
ग्रं. सं. ठाणे
चरित्र
१०५२
१८६२



# मुकांचे गुरुदेव

REFBK-0012367

महाराष्ट्र राज्य रवींद्रनाथ टागोर जन्म-शताब्दि समितीचें प्रकाशन :

# मुलांचे गुरुदेव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम 33903 वि:
क्रमांक 9052 नों: दि:

संपादिका–अनुवादिका
सौ. सरोजिनी कमतनूरकर

रा. क. 92360
REFBK-0012367


चित्र ... ान, पुणें २

प्रकाशक
महाराष्ट्र राज्य रवीन्द्रनाथ टागोर
जन्म-शताब्दि समितीकरिता
**दामोदर पांडुरंग रानडे**
व्यवस्थापक : चित्रशाळा प्रकाशन,
५६२ सदाशिव पेठ : पुणें २.

प्रथमावृत्ति १९६२

मुद्रक
**दामोदर त्र्यंबक जोशी**
व्यवस्थापक : चित्रशाळा प्रेस,
५६२ सदाशिव पेठ, पुणें २.

**किंमत आठ रुपये**



# अनुक्रमणिका


निवेदन ७–९

प्रस्तावना ११–१५

गुरुदेवांचें अल्पचरित्र १७–२५

शिवस्मरण ३०

**आत्मचरित्र**

गुरुदेवांच्या शब्दांत गुरुदेवांचें लहानपण १ ते ७१

**नाट्यविभाग**

मालिनी ७४–९३

विसर्जन ९४–१०६

**प्रवासवर्णनें**

युरोप प्रवाशाचीं पत्रें १०९–१३०

जाव्हा प्रवासांतील पत्रें १३१–१४७

**गुरुदेवांच्या गोष्टी**

गुप्तधन १५०–१७५

कांबुलिवाला १७६–१८७

निबंध


| | |
|---|---|
| स्वतंत्रशिक्षण | १९०–१९५ |
| भारतवर्षाचा इतिहास | १९६–२०५ |


काव्यविभाग


| | |
|---|---|
| लक्ष्मणभाई असेल जर का | २०८–२११ |
| दोन बिघे जमीन ( गद्यानुवाद ) | २१२–२१५ |
| हिंग् टिंग् छट् ! | २१६–२२४ |
| रंगपंचमी ( गद्यानुवाद ) | २२५–२२७ |
| चरम-मूल्य | २२८–२३० |
| जोड्यांची जन्मकथा ( गद्यानुवाद ) | २३१–२३४ |
| चित्रवती | २३५–२३८ |
| देवतेचा घांस ( गद्यानुवाद ) | २३९–२४४ |
| बंदीवीर | २४५–२४७ |
| जीवनीं केली पूजा | २४८ |


* * *

स्थळप्रत
वि:
नों. दि:

# निवेदन

रवींद्र-जन्मशताब्दिनिमित्त महाराष्ट्र राज्याच्या संवर्धी समितीनें रवींद्र-नाथांचें कांहीं वाङ्मय मराठींत प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. त्यांत मुलांसाठीं एक स्वतंत्र पुस्तक काढावयाचें योजून, त्या पुस्तकाची सर्व सिद्धता करण्याचें काम मजवर सुपूर्त करण्याचें समितीनें ठरविलें आणि त्याप्रमाणें मला कळविण्यांत आलें. अर्थातच, मला मनापासून आनंद वाटला. हें काम सर्वस्वीं मजकडे सोंपविल्याबद्दल सुरुवातीसच महाराष्ट्र-सरकारचे, उपरोक्त समितीचे आणि प्रकाशन-समितीचे मी मनःपूर्वक आभार मानते.

'**मुलांचे गुरुदेव**' हें पुस्तक मुलांसाठीं, याचा अर्थ तें अगदीं लहान मुलांसाठीं, म्हणजे बालवाङ्मय नाहीं; सुमारें बारा तेरा वर्षांच्या मुलांपासून तों अठरावीस वर्षें वयाच्या मुलांमुलींना उपयुक्त व्हावें, ही दृष्टि ठेवून या पुस्तकाची योजना आणि संपादन केलेलें आहे. त्याच दृष्टीनें पुस्तकांतील लेखांची निवड करण्यांत आलेली आहे; एकंदरीनें, त्यांतल्या-त्यांत रवींद्र-वाङ्मयाचें मुलांना प्रातिनिधिक स्वरूपाचें दर्शन व्हावें हा हेतु; तरी देखील, पुस्तक अपुरेंच आहे. त्यांच्या एखाद्या कादंबरीचें कथानक, कांहीं विनोदी लेख, असें आणखी कांहीं यांत समाविष्ट करतां आलेलें नाहीं, याची मला जाणीव आहे. सारें थोडें थोडें घालावयाचें, तर पुस्तक फार मोठें झालें असतें आणि त्याचे भाग पाडावे तर अर्धवटपणा आला असता.

पुस्तकांतील गुरुदेवांचें लिखाण मूळ बंगालीवरूनच मी अनुवादित केलेलें आहे. नाहीं म्हणायला, नाट्यविभागांत घातलेला 'मालिनी'चा अनुवाद तेवढा त्यांच्या इंग्रजीवरून केला आहे. कारण, मूळ बंगाली नाटिका पुष्कळ प्रयत्न करूनहि मला शेवटपर्यंत मिळूं शकली नाहीं.

अनुवाद करतांना, तो अनुवाद नसून, मूळ मराठींतच लिहिलेलें पुस्तक आहे, असें वाटावें, इतपत सफाईदारपणा त्यांत आणण्याचा मी प्रयत्न केला आहे, हें विनम्रपणें नमूद करावेंसें वाटतें. अर्थातच, तसें करतांना, मूळच्या मजकुरांत बदल मात्र मी होऊं दिलेला नाहीं. उदाहरणार्थ, दुसऱ्या कांहीं पुस्तकांत, 'जोड्याचा शोध' या कवितेच्या गोष्टींत, मुळांत हबुचंद्र राजाच्या पायाला धूळ लागली असतां, खुशाल त्याच्या पायांत कांटा मोडण्यांत आला आहे; असला प्रकार मी होऊं दिलेला नाहीं. कांहीं कवितांचा काव्यांतच अनुवाद करण्याची दखल घेतली आहे; आणि शक्यतों त्यांच्या मूळच्या वृत्तांतच तो करण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या रवींद्र-जन्मशताब्दि समितीचे संयुक्त चिटणीस **श्री. शं. ह. आडिवरेकर** यांनीं विशेष सहानुभूतीनें या पुस्तकाच्या पूर्ततेसाठीं हरतऱ्हेनें साहाय्य केलें. दुसरें कितीहि काम असलें, तरी कधींहि कंटाळा केला नाहीं. त्यांच्या कळकळीच्या साह्याबद्दल मी त्यांचे आभार मानूं तरी कसे?

पुस्तकाच्या सजावटीसाठीं चित्रकार **श्री. द. ग. गोडसे** यांनीं ज्या हौसेनें साहाय्य केलें, त्याबद्दल त्यांचे आभार मानायलाच हवेत. तीच गोष्ट चित्रशाळेच्या व्यवस्थापकांची; **श्री. दा. पां. रानडे** यांनींहि तितक्याच हौसेनें पुस्तकाच्या छपाईचें काम तांतडीनें करून दिलें, त्याबद्दल त्यांचीहि मी अवश्य ऋणी आहे. मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ् आर्टचे ख्यातनाम **प्रिंसिपल श्री. दादासाहेब आडारकर** यांनीं चित्रांची छपाई करवून घेणें, ब्लॉक्स करवून देणें, एक ना दोन, नाना तऱ्हेनीं जी आत्मीयता दाखविली, त्याबद्दल त्यांचे आभार मानायला माझ्यापाशीं शब्द नाहींत. 'काबुलिवाल्या'च्या गोष्टींत घालण्यासाठीं, सुप्रसिद्ध सिनेनिर्माते श्री **बिमल रॉय** यांनीं श्री. बलराजसहानींचा काबुलिवाल्याच्या वेषांतील फोटो मुद्दाम काढून दिला याबद्दल मी त्यांची मनापासून आभारी आहे.

**श्री. सहानी** शांतिनिकेतनचे विद्यार्थी; शांतिनिकेतनमध्यें कांहीं काळ अध्यापनाचें काम त्यांनीं केलेलें; गुरुदेवांच्या शांतिनिकेतनमधील या विद्यार्थ्यानें मोठा कलावंत म्हणून नांवलौकिक मिळविला आणि गुरुदेवांच्या 'काबुलिवाला' या कथेवर आधारलेल्या चित्रपटांत काबुलि-

वाल्याची भूमिका केली. त्यामुळें, त्यांच्या काबुलिवाल्याच्या वेषांतील छायाचित्राला विशेष सौंदर्य प्राप्त झालेलें आहे.

**श्री. मामासाहेब देवगिरीकर** आणि **श्रीमती माया चिटणीस** यांनीं आपल्या जवळचीं बंगाली पुस्तकें मला हवीं तेव्हां दिल्यानें माझें काम फार सुकर झालें. त्या उभयतांचेहि आभार मानल्याशिवाय राहवत नाहीं.

याशिवाय ज्यांनीं ज्यांनीं मला अमूल्य साहाय्य केलें, त्या कोणाचे मी आभार मानण्याच्या भरीस पडतच नाहीं. राहूं दे ऋण तसेंच माझ्यापाशीं.

थोडक्यांत म्हणजे, सर्वांच्या प्रेमाच्या ऋणानेंच हें पुस्तक नटलें आहे !

मुद्रितें शक्य तितक्या कसोशीनें तपासलीं आहेत. तथापि कांहीं अशुद्धें, नजरचुकीनें राहिलीं असण्याचा संभव आहे. त्या दोषांबद्दल 'क्षमस्व.'

**सौ. सरोजिनी कमतनूरकर**
संपादिका

... स... ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३३९०७ दि: ...
क्रमांक ...१०५...२... नों: दि: ...२३-५-८२

# प्रस्तावना

मुलें गुरुदेव रवींद्रनाथ ठाकुर यांचा जीवप्राण होतीं. बहुतेक लोक मोठे झाल्यावर आपलें लहानपण विसरतात. परंतु, गुरुदेव आपल्या लहानपणच्या भावना, आशा-आकांशा कधींहि विसरले नव्हते. म्हणूनच त्यांना मुलांचें मन इतकें सुस्पष्टपणें कळलें होतें. मुलांवर त्यांचें नुसतें प्रेम होतें असें नाहीं, तर मुलांविषयीं त्यांच्या मनांत प्रगाढ आदर होता. मुलांच्या नैसर्गिक शक्तीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. म्हणून तर त्यांच्या वाङ्मयांत मुलांना येवढें महत्त्व आहे !

गुरुदेवांच्या मनांत मुलांबद्दल काय भावना होती, तें त्यांच्या 'चरम-मूल्य' ( सर्वोत्तम मूल्य ) या कवितेंत स्पष्टपणें व्यक्त झालें आहे. ती कविता या पुस्तकांत आहे. कवीच्या शिरावरील ओझें योग्य किंमत देऊन, हलकें करण्याचें काम राजा, वृद्ध, तरुणी या कोणालाहि करतां आलें नाहीं; पण, समुद्राच्या वाळवंटींत खुशाल खेळत असलेल्या एका छोट्या मुलानें, सहज लीलया, हंसून, विनामूल्य तें ओझें हलकें केलें, कवीला जिंकून घेतलें !

" .........

.........

विनामूल्य मज खरीदलें

क्रीडानंदें क्षणकालें ! "

या शेवटच्या ओळींत मुलांची निरागस शक्ति किती सुंदर दिसते आहे.

या पुस्तकांत समाविष्ट केलेल्या कविता——आणि बाकीचें वाङ्मयहि मुलांची लहान मोठी वयोमर्यादा लक्षांत घेऊन वेंचलें आहे. कांहीं कवितांचा काव्यांत अनुवाद केला आहे, तर कांहींचा गद्यानुवाद केलेला आहे. त्या कवितांची विविधता आणि सौंदर्य, यांचें निराळें वर्णन करायला हवें असें नाहीं. '**हिंग्, टिंग्, छट्!**' ही उपरोधात्मक विनोदगर्भ कविता जितकी मार्मिक, तितकेंच '**रंगपंचमी**' मधील रजपूत राणीचें शौर्य, आणि काव्यसौंदर्य, '**बंदीवीर**' मधील शीख वीर पुरुष 'बंदा' ची धीरोदात्तता, अंधश्रद्धेचे परिणाम दाखविणाऱ्या '**देवतेचा घांस**' मधील मुलाचें बलिदान, आणि '**वनवास**' मधील राम होण्याची हौस असलेल्या मुलाच्या मनाचा निष्कपटपणा हृदयस्पर्शी आहे. '**बिंबवती**'चें रूप कांहीं आगळेंच आहे. एकंदरीनें साऱ्याच कविता मनोरम आहेत.

गुरुदेवांना एकदां 'मुलांसाठीं खास कांहींतरी लिहा' असा आग्रह करण्यांत आला होता. तेव्हां, आपल्या लहानपणांत पुनः प्रवेश करून, त्यांनीं आपल्या लहानपणचें शब्दचित्र रेखाटलें आणि त्या पुस्तकाचें नांव ठेवलें '**छेलेबेला;**' म्हणजे 'लहानपण.' '**छेलेबेला**' हें गुरुदेवांचें भारी मनोहर चित्रण आहे. अगदीं सोप्या भाषेंत, मुलांना गोष्टी सांगितल्या-प्रमाणें त्यांनीं आपल्या लहानपणच्या हकीकती मनमोकळेपणानें सांगितल्या आहेत. या पुस्तकावरून, गुरुदेवांच्या लहानपणीं कलकत्ता शहर कसें होतें, त्यांच्या घरची परिस्थिति आणि वातावरण कसें होतें, समाजाचे रीति-रिवाज काय होते, याची जितकी सुंदर कल्पना येते, तितकीच गुरुदेवांच्या बालमनाच्या भावनांची भूमिका कळते. थोडक्यांत, '**छेलेबेला**' एक सुंदर चित्र, गद्यकाव्य आहे. म्हणून, मराठी मुलांमुलींसाठीं मुद्दाम त्याचा अनुवाद या पुस्तकांत '**गुरुदेवांच्या शब्दांत गुरुदेवांचें लहानपण**' या मथळ्यानें सर्वांआधीं घातला आहे.

'छेलेबेला'ची भाषा अगदीं सोपी, बोलल्यासारखी, तर त्यांच्या निबंधांची भाषा जरा प्रौढ, त्या त्या विषयाला उपयुक्त अशी आहे. मुलां-साठीं पुस्तक, म्हणजे सारेंच्या सारें अगदीं सोपें, लुसलुशीत ठेवण्यापेक्षां, गुरुदेवांचे गंभीर विचाराचे, गंभीर भाषाशैलीचे नमुनेहि मुलांना पाहायला मिळावेत, या उद्देशानें या पुस्तकांतील निबंधांची निवड केली आहे.

'स्वतंत्र शिक्षण' हा निबंध म्हणजे, गुरुदेवांनीं शांतिनिकेतनमधील शालान्त परीक्षेनंतर विश्वविद्यालयांत जाणाऱ्या मुलांपुढें केलेलें एक भाषण आहे. यांत त्यांच्या शिक्षणविषयक व्यापक विचारसरणीचें सुरेख दर्शन झालेलें आहे. तसेंच, आपण भारताचा इतिहास वाचतो, शिकतो, पण वास्तविक इतिहास म्हणजे काय, आणि तो कोणत्या दृष्टिकोनांतून शिकणें अवश्य आहे, याचें उद्बोधक दिग्दर्शन गुरुदेवांनीं 'भारतवर्षाचा इतिहास' या निबंधांत केलें आहे. दोन्ही निबंध कदाचित् मुलांना थोडेंफार अवघड वाटलेंच, तर शिक्षक-पालकांनीं ते त्यांना समजावून द्यावेत. इतकेंच काय, यापुढें निघणाऱ्या मराठी भाषेच्या क्रमिक पुस्तकांतहि त्या निबंधांचा समावेश करायला हवा, असें कांहीं विद्वानांचें मत आहे.

असाच, थोडासा अवघड वाटणारा दुसरा एक भाग, म्हणजे नाट्य-विभागांत घातलेला 'मालिनी' या नाटिकेचा अनुवाद. गुरुदेवांच्या उदात्त कल्पनेची चुणूक मुलांना दिसावी, या हेतूनें या अनुवादाची योजना केली आहे. 'मालिनी' सन १८९५-९६ मध्यें प्रसिद्ध झालें.

कडव्या निष्ठेच्या माणसाला नवे विचार जराहि स्वागतार्ह वाटत नाहींत. त्याचें मन एकाच चाकोरींत सांपडलेलें असतें, जुन्यापुराण्या सांध्यांत अडकून राहिलेलें असतें. आपल्या विचारसरणीहून निराळ्या, नव्या विचारांचें, तत्त्व-प्रणालींचें त्याला वावडें असतें; त्यामुळें त्याचें पित्त ढवळून उठतें आणि कडवेपणा त्याच्या रक्तांत भिनून जातो. धर्मकडव्या माणसाच्या बाबतींत तर असा अनुभव अधिकांत अधिक खरा ठरतो, पूर्वापार ठरत आलेला आहे. कारण, आपलीं निष्ठामूल्यें चिरंजीव तत्त्वांच्या कडेकोटांत बंदिस्त असल्यानें त्यांना कोणीहि स्पर्श करूं शकत नाहीं, असा त्याचा आंधळा विश्वास असतो. अन्य धर्म, नवनव तत्त्वें, प्रकाशिलेलीं सत्यें, त्यांवर आधारलेली नवीन आचारसरणी, या साऱ्यांना अधःपाताचे, पापाचे घाट-उतार मानून धर्मवेडा त्यांना तिरस्करणीय समजूं लागतो; शक्य कोटींतील वाटल्यास परका धर्म, त्याचीं तत्त्वें, इत्यादींचा सत्यानाश करण्याकरितां तो स्वतःच्या जीवाचें रान करायलाहि मागेंपुढें पाहात नाहीं. कोणताहि आततायीपणा परिणामीं एकासह अनेकांच्या दुःखाला, प्रसंगीं सर्वनाशालाहि कारणीभूत होतो; या मानवी जीविताशीं संलग्न असलेल्या सत्याचें 'मालिनी' नाटिकेंत उत्कटतेनें प्रात्यक्षिक चित्रित करण्यांत आलें आहे.

हें नाटकहि मोठ्यांनीं मुलांना समजावून द्यायला हवें, आणि शक्य तर या नाटिकेचा प्रयोगहि करतां येण्यासारखा आहे.

वरील दोन्ही निबंध आणि ही नाटिका किशोर काल संपवून तारुण्याच्या देहलीवर उभे असलेल्या मुलांमुलींसाठीं आहे.

पूर्वी देवीपुढें जीवबलि देण्याची जी अमानुष प्रथा होती त्यांतील भीषणता दाखवून, प्रेमाचा, अहिंसेचा व शांतीचा संदेश देण्यासाठीं '**विसर्जन**' नाटक गुरुदेवांनीं सन १८९० मधें लिहून प्रसिद्ध केलें. त्या नाटकाची नुसती कथा या पुस्तकांत दिली आहे; तीहि परिणामकारक अशीच आहे.

प्रवास-वर्णनांची त्यांची शैली पुनः अगदीं स्वतंत्र आहे. भाषाहि अगदीं सोपी. रवींद्रनाथ वयाच्या सतराव्या वर्षी जेव्हां पहिल्यानें युरोपला गेले, त्या वेळीं त्यांनीं लिहिलेलीं '**युरोप प्रवाशाचीं पत्रें**' मुद्दाम वाचण्यासारखीं आहेत. त्या पत्रांच्या रूपानें रवींद्रनाथांनीं बंगाली साहित्यांत बोली भाषेची प्रस्थापना केली. या पत्रांत त्यांचा मार्मिक, हळुवार विनोद, त्यांची त्या वयांतली निरीक्षण-शक्ति, आणि तोंवरच्या त्यांच्या वाचनादि व्यासंगाचा प्रत्यय आपल्याला पावलोपावलीं येतो. या पत्रांविषयीं स्वतः गुरुदेवांनीं मात्र पुढें म्हटलें, "......पहिल्यानें गेलों होतों विलायतेला. या पत्रांतून वस्तुस्थितीहून माझा तेव्हांचा अहंकारच अधिक व्यक्त झाला आहे. त्या वयांत तसें होतें. दुसऱ्यांचें जें चांगलें त्याचें रसग्रहण करण्याची ताकद मनुष्याच्या अहंकारापुढें दुबळी असते. दुसऱ्यांच्या अवमानाच्या प्रयत्नांत आपलाच अवमान होत असतो, हें कळण्याचें वय तेव्हां माझें नव्हतें. त्यामुळें, पुष्कळांनीं आग्रह केला, तरीहि बरेच दिवस हीं पत्रें प्रसिद्ध केलीं नव्हतीं; पण, तीं झांकून राहणार किती दिवस?—असो. या पत्रांतील साराच भाग ग्राह्य नाहीं, कांहीं भाग त्याज्य आहे, येवढेंच मी सांगून ठेवतो." या म्हणण्यांत, आपल्या अपक्व बुद्धीची चूक गुरुदेवांनीं प्रांजलपणें, जाहीरपणें कबूल केली असली, तरी पत्रांतील साहित्यिक आणि ज्ञान-मूल्य फार मोठें आहे. त्याचप्रमाणें, '**जाव्हा प्रवासांतील पत्रें**' हीं वाचकांना मनोरंजक आणि माहितीपूर्ण वाटण्यासारखींच आहेत.

'**गुप्तधन**' आणि '**काबुलिवाला**' या त्यांच्या कथा सर्वतोमुखीं झालेल्या आहेत. मुलांच्या या पुस्तकांतहि त्यांना कायम स्वरूप असावें, म्हणून त्या समाविष्ट केल्या आहेत. या कथांचे दुसऱ्यांनीं अनुवाद केले

असले, तरी या पुस्तकांतील अनुवाद मी स्वतंत्रपणें, मूळ बंगालीवरून केले आहेत.

एकंदरीनें, सारेंच पुस्तक शक्य तितकें मनोरंजक करण्याचा प्रयत्न केला आहे.

——जगांत संपूर्ण आणि निर्दोष काय आहे ? या पुस्तकांतहि अपुरे-पणा आणि दोष असणार, यांत नवल नाहीं. जेवढें चांगलें आहे, तो गुरुदेवांचा आशीर्वाद आहे. त्याचा कोणीहि आनंदानें स्वीकार करीलच. जे दोष आहेत, त्यांना मी जबाबदार आहे.

पण, शेवटीं, विनम्रपणें मला गुरुदेवांच्या शब्दांत येवढें म्हटल्यावांचून राहावत नाहीं.——

जीवनीं केली पूजा, अपुरी राहिली
जाणितो तरी ना ती विफल जहाली !
" जीवने यत पूजा हल ना सारा
जानी हे जानी ताओ हयनि हारा ! "

सांगली-मिरज
भाद्रपद, शुद्ध चतुर्दशी,
शके १८८३
(ता. २३ सप्टेंबर, १९६१)

सौ. सरोजिनी कमतनूरकर



परदेशांत रवींद्रनाथ



रवींद्रनाथ व मृणालिनीदेवी ( रवींद्रनाथांच्या पत्नि )

33703
9234



# गुरुदेवांचें अल्पचरित्र

गुरुदेवांनीं आपल्या एका कादंबरीच्या ‘ सूचनें ’ त लिहिलें आहे, ‘ आरंभाचाहि प्रारंभ असतो. ’ तेव्हां, गुरुदेवांच्या अल्पशा चरित्राला सुरुवात करतांना, त्याच्या ‘ आरंभाच्या प्रारंभा ’ ची हकीकत सांगणें योग्यच होईल. ती पुष्कळांना मनोरंजकहि वाटेल.

फार फार वर्षांपूर्वी यशोहर-खुलना गांवांत **जगन्नाथ कुशारि** नांवाची एक व्यक्ति राहात होती. जगन्नाथ कुशारींचें आपल्या आप्तेष्टांशीं पटेनासें झालें. तेव्हां, आपलीं बायका-मुलें घेऊन, ते नावेंत बसून गोविंदपूरला आले. गोविंदपूर हें शहर तेव्हां इंग्रज व्यापाऱ्यांचें गांव होतें. कलकत्त्याला इंग्रजांनीं नुकताच आपला व्यापार-व्यवसाय सुरू केला होता. जगन्नाथांनीं त्या गांवांतल्या अस्पृश्य आणि खालच्या वर्गांतल्या वस्तींत ठाण मांडलें. तेथें ब्राह्मणाचा उंबरा नव्हता. त्या लोकांना आपल्यांत एक ब्राह्मण-कुटुंब राहायला आल्याचा अतिशय आनंद झाला. बंगालींत ब्राह्मणाला ‘ठाकुर’ म्हणतात; देवालाहि ठाकुर म्हणतात; आणि त्या काळीं ब्राह्मणांना देवासारखेच पवित्र मानीत, मान राखीत त्यांचा. त्या वस्तींतले लोक वरचेवर ‘ ठाकुर-मॉशाई आले ’( ‘ठाकुर महाशय आले’) ‘ ठाकुर मॉशाई आले, ’

असें म्हणूं लागले. 'ठाकुर' हा शब्द त्या मंडळींच्या तोंडांतून जगन्नाथ कुशारींबद्दल वारंवार निघूं लागला; आणि होतां होतां कुशारींचें नांवच 'ठाकुर' झालें. इंग्रज व्यापारी, आगबोटीवाल्यांच्या मालावर जगन्नाथ देखरेख करूं लागले. ते व्यापारीहि जगन्नाथांच्या नांवापुढें कुशारीऐवजीं ठाकुरच लिहायला लागले. साहेबांनीं 'ठाकुर' चें केलें 'टेगोर.' Tagore किंवा Tegowre असें साहेब तें नांव लिहूं लागले. गुरुदेवांच्या उपनांवाचा असा अभिनव इतिहास आहे. महाराष्ट्रांतल्या कांहीं मंडळींची समजूत आहे, कीं रवींद्रनाथांनीं आपल्या नांवाला 'साहेबावाणी' रूप देण्यासाठीं आपलें आडनांव ठाकुर असतांना 'टेगोर' असें लिहायला सुरुवात केली; पण ही समजूत गैरसमजूत आहे.

याच घराण्यांतल्या **नीलमणि ठाकुरना** ईस्ट इंडिआ कंपनीची दिवाणगिरी मिळाली; नंतर ते ओरिसांत कलेक्टरकचेरींत काम करूं लागले. त्यांनीं चांगला पैसा मिळविला आणि गंगेच्या कांठावर असलेल्या 'पाथुरिआ घाटा' गांवांत घरदार केलें. पुढें तें घर, शेतीवाडी त्यांनीं आपल्या भावाला देऊन टाकली, आणि एक लाख रुपये घेऊन गांव सोडलें.

कलकत्त्याच्या चित्पूर रस्त्याच्या पूर्वेला जोडासांकोजवळ नीलमणि ठाकुरांनीं जमीन विकत घेतली आणि घर बांधलें. ही हकीकत आहे, वॉरन हेस्टिंग्सच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटींच्या वेळेची, म्हणजे सन १७८४ मधली. त्या वेळीं त्या वाडीचें नांव होतें, 'मेछोबाजार' (मासळीबाजार); त्यानंतर बरेच दिवसांनीं त्या वाडीचें नांव झालें 'जोडासांको.'

नीलमणि ठाकुरांच्या घराण्यांत गुरुदेवांचे आजोबा **द्वारकानाथ** यांचा जन्म झाला. द्वारकानाथांच्या वेळेपासून ठाकुरांच्या घराण्यांत धनसंपत्ति आली, मानसन्मान वाढला, त्यांना प्रतिष्ठा मिळाली. कालक्रमानें द्वारकानाथ ठाकुर त्या वेळचे कलकत्त्याचे एक बडे उद्योगपति झाले. विद्वान, बुद्धिबळीवंत, धनी असा त्यांचा नांवलौकिक झाला. साऱ्यासाऱ्यांना त्यांच्याविषयीं आदर वाटूं लागला. त्यांनीं पैसा कमावला, तसा मोकळ्या हातांनीं खर्चहि केला. मनानें रसिक, दिलदार अन् हातानें उदार होते ते. लोक त्यांना 'प्रिन्स द्वारकानाथ' म्हणत. ते राजा राममोहन राय यांचे कालीन आणि मित्र होते.

गुरुदेवांचे वडील **देवेंद्रनाथ** हे द्वारकानाथांचे चिरंजीव. त्यांनीं राममोहन

रायांच्या ब्राह्मधर्माची दीक्षा घेतली होती. ( ता. १२ डिसेंबर १८४३ ). त्यांना एके दिवशीं उपनिषदाचें एक फाटकें पान सांपडलें होतें; त्यावर होतें–' सर्व ठायीं परमेश्वराचें अधिष्ठान आहे, तो देईल तें आनंदानें घ्या, दुसऱ्याच्या संपत्तीवर लक्ष देऊं नका '–आणि तेंच वाक्य देवेंद्रनाथांच्या आयुष्याचा मूलमंत्र झाला.

द्वारकानाथ विलायतेंत मरण पावले. त्यांचा व्यापार-व्यवसाय आणि जमीन-जुमल्यांची सर्व जबाबदारी तरुण देवेंद्रनाथांवर पडली. बरीच शेतीवाडी विकून, त्यांनीं पित्याचें व्यापार-व्यवसायांतलें कर्ज फेडलें; द्वारकानाथांनीं लोकांना देणगी, वर्गणी देण्याविषयीं दिलेले शब्दहि पित्याचें ऋण समजून, देवेंद्रनाथांनीं लक्षावधि रुपये वर्गणीरूपानें किती तरी वर्षें दिले.

देवेंद्रनाथांचा प्रापंचिक आणि आध्यात्मिक संघर्ष त्यांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रावरून आपल्या ध्यानांत येतो. महर्षि देवेंद्रनाथांचें आत्मचरित्र म्हणजे बंगाली साहित्याचा एक मौलिक आणि अपूर्व ठेवा आहे. निरनिराळ्या धर्मग्रंथांचें पारायण करून आपल्या धार्मिक श्रद्धेस अनुसरून त्यांनीं ' ब्राह्मधर्म ' या नांवाचा एक स्वतंत्र धर्मग्रंथ लिहिला.

बंगाली पौष सप्तमीला देवेंद्रनाथांनीं ब्राह्मधर्माची दीक्षा घेतली होती. तो दिवस त्यांच्या आणि रवींद्रनाथांच्याहि आयुष्यांत एक पवित्र दिवस ठरला. त्या दिवशीं ' सातुई पौष ' ( पौष सप्तमी ) या नांवानें ते उत्सव साजरा करीत. एका पौष सप्तमीला बोलपूर-शांतिनिकेतन येथें ' ब्रह्ममंदिरा 'ची प्रतिस्थापना झाली आणि त्यानंतर दहा वर्षांनीं गुरुदेवांनीं पौष सप्तमीलाच शांतिनिकेतनमधें ' ब्रह्मचर्याश्रमा 'ची स्थापना केली. याप्रमाणें गुरुदेवांच्या जीवनांत पौष सप्तमीला अनेकाविध महत्त्व होतें. शांतिनिकेतनमधें ' सातुई पौष ' ला मोठ्या जल्लोषानें हा उत्सव होतो, मेळावा भरतो. गुरुदेव आपल्या आयुष्यांतल्या अखेरच्या पौष सप्तमीचें पुण्यस्मरण करायला विसरले नाहींत. ' ब्राह्मधर्म ' हा ग्रंथ गुरुदेवांचा सततचा सोबती होता.

महर्षि देवेंद्रनाथांना एकूण पंधरा मुलें होतीं. रवींद्रनाथ चौदावें. रवींद्रनाथांचा जन्म ता. ७ मे सन १८६१ मधें जोडासांकोच्या वाड्यांत झाला आणि त्याच वाड्यांत त्यांचा अंतहि झाला. ऐंशी वर्षांहून अधिक काळ

गुरुदेवांचा त्या वाड्याशीं जिव्हाळ्याचा संबंध असल्यामुळें, त्यांच्या जन्म आणि मृत्यु या दोन्ही दिवशीं बंगाली लोक त्या वाड्याचें दर्शन घ्यायला जातात.

रवींद्रनाथांच्या आईचें नांव होतें शारदा देवी. येवढ्या मोठ्या प्रपंचाचा सारा कारभार त्याच पाहात असत. देवेंद्रनाथ बाहेरगांवींच फार करून असायचे; लेकी-सुना आपापल्या मुलांबाळांच्या व्यापांत गुरफटलेल्या असत. त्यामुळें, अशा गजबजलेल्या थोर प्रपंचाचा गाडा सुरळीत चालूं ठेवण्याची मोठी जबाबदारी शारदादेवींवर होती.

रवींद्रनाथांचें लहानपण,त्या वेळच्या थोरामोठ्यांच्या घरच्या रीतिरिवाजाप्रमाणें,नोकर-चाकरांच्या सान्निध्यांत कसें गेलें, त्यांच्या वडील बंधूंनीं त्यांच्या शिक्षणासाठीं काय काय आणि कसकसे उपाय योजले होते, रवींद्रनाथांचें मन शाळेच्या ठराविक चाकोरीच्या शिक्षणाला कंटाळत असलें, तरी घरच्या घरीं त्यांना किती ज्ञान मिळूं शकलें, इत्यादींबद्दल याच पुस्तकांतील ‘गुरुदेवांच्या शब्दांत गुरुदेवांचें लहानपण’ या भागांत सविस्तर माहिती दिली असल्यानें, त्याची पुनरुक्ति करण्याची आवश्यकता नाहीं. येवढें मात्र लिहायला हवें, कीं वयाच्या बाराव्या वर्षीं ( सन १८७३ ) मधें त्यांची मुंज झाली; तेव्हांपासून गायत्रीमंत्राचा त्यांच्या मनावर फार मोठा प्रभाव पडला. ‘भुर्भुवःस्वः’ असें म्हणून ते त्या वयांतहि आपलें मन व्यापक बनविण्याचा प्रयत्न करीत असत. पुढें त्या मंत्राचा अर्थ त्यांना आपोआप कळूं लागला.

घरच्या घरीं जेव्हां त्यांचा अभ्यास व्हावा तसा, मनाजोगा होईना, तेव्हां रवींद्रनाथांना बॅरीस्टरीसाठीं विलायतेला पाठवायचें ठरलें. त्या आधीं, म्हणजे वयाच्या सतराव्या वर्षीं ते पहिल्यानदां महाराष्ट्रांत आले. त्यांचे एक वडील बंधु सत्येंद्रनाथ ठाकुर त्या वेळचे पहिले आय्. सी. एस्. ते अहमदाबादला होते त्या वेळीं. विलायतेला जाण्यापूर्वी इंग्रजीची चांगली तयारी करण्यासाठीं आधीं रवींद्रनाथांना अहमदाबादेस सत्येंद्रनाथांकडे पाठविण्यांत आलें. सत्येंद्रनाथ अहमदाबादला शाहीबागेंत राहत असत. त्यांची पत्नी आणि मुलें विलायतेला होतीं. त्यामुळें, ते कोर्टांत गेले, कीं येवढ्या मोठ्या वाड्यांत रवींद्रनाथ एकटेच असत. कधीं सत्येंद्रनाथांच्या लायब्ररींत डिक्शनरीच्या साहाय्यानें इंग्रजी पुस्तकें वाचीत बसत, तर कधीं लिहीत बसत कांहीं तरी. त्या मुक्कामांत त्यांनीं बरेच

लेख आणि कविता लिहिल्या-पैकीं बहुतेक कविता मूळ संस्कृत, इंग्रजी किंवा मराठीवरून लिहिल्या. सत्येंद्रनाथांना उत्तम मराठी येत होतें. त्यांच्यापाशीं मराठी शिकणें, मराठी वाङ्मय समजून घेणें रवींद्रनाथांना सोपें झालें होतें. अभ्यासाचा किंवा लिहिण्याचा कंटाळा आला, कीं रवींद्रनाथ एकटेच गच्चीवर फिरत असत; मनांतल्या कल्पनांना भाषेचें रूप देत, काव्याला सूर देत. म्हणजे, अहमदाबादेस रवींद्रसंगीताचा जन्म झाला, असें म्हणायला हरकत नाहीं.

परंतु, अशा प्रकारें एकट्याएकट्यानें, स्वावलंबनानें रवींद्रनाथांचा व्हावा तसा इंग्रजीचा अभ्यास, बोलण्या-सवरण्याची संवय होईना. म्हणून, सत्येंद्रनाथांनीं त्यांना मुंबईला आपले स्नेही दादोबा पांडुरंग यांच्याकडे पाठविलें. तें कुटुंब इंग्रजीबद्दल, साहेबी चालचलणुकीबद्दल प्रख्यात होतें. दादोबांची बिलात-फिरत कन्या ॲना तर्खड यांच्यापाशीं रवींद्रनाथ इंग्रजी शिकूं लागले. ॲनाबाई रवींद्रनाथांहून वयानें थोड्या मोठ्या होत्या आणि त्यांना रवींद्रनाथांचें फार कौतुक वाटे.

वयाच्या सतराव्या वर्षीं (सन १८७८) रवींद्रनाथ पहिल्यानें विलायतेला गेले. त्या वेळीं त्यांनीं विलायतेहून लिहिलेलीं पत्रें—'युरोप प्रवाशीर पत्र' (युरोप प्रवाशाचीं पत्रें)— त्या वयाच्या त्यांच्या बुद्धिवैभवाची साक्ष देतात. त्या पत्रांची भाषा त्यांनीं मुद्दामच बोलल्यासारखी वापरलेली होती. बंगाली साहित्यांत बोली भाषा रवींद्रनाथांनीं रूढ केली. त्या काळांत, बाहेरच्या जगांत भारताला मान नव्हता. वरचेवर परदेशांत जाणेंहि इतकें सोपें नव्हतें. असें असतां, गुरुदेव एकूण बारा वेळां विलायतेला गेले. सारें जग पाहून आले. भारतीय संस्कृतीचा प्रसार त्यांनीं केला आणि तिकडील जें चांगलें तें टिपून घेतलें. त्या काळीं गुरुदेवांनीं जगांत भारताला मानाचें स्थान मिळवून दिलें. परदेशांत ते फिरत असतां ठिकाठिकाणीं व्याख्यानें देत असत. अलोट समुदाय जमून त्यांचे कितीतरी सत्कार-समारंभहि झाले. सारें विश्व हिंडून त्यांना 'अमृताचा शोध' लागला होता. मानव म्हणजे 'अमृतस्य पुत्राः' हें त्यांना कळलें होतें. म्हणूनच त्यांनी गायिलें आहे—

"विश्व-जनांच्या पायाखालीं धूलिमय जी भूमि—
—तीच स्वर्गभूमि
सर्वांठायीं, सर्वांभूतीं लपला जो स्वामी
तोच मम स्वामी."

सर्व जगाच्या उच्चतम संस्कृतींचा मिलाफ करून गुरुदेवांनीं एका नव्या संस्कृतीचा पाया रोंवला. त्यांचें **शांतिकेतन** आणि **विश्वभारती** या संस्था त्या संस्कृतीची जोपासना करूं शकतील, एवढा जीव गुरुदेवांनीं त्या संस्थांत ओतला. महर्षि देवेंद्रनाथ यांनीं सन १८७३ मधें बोलपूर स्टेशन-पासून मैल दीड मैलावर सुमारें वीस बिघे जमीन खरेदी केली होती आणि छोटीशी चुनेगच्ची इमारत बांधून त्याचें '**शांतिनिकेतन**' असें नांव ठेवलें होतें. पुढें देवेंद्रनाथांनीं तेथें आश्रम स्थापन केला आणि एक देऊळ बांधलें. **वयाच्या अकराव्या वर्षीं रवींद्रनाथ पित्या-बरोबर पहिल्यानें शांतिनिकेतनला गेले ( १८७३ ). पुढें गुरु-देव म्हणजे शांतिनिकेतन आणि शांतिनिकेतन म्हणजे गुरुदेव असें झालें**, तें कसें त्याबद्दल विस्तृतपणें लिहायला हवें असें नाहीं. महर्षि देवेंद्रनाथांनीं बालक रवीला आपल्याबरोबर कसें वागाविलें आणि त्याच्या मनाला, बुद्धीला, विचारसरणीला कसें वळण लावलें, याबद्दलच्या मनोरम हकीकती रवींद्रनाथाच्या 'जीवन-स्मृतीं'त मुद्दाम वाचण्यासारख्या आहेत.

सन १८७५ मधें रवींद्रनाथांची आई, शारदादेवी देवाघरीं गेल्या अन् बालक रवि परदेशीं झाला. पुढें त्यांच्या वहिनीचा त्यांना लळा लागला. **ज्योतिरिंद्रनाथांच्या** पत्नी **कादंबरीदेवी** यांचें आपल्या दिरावर आईसारखें प्रेम होतें.

ता. ९ डिसेंबर १८८३ मधें रवींद्रनाथांचें लग्न झालें. त्यांच्या पत्नीचें माहेरचें नांव होतें **भवतारिणी**; सासरचें नांव ठेवण्यांत आलें **मृणालिनी-देवी**. रवींद्रनाथांना पांच मुलें झालीं. त्यांचीं नांवें अनुक्रमें—**माधुरीलता, रथींद्रनाथ, रेणुका, मीरा** आणि **शमींद्र**' पैकीं माधुरीलता वयाच्या बत्ती-साव्या वर्षीं, रेणुका वयाच्या तेराव्या वर्षीं आणि शमींद्रहि वयाच्या तेराव्याच वर्षीं स्वर्गवासी झाला. संसारांतलें हें पोटजाळाचें दुःख रवींद्र-नाथांच्या वांटणीला आलें. सन १९०२ मध्येंच त्यांची प्रिय पत्नी काळानें ओढून नेली होती. रवींद्रनाथ अतिशय प्रेमळ पति आणि ममताळू पिता होते. पण त्यांच्या वांटणीला परमेश्वरानें संसारांतलें मायेचें सुख फारसें दिलें नाहीं. इतकें असून ते सतत शांत, समाधानी होते. आपलें दुःख त्यांनीं कधीं बाहेर दाखविलें नाहीं. तरीपण, पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनीं तिच्या

स्मृतीला वाहिलेलें अखेरचें अर्घ्य काव्यरूपानें ' स्मरण ' या काव्यखंडांत समाविष्ट आहे.

ठाकुरांची जमीनदारी फार मोठी. ते शिलाईदहचे जमीनदार. रवींद्र-नाथांचे बाकीचे बंधु दुसऱ्या उद्योगांत गुंतलेले होते. म्हणून देवेंद्रनाथांनीं जमीनदारीची सर्व जबाबदारी रवींद्रनाथांवर सोंपविली होती. त्या कामासाठीं गुरुदेवांना सारखे जमिनींच्या गांवीं हेलपाटे घालावे लागत. बंगालमधले जमीनदार मोठे उद्दाम असत. रयतांचा जीव बेजार होत असे त्यांच्या दडपशाहीनें. तशा परिस्थितींत गुरुदेवांनीं आपली जमीनदारी मोठ्या कौशल्यानें, रयतांना सांभाळून घेऊन सांभाळली. प्रापंचिक सुखासमाधानाला अंतरलेले, जमीनदारीची जबाबदारी शिरावर, शांतिनिकेतनचें काम होतेंच; शांतिनिकेतनपासून जवळच सुरुल येथें ग्रामसुधारणेचें त्यांचें केंद्र—श्रीनिकेतन—होतेंच; त्यांतच परदेशच्या वाऱ्या चालू असत; कधीं कलकत्त्याला, कधीं बोलपूरला, कधीं शिलाईदहला सारखे त्यांना फिरावें लागे; स्वास्थ्य आणि गुरुदेव यांचें जसें कांहीं वावडें होतें.

अशा सर्व परिस्थितींत त्यांनीं निर्माण केलेला अफाट वाङ्मयसागर जितका मोलाचा मानावा तितका थोडाच होईल. रवींद्रनाथांच्या साहित्य-जीवनाच्या उषःकालीं बंगालमधील नामवंत साहित्यिक, कादंबरीकार श्री. **बंकिमचंद्र** व **बिहारीलाल** हे त्यांचे आदर्श होते. त्या उभयतांनाहि रवींद्र-नाथांचें उज्वल भवितव्य दिसत असून, त्यांचें मनापासून कौतुक होतें. काव्य, कथा, प्रबंध, विनोदी लेख, कादंबऱ्या, नाटकें इत्यादींनीं गुरुदेवांनीं बंगाली साहित्यभांडार तर अलोट रत्नखचित केलेंच, पण साऱ्या भारताचे ते श्रेष्ठ कवि ठरले. जगद्वंद्य झाली त्यांची कीर्ति. सन १९१३ मध्यें त्यांच्या '**गीतांजली**'ला नोबेल पारितोषिक मिळालें. भारताला प्रथम तें पारितोषिक मिळविण्याचें श्रेय गुरुदेवांचें. त्या निमित्तानें त्यांचें नांव पहिल्यानें सर्वतोमुखीं झालें. गुरुदेवांचें सारें लिखाण कलकत्त्याच्या विश्वभारती-प्रकाशन-संस्थेनें ' रवींद्ररचनावली ' या नांवानें सत्तावीस खंडांत प्रसिद्ध केलेलें आहे. प्रत्येक खंड शेंकडों पानांचा असून, त्यांत गुरुदेवांचें विविध लिखाण समाविष्ट करण्यांत आलेलें आहे. त्या-खेरीज त्यांचे रवींद्रसंगीताचे ५९ स्वतंत्र खंड आहेत ते निराळेच. **संगीतशास्त्राचा सखोल अभ्यास करून, गुरुदेवांनीं संगीताचें एक**

स्वतंत्र दालन निर्माण केलें. तेंच रवींद्रसंगीत. त्याचप्रमाणें, त्यांनीं आपल्या गाण्यांची सुरावटहि तयार केली, आणि प्रसिद्ध केली.

गुरुदेवांची लेखणी जितकी कलात्मक, तितकीच निर्भीड होती. परकी सत्तेच्या तऱ्हा तऱ्हा चालू असतांना त्यांनीं वेळोवेळीं सडेतोडपणें आपले विचार प्रदर्शित केले. पहिल्यापासून 'आनंदबाजार पत्रिका,' 'भारती,' 'विश्वभारती पत्रिका,' 'हितवादी,' 'वंगदर्शन,' साधना' इत्यादि नियतकालिकांत त्यांना मुक्तद्वार असल्यानें त्यांच्या लेखणीला कधीं आडकाठी नव्हती. त्यामुळें, पुढें पुढें त्यांच्या सराईत लेखणींतून उतरलेले प्रबंध विशेष परिणामकारक ठरले. राजकीय प्रश्नांवर वेळोवेळीं त्यांनीं स्वतंत्र प्रबंध लिहिले ते निराळेच. सन १८१३ मध्यें वाईच्या तेरा हिंदूंना तुरुंगांत टाकण्यांत आलें, केसरीवरच्या राजद्रोहाच्या खटल्यांत लोकमान्यांना दोन वर्षें सश्रम कारावासाची शिक्षा झाली, तेव्हां चहूंकडे असंतोष उफाळून आला असतां त्या वेळच्या राज्यकर्त्यांनीं राजद्रोहाचा कायदा पास केला; अशा प्रसंगीं गुरुदेवांनीं लिहिलेले जोरदार प्रबंध महाराष्ट्रीयांना विसरतां येणार नाहींत. ते प्रबंध त्यांची न्यायप्रियता, तत्त्वनिष्ठा आणि महाराष्ट्रा-बद्दलचा कळवळा यांची साक्ष देतात.

परकीय राजसत्तेची अहंकारी वृत्ति ज्या ज्या वेळीं कांहीं गैरवाजवी गोष्टी करीत असे, त्या त्या वेळीं गुरुदेव स्पष्टपणें त्यांच्या पदरांत माप घालीत असत. वंगभंगाच्या वेळीं ते चळवळीच्या अग्रभागीं असून आपला विरोध शक्य त्या उपायांनीं व्यक्त करीत होते. त्यांच्या सूचनेनें वंगभंगाच्या दिवशीं (ता. १६ ऑक्टोबर १९०५) लोकांनीं चुली बंद ठेवल्या, गंगास्नान केलें, परस्परांच्या हातांत राख्या बांधल्या. गुरुदेव स्वतः मिरव-णुकीबरोबर फिरले, शेजारी-पाजारी, श्रीमंत-गरीब, स्पृश्य-अस्पृश्य असा भेद न मानतां, सर्वांच्या हातीं त्यांनीं स्वतः राखी बांधल्या. रस्त्याकडेच्या मुसलमान गाडीवानाच्या हातांत त्यांनीं रंगीत राखी बांधली, तेव्हां लोक आश्चर्यचकित झाले. सरकारनें दिलेली 'सर' पदवी, जालियनवाला बाग प्रकरणाच्या वेळीं त्यांनीं किती तडफदारपणें परत केली हें सर्वश्रुत आहे. सरकारी पदवीचा अशा रीतीनें त्याग करणारे गुरुदेव पहिले. पुढें महात्मा गांधींनीं कैसर-इ-हिंद पदवी त्याग केल्याचेंहि सर्वांना माहीत आहे. मौज अशी, कीं 'सर' पदवीचा त्याग करतांना गुरुदेवांनीं लिहिलेलें

पत्र आणि कैसर-इ-हिंद या पदवीचा त्याग करतांना महात्माजींनीं लिहिलेलें पत्र यांत बरेंच साम्य होतें.

गुरुदेवांचा आणि महात्माजींचा फार जिव्हाळ्याचा संबंध होता. दोघांच्या कार्यपद्धति आणि मार्ग भिन्न असले, तरी मानवतेची सेवा हेंच उभयतांचें ध्येय होतें. **दोघांनींहि आपापल्या रीतीनें जगाला मानवतेचाच संदेश दिला.** दोघांत मतभेद नव्हते असें नाहीं,–तीव्र मतभेद होते कांहीं कांहीं बाबतींत; –पण ते त्यांच्या परस्परांविषयींच्या आदराच्या आड कधींच आले नाहींत. शांतिनिकेतन अडचणींत असतां, महात्माजींनीं पैसे जमवून द्यावे, महात्माजींच्या गरजेस गुरुदेवांनीं उभे राहावें, असें होत असे. इतकेंच काय, पण सन १९३२ मधें महात्माजींनीं जेव्हां ऐतिहासिक महत्त्वाचें उपोषण केलें, त्याच्या आधीं, आदले दिवशीं पहाटेच्या वेळीं त्यांनीं गुरुदेवांना पत्र लिहून, त्यांचा आशीर्वाद मागितला; आणि ते येरवड्याच्या तुरुंगांत उपासांत असतांना त्यांना भेटण्यासाठीं मुद्दाम गुरुदेव आले होते. थोरांचीं मनें नि थोरांचा आदरभाव असा असतो. गुरुदेवांच्या '**प्रायश्चित्त**' नाटकांत जो '**धनंजय वैरागी**' आहे, तो म्हणजे महात्माजींचेंच चित्र असावें, असा समज होण्यासारखी ती भूमिका आहे. मात्र, एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन, गुरुदेवांनीं राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेण्याचें पुढें पुढें सोडून दिलें.

आपलें शांतिनिकेतन, विश्वभारती, आपले सहकारी आणि विद्यार्थी यांशीं ते एकजीव होऊन राहिले. नाना अडीअडचणींतहि पूर्वी जशी त्यांची सतत उत्स्फूर्त लेखणी त्यांना सोबत करीत होती, तशी तिनें अखेरच्या घटकेपर्यंत त्यांना सोबत केली. **त्यांच्या प्रतिभेचा जिवंत झरा कदापि सुकला नाहीं.**

वयाला सत्तर वर्षें झाल्यावर गुरुदेवांना चित्रकलेची स्फूर्ति झाली; आणि चित्रकार म्हणून त्यांनीं आपलें एक स्वतंत्र स्थान निर्माण केलें. आपल्याकडे मनुष्याची पन्नाशी झाली कीं तो म्हातारपणांत समाविष्ट होतो. 'साठी बुद्धि नाठी' या म्हणीवरून साठ वर्षांच्या वयाला मनुष्याच्या बुद्धीची काय दुरवस्था कल्पिलेली आहे, हेंहि उघड आहे. त्यामुळें, सत्तर वर्षें वयाला कलेच्या एका प्रांगणांत नव्यानें पदार्पण करून दहा वर्षांत हजारों चित्रणांनीं त्या प्रांगणांत सतेजपणें विहार करणाऱ्या गुरुदेवांच्या उज्ज्वल प्रतिभेचें आणि त्यांच्या सतत तरुण असलेल्या उमेदीचें कोणालाहि

कौतुक वाटल्यावांचून राहत नाहीं. त्यांच्या चित्रकलेबद्दल आवड–निवड दोन्ही व्यक्त करणारे गट आहेत, हें खरें. परंतु, त्यांची बुद्धि कधींहि बुरसटली नाहीं, हें सर्वमान्य आहे.

त्यांच्या साऱ्या आयुष्यांत, स्वदेशांत, परदेशांत कोणाकोणाशीं त्यांचा संबंध आला, वंगीय साहित्य-परिषद आदिकरून आणखी किती व कोणकोणत्या संस्था त्यांनीं चालविल्या, किती परिषदा नि सभांचे ते अध्यक्ष झाले, आणि कोणत्या वेळीं त्यांनीं काय काय भाषणें केलीं या साऱ्यांचा आढावा घेऊन त्यांचें चरित्र द्यायचें झालें, तर तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल. गुरुदेवांच्या जीवनाला इतके पैलू आहेत, आणि ते इतके चमकदार आहेत, कीं त्यांची पुसटती झकाकीसुद्धां इतक्या थोडक्या चरित्रांत देतां येणें केवळ अशक्य आहे.

म्हणून, थोडक्यांत येवढेंच म्हणावें लागतें, कीं बंगालमधें जन्माला आलेले 'मुलांचे गुरुदेव' नुसत्या भारताचाच नव्हे, तर साऱ्या जगाचा मौलिक ठेवा आहेत. अत्यंत विशाल आणि व्यापक विचारसरणीची ही थोर व्यक्ति साऱ्या जगाला आदरणीय वाटावी, यांत आश्चर्य नाहीं. जगभर त्यांचा जन्मशताब्दि महोत्सव साजरा व्हावा, हेंहि योग्यच; कारण, **गुरुदेवांचें जीवन-चरित्र म्हणजे 'सत्यं–शिवं–सुंदरम्'!**

ता. ७ ऑगस्ट १९४१–राखी पौर्णिमेच्या दिवशीं त्यांचें देहावसान झालें.

**सौ. सरोजिनी कमतनूरकर**

ज्याचें त्याला

फुल देवाला

...नी ग्रंथ संग्रहालय, वाई. स्वकमत.
अनुक्रम ३३९७३ दि. ...
...ांक ...  नों. दि. ...

# शिवस्मरण

# शिव—स्मरण

" हे राज-तपस्वी वीर, तोमार से उदार भावना
विधिर भांडारे
संचित होईया गेछे, काळ कभु तार एक कणा
पारे हरिबारे ?
तोमार से प्राणोत्सर्ग स्वदेश-लक्ष्मीर पूजाघरे
से सत्यसाधन
के जानित हये गेछे चिर-युगयुगान्तर-तरे
भारतेर धन ! "


—रवींद्रनाथ

* * *

विधिच्या कोशीं संचित झालेला तव उदात्त भाव, ऋषे, ।
हरणें कणभारेंही त्यातें केव्हां, कुणास शक्य असे ? ॥१॥
राजतपस्वी, केलें अखंड साधन तुम्हींच सत्याचें ।
आत्मसमर्पण केलें, अनुपम पूजन स्वदेशलक्ष्मीचें ! ॥२॥
भारतभूचें यशधन, शिवरायाचें, स्वकर्म योगाचें ।
युगयुग उलटुनि गेलें, तरिही अक्षर सदा असायाचें ॥३॥

* * *






# आत्मचरित



१२३६४
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ........
क्रमांक ...................... नों: दि: ..........



# गुरुदेवांच्या शब्दांत गुरुदेवांचे लहानपण

: १ :

मी त्या काळच्या कलकत्त्यांत जन्मलों. तेव्हां रस्त्यावरचा धुरळा उडवीत घोड्याच्या गाड्या पळायच्या. हाडं निघालेल्या घोड्याच्या पाठीवर सपासप दोरींचे चाबूक बसायचे. ट्राम नव्हती, बस नव्हती, कीं मोटारगाडी नव्हती तेव्हां कामाची अशी घाईगर्दी नव्हती; उठत, बसत दिवस जायचे. बाबूलोक झकास तंबाकू ओढून, पान चघळत चघळत, कोणी मेण्यांत, तर कोणी गाडींत बसून कचेरीला जायचे. पैसेवाले असतील त्यांच्या गाडया असायच्या तकतकीत, निम्म्या डोक्यावर कातडयाचा पदर घेतल्या सारख्या; कोचबॉक्सवर (गाडीवानाची बसायची जागा) गाडीवान बसायचा– डोक्यावर कलता फेटा बांधून; मागच्या बाजूला दोघं दोघं सईस असायचे– कमरेला चामर बांधलेले; आणि ते 'हइयो' करून ओरडत पायीं चालणाऱ्यांना चमकवायचे. दारं बंद असलेल्या, जीव गुदमरणाऱ्या अंधाऱ्या मेण्यांतून बायका बाहेर पडायच्या; गाडींतून जायचं म्हणजे मोठी लाजेची बाब होती. उन्ह असो कीं पाऊस असो, वाय-

कांच्या डोक्यावर छत्री नसायची. एखादीच्या अंगांत शिमीज अन् पायांत जोडे पाहिले, कीं त्याला म्हणायचे, 'मेमसाहेबी'; त्याचा **अर्थ**, '**लाज**-लज्जा गुंडाळून ठेवणें' असा असायचा. चुकून एखादे वेळीं एखादी स्त्री परपुरुषासमोर आलीच, कीं खसूकन् ती डोक्यावरचं पदराचं घुंघट नाकाच्या शेंड्याखालीं ओढायची आणि जीभ चावून पाठ फिरवून उभी राहायची. घरांत जशा बायका दारं बंद करून बसायच्या, तशाच मेण्यांत; थोरामोठ्यांच्या लेकीसुनांच्या मेण्यांवर आणखी एक शोभेचा घुमट असायचा. तसला मेणा रस्त्यानें चालत्या कबरीसारखा दिसायचा. मेण्याबरोबर पितळी (पट्ट्या किंवा, तारांचीं वेटोळीं बसविलेल्या) काठ्या घेतलेले दरवानजी असायचे. देवडीवर बसून घराची राखण करणं, दाढी चोपडणं, बँकेंत पैसे आणि पाहुण्यांच्या घरीं बायका-मंडळींना पोहोंचवणं, किंवा पर्वणीला मालकीणबाईंना बंद मेण्यासकट गंगेंत बुचकळून आणणं, हीं त्या दरवानजींचीं कामं असायचीं. पेटींत निरनिराळ्या वस्तु सजवून ठेवून फेरीवाला दरवाजाशीं येत असे. त्यांत शिवनंदनची थोडीशी भागीदारी असायचीच; आणि भाड्याच्या गाडीचा गाडीवान येत असे;– ज्याला दिलेलं भाडं परवडायचं नाहीं, तो देवडी-समोर जोरकस भांडण सुरू करायचा. देवडीवर आमचा पहेलवान जमादार मधून मधून जोर काढायचा, खूप वजनाच्या जोड्या फिरवायचा, बसल्या बसल्या थंडाई घोंटायचा, कधीं कधीं हिरव्या पाल्यासकट कच्चा मुळा खायचा;– आम्ही मुलं त्याच्या कानाशीं मोठ्यांदा 'राधाकृष्ण' असं ओरडून पळत असूं. तो 'हां, हां' करून दोन्ही हात उगारायला लागला, कीं आम्हांला आणखी गंमत वाटून, आम्ही पुन: पुन: तेंच करीत असूं; आपल्या इष्ट देवतेचं नांव ऐकण्याची त्याची ती एक युक्ति होती.

तेव्हां शहरांत गॅस नव्हता, विजेचे दिवे नव्हते; नंतर जेव्हां केरो-सिनचे (रॉकेल तेल) दिवे आले, तेव्हां त्यांचं तेज पाहून आम्ही थक्क झालों. त्या आधीं, घरोघरीं दिवे लावणारा येऊन एरंडेल तेलाचे दिवे लावून जायचा. आमच्या अभ्यासाच्या खोलींत दोन वातींचा दिवा

तेवायचा. मिणमिणत्या प्रकाशांत गुरुजी पॅरि सरकारांचं 'फर्स्ट बुक' (पहिलं पुस्तक) शिकवायचे. पहिल्यांदा यायची जांभई, मग यायची झोंप, आणि नंतर डोळे चोळणं सुरू व्हायचं. पुनः पुनः मास्तरांच्या तोंडीं त्यांच्या दुसऱ्या विद्यार्थ्याचं–सतीनचं–गुणवर्णन ऐकावं लागायचं; 'तो कसा सोन-तुकडा मुलगा आहे, मन लावून अभ्यास करतो, झोंप आली कीं, तपकीर चोळतो डोळ्यांना.' आणि मी? तें सांगायची कांहीं जरूरी नाहीं. सगळ्या मुलांत आपण एकमेव मूर्ख बनून राहण्याची नाहीं ती हौसहि माझं मन तेवतं ठेवूं शकत नसे. त्यामुळं मी तसाच कांहींतरी शिकत (?) बसत असें. रात्रींचे नऊ वाजायला आले आणि झोंपेनं डोळे मिटायला लागले, कीं मग सुट्टी मिळायची. बाहेरून आंतल्या चौकांत जायची वाट होती अरुंद; दोहों बाजूंला उघडझांपाचीं दारं असलेल्या खिडक्या; अन् वरून मिण-मिण्या उजेडाचे कंदील लोंबायचे. तिथून मी चाललों, कीं मनाला वाटायचं मागनं कोणीतरी येतंय्! पाठ सुरसुरल्यासारखी व्हायची. त्या काळच्या गोष्टी भूत–प्रेतांच्या असायच्या; माणसांच्या मनांत, काना-कोपऱ्यांत भुतं-प्रेतं दडलेलीं असायचीं! एखाद्या दासीला मधेंच शाँकचुन्नीचा (एक प्रकारचं स्त्री भूत–हडळीसारखं) नाकांतला आवाज ऐकूं यायचा अन् ती धाडकन् जमिनीवर हापटायची. त्या हडळीची मिजास सगळ्यांत वाईट असायची; तिला माणसाचा लोभ भारी! आमच्या वाड्याच्या पश्चिमेच्या कोंपऱ्यावर दाट पानांचं बदामाचं झाड होतं. त्याच्या एका फांदीवर एक पाय आणि दुसरा पाय तिसऱ्या मजल्याच्या कार्निसवर ठेवून कोणीतरी उभं असायचं– म्हणे! त्याला म्हणे पुष्कळांनीं पाहिलं होतं आणि सांगितलेलं खरं असं गृहीत धरून चालणारेहि कांहीं कमी नव्हते. दादाचा एक मित्र ती गोष्ट जेव्हां हंसा-वारी घालवण्याचा प्रयत्न करीत असे, तेव्हां नोकराचाकरांना वाटायचं कीं, 'गृहस्थाला धर्मबुद्धि मुळींच नाहीं; एखाद दिवशीं टाकील मुंडी मुरगळून, तेव्हां शहाणपण निघेल बाहेर!' त्या काळीं साऱ्या वाता-वरणांत भीतीचं असं कांहीं जाळं पसरलेलं असे, कीं टेबलाखालीं पाय

ठेवले, तरी ते शिवशिवायला लागायचे– त्यामुळें, त्या अरुंद वाटेनं रात्रींच्या वेळीं, मिणमिणत्या प्रकाशांत जात असतांना माझ्या मनाची भारी चमत्कारिक स्थिति व्हायची.

पाण्याचे नळ आले नव्हते. माघ–फाल्गुनांत पाणके कावडीनं गंगेचं पाणी आणायचे. तळमजल्यावरच्या अंधेऱ्या खोलींत मोठाले रांजण गंगेचं पाणी भरून ओळीनं ठेवलेले असायचे. तें आमचं पिण्याच्या पाण्याचं वर्षाचं सांठवण असे. तळमजल्याच्या ओलीच्या त्या अंधेऱ्या कोठडींत बुरखा घेऊन ज्यांची वस्ती असायची, त्यांचा तो मोठा आ, ते छातीवरचे डोळे, सुपासारखे कान अन् उलटीं पाउलं! तो प्रकार माहिती नसलेली व्यक्ति दुर्मिळ होती. त्या भुताटकीच्या छायेसमोरून आंतल्या बागेंत जायला लागलों, कीं माझ्या छातींत कालवाकालव व्हायची, पाय झपाझप उचलले जायचे.

रस्त्याच्या कडेकडेनं बांधलेल्या नाल्यांतून भरतीच्या वेळीं गंगेचं पाणी यायचं. आजोबांच्या कारकीर्दीपासून नाल्याच्या त्या पाण्याचा ओघ आमच्या तळ्याशीं पोंचलेला असायचा. फाटक बंद केलेलं असायचं; अन् झर् झर्, खळ्खळ् करीत फेंसाळ पाण्याचा प्रवाह आंत यायचा. माशांना उलट्या दिशेला पोहण्याची कसरत दाखवायची हौस यायची. मी दक्षिणेकडच्या गॅलरींत कठड्याला धरून, आश्चर्यानें तिकडे पाहात गप्प उभा राहात असे. शेवटीं, त्या तळ्याचं जीवन संपत आलं. गाड्या भरभरून त्यांत केर–कचरा पडायला लागला. तळं बुजल्याबरोबर खेड्याची हिरवी सांवली पडलेला आरसा नजरेआड झाला. तें बदामाचं झाड अजून आहे. पण, तसे लांब लांब पाय ठेवून उभं राहण्याची सोय असूनहि त्या ब्रह्मसमंधाचा आतां पत्ता लागत नाहीं.

आंतबाहेर प्रकाश वाढला आहे.

: २ :

तो मेणा आजीबाईंच्या कारकीर्दींतला होता. मोठ्या मोलाचा अन् डौलाचा– नबाबी रंगढंगाचा. दोन्ही दांडे आठ आठ भोयांच्या खांद्यांच्या मापाचे. हातांत सोन्याचे वाळे, कानांत लठ्ठ बाळे आणि बिनहातांचे लाल डगले घातलेले त्या वेळचे मेण्याचे भोई सूर्यास्ताच्या वेळच्या रंगीत मेघांसारखे, त्या वेळच्या श्रीमंतीबरोबरच दृष्टीआड झालेले होते. त्या मेण्यावर रंगीत रेघांनीं नक्षीकाम केलेलं होतं; पण आतां ते पुष्कळ ठिकाणीं खराब झालेलं होतं; जिकडंतिकडं डाग पडलेले होते. आंतल्या गादीचा काथ्या बाहेर पडलेला होता. तो मेणा म्हणजे जसा कांहीं चालू हजेरीपटावरचं नांव काढलेला ऐवज होता; आणि म्हणून फरासखान्याच्या पडवींत एका कोंपऱ्यांत तो पडलेला होता. मी तेव्हां सात आठ वर्षांचा होतों. जगांतल्या कोणत्याहि जरूरीच्या कामाला माझा उपयोग नव्हता; आणि त्या पुराण्या मेण्याला सर्व जरूरीच्या कामकाजांतून बडतर्फ करण्यांत आलेलं होतं. म्हणूनच माझ्या मनाला त्याची इतकी ओढ होती. तो म्हणजे समुद्रांतलं बेट, आणि मी म्हणजे (सुट्टीच्या दिवशीं) रॉबिन-क्रूसो, असं वाटायचं मला ! भोंवतालची नजरकैद चुकवून, मेण्याच्या बंद दारांच्या आंत हा वाट चुकलेला प्रवासी बसून राहायचा.

त्या वेळीं आमच्या घरांत माणसंच माणसं होतीं; आपलीं किती आणि दुसरीं किती, याचा पत्ता नव्हता. निरनिराळ्या भागांतल्या नोकर-चाकरांचा, दासी–मोलकरणींचा गलबला सुरू असायचा.

समोरच्या अंगणांतून प्यारीदासी टोपली खाकेंत घेऊन यायची– बाजारांतून आणलेली भाजी–मिरच्या–कोथिंबीर असायची त्या टोपलींत; दुरून पाणक्या कावडीनं पाणी आणीत असायचा; नवीन किनारीच्या नव्या साड्यांचा सवदा करण्यासाठीं कोष्टीण आंतल्या चौकांत चाललेली असायची; महिन्याच्या पगारावर असलेला, बोळांतल्या शेजारच्या घरांत बसून 'भासभूस' करीत घरच्या 'फर्माइशी' प्रमाणें दागिने करून देणारा दिनु सोनार, फरासखान्यांत, कानावर पिसाची लेखणी अडकव-लेल्या कैलास मुखुज्जे (मुखार्जी) कडे पैसे वसूल करायला यायचा; पिंजारी अंगणांत बसून, 'फट् फट् फटंग्' करीत जुन्या लेपट्यांचा कापूस पिंजीत असायचा. बाहेर चकण्या पहेलवानाशीं मुकुंदलाल दरवान लोळणपट्टी करीत कुस्तीचे हात करीत असायचा; चटक् फटक् आवाजांत दोन्ही पायांवर चापट्या मारायचा, अन् पुनः पुनः,. वीस-पंचवीस कोलांट्या उड्या मारायचा. हक्काच्या भिक्षेच्या आशेनं भिकारी बसलेले असायचे.

दिवस चढायला लागला, कीं उन्हाचा तावहि चढायचा; देवडींत घंटा वाजायची. पण, मेण्याच्या आंतल्या दिवसाला घंटा–तासांच्या हिशोबाची पर्वा होती कुठं ? तिथले बारा वाजलेले असायचे पार जुन्या काळांतले–म्हणजे, जेव्हां राजवाड्याच्या सिंहदाराशीं सभासमाप्तीची घंटा वाजायची आणि मग राजा चंदनाच्या पाण्यानं स्नान करायला जायचा तेव्हांचे. सुट्टीच्या दिवशीं ज्यांच्या ताब्यांत मी असें, ते जेवणीं-खाणीं आवरून झोंपा काढीत असायचे. मी एकटा बसलेला असायचा. मनांतल्या मनांत माझा अचल मेणा चाललेला असायचा; हवेंतले भोई माझ्या मनांतलं मीठ खाऊन लहानाचे मोठे झालेले असायचे. मेण्याची वाट माझ्या लहरींनंच आखलेली असायची. त्या वाटेनं मेणा दूरदूरच्या देशांना चाललेला असायचा; त्या देशांचीं नांवं माझ्या पुस्तकांत वाचलेलीं, मींच ठेवलेलीं असायचीं. केव्हां केव्हां ती वाट घनदाट वनांत शिरलेली असायची; वाघांचे डोळे चक्मक् करीत असायचे! अंगाला घाम सुटायचा ! त्या कल्पनाराज्यांतल्या प्रवासांत माझ्या मेण्याबरोबर विश्वनाथ शिकारी

असायचाच; तो ‘ ठो ’ दिशीं बंदूक ठोकायचाच ! बस्, मग सारं चूपचाप होऊन जायचं. कधीं कधीं मेण्याचा चेहरा पालटायचा माझ्या मनोराज्यांत; आणि त्याला मयूरपंखीचं रूप यायचं; मग ती मयूरपंखी समुद्राच्या पाण्यांतून वाहात जायची; किनारा दिसेनासा व्हायचा; हलत डुलत लाटा वरवर यायला लागायच्या. वल्हेकरी ओरडायचे ‘ संभाळ, संभाळ, वादळ आलं. ’ सुकाणूंपाशीं असायचा आबदुल नावाडी. तो माझ्या ओळखीचाच असायचा– कारण, तो पद्मा नदींतून दादाला इलिश मासे आणि कांसवाचीं अंडीं आणून देत असे ना !

त्यानं मला एकदां एक गोष्ट सांगितली होती– एकदां म्हणे तो नावेंतून मासे धरायला गेला होता; चैत्रमास संपत आलेला होता; एकदम काळवैशाखी वादळ सुरू झालं. भयंकर तुफान आलं, नाव बुडायची पाळी. आबदुलनं दांतांत नाडा चावून धरला आणि पाण्यांत उडी टाकली; तस्सा पोहत पोहत कांठावर चढला आणि नाडा खेंचून नाव घेतली ओढून वर.

त्याची ती इतक्या लवकर संपलेली गोष्ट मला आवडली नव्हती. नाव बुडाली नाहीं, वांचली, असली कसली गोष्ट ? मी पुन्हां पुन्हां ‘ पुढं काय,’ ‘ पुढं काय ’ असं विचारायला लागलों.

तो म्हणाला, “ पुढं आणखी एक प्रकार ! समोर पाह्यला एक ढाण्या वाघ ! अश्शाल्या त्याच्या मिशा ! वादळ आलं, तेव्हां तो पलीकडच्या तटावरच्या एका पिंपळाच्या झाडावर चढला होता. सोसाट्याचा वारा सुटल्याबरोबर झाड पडलं मोडून पद्मा नदींत. वाघोबा लागले वाहुटीला; गटांगळ्या खात खात आले एकदांचे कांठावर. त्याला पाहिल्याबरोबर मीं नाड्याचा केला फांस. वाघोबा येवढाले डोळे करून माझ्यासमोर उभा राहिला. पोहून पोहून त्याला सडकून भूक लागली होती. मला पाहून त्याच्या लालचुटूक जिभेला पाणी सुटलं, लाळ गळायला लागली. पुष्कळ माणसांची त्याची अंतर्बाह्य ओळख झालेली होती. पण आबदुलला त्यानं ओळखला नव्हता. मी हांक दिली, “ आव बच्चा ! ” त्यानं दोन पाय वर उचलल्याबरोबर टाकला फांस त्याच्या गळ्यांत.

सुटण्यासाठीं तो धडपडायला लागला, कीं फांस आवळला जायचा; असे होतां होतां वाघाची जीभ निघाली बाहेर!"

इथवर गोष्ट झाली अन् मीं घाईघाईनं विचारलं,

"आबदुल, तो मेला का?"

आबदुल म्हणाला, "मरायची काय त्याच्या बापाची छाती होती! बहादुरगंजला परतायला हवं होतं ना. नदीला पूर आलेला; वाघोबा बचंजीला जोडला नावेला आणि त्याच्याकडून नाड्याला तणावा देण्याचं काम करून घेतलं,— किमान वीस कोस नेला त्याला असा. 'घ्वां घ्वां' करायला लागला, कीं वल्ह्यानं बेट्याच्या पोटाला ढोंसत होतों. दहा-पंधरा तासांच्या ऐवजीं दीड तासांत पार झालों— त्यापुढचं आतां कांहीं विचारूं नको बाबा, उत्तर मिळायचं नाहीं सांगतों आधींच."

मी म्हणालों, "बरं, वाघाची गोष्ट झाली; आतां सुसरीची."

आबदुल म्हणाला, "पाण्यावर तिच्या नाकाचा शेंडा पाहिला आहे पुष्कळदां. नदीच्या उताराच्या कांठावर लांबच्या लांब अंग पसरून ती उन्ह खात असते तेव्हां 'कसलं घाणेरडं हंसते आहे,' असं वाटतं. अशा वेळीं बंदुक असती तर मुकाबला करून टाकला असता. पण, लायसन्स संपलेलं! पण, एकदां अशी मजा झाली; कैची बुरडीण कांठावर कोयत्यानं बांबूच्या कामट्या तासत बसली होती, अन् तिचं कोंकरूं होतं जवळच बांधलेलं. केव्हां कुणाला माहीत, पाण्यावरून वर येऊन सुसरीनं त्या कोंकराची तंगडी पकडली आणि नेलं ओढून पाण्यांत. बुरडिणीनं एक उडी मारली अन् बसली चढून त्या सुसरीच्या पाठीवर; आणि लागली मारायला सपासप घाव त्या सुसरीच्या गळ्यावर. तेव्हां सुसरीनं कोंकरू सोडून दिलं आणि गेली बया पार पाण्याच्या तळाशीं."

मीं उतावीळपणानं विचारलं, "आणि मग?"

आबदुल म्हणाला, "पुढची गोष्ट पण पाण्याच्या पार तळाशीं गेली आहे. तिथून ती आणायला वेळ लागेल. पुनः येतांना माणसं पाठवून बातमी काढून आणीन हं."

–पुनः कांहीं तो आला नाहीं. बहुतेक बातमी काढायला गेला असेल.

–या साऱ्या गोष्टी मला मेण्यांत बसल्या बसल्या आठवायच्या. मेण्यांतल्या मनोरथांच्या अशा मनोहर सफरी असत माझ्या.

मेण्याबाहेर कधीं कधीं माझी मास्तरकी चालायची. कठड्याच्या सळ्यांना माझे विद्यार्थी करायचा मी. त्यांतला एक एक विद्यार्थी भारी खट्याळ होता; अभ्यासांत लक्ष नसायचं ! मग मी त्यांना धाक दाखवायचा, "मोठं झाल्यावर हमाली करावी लागेल !" माझ्या हातचा मार खाऊन खाऊन वरपासून खालपर्यंत एकेकाच्या अंगावर डाग उठले होते, पण त्यांचा व्रात्यपणा कांहीं संपायचा नाहीं– संपेल कसा ? माझा खेळ संपला असता ना !

आणखी एक खेळ होता माझा. माझं लाकडी शिंगरूं घेऊन मी खेळायचा. पूजेच्या वेळीं बलिदानाच्या गोष्टी ऐकून मनाशीं ठरवलं होतं, कीं शिंगरूं बळी दिल्यानं मोठेपणा मिळेल. म्हणून त्या लाकडी घोड्याच्या पाठीवर काठीचे कितीतरी वार मीं केले होते. बळी द्यायचा, म्हणजे मंत्र हवा ! म्हणून मी एक मंत्र रचला होता; नाहींतर पूजा यथासांग व्हायची कशी ? तो मंत्र असा–

शिंगरूमामा खाऽट् !
आंदिबोसांचा भट् !
उलुकुट ढुलुकुट ढॅमकुड्कुड्,
आकरोड बाकरोड खट् खट् खटाऽक् !
फट् फट् फटाऽक् !

या माझ्या मंत्रांतले बहुतेक शब्द उसनवारीचे होते. फक्त 'आकरोड' येवढा शब्द याझ्या पदरचा होता. कारण, मला आकरोड फार आवडत असत. 'खाऽट्' या शब्दावरून लक्षांत येईल, कीं माझा कोयता लाकडी होता; आणि फटाऽक् या पिचपिचीत आवाजावरून कळेल, कीं तो मजबूत नव्हता.

: ३ :

मला माझ्या लहानपणच्या संध्या आठवतात. त्या वेळीं आम्ही नोकरचाकरांच्या जागेंत असायचे. तेव्हां इंग्रजी शब्दांचं स्पेलिंग आणि अर्थ पाठ करण्याच्या, छातींत धडकी भरवणाऱ्या संध्या अजून आमच्या मानगुटीवर बसल्या नव्हत्या.

माझे एक वडील बंधु म्हणायचे, "आधीं बंगाली चांगलं पक्कं आलं पाहिजे, इंग्रजीचा पाया त्यानंतर." म्हणून, आमच्या वयाचे शाळेंतले विद्यार्थी जेव्हां घडाघड 'I am up,म्हणजे मी होतों वर 'आणि ' तो होता खालीं, म्हणजे He is down 'पाठ म्हणत असत, तेव्हां आमची विद्या ' बी ए डी–बॅड ' आणि ' एम् ए डी–मॅड ' पर्यंत सुद्धां पोंचली नव्हती.

' नबाबी जबानींत ' चाकर नोकरांच्या आवाराला म्हणायचे ' तोशा-खाना.' त्याकाळची आमची आमीरी जरी बरीच घसरली होती, तरी तोशाखाना, दफ्तरखाना, बैठकखाना हे शब्द मात्र कायम होते.

त्या तोशाखानाच्या दक्षिणेला एका मोठ्या खोलींत मिणामिणता कांचेचा दिवा असायचा– ( एरंडेल तेलाचा ); भिंतीवर एक गणपतीचं आणि एक कालीमातेचं चित्र टांगलेलं असायचं; त्याच्याच आसपास एखाद दुसरी पाल आपली शिकार पकडण्याच्या उद्योगांत असायची. खोलींत दुसरी कसली सजावट नसे; जमिनीवर एक मळकट हांतरी टाकलेली असायची.

आमचीं राहणी अगदीं साधी होती, हें सांगून ठेवतों. गाडी-घोड्याची ब्याद नव्हती म्हटलं तरी चालेल. बाहेरच्या बाजूला, कोंपऱ्यावर, चिंचेच्या

क्रमांक ... नों. दि. ...



झाडाखालीं एक मेणागाडी आणि एक म्हातारं घोडं तेवढं होतं. अंगावरचे कपडे अगदीं साधे असत. पायांवर मोजे चढायला कितीतरी काळ जावा लागला होता. व्रजेश्वराची फराळाची यादी डावलून, न्याहारी आणि मधल्या वेळच्या खाण्यासाठीं जेव्हां आम्हांला पाव आणि केळींच्या पानांत गुंडाळलेल्या लोण्याचा रतीब सुरूं झाला तेव्हां आभाळाला हात पोंचल्यासारखं वाटलं आम्हांला ! जुन्या काळची श्रीमंती मोडकळीला आलेली होती; ती परिस्थिति स्वाभाविक म्हणून अंगवळणीं पाडण्यासाठीं साहजिकच आमची तालीम चालू होती.

आमच्या त्या हांतरी अंथरलेल्या बैठकखान्यांतल्या नोकरांचा जो नाईक होता, त्याचं नांव होतं व्रजेश्वर. त्याचे केंस आणि मिशा अर्धवट काळ्या-पांढऱ्या होत्या; तोंडावरचं कातडं ओढलेलं अन् वाळलेलं होतं; कडक मिजासीचा अन् खणखणीत आवाजाचा होता तो;पण, चावत चावत, चघळत चघळत,बोलायचा. त्याच्या पहिल्या मालकांचं नांव होतं लक्ष्मिंत. चांगला नांवलौकिक असलेले होते ते. तेथून व्रजेश्वर उतरला आमच्यासारख्यांच्या घरीं; मुलांवर देखरेख करण्याच्या कामावर. ऐकलं, कीं त्यानं खेड्यांतल्या पाठ शाळेंत गुरुगिरि केलेली होती.त्याची ती पंतोजीपद्धतीची भाषा आणि ढंग शेवटपर्यंत होता. 'बाबू लोक वाट पाहताहेत' असं न म्हणतां तो म्हणत असे, 'बाबू लोक मार्गप्रतीक्षा करीत आहेत.' असलं त्याचं बोलणं ऐकून मालक मंडळी हंसत असत. तो जसा करारी होता, तितकाच तो सोंवळा होता. स्नानाच्या वेळीं, तळ्यांतल्या पाण्याचा वरचा तेलाचा तवंग दोन्ही हातांनीं चांगलं पांच सातदां बाजूला सारून तो डुबकन् पाण्यांत बुडी मारायचा. स्नानानंतर तो बागेंतल्या वाटेनं अशा कांहीं विशिष्ट तऱ्हेनं हात वांकवून चालायचा, कीं जसं कांहीं विधात्याच्या या अमंगल पृथ्वीला चुकवून, वळसा घालून चालतां आलं, तरच त्याची जात टिकून राहणार होती. रीतीभातींत काय बरोबर, काय चूक, याबद्दल तो ठांसून बोलत असे. आणि त्याची मान थोडीशी वांकडी असल्यामुळं त्याच्या बोलण्याला मान चढायचा. त्याच्या त्या पंतोजीगिरींत एक बारीकसा दोष होता. तो जरासा खाबू

होता; पण त्याचा खादाडपणा आंतल्या आंत झांकलेला असायचा. आमच्या पानांत तो आधींच सर्व कांहीं नीट वाढून ठेवीत नसे. आम्ही खायला बसल्यावर तो एक एक पुरी बोटांनीं अलगत लोंबत धरून विचारायचा, "आणखी वाढूं का?" त्याच्या आवाजावरून त्याला काय उत्तर हवं असायचं तें कळत असे. मी बहुतेक म्हणायचा, "नको आहे." मग तो फारसा आग्रह करीत नसे. दुधाच्या वाटी-बद्दलहि त्याला अनावर ओढ असायची,—माझी नसायची. त्याच्या खोलींत एक लहानसं फळ्यांचं कपाट होतं. त्यांत एका मोठ्या पितळेच्या वाटींत दूध असायचं आणि एका लाकडी थाळींत पुऱ्या अन् भाजी. मांजर जाळीच्या बाहेरून त्याचा वास घेत घेत फिरायचं.

याप्रमाणं, लहानपणापासून थोडं खायची मला संवय लागून गेली होती. कमी खाल्ल्यामुळं मी अशक्त झालों होतों, असं मात्र नव्हे. जीं मुलं खाण्यांत कसूर करीत नसत त्यांच्याहून माझ्या अंगांत जोर जास्तीच होता, कमी नव्हता. माझी प्रकृति इतकी चांगली वाईट होती, कीं शाळा चुकवायचं मनांत आलं, म्हणजे प्रयत्न करूनहि मला कांहीं आजार आणतां येत नसे. जोडे पाण्यांत भिजवून ओल्या जोड्यांनीं दिवसभर हिंडलों, पण सर्दी झाली नाहीं; कार्तिक मासांत उघड्या गच्चीवर झोंपलों;—केस, कपडे भिजले—पण जरा तरी घशांत खवखव झाली असेल तर शपथ; आणि अपचनानं पोटांत दुखणं म्हणजे काय असतं, त्याचा पोटाला कांहीं कधीं अनुभव आला नाहीं; फक्त जरूरीप्रमाणं आईला तोंडानं मात्र मी तसं सांगायचा. ऐकून आई मनांतल्या मनांत हंसायची; तिला त्याबद्दल काळजी कधीं वाटल्यासारखं दिसलं नाहीं! तरीपण, ती नोकराला हांक मारून सांगत असे, "बरं, जा, मास्तरना सांग, आज शिकवणी राहूं दे."

'मुलानं अधून मधून अभ्यासाला रजा दिली, तर इतकं कांहीं नुकसान नाहीं!' असं आमच्या जुन्या काळच्या आईला आपलं वाटत असे. आजकालच्या आईच्या हातांत सांपडलों असतों, तर मास्तरांकडं

परत जावंच लागलं असतं, आणि वर कान-पिळ्यांचा आहेर मिळाला असता; किंवा गालांतल्या गालांत हंसून, पाजलं असतं तिनं एरंडेल-जन्माची पोटदुखी बरी झाली असती. क्वचित् केव्हां तरी मला ताप आलाच, तर त्याला कोणी 'ताप' म्हणायचं नाहीं; म्हणत, 'अंग ऊन झालंय्.' नीलमाधव डॉक्टर यायचे; थर्मामीटर कधीं डोळ्यांनीं पाहिलंहि नव्हतं; अंगाला हात लावून, डॉक्टर पहिले दिवशीं एरंडेल आणि उपासाची योजना करायचे. थोडं पाणी प्यायलं तरी चालायचं, पण तें गरम; आणि त्याबरोबर वेलदोड्याचे दाणे चावले तरी चालायचे. तापानंतर तिसरे दिवशीं मरळ-माशांची पातळ भाजी आणि गुरगुट्या भात, म्हणजे नुसतं अमृत वाटायचं !

मात्र, तापानं आजारी असणं कशाला म्हणतात, तें मुळींच आठवत नाहीं. 'मलेरिया' हा शब्द सुद्धां ऐकला नव्हता. 'ओक्याक्' करायला लावणाऱ्या औषधांचा राजा होता तें तेल; पण कोयनेल कांहीं आठवत नाहीं. अंगावर, देवी काढायच्या चाकूचा ओरखडा सुद्धां कधीं उमटला नव्हता. गोंवर, कांजिण्या कशाला म्हणतात, तें आजपर्यंत माहीत नाहीं. अशी हेंकट स्वभावाची चांगली प्रकृति होती माझी.

आयांना जर मास्तरांचा हात चुकवतां न येण्यासारखी मुलांची प्रकृति निरोगी ठेवायची असेल, तर त्यांनीं व्रजेश्वरासारखा नोकर शोधावा. खाण्यापिण्याच्या खर्चाबरोबरच तो डॉक्टरांचा खर्च वांचवेल; विशेषतः गिरणीचं पीठ आणि मिसळीच्या तेल-तुपाच्या आजकालच्या दिवसांत. एक गोष्ट लक्षांत ठेवायला हवी- तेव्हां, बाजारांत अजून चॉकोलेट आलेलं नव्हतं. एक पैशाची गुलाबी-रेवडी मिळायची. गुलाबी-वास लावलेल्या, साखर-तिळाच्या तसल्या खाऊनं अजून सगळ्या मुलांचे खिसे चिकट होतात कीं नाहीं, याची मला कल्पना नाहीं; पण नक्कीच त्यानं आजकालच्या मान्यवंतांच्या घरांतून शरमेनं पळ काढला असला पाहिजे. ते भडंग-मिसळीचे पुडे आणि स्वस्त किंमतीच्या तिळाच्या वड्या गेल्या कुठं ? अद्याप टिकून आहेत का ? नसतील, तर त्यांना परत आणायची कांहीं जरूरी नाहीं.

व्रजेश्वर रोज संध्याकाळीं कृत्तिवासाचं सात-कांडांचं रामायण वाचायचा अन् तें आम्हांला ऐकायला मिळायचं. त्याच्या वाचनाच्या वेळीं अधून मधून किशोरी चाटुज्जे ( चतर्जी ) हजर व्हायचा. सबंध रामायणाची पोथी त्याला सुरासकट तोंडपाठ येत होती. तो एकदम बैठक मारून बसायचा आणि भराभर रामायण म्हणत कृत्तिवासाच्यावर ताण करायचा. 'अरे रे लक्ष्मण, हें काय अवलक्षण, संकट आलं विलक्षण !' हे त्याचे सूर अजून कानांत घुमताहेत. त्याच्या तोंडावर हंसूं, डोक्यावर तुकतुकीत टक्कल; त्याच्या गळ्यांतून निर्झराच्या प्रवाहासारखे सूर बाहेर पडायचे; पाण्याच्या तळच्या गारगोट्यांच्या आवाजाप्रमाणें त्याचे शब्दांचे संयोग जुळवणारे सूर उमटायचे. त्याचबरोबर हातपाय हालवून त्याचं 'भावदर्शन' चालायचं.

किशोरी चाटुज्जेला सर्वांत वाईट वाटायचं म्हणजे त्याचा 'दादाभाई, म्हणजे मी, असा आवाज असून, भजनी मेळ्यांत जाऊं शकत नव्हतों !' तें शक्य झालं असतं, तर जगांत माझं कांहींतरी नांव राहलं असतं.

रात्र व्हायला लागली, कीं हांतरीची-बैठक बरखास्त व्हायची. नंतर भुताचं भय पाठीच्या कण्यावर घेऊन, आंत, आईच्या खोलींत जायचा मी. आई तेव्हां तिच्या काकूशीं पत्ते खेळत बसलेली असायची. तिच्या खोलींत नक्षीकाम केलेलं होतं; ती खोली हस्तिदंतासारखी चकचकीत असायची. मोठ्या तक्तपोशीवर जाजम अंथरलेलं असायचं. मी जाऊन अशी दंगामस्ती सुरू करायचा, कीं शेवटीं खेळणं बंद करून आई म्हणायची, "हैराण केलं या पोरानं ! जा बाई काकू, मुलांना गोष्टी सांग जा." आम्ही बाहेरच्या व्हरांड्यांत तांब्यांतल्या पाण्यानं हातपाय धुऊन, आजीला ओढून घेऊन जात होतों आणि अंथरुणावर चढत होतों. तिथं मग दैत्यपुरीपासून तों राजकन्येची झोंप मोडून तिला मिळवून आणणाऱ्याच्या गोष्टींचा कार्यक्रम सुरू व्हायचा. पण, मधल्यामधें माझी झोंप मोडायची कोणी ? रात्रींच्या पहिल्या प्रहरीं कोल्हे ओरडायचे तेव्हां ! कलकत्त्यांतल्या कांहीं कांहीं जुन्या वाड्यांतून कोल्हेकुईची रात्र असायची त्या काळीं.

# : ४ :

आम्ही लहान असतांना संध्याकाळच्या सुमाराला कलकत्ता शहर आतांसारखं जागं नसायचं. आतां सूर्यप्रकाशाचा दिवस संपतो न संपतो तोंच विजेच्या प्रकाशाचा दिवस सुरू होतो. त्या काळीं शहरांत काम कमी असायचं, पण विसांवा नसायचा; चुलींतलीं लाकडं विझलीं, तरी निखारे असायचे; तेलाचं यंत्र चालेनासं व्हायचं, आगबोटीचा भोंगा बंद पडायचा; कारखान्यांतले कामगार निघून गेलेले असायचे. कापडांच्या गांठी ( गड्डे ) नेणाऱ्या गाड्यांचे रेडे पत्र्यांच्या छपराखालीं 'शहरीं' गोठ्यांत जायचे. सारा दिवसभर ज्या शहराचं डोकं अशा नाहीं नाहीं त्या काळजींनीं तापलेलं असायचं, त्याच्या नाड्या अजून जशा कांहीं उडताहेतसं वाटतं. आतां रस्त्याच्या दोहों बाजूंला दुकानांतून तशीच खरेदी-विक्री चालू आहे, फक्त त्यावर थोडी राख सांचली आहे. निरानिराळ्या तऱ्हेचे सूर-बेसूर भोंगे वाजवीत जिकडे तिकडे हवागाड्या पळताहेत आतांशा, पण त्यांच्या पळण्यामागं गरजेची निकड कमी आहे.

आमच्या त्या काळीं, दिवस संपला, कीं कामाकाजांचा जादा भाग, जसा कांहीं, शहराच्या दिवे मालवलेल्या तळमजल्यांत काळी घोंगडी पांघरून गपचूप झोंपून टाकायचा. घरांत, बाहेर, संध्याकाळच्या आकाशाची झांपड असायची. गंगेच्या कांठीं असलेल्या एडन गार्डनवर हवा खायला गेलेल्या गुलहौशी लोकांच्या गाड्या परत येत असतांना, रस्त्यावरून सईस लोकांची 'हऽय् ! होऽय् !' अशी हाकाटी ऐकूं यायची. चैत्र- वैशाखांत रस्त्यावरून फेरीवाला ओरडत जायचा-

' बरीऽफ ! ( बर्फ ); ' मातीच्या डेऱ्यांत, मिठाच्या पाण्यांत लहान लहान पत्र्याच्या नळकांड्यांत एक प्रकारचा पदार्थ विकायचे; त्याचं नांव होतं ' कुलपी–बरफ '– हल्लीं त्याला ' आईस ' नाहींतर ' आईस्क्रीम ' म्हणतात. रस्त्याच्या कडेला असलेल्या व्हरांड्यांत उभा राहून त्या फेरीवाल्यांची साद ऐकतांना मनाला काय नि कसं वाटे, तें मनालाच माहीत. आणखी एक साद ऐकूं यायची– ' बेलफूऽल ! ( मोगरा ). '

कां कोणाला माहीत, आतां वसंत ऋतूंत माळ्यांच्या त्या फुलांच्या टोपल्या नाहींशा झाल्या आहेत. त्या काळीं घरांतल्या बायकांच्या आंबाड्यावर बेलफुलांच्या माळा असायच्या, आणि त्यांचा गोड वास घरभर दरवळत राहायचा. अंगधुवायला जायच्या आधीं आपल्या खोलीपुढं भुईवर हात आरसे मांडून बायका वेण्या घालायच्या. वेण्या वळलेल्या केसांच्या दोरांचीं तऱ्हतऱ्हेचीं चक्रं तयार व्हायचीं डोक्यावर ! फरासडांग्याच्या[1] काळ्या कांठांच्या साड्या त्या नेसायच्या; आधींच त्यांच्या निऱ्या करून ठेवलेल्या असत. न्हावीणबाई यायची, वज्रीनं पाय घासून आल्‌ता[2] ( आलिता ) लावून जायची. बायकांच्या आवारांत त्या न्हावीणबाईच बातम्यांची देवाण–घेवाण करायच्या. कॉलेज आणि कचेऱ्यांतून परतणारे ट्रामच्या फूटबोर्डावर गर्दी करून फूटबॉल खेळायच्या मैदानाकडे पळत नसत. परतीच्या वाटेवर त्यांची सिनेमागृहापुढं तेव्हां गर्दी होत नसे. नाटकाची एक प्रकारची हौस दिसायला लागली होती– पण, काय सांगूं ? आम्ही तेव्हां पोरंसोरं होतों !

त्या काळीं, मोठ्या माणसांच्या करमणुकींत लहान मुलांना दुरूनसुद्धां भाग घेतां येत नसे. जर धीर करून जरा जवळपास गेलोंच 'तर जा, पळा, खेळा जा पाहूं, ' असं ऐकून घ्यावं लागायचं. आणि खेळतांना मुलांनीं यथोचित गलबला केला, तरी ' गप् बसा पाहूं ' असंहि ऐकावं लागायचं.

---

[1] या विशिष्ट गांवीं तयार झालेल्या. [2] बंगालमधल्या स्त्रिया, म्हणजे सुवासिनी आणि कुमारी कन्यका पावलांच्या कडेनें लाल आलिता लावतात त्याला आल्‌ता म्हणतात.



विलायतेंत रवींद्रनाथ : वय वर्षे सतरा



रवींद्रनाथ : वय वर्षे चवदा

मोठ्या माणसांच्या करमणुकीचा आनंद अगदीं चूपचापपणें पार पडत असे असं कांहीं नाहीं. त्यामुळें, झऱ्याच्या तुषारासारखं त्यांतलं कांहींबाही आमच्यापर्यंत उडतच असे. इकडल्या व्हरांड्यांत उभा राहून वांकून पाहात राहात होतों:- तिकडच्या व्हरांड्यांतून नाचाची खोली उजेडांत झकमकत असलेली दिसायची. देवडीसमोर मोठमोठ्या, जोड-घोडयांच्या गाडया आलेल्या असायच्या; माझ्या थोरल्या बंधूंपैकीं कोणी कोणी आलेल्या पाहुण्यांना वर घेऊन जात असलेले दिसायचे; कोणी मंडळींच्या अंगावर गुलाबदाणींतून गुलाबपाणी शिंपडायचें, हातांत फुलांचे गुच्छ द्यायचे. कधीं कधीं नाटकांतल्या बाईचं हुमसून हुमसून रडूं ऐकायला यायचं, पण त्याचं मर्म कळायचं नाहीं. ती तशी कां रडायची तें कळावं, असं मनापासून वाटायचं. मग असा पत्ता लागायचा, कीं ती नाटकांत रडणारी बाई, म्हणजे माझ्या एका बहिणीचे पतीच असायचे! तेव्हांच्या कुटुंबव्यवस्थेंत स्त्रिया आणि पुरुष जसे दोहीं-कडच्या दोन सीमेवर असायचे, तशींच मुलं आणि मोठीं माणसं. बैठकखान्यांत हंडयाझुंबरांच्या उजेडांत नाचगाणीं चालायचीं; मोठीं माणसं गुडगुडी ओढीत बसायचीं; झरोक्यांच्या पलीकडे बायकामंडळी विडयांचं तबक[1] घेऊन बसलेली असायची- ओळखींच्या बायकाहि आलेल्या असायच्या, अन् मग त्यांच्या खुसुखुसु घरच्या गप्पा चालायच्या. मुलं तेव्हां अंथरुणावर झोंपलेलीं असायचीं. त्यांना पियारी नाहींतर शंकरी दासी गोष्ट सांगत असायची- त्यांतले शब्द माझ्या कानावर यायचे-

'चांदण्यांत जशीं कांहीं फुलं उमललीं होतीं......'

[1]बंगालमध्यें पुरुषांप्रमाणेंच स्त्रियाहि नेहमीं विडे खातात.

: ५ :

माझ्या लहानपणाच्या जरा आधींच्या काळांत श्रीमंतांच्या घरांतून हौशी- मेळे काढण्याची पद्धत होती. बारीक, गोड आवाजाचीं मुलं गोळा करून मेळे काढायची गडबड असायची. माझे दुसरे काका अशाच एका हौशी मेळ्याचे मुख्य होते. मेळ्यांतलं काव्य लिहिण्याचीहि त्यांची ताकद होती आणि मुलांची तयारी करून घेण्याचा त्यांच्यांत उत्साह पण होता. श्रीमंतांच्या घरांत जसे मेळे पाळलेले असत, तसेच त्या वेळीं बंगालमधें धंदेवाईक मेळे काढायची एक धुंदी चढलेली होती. एकेका वाडींत एकेक नामवंत पदाधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालीं एकेक मेळा उत्पन्न व्हायचा. त्या मेळ्यांचे प्रमुख अधिकारी सगळेच जातीनं किंवा विद्याभ्यासानं विशेष कोणी मोठे असायचे, असं कांहीं नाहीं. त्यांनीं आपापल्या सामर्थ्यावर नांवं कमावलेलीं होतीं. आमच्या घरीं मधून मधून मेळे-गाणीं होत असत. पण, मला रस्ता बंद होता-लहान होतों म्हणून ! पण मला त्याची पूर्वतयारी पाहायला मिळालेली होती. व्हरांडाभर लोक बसलेले असायचे; चहूंकडे तंबाकूचा धूर व्हायचा. लांब लांब केंसांचे, डोळ्यांना काजळ असलेले मुलगे असायचे. लहान वयांतच चेहऱ्यावर पोक्तपणा आलेला असायचा त्यांच्या; विडे खाऊन खाऊन ओठ काळे पडलेले असायचे बिचाऱ्यांचे. पत्र्याच्या रंगीत ट्रंकेंत साज-शृंगाराचं सामान-सुमान असायचं. देवडीचा दरवाजा मोकळा असायचा; माणसं शिरायचीं आंत हवीं तेवढीं; खूप गर्दी व्हायची. मोठ्यामोठ्यानं आवाज निघायचे;

चहूंकडे आणि गल्ली ओलांडून, पार चित्पूररस्त्यावर ऐकूं जायचा मेळ्याचा आवाज. रात्रीं नऊचा सुमार झाला कीं, पारवळाच्या पाठीवर बहिरीससाण्यानं झडप घालावी त्याप्रमाणं, शाम येऊन त्याच्या घट्टे पडलेल्या बळकट हातानं माझा दंड पकडायचा आणि म्हणायचा, "आई बोलावते आहे, चल, झोंपायला चल." लोकांसमोर तशी ओढाताण केल्यानं मानहानि व्हायची! म्हणून पराजय पत्करून मी मुकाट्यानं झोंपायच्या खोलींत चालूं लागायचा. बाहेर आरडाओरडा चाललेलाच असायचा; लोंबते दिवे झगझगत असायचे. माझ्या खोलींत मात्र सगळं कसं शांत शांत असायचं; पितळी समई मिणमिणत असायची. नाचाचा ताल समेवर येऊन पोंचतांक्षणीं वाजलेल्या टाळ्या झोंपेच्या गुंगींत ऐकूं यायच्या.

ज्यांत त्यांत–' नको ' म्हणणं हा वडील माणसांचा तेव्हां धर्म होता. एकदां, कां कोणाला माहीत, त्यांचं मन मऊ झालं आणि ' मुलांनाहि मेळा पाहायला मिळेल ' असा हुकूम निघाला. नलदमयन्तीचं आख्यान होतं. सुरुवात व्हायच्या आधीं, रात्रीं अकरा वाजेपर्यंत अंथरुणावर झोंपलों होतों. बरोबर वेळेला आम्हांला उठवण्यांत येईल, असं पुनः पुनः आश्वासन दिलेलं होतं. वरचढ माणसांची रीत माहीत होती, त्यामुळें त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसत नव्हता. कारण, ते मोठे अन् आम्ही लहान होतों ना.

त्या रात्रीं आपलं नाराज शरीर ओढत बिछान्यावर घेऊन गेलों. कारण, आई म्हणाली होती, " मी स्वतः तुला उठवीन. " आणखी एक कारण असं, कीं रात्रीं नवाच्या पुढं जागं राहायचं म्हणजे मला फार कठीण व्हायचं. मधेंच केव्हांसं झोंपेंतून उठवून मला बाहेर आणण्यांत आलं. डोळे दिपून गेले! पहिल्या दुसऱ्या मजल्यावरून दिव्यांच्या हंड्यांचा प्रकाश जिकडे तिकडे पसरून झकमक् करीत होता. अंगणांतल्या पांढऱ्या शुभ्र बिछाइतीमुळं अंगण डोळ्यांना कसं मस्त दिसत होतं! एका बाजूला घरांतली वडीलधारी मंडळी आणि निमंत्रित पाहुणे मंडळी

बसली होती. बाकीच्या जागेंत, आपण होऊन आलेल्या लोकांनीं ज्याला जिथं हवं तिथं बस्तान ठेवून अंगण गजबजून सोडलं होतं. पोटावर-सोन्याच्या-सांखळ्या लोंबत असलेली, नामवंत मंडळी आली होती कार्यक्रमाला; आणि त्या कार्यक्रमाच्या बैठकींत लहान-मोठीं माणसं चिकटलेलीं होतीं. पैकीं बहुतेक लोक, शिष्टमंडळी ज्यांना 'बाजारबुणगे' किंवा, 'आलतु फालतु' म्हणतात, तसले होते. तशा कार्यक्रमासाठीं उम्या-लेखणीनं गाणीं लिहून लिहून हात पक्के झालेली मंडळी पण आली होती; त्यांनीं कांहीं इंग्रजी कॉपी बुकं गिरवलेलीं नव्हतीं. त्या कार्यक्रमाचे सूर, नाच, कथा, सारं सारं बंगाली भूमीवरचं, बंगाली बाजारांतलं होतं. त्यांतली भाषा गुरुजींनीं घासून पुसून मुलामा दिलेली नव्हती. आम्ही मुलं बैठकींत दादांच्यापाशीं जाऊन बसल्यावर रुमालांत थोडे थोडे पैसे बांधून आमच्या हातांत दिले. 'वाहवा' द्यायच्या वेळेला ते पैसे फेकायची रीत होती. त्या रीतींत मेळेवाल्यांची 'जादा दौलत' आणि सभ्य गृहस्थांचा मोठेपणा असायचा.

रात्र संपत आली, तरी कार्यक्रम संपायचीं चिन्हं नसायचीं. मधेंच केव्हां तरी कोणी माझं पेंगून लवंडलेलं शरीर उचलून कुठं नेऊन ठेवलं, मला पत्ताहि लागला नाहीं. आणि तें मला समजलं असतं; तर ती कमी का शरमेची बाब होती! जो मनुष्य मोठ्या माणसांच्या बरोबर एका रांकेंत बसून बक्षिसं फेकीत होता, त्याला अंगणभर माणसांतून तसा उचल-तांगडी करून न्यायचा म्हणजे केवढा अपमान! झोंपेंतून जागा झालों तों, मी आईच्या तक्तपोशीवर झोंपलों होतों, हें दिसलं. खूप उशीर झाला होता, ऊन रणरणत होतं. सूर्य वर आला तरी मी उठलों नाहीं, असं कधीं झालं नव्हतं!

आजकाल शहरांतून नदीच्या प्रवाहासारखे करमणुकीचे कार्यक्रम चाललेले असतात. त्यांत अधेंमधें खंड नाहींच. दररोजच, जिथं तिथं, हवा तेव्हां, सिनेमा आहेच; थोडक्या खर्चांत हवं त्यांनीं आंत शिरावं. त्या काळीं (देवादिकांचीं गाणीं असलेले) मेळ्यांचे कार्यक्रम, वाळवंटांत कोस, दोन दोन कोस अंतरावरची वाळू उकरून काढलेल्या पाण्या-

सारखे असत. कांहीं तासांचं त्याचं जीवन, मधेंच वाटसरूंनीं यावं आणि ओंजळ भरून घेऊन आपली तहान भागवावी, अशापैकीं चालत असे.

ते दिवस म्हणजे जसे कांहीं गोष्टींतला राजपुत्र होता. अधून मधून, पर्वण्यांच्या वेळीं, मर्जीप्रमाणं आपल्या राज्यांत तो दानधर्म करायचा. हल्लींचा काळ आहे सौदागराचा पुत्र. रस्त्याच्या चौकावर तऱ्हतऱ्हेचा माल मांडून बसलेला आहे– मोठ्या रस्त्यावरून पण गिऱ्हाईक येतं अन् लहान रस्त्यांवरूनहि येतं.

## : ६ :

नोकरचाकरांचा नाईक होता व्रजेश्वर. त्यांच्यांतला सर्वांत लहान पदाधिकारी होता शाम. त्याचं घर होतं यशोहर जिल्ह्यांतल्या एका अस्सल खेड्यांत. त्याची भाषा कांहीं कलकत्त्याची नव्हती. त्याचं गमतीदार खेडवळी बोलणं ऐकून आम्हांला खूप मौज वाटायची. नांवा-सारखाच वर्णानं तो श्याम होता; मजबूत, दुहेरी हाडाचं होतं त्याचं शरीर; डोळे होते टपोरे आणि त्याचे लांब लांब केंस नेहमीं तेलानं तुकतुकत असायचे. त्याच्या स्वभावांत मुळींच कडकपणा नव्हता; आणि मन अगदीं साधं, निर्मळ होतं. मुलांवर त्याचं प्रेम होतं. तो आम्हांला दरोडेखोरांच्या गोष्टी सांगायचा. तेव्हां माणसांच्या मनांत जशी भुताची भीति ठाण मांडून बसलेली होती, तशाच घरोघरीं चोर-दरोडेखोरांच्या गोष्टी बिऱ्हाड करून होत्या. दरोड्यांचा प्रकार अजूनहि कमी झालेला नाहीं. दरोडे पडतात, खून-जखमा होतात, लुटालूट चालते, अन् पोलीसहि अचूक गुन्हेगाराला पकडत नाहींतच ! पण ही झाली आतांची बातमी. तेव्हांची दरोडेखोरी गोष्टींत एकजीव झाली होती आणि पुष्कळ दिवस तोंडातोंडीं फिरत राहिली होती. आम्ही जन्मलों त्या सुमाराला दरोडेखोरांच्या टोळींत असलेल्या ऐन उमेदीच्या व्यक्ति पाहायला सांपडत असत. त्या बड्या बड्या लाठीधारी असत आणि त्यांच्या लाठ्यांच्या कसरती चालत असत. त्यांचं नांव ऐकलं, कीं लोक सलाम करायचे. त्या वेळची दरोडेखोरी बहुतेक निर्मळ असायची; म्हणजे त्यांत अजून खून-

खराबी शिरलेली नव्हती. निधड्या छातीची आणि उमद्या मनाची दरोडेखोरी होती तेव्हां. इकडे सभ्यगृहस्थांच्या घरांतूनहि लाठीनं लाठीला तोंड द्यायचे आखाडे सुरू झाले होते. त्यांत नांव कमावलेल्यांच्या वाटेला दरोडेखोर जात नसत. पुष्कळ जमीनदारांचा दरोडीखोरीचा धंदा होता. अशी एक गोष्ट ऐकली होतीः—एका तसल्या धंदेवाईक दरोडे-खोरांच्या टोळीनं नदीच्या आसपास तळ ठेवला होता. त्या दिवशीं होती अमावस्या. पूजेच्या रात्रीं काली–कंकाली–मातेच्या नांवानं जेव्हां त्यांनीं एक मुंडकं कापून आणलं, तेव्हां कपाळ पिटून जमीनदार म्हणाला, " अरे, हा माझाच जांवई कीं रे ! "

तसंच, रघू आणि विसू दरोडेखोरांच्या गोष्टी ऐकायला मिळत. ते अगोदरपासून इशारा देऊन दरोडा घालायचे, नीचपणा करायचे नाहींत. दुरून त्यांचं नांव ऐकूं आलं कीं, गांवांतल्या लोकांचं रक्त गोठायची पाळी यायची. बायकामाणसांच्या अंगाला हात लावणं त्यांच्या धर्माला अमान्य होतं. एकदां तर एका स्त्रीनं, कोयता हातांत घेऊन, कालीच्या अवतारानं उलटून दरोडेखोरांचा नमस्कार पैदा केला होता.

आमच्या घरीं एकदां दरोडेखोरांचा एक खेळ दाखवला होता. अगडबंबच्या अगडबंब, काळे काळे जवान सगळे, लांब लांब केंसवाले. उखळीला चादर बांधून दांतांत धरली अन् एक हिसडा मारून टाकली पाठीकडे. केसांच्या झिंज्यांना माणसं बांधून त्यांना झोंके देत फिरावायला लागले. उंच काठीवरून उडी मारून सटकूदिशीं दुसऱ्या मजल्यावर चढले. एकाच्या दोन्ही हातांच्या कवळींतून दुसरा एक सुटुककन् निसटून पळाला. दहावीस कोसांवर दरोडा घालायचा अन् त्याच रात्रीं परत येऊन घरीं साध्याभोळ्या माणसासारखं झोंपायचं, ही करामत कशी करतात, तेंहि दाखवलं. दोन उंच, मोठ्या काठ्यांना कांहीं अंतरा-अंतरावर पाय ठेवायसाठीं लहान लहान लाकडी तुकडे बसवलेले असतात. या काठ्यांना म्हणतात ' रनूपा ' ( लाकडी घोडे ). दोन हातांत दोन काठ्यांचीं टोंकं धरायचीं आणि त्या लाकडी पाय-

दानांवर पाय ठेवून चालायचं, म्हणजे एक पाऊल टाकलं, कीं दहा पावलं टाकल्याचं काम होतं; घोड्यापेक्षां त्या रन्पांनीं झपाट्यानं जातां येत असे. दरोडे घालण्याचा हेतु कांहीं माझ्या डोक्यांत नव्हता, तरी-पण, एके काळीं तसल्या रन्पांच्या साहाय्याने चालण्याचं शिक्षण शांतिनिकेतनमधल्या मुलांना देण्याचा मीं प्रयत्न केला होता. आमच्या घरांत झालेल्या दरोडेखोरांच्या खेळाच्या चित्राचा शाम सांगत असलेल्या गोष्टींशीं मेळ घालून, दोन्ही हातांनीं छाती घट्ट दाबून धरून शामच्या गोष्टी ऐकण्यांत मीं कितीतरी सांजा काढल्या होत्या.

रविवार, सुट्टीचा दिवस. आदले संध्याकाळीं, बाहेर दक्षिणेकडल्या बागेच्या झुडुपांत रातकिड्यांचीं ' किर्रर्र ' चालू होती; मिणमिणत्या प्रकाशांत भिंतीवर सांवल्या हालतांना दिसत होत्या; छातींत धस् धस् चालू होतं.– शाम रघु दरोडेखोराच्या गोष्टी सांगत होता. दुसरे दिवशीं, म्हणजे रविवारीं, सुट्टीच्या वेळीं मी मेण्यांत जाऊन बसलों. बिन् चालणारा मेणा सुरू झाला, चालला बिन् माहितीच्या प्रदेशाला. गोष्टीच्या जाळ्यांत गुरफटलेल्या मनाला पुन: भीतीचं चाटण द्यायचं होतं.–गडद्द अंधाराच्या नाडींत भोयांच्या ' हैय्या–हुय्या, हैय्या–हुय्या ' आवाजाचे सूर दब दब करून तालावर नाचत होते;–अंग शिवशिवत होतं–उभं मैदान पसरलेलं होतं, उन्हांत वारं कांपत होतं.–दूर तिकडं कालीदिघीचं (काळ्या तळ्याचं) पाणी झकमक चमकत होतं–वाळू चक-चकत होती. कांठावरचं फांद्या-पानांनीं भरलेलं झाड फट पडलेल्या घाटावर वांकलेलं होतं.

गोष्टींतली भीति बिन् माहितीच्या मैदानावरच्या झाडाखालीं वेताच्या बेटांत गोठून बसली होती. मेणा पुढं पुढं जाईल, तस्तसं छातींत धस् धस् व्हायचं ! वेताच्या बेटांत एक दोन उंच बांबूच्या काठ्यांचीं टोकं दिसलीं !–तिथंच भोयांना खांदे बदलायचे होते; मेणा खालीं ठेवून पाणी प्यायचं होतं; डोक्यांना ओले पंचे गुंडाळायचे होते. आणि नंतर ? पुन:—

' हैय्या–हुय्या ! हैय्या हुय्या !–रे रे रे रे रे रे ! '

## : ७ :

सकाळपासून रात्रीपर्यंत अभ्यासाचं जातं घर्घर्, घर्घर् आपलं फिरत असायचं. तें जातं सुरू ठेवण्याची जबाबदारी माझ्या एका थोरल्या भावावर, हेमेंद्रनाथांवर होती. त्यांचा कारभार भारी कडक! तंबोऱ्याची तार फारच ताणली तर 'तडङ्' दिशीं तुटते. आमच्या मनाच्या नावेंत त्यांनीं जें जें कांहीं लादलं होतं, त्यांतलं बरंचसं बुडून गेलेलं आहे. माझी विद्या हें एक बुडीत खातं आहे, हें आतां झांकून चालणारं नाहीं.

हेमेंद्रदादा त्यांच्या मोठ्या मुलीला 'सुशिक्षित' करायला लागले होते. योग्य वेळीं तिचं 'लॉरेटो[1]'त नांव घातलं होतं. त्या आधींच तिचा बंगाली भाषेचा पाया घोंटून झाला होता.

प्रतिभेला इंग्रजी संगीतांत पारंगत करवून घेतलं होतं दादांनीं. पण, त्यासाठीं तिला देशी संगीत, आणि त्यांतलीं गाणीं विसरूं दिलीं नव्हतीं, हेंहि आम्हांला माहीत आहे. त्या काळीं, सुशिक्षित कुटुंबांत, हिंदुस्थानी गाण्याच्या बाबतींत तिची बरोबरी कोणी करूं शकत नसे. विलायती संगीताचा गुण असा आहे, कीं गाण्यांना अस्सल सुरांत बसवलेलं असतं—कान दुरुस्त होऊन जातात—आणि पियानोच्या शिस्तींत तालांतहि ढिलाई राहात नाहीं. इकडं विष्णूपाशीं देशी गाण्याचं शिक्षण सुरू

---

[1] कलकत्त्यांतील एक सुविख्यात, इंग्रजी माध्यमाची (कॉन्व्हेंट) शाळा.

झालं होतं, अगदीं लहानपणापासून. माझंहि नांव त्या गाण्याच्या वर्गांत घातलं होतं. विष्णूनं ज्या गाण्यांनीं संगीताचीं धुळाक्षरं गिरवून घेतलीं, त्या गाण्यांकडे हल्लींचे नामवंत, अनामवंत 'उस्ताद' ढुंकूनहि पाहणार नाहींत. त्या गाण्यांचा दर्जा खेड्यांतल्या लोकगीतांहूनहि खालचा असायचा म्हणाना. एक-दोन नमुने देतों—

एक होती वैदीण
आली वाडींतऽ
पोरींची गोंदायाची
हौस पुरवीतऽ ।
कोंदणं तिचं कसलं बसलं,
गोष्टी वेल्हाळऽ
गोंदण्यानं, वन्सं,
माझं दुखलं कपाळऽ ।
वन्सं, वन्संऽऽ ! !

आणखी कांहीं तुकडे तुकडे आठवताहेत:—

चंद्रसूर्य हारले, दिवे लावतात
रातकिडे;
मोगल पठाण दमले, कोष्टी घेतो
फारसी धडे.
गणूची आई, केळसूनेचा
छळ नको करूं,
एक केळफूल येऊं दे,
लेंकरं भरतील घरूं ।

अगदीं जुन्या काळांतल्या स्थितीचा अंदाज लागण्यासारखी ओळहि आठवते आहे:—

कुत्र्यांनीं चाटलेलं, कोल्ह्यांनीं व्यापलेलं
कांटेरी बन,
कापून त्याचं केलं सिंहासन ।

हल्लीं, पहिल्यांदां हार्मोनियमचा सूर लावून सा-रे-ग-म बोलायचं, असा नियम आहे. मग सोपीं सोपीं हिंदी गाणीं शिकवायचीं. त्या वेळीं आमच्या अभ्यासाची जिम्मेवारी ज्यांनीं पत्करलेली होती, त्यांना पोरकटपणा हा लहान मुलांच्या मनाचा स्वाभाविक धर्म आहे, हें कळत होतं; आणि तसली सोपी, बंगाली भाषा सहज मनांत ठसते, हेंहि त्यांना माहीत होतं. शिवाय, त्या वृत्तांतले देशी ताल तबला-डग्ग्याची मुरवत राखत नाहींत; आपसूक नाडींत नाचत राहतात. मुलांचं मन रमवणारं पहिलंवहिलं साहित्याचं शिक्षण आईनं म्हटलेल्या गीतांनीं सुरू व्हायचं आणि गाण्याचं शिक्षण सुरू व्हायचं वर दिल्यासारख्या लोकगीतांनीं—याचं प्रात्यक्षिक आमच्यावरून करून पाहिलं होतं.

तेव्हां, या देशांतल्या संगीताची जात मारायला अजून बाजाची पेटी आली नव्हती. खांद्यावर तंबोरा धरून गाण्याचा अभ्यास केला आम्हीं; यांत्रिक सुरांची गुलामगिरी केली नव्हती.

माझ्यांत एक फार मोठा दोष आहे. चिकाटीनं शिकत राहण्याचा नेटकसपणा माझ्यांत नव्हता. मनाजोगं वेंचून, टिपून जें जें मिळालं, त्यानंच झोळी भरून घेतली. मन लावून शिकण्याचा गुण जर माझ्या अंगांत असता, तर हल्लींच्या उस्ताद लोकांना मला तुच्छ लेखतां आलं नसतं. कारण, शिकण्याची संधि हवी तेवढी होती मिळालेली. जोंवर आमच्या शिक्षणाची जबाबदारी हेमेंद्रदादांवर होती, तोंवर विष्णूजवळ खुशालचेंडूप्रमाणें ब्रह्मसंगीत[१] म्हटलं होतं. कधीं कधीं मनाला आपसूक लहर लागली, तर दारापाशीं उभं राहून राहून गाणं पैदा केलं होतं. हेमेंद्रदादा बेहाग सुरांत गात असायचे, 'अतिगज गामिनीरे !' आणि मी लपून लपून त्याचे छाप मनावर उठवून घ्यायचा. मग संध्याकाळच्या

[१] ब्राह्मधर्मीयांचीं प्रार्थनागीतें.

सुमाराला आईला तें गाणं ऐकवून आश्चर्यचकित करून टाकणं अगदीं सोपं काम असायचं.

आमचे कुटुंब-स्नेही, श्रीकंठ बाबू रात्रंदिवस गाण्यांत बुडलेले असायचे. व्हरांड्यांत बसल्या बसल्या चमेली-तेल लावून, ते स्नान करायचे. त्यांच्या हातांत नेहमीं एक गुडगुडी असायची; अन् अंबुरी तंबाकूचा वास सुटलेला असायचा. नेहमीं गुणगुणत असायचे आणि सदोदित भोंवतालीं मुलं गोळा करीत असायचे. ते कांहीं गाणं शिकवीत नसत; पण, ते गाणं द्यायचे अन् केव्हां आम्ही तें उचलून घेत असूं, तें कळायचं सुद्धां नाहीं. स्फूर्ति अनावर झाली कीं, श्रीकंठबाबू उठून उभे राहायचे, सतार वाजवीत नाचत राहायचे; चेहऱ्यावर हंसूं असायचं अन् डोळे चमकत असायचे; अन् ते गाणं सुरूं करायचे—

'मय छोडों व्रजकी बांसरी'

त्यांच्या बरोबरीनं गायल्याशिवाय माझी सुटका नसायची.

*　　　　*　　　　*

तेव्हां मुक्तद्वाराचा पाहुणचार होता. ओळखीपाळखीची खाराखोशी करण्याची विशेष जरूरी नसायची. जेव्हां जे कोणी यायचे त्यांना झोंपायला जागाहि मिळायची अन् रीतसर जेवायचं ताटहि यायचं त्यांच्या-पुढे. असेच एक अनोळखी अतिथि लेप पांघरून, तंबोरा खांद्यावर घेऊन आले एक दिवस आणि बसायच्या खोलींत आपलं बोचकं सोडून, पाय पसरून बसले. हुक्काबरदारानं [1] रीतीप्रमाणं त्यांच्या हातांत हुक्का दिला. त्या काळीं पाहुण्यांसाठीं पान-तंबाकूची सोय ठेवलेली असायची. आंत घरांतल्या बायकामुलींचं सकाळच्या वेळीं तेंच काम असायचं–; आल्या-गेल्यासाठीं ढीगन् ढीग विडे तयार करून ठेवावे लागत. चट्पट् पानाला चुना लावायचा, काटकीनं ओला कात लावायचा, मसाला टाकायचा

---

[1] घरच्या मंडळींना आणि आल्यागेल्या पै-पाहुण्यांना हुक्के भरून देण्याच्या कामावर नेमलेला खास मनुष्य.

आणि विडे बांधून, लवंग टोंचून, पितळी घमेल्यांत विडे रचून ठेवायचे; त्यावर काताचे डाग पडलेलं एक ओलं फडकं टाकून ठेवायचं. तिकडं बाहेच्या बाजूला, जिन्याखालच्या खोलींत तंबाकू भरायची धांदल चाललेली असे. मातीच्या घंगाळांत राखेखालीं गुल-कोळसाकणीचे गोळे आणि गुडगुडयांच्या नळ्या नागलोकांतल्या सापांसारख्या लोंबत असायच्या; त्यांत असायचा गुलाबपाण्याचा वास. त्या अंबुरी तंबाकूच्या वासानं जिन्याच्या तोंडाशीं येतांक्षणींच आलेल्या पाहुण्याचं "यावं, यावं" असं जसं कांहीं स्वागत व्हायचं. कोणीहि येवो, आलेल्या माणसाचा मान राखलाच पाहिजे, असा त्या काळचा एक ठरलेला नियम होता. भरलेल्या विड्यांचं तें घमेलं मागेंच बाजूला झालंयू आणि हुक्काबरदारांची जात पोषाख उतरवून ठेवून, मिठाईवाल्याच्या दुकानांत तीन दिवसांचे शिळे संदेश मळत बसण्याच्या उद्योगाला लागली आहे.

ते अनोळखी गायक आपखुषीनं आमच्या घरीं राहिले कांहीं दिवस. कोणी कांहीं प्रश्न विचारला नाहीं. उजेडतांच त्यांना मच्छरदाणीच्या बाहेर ओढून काढून त्यांचं गाणं मी ऐकत होतों. नियमितपणें शिकणं ज्यांच्या स्वभावाला मानवत नाहीं, त्यांना नियमविहीन शिक्षणाची हौस असते. सकाळच्या रागांत आमचं चालायचं, 'बन्सी हमारि रे.'

त्यानंतर, मी थोडा मोठा झाल्यावर आमच्या घरीं यदुभट्ट नांवाचे मोठे उस्तादजी आले. एक मोठी चूक केली त्यांनीं. मला गाणं शिकवणारच, अशी त्यांची जिद्द होती. त्यामुळे, माझं गाणं शिकून झालंच नाहीं. लपून, चोरून कांहींबाही उचललं मी. काफी रागांतलं 'रुमझुम बरखे आजु बदरवा' हें गाणं मला आवडलं होतं; आजपर्यंत त्याचं माझ्या वर्षाऋतूंतल्या गाण्यांशीं नातं राहिलेलं आहे. त्याच सुमाराला, कांहीं न सांगतां संवरतां आणखी एक पाहुणा आला आणि मोठी पंचाईत झाली. वाघ-माऱ्या म्हणून त्याची ख्याति होती. 'बंगाली मनुष्य वाघ मारतो,' हें त्या काळांत ऐकून मोठं अद्‌भुत वाटायचं! त्यामुळं त्यांच्या खोलींतच माझा मुक्काम जास्त वेळ होऊं लागला. एका वाघाच्या तावडींत सदरहु वाघमारे सांपडले होते, असं ऐकून आमच्या काळजांत

चमकलं होतं; पण, तो वाघ कांहीं त्यांना चावला नव्हता. वाघाचं चावणं कसं असतं, याचा त्यांनीं म्युझियम (अजबखाना-पदार्थ-संग्रहालय) मधल्या, भुसा भरलेल्या वाघानं वांसलेल्या आ वरून अदमास घेतला होता! त्यामुळें वाघाच्या गोष्टींत तेवढी उणीव राहत नसे. या गोष्टीचा मीं तेव्हां विचार केला नव्हता; आज तें स्पष्ट कळतं आहे. तरीपण, त्या वेळीं त्या वीर पुरुषासाठीं वरचेवर पान-तंबाकूची लगबगीनं तरतूद करीत होतोंच मी;–दुरून कानडा रागांतले आलाप कानावर पडायचे!

*                    *                    *

हें झालं गाण्याचं. हेमेंद्रदादांनीं दुसऱ्या विद्याभ्यासाचा पायाहि चांगला भरभक्कम घातला होता. त्याचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं; त्याचं कारण माझा स्वभावदोष. बहुतेक माझ्यासारखी व्यक्ति लक्षांत घेऊनच रामप्रसाद सेन म्हणाले होते, 'मना, तुला शेतकाम समजत नाहीं.' माझ्या मनांतल्या शेतीचं काम कधीं पीक काढण्यापर्यंत सरळ झालंच नाहीं.

कोणकोणत्या जमिनीवर नांगरट केली होती, त्याचा वृत्तान्त तेवढा सांगतों.

अंधार असतांनाच अंथरुणांतून मी उठत असे, आणि कुस्तीचा 'पोषाख' करत असे! थंडीच्या दिवसांत नुसतं 'हु: हु:' करून अंगावर कांटा उभा राहायचा. गांवांत एक नांवाजलेला पहिलवान होता;– चकणा होता तो. तो चकणा– पहिलवान आम्हांला कुस्ती शिकवायचा. घराच्या मुख्य इमारतीच्या उत्तरेला धान्याचं पेंव होतं. यावरून कळेल, कीं त्या काळीं शहरांनीं कांहीं खेडेगांवं आमूलाग्र झांकून टाकलीं नव्हतीं. मधून मधून शहरांतहि खेड्यासारखी योजना होतीच. शहरी सभ्यतेच्या सुरुवातीच्या काळांत, आमच्या घरीं वर्षाचं धान्य पेंवांत सांठवून ठेवलेलं असायचं. रयत लोक आपापला खंड आणून द्यायचे. त्या पेंवाला लागूनच झोंपडीवजा आमचा तालीमखाना होता. तिथं हात-भर जमीन खणून माती भुसभुशीत केलेली होती आणि मणभर मोहरीचं

तल ओतून ती मऊसूत केलेली होती. मी तिथं पहिल्वानाशीं कुस्तीचे पेंच करणं, म्हणजे शुद्ध पोरखेळ होता. बराच वेळ मातींत धुडकूस घालून, शेवटीं अंगांत एक सदरा अडकवून परत येत होतों झालं. दररोज सकाळच्या प्रहरीं इतकं मातींत खेळणं आईला बरं वाटत नसे. आपल्या मुलाचा रंग मातकट होईल, अशी तिला भीति वाटायची. त्या भीतीमुळं सुट्टीच्या दिवशीं ती सारी माती धुवून पुसून स्वच्छ करण्याचा तिचा कार्यक्रम असायचा. आतांच्या गृहिणी रंगसफाईचं साहित्य विलायती दुकानांतून विकत आणतात– डब्या भरून ! तेव्हांच्या गृहिणी स्वतः मलम तयार करायच्या. दुधाची साय, बदाम, संत्र्यांचीं सालं, आणखी काय काय घालून, वाटून आई उटणं तयार करायची. कसं कसं अन् काय काय घालून ती तें करत होती, त्याची पुरती माहिती असती आणि मनांत असतं, तर 'बेगमविलास ' नांव देऊन एखादं दुकान काढतां आलं असतं मला. एखाद्या संदेशच्या, मिठाईच्या दुकानापेक्षां त्या व्यापारांत खासच कमी फायदा झाला नसता. रविवारीं सकाळीं, व्हरांडयांत बसून मर्दनाचा कार्यक्रम चालायचा; त्यांतून सुटका मिळण्यासाठीं मन उतावळं व्हायचं. इकडे शाळेंतल्या विद्यार्थ्यांत असा छुपा समज होता, कीं आमच्या घरांत मुलं जन्मल्याबरोबर त्यांना दारूंत बुचकळत असत, म्हणून आमच्या घरच्या मुलांचा रंग साहेबी झिलईचा असायचा !

कुस्तीच्या आखाड्यांतून परत यावं, तों मेडिकल कॉलेजमधले एक विद्यार्थी येऊन बसलेले दिसायचे. ते आम्हांला हाडं ओळखण्याची विद्या शिकवायला यायचे. भिंतीशीं एक सबंध सांगाडा लोंबत असायचा. रात्रीं, आमच्या झोंपायच्या खोलींत वाऱ्यानं हालला, कीं हाडं 'खट् , खड् ' करून वाजायचीं. तीं हाडं हलवून हलवून त्यांचीं अवघड अवघड नांवं पाठ केलीं होतीं, त्यामुळं त्या सांगाड्याची भीति मोडली होती.

देवडीवर साताचे टोले पडले, कीं नीलकमल मास्तर घड्याळा-सारखे हजर व्हायचे; एका मिनिटाचा फरक व्हायचा नाहीं तो. त्यांचा बारीक, सडपातळ बांधा होता; पण तब्बेत होती आपल्या विद्यार्थ्यां-

सारखीच; चुकूनहि एखाद्या दिवशीं त्यांचं डोकं दुखलं नाहीं! पाटी दप्तर घेऊन टेबलापुढं हजर होत होतों. काळ्या फळ्यावर खडूचे अंक उमटायला सुरुवात व्हायची– पाटीगणित (अंकगणित), बीजगणित, रेखागणित (भूमिति), सगळं बंगालींत. साहित्यांत 'सीतेच्या वनवासा-' वरून एकदम 'मेघनादवध' काव्याच्या वर्गांत चढवलं होतं आम्हांला. त्याचबरोबर 'प्राकृत विज्ञान' शिकावं लागत होतं. त्यासाठीं मधून मधून सीतानाथ दत्त यायचे. ओळखीच्या पदार्थांवरून माहितीच्या वस्तु पारखून विज्ञानाची वरवर माहिती व्हायची. मधें एकदां 'हेरंब तत्त्वरत्न' आले. कांहीं न समजतां लागलों पाठ करायला 'मुग्धबोध'. याप्रमाणं, सारी सकाळभर अभ्यासाचा जेवढा दाब पडायचा, त्यांतलं हळूंच कांहीं कांहीं ओझं बाजूला ढकलायचा मन आंतल्या आंत प्रयत्न करीत राहायचं. पोपटपंचीची विद्या जाळं ताणून, त्याच्या भोंकांतून निसटण्याचा प्रयत्न करायची; आणि नीलकमल मास्तर आपल्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीबद्दल जें मत जाहीर करत राहायचे, तें कांहीं चार लोकांना हांक मारून सांगण्यासारखं नाहीं.

व्हरांड्याच्या दुसऱ्या बाजूला, डोळ्यांना आतश कांचेचा (उन्हाळी, गडद रंगाचा) चष्मा लावून, म्हातारा शिंपी वांकून कपडे शिवत बसलेला असायचा. वेळ झाली, कीं मधेंच उठून नमाज पढायचा. त्याच्याकडे पाहिलं, कीं वाटायचं, काय सुखी आहे नियामत्! अंकगणितानं डोकं थिथथिथलं, कीं पाटी डोळ्यासमोर वर धरून, मी खालच्या बाजूला पाहायचा; समोर देवडीवर चंद्रभान लाकडी फणीनं आपल्या लांब दाढीचा भांग पाडून कानांच्या बाजूस ती वळवत बसलेला असायचा. त्याच्या शेजारींच कांकणं घातलेला, रोडका दरवान बसलेला असायचा– तंबाकू कुटत. तिथं, ऐन सकाळींच, घोडं बादलींतून आपल्या वांटणीचे दाणे खाऊन गेलेलं असायचं; त्यांतले सांडलेले हरभऱ्याचे दाणे कावळे उड्या मारीत खात असायचे; जनी कुत्रीची कर्तव्यबुद्धि जागी झाल्यामुळं ती भू भू करून त्यांच्या अंगावर धांवायची– पाटीच्या आडून मला या सगळ्या गोष्टी दिसायच्या.



ॲना तर्खंड व त्यांचे पति



रवींद्रनाथ व ज्योतिरिंद्रनाथ

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 33903 ... वि: ...
क्रमांक 9542 ... नों: दि: ...



व्हरांड्याचा केर काढून, एका कोंपऱ्यांत धुरळा सांठवलेला होता. त्यांत मी एक सीताफळीचं बीं टोंचून ठेवलं होतं. त्याला हिरवे अंकुर फुटलेले पाहण्यासाठीं मन नुसतं बेचैन झालं होतं. नीलकमल मास्तर गेले रे गेले, कीं तिकडं पळत जाऊन पाहायचं आणि पाणी घालायचं, हें एक कामच होतं माझं! शेवटपर्यंत माझी आस कांहीं मिटली नाहीं. ज्या केरसुणीनं कोंपऱ्यांत धुरळा सांठवला होता, त्याच केरसुणीनं एक दिवस तो उडवून टाकला!

सूर्य वर चढला म्हणजे निम्म्या अंगणांत सांवली पडायची. बुटका, काळा गोविंद खांद्यावर मळकट, पिंवळट एक पंचा टाकून मला आंघोळीला घेऊन जायचा. साडे नऊ वाजल्या बरोबर रोजचं, डाळ-भात आणि माशांच्या रसभाजीचं ठराविक जेवण. चव लागायची नाहीं त्या जेवणाला.

दहाचे टोले पडायचे. मोठ्या रस्त्यावरून हिरवे-आंबेवाल्याची मन उदास करणारी साद ऐकूं यायची. भांडीवाला 'ठङ् ठङ्' भांड्यांचा आवाज करीत लांब लांब चाललेला असायचा. आमच्या वाड्याच्या रस्त्याकडेच्या भागांतल्या गच्चीवर थोरली वहिनी ओले केंस वाळवत[1] असायची उन्हांत; तिच्या दोन मुली आपल्या कवड्या घेऊन खेळत बसलेल्या असायच्या; कांहीं घाईगर्दी नसायची त्यांच्या पाठीमागें. तेव्हां मुलींच्या मागे शाळेचा तगादा नसायचा; वाटायचं, 'अहाहा! मुलींचा जन्म काय सुखाचा!' म्हातारं घोडं मेणागाडींतून मला माझ्या 'दहा ते चार'च्या अंदमानांत ओढून घेऊन जायचं. साडेचारच्या पुढं शाळेंतून परतायचा मी. तोंवर 'जिमनॅस्टिक'चे (व्यायामाचे) मास्तर आलेले असायचे. एका लांकडी खांबावर एक तासभर शरीर उलटं पालटं करीत असे. ते मास्तर जातात न जातात तोंच ड्रॉइंगचे मास्तर यायचे.

---

[1] बहुतेक बंगाली स्त्रियांचे केंस लांब, मोठे असतात. स्नान झाल्यावर, शक्य असेल तेव्हां कांहीं वेळ पाठीवर केंस मोकळे टाकून गच्चीवर उन्हांत हिंडून त्या ते थोडे सुकवतात. तिकडे स्त्रियाहि रोज डोक्यावरून स्नान करतात.

हळूं हळूं दिवसाचा गंजलेला प्रकाश मावळत यायचा. शहरांतल्या पांच-मिसळी अस्पष्ट आवाजांनीं त्या विटालाकडांच्या नगरदैत्याला स्वप्नाचे सूर ऐकूं यायला लागायचे.

अभ्यासाच्या खोलींत तेलाचा दिवा लागायचा. अघोर मास्तर येऊन हजर व्हायचे; इंग्रजीचे धडे सुरू. काळ्या काळ्या पुठ्याचं इंग्रजी 'रीडर' जसं कांहीं टेबलावर दबा धरून बसलेलं असायचं. पुठ्ठा जरा सैल झाला होता; कांहीं पानं फाटलीं होतीं; कांहींवर डाग पडले होते; नाहीं त्या ठिकाणीं, पहिल्या लिपींत आपलं नांव लिहून लिहून अक्षर घटवण्याचा प्रयत्न केला होता मी. वाचतां वाचतां मी पेंगायचा अन् पेंगतां पेंगतां दचकून जागा व्हायचा. त्यामुळ जितका अभ्यास मी करायचा त्यापेक्षां न करण्याचं प्रमाण जास्त असायचं.

दिवसाच्या कांठीं इतकं सारं झाल्यावर अंथरुणावर पडल्यावर मग कुठं जराशी सवड सांपडायची. अंथरुणावर पडल्या पडल्या गोष्ट ऐकायला मिळायची; पण ती कांहीं संपायची नाहीं—

'राजपुत्र चालेला आहे तेपांतरच्या मैदानावरून.' राजपुत्र घोडयावरून चालल्लेला असायचा— आणि मी? केव्हां झोंप लागायची कुणाला माहीत— !

: ८ :

आतांशा घराच्या गच्चीवर माणसांची ये-जा नाहीं, अन् भुतांची पण नाहीं; हें पाहिलं म्हणजे, आतां काळ बदलला आहे, हें कळतं. आधींच सांगितलं आहे कीं अत्यंत अभ्यासाचं वातावरण न सोसल्यानं ब्रह्मसमंधानं पळ काढला होता. तो गच्चीच्या कार्निसवर एक पाय ठेवून आराम घेत असल्याची गप्प उडाली असून तिथं आतां आंब्यांच्या उष्ट्या कोईंवर कावळ्यांची झडप असते; आणि माणसांची 'वस्ती' खालच्या मजल्यावर चौकोनी भिंतींच्या पेटींत पॅकबंद झाली आहे.

वाड्यांतल्या आंतल्या बाजूची, चहूंकडे भिंत असलेली गच्ची आठवते आहे मला. तिथं संध्याकाळीं हांतरी अंथरून आई बसलेली असायची; भोंवतालीं तिच्या मैत्रिणी बसलेल्या असायच्या; आणि त्यांच्या शिळोप्याच्या गप्पा चालायच्या. त्या गप्पागोष्टींत अचूक माहितीची आवश्यकता नसे, वेळ काढण्याचीच तेवढी गरज असे. तेव्हांचा दिवस भरून काढण्यासाठीं निरनिराळ्या किंमतींच्या निरनिराळ्या मालमसाल्यांची सोय नव्हती. ठांसून विणल्यासारखे दिवस नव्हते, अंतरा-अंतरावर, जाळ्यासारखी वीण होती दिवसांची. पुरुषांच्या मजालिसींत असो, कीं बायकांच्या बैठकींत असो, गप्पासप्पा, हास्यविनोद खूप सवंग असे. आईच्या बैठकींतली प्रमुख व्यक्ति, म्हणजे व्रज आचार्यांची बहीण होती. त्यांना 'आचार्यिनी' म्हणायच्या सगळ्या बायका. त्यांच्याकडे बैठकींत बातम्या पुरवायचं काम असायचं. गांवांतल्या नाहीं नाहीं त्या विचित्र बातम्या गोळा करून—किंवा रचून—आणा-

यच्या त्या. त्यामुळं ग्रहशांति आणि नंतरचे आशीर्वाद यांचा हिशोब लगेच पुढें तोंडभर व्हायचाच. अधून मधून मी माझी नवी पुस्तकी-विद्या आईच्या त्या मंडळाला सादर करीत असे; सूर्य पृथ्वीपासून नऊ कोटी मैल लांब असल्याचं मीं त्यांना सांगितलं होतं. ' ऋजुपाठ,–दुसरा भाग ' या पुस्तकांतून खास वाल्मीकिरामायणांतले वेंचे मी म्हणून दाखवले होते–अगदीं अनुस्वार विसर्गासह. आपल्या मुलाचे उच्चार किती निर्दोष होते, तें कांहीं आईला माहीत नव्हतं, पण त्याचा विद्येचा पल्ला नऊ कोटी मैलांवरच्या सूर्यापर्यंत पोंचल्याचं पाहून ती थक्क झाली होती! रामायणांतले ते श्लोक स्वतः नारदमुनींखेरीज आणखी कोणी म्हणूं शकत असे अन् तो म्हणणारा तिचा मुलगा होता, ही काय कमी आश्चर्याची गोष्ट होती?

वाड्याच्या आंतली ती गच्ची अगदीं बायकांच्या ताब्यांत होती. कोठीच्या खोलीशीं त्या गच्चीचं नातं होतं. गच्चीवर झकास ऊन पडायचं. मिठांतलं लिंबाचं लोणचं झक्क मुरायचं त्या उन्हानं. वाटाण्याची डाळ वाटून, ( तिखटमीठ कालवून ) त्या रबड्यानं भरलेलं पितळी घमेलं घेऊन बायका गच्चीवर बसायच्या आणि न्हालेले केंस वाळवण्यासाठीं पाठीवर सोडून, हातानं सांडगे घालीत असायच्या पटापट; मोलकरणी धुणं वाळत घालून जायच्या. त्या काळीं धुण्याचा आटापीटा बराच हलका होता. हिरव्या आंब्याच्या फोडी उन्हांत वाळवून आंबूशी करीत असत. निरनिराळं नक्षीकाम केलेल्या लहानमोठ्या आकाराच्या दगडी थाळ्यांत आंब्याचा रस ओतून, उन्हांत वाळवून आंब्याच्या पोळ्या करीत असत. मोहरीच्या तेलांतलं कच्च्या फणसाचं लोणचं मुरायसाठीं उन्हांत ठेवलेलं असायचं. केवड्याच्या पानांतल्या कातगोळ्या तयार होत असत. आमच्या घरच्या खास कातगोळ्यांची मला चांगली आठवण आहे. त्याचं तसंच कारण आहे. आमच्या शाळेच्या पंतोजींनीं मला एक दिवस सांगितलं होतं, कीं आमच्या घरच्या कातगोळ्यांची ख्याति त्यांनीं ऐकली होती. त्यांच्या म्हणण्याचा हेतु माझ्या सहज ध्यानांत आला होता. ज्याची ख्याति त्यांनीं ऐकली होती, त्याची खात्री व्हावी,

असं वाटत होतं त्यांना! साहाजिकच, घरचा नांवलौकिक शाबूत राहण्यासाठीं मी गच्चीवर जाऊन – गुरुजींसाठीं काथगोळ्या मधून मधून हळूंच, काय म्हणूं? – 'चोरीत होतों' म्हणण्यापेक्षां 'अपहरण करीत होतों' असं म्हटलेलं बरं दिसेल. कारण, राजे-महाराजेसुद्धां जरूर लागली म्हणजे, आणि जरूरी नसतांनाहि अपहरण करतात. पण चोऱ्या करणाऱ्यांना तुरुंगांत टाकतात, सुळावर देतात! थंडीच्या दिवसांत कोंवळ्या उन्हांत बसून, गुजगोष्टी करतां करतां,कावळे हांकलण्याची आणखी एक जबाबदारी बायकांवर होती. घरीं राहणारा असा मी एकमेव भाऊजी होतों. वहिनीच्या आंब्याच्या पोळ्यांची राखण करणं, आणि तसल्याच बारीकसारीक कितीतरी कामांत मी तिचा सवंगडी होतों. मी तिला 'वंगाधिपपराजय' वाचून दाखवीत असे. कधीं कधीं आडकित्त्यानं तिला सुपारी कातरून देण्याचं काम मला करावं लागे. मी सुपारी अगदीं बारीक, छान कातरायचा. माझ्यांत आणखी कांहीं गुण असल्याचं वहिनीला मुळींच कबूल नव्हतं. इतकंच काय, पण माझ्या चेहऱ्यांतहि कांहींतरी खोड काढून, ती देवावरसुद्धां राग काढायची. मात्र, माझ्या सुपारी कातरण्याच्या करामतीची तोंडभर अवास्तव स्तुति करतांना तिला मुळींच दिक्कत वाटायची नाहीं. त्यामुळं सुपारी कापण्याचं काम जोरांत चालायचं, हें सांगायला नकोच. मीं कातरलेली बारीक सुपारी विसकटून टाकणारं माणूस आतां न राहिल्यानं, दुसऱ्या बारीक कामाला मी माझे हात वाहिले आहेत!

गच्चीवर पसरलेल्या त्या साऱ्या स्त्रियांच्या कामकाजांत एक प्रकारची खेडेगांवी छाया होती. घरीं धान्याचीं कोठारं असायचीं; दळण–कांडण सुरू असायचं; संध्याकाळीं घरच्या दासी पायांवर दिव्यांच्या वाती वळत बसलेल्या असायच्या आणि शेजारीं-पाजारीं कुणाच्या तरी घरचं आठकौडीचं[१] बोलावणं यायचं; अशीं त्या काळांतलीं होतीं तीं कामं.

[१] त्या काळांत, मूल जन्माला आल्यानंतर आठवे दिवशीं बंगालमध्यें विशिष्ट संस्कार करीत असत. आपल्याकडे षष्ठीपूजन करतात, त्यावरून त्या उपचाराची थोडीशी कल्पना यायला हरकत नाहीं. त्या दिवशीं लाह्यांत आठ कवड्या मिसळून, त्या लहान लहान मुलांच्या हातून उधळण्याची प्रथा होती.

हल्लीं मुलं आपलीं आपण छापील पुस्तकांतून परीकथा वाचतात; घरच्या बायका नाहीं सांगत त्यांना तसल्या गोष्टी. चटण्या, लोणचीं– आतां नव्या बाजारांत बरण्यांतून भरून ठेवलेलीं असतात; तीं तिथून विकत आणलीं कीं झालं.

याखेरीज, आमच्या चंडीमंडपावर पण खेडेगांवी छाप होती. तिथं पंतोजींची पाठशाळा भरत असे. फक्त आमच्या घरचींच मुलं त्या पाठशाळेंत जायचीं, असं नव्हतं. शेजारपाजारचीं मुलंहि त्यांच्या पहिल्या पहिल्या, ताडपत्रीवरच्या रेघोट्या त्याच पाठशाळेंत काढत असत. अर्थातच, मीहि माझं 'अ अ रे अ अ', 'आ आ रे आ आ' याच पाठशाळेंत गिरवलं होतं. पण, आभाळांतलीं ग्रहनक्षत्र पाहण्यासाठीं दुर्बिण वापरतात, तशी त्या अक्षरं गिरवीत बसलेल्या लहान मुलाचं चित्र दाखवूं शकणारी एखादी दुर्बिण कांहीं नाहीं. त्यानंतर पुस्तकवाचन आठवतं आहे; म्हणजे, त्या अजस्र मुनींच्या अचाट पाठशाळेच्या हकीकती; आणि हिरण्यकश्यपूचं पोट फाडणाऱ्या नरसिंह अवताराची गोष्ट—बहुतेक शिसवीच्या लाकडी फळ्यांवर कोरलेलं नरसिंह अवताराचं एक चित्रहि मीं पाहिलेलं असावं, असं वाटतं आहे. चाणक्याचे कांहीं कांहीं श्लोक पण आठवताहेत.

माझ्या आयुष्यांत आमच्या वाड्यांतल्या बाहेरच्या मोकळ्या गच्चीचं विशेष रहस्य आहे. सुट्टीच्या दिवसांत कितीतरी वेळ मी तिथं काढायचा. लहानपणापासून मोठ्या वयापर्यंतचे कितीतरी दिवस त्या गच्चीवर नाना प्रकारानं मीं काढले आहेत. माझ्या त्या गच्चीवरच्या निरनिराळ्या आठवणी माझ्या जीवनाशीं एकजीव झालेल्या आहेत.

आमचे वडील घरीं असले म्हणजे त्यांचा मुक्काम तिसऱ्या मजल्यावरच्या खोलींत असे. गच्चीवरच्या त्या लहानशा खोलीच्या आडोशाला उभा राहून मीं कितींदां तरी पाहिलं होतं,– सूर्य उगवलेला नसायचा आणि मांडीवर दोन्ही हात जोडून गच्चीवर पांढऱ्या दगडी पुतळ्यासारखे बाबा बसलेले दिसायचे. मधून मधून बाबा बरेच दिवसांसाठीं पहाड-

पर्वतावर गेले, म्हणजे त्या गच्चीवर जाण्यांत मला साता-समुद्रापार गेल्याचा आनंद वाटायचा. सदोदित मी आपला खालच्या मजल्यावर कठड्याच्या फटींतून रस्त्यावरच्या लोकांची ये-जा पाहात असे; त्यामुळं, त्या गच्चीवर जायला मिळणं, म्हणजे जसं कांहीं लोकांची गर्दी असलेली आगगाडी सोडून लांब जाण्यापैकीं वाटायचं. तिथं गेलों म्हणजे माझं मन जसं कांहीं कलकत्त्याच्या डोक्यावरून पावलं टाकीत चालूं लागायचं अन् लांब तिकडं जिथं आकाशाची निळी रेषा पृथ्वीच्या हिरव्या रंगाला टेकल्यासारखी भासायची तिथवर तें धांवायचं. निरनिराळ्या तऱ्हेच्या इमारतींच्या उंचनिंच गच्चींवर नजर खिळायची; अधून मधून झाडांचं पिंजारलेलं डोकं दिसायचं. बहुतेक मी दुपारच्या वेळीं हळूंच गच्चीवर जात असे. पहिल्यापासून दुपारींच माझं मन वेडं करीत असत. त्या दुपारच्या वेळा, म्हणजे जशा कांहीं माझ्या दिवसाच्या रात्रीं असायच्या! या बाल-संन्याशाची विरागी बनण्याची वेळ असायची दुपार म्हणजे! दाराच्या उघड-झांपी फळ्यांच्या फटींतून मी आंत हात घालत असे अन् बेतानंच कडी काढून बाबांच्या खोलींत जात असे. बरोबर दारासमोरच एक सोफा होता; त्यावर अगदीं एकटाच मी बसून राहायचा. मला पकडून नेण्याची जबाबदारी असलेले चौकीदार जेवून खाऊन आहारलेले असल्यामुळं, हांतऱ्यांवर वामकुक्षी करतां करतां गांढ झोंपलेले असायचे. हळूं हळूं संध्याकाळ डोकावूं लागली, कीं ऊन तांबूस दिसायला लागायचं; आकाशांत घारी ओरडलेल्या ऐकूं यायच्या; समोरच्या गल्लींतून बांगडीवाला साद घालीत जायचा.

त्या काळांतल्या दुपारच्या वेळेचा चूपचापपणा आतां राहिलेला नाहीं; आणि त्या शांत वेळांतले ते फेरीवालेहि आतां राहिलेले नाहींत.

मधेंच केव्हांतरी, त्या फेरीवाल्यांची साद वाड्यांतल्या आंतल्या भागांत, जिथं सूनबाई, घरची लक्ष्मी, उशीवर केंस मोकळे सोडून लवंडलेली असे, तिथवर पोंचायची. दासी त्या म्हाताऱ्या कासाराला आंत बोलावून

न्यायची आणि पसंतीप्रमाणं तो कासार घरधनिणीच्या कोंवळ्या हातांत बेताबेतानं, जपून, कांचेचे बिलवर चढवायचा. त्या काळांतल्या सूनबाई या काळांत अजून सूनबाईंच्या पदावर पोंचलेल्या नाहींत; सेकंड क्लासांत अभ्यासाचे धड घोकताहेत अजून त्या. तो कासार बांगड्या विकण्याचा धंदा सोडून आतां त्याच गल्लींत रिक्षा ढकलण्याच्या उद्योगाला लागला आहे. ती गच्ची म्हणजे, मी पुस्तकांत वाचलेलं, माझं वाळवंट होतं जसं कांहीं. अफाट पसरलं होतं तें चहूंकडे. गरम वारा सूं सूं करीत त्या काल्पनिक वाळवंटांत धुरळा उडवीत भिरभिरत असायचा; आकाशाचा निळा रंग फिकट होत आलेला असायचा.

त्या गच्चीवरल्या वाळवंटांत तेव्हां एक 'ओॲसिस' दिसलं होतं. आतांशा वरच्या मजल्यापर्यंत नळाचं पाणी चढत नाहीं. तेव्हां तिसऱ्या मजल्यावर तें पोंचलेलं होतं. गुपचूप एकदां तिसऱ्या मजल्यावरच्या आंघोळीच्या खोलींत शिरलों होतों; जणुं कांहीं, बंगालमधल्या बाललिव्हिंग्स्टनला नुकताच त्याचा शोध लागला होता. नळ मोकळा सोडून ठेवीत होतों; पाण्याची धार साऱ्या अंगभर पडायची. नंतर बिछान्यावरच्या चादरीनं अंग पुसून साधासुधा माणूस बनून बसत असे.

सुट्टीचा दिवस पाहतां पाहतां संपत यायचा. खालीं देवडीवर चारचे टोले पडायचे. रविवारच्या संध्याकाळचा चेहरा सदा वांकडा असायचा! दुसरे दिवशीं उगवणाऱ्या सोमवारच्या ग्रहणाची 'आ' वांसलेली सांवली जशी कांहीं रविवारला गिळायला आरंभ करत असल्यासारखी कळा असायची रविवारच्या संध्याकाळची. त्याच सुमाराला खालीं, पहारेकऱ्यांची नजर चुकवलेल्या मुलाचा तपास सुरू झालेला असायचा.

नंतर फराळाची वेळ. ती वेळ व्रजेश्वराची तांबडी लूण केलेली (महत्त्वाची) वेळ. फराळाच्या जिनसा विकत आणण्याची जिम्मेवारी त्याचीच होती. त्या काळीं दुकानदार तुपाच्या किंमतींत शेंकडा तीस चाळीस टक्के तोट्याची तमा बाळगीत नसत. वास आणि चवीच्या बाबतींत फराळाचे जिन्नस (मिठाई इ.) अजून बिघडलेले नव्हते.

कचोरी, सामोसे किंवा आलूरदम[1] पुढें आल्यास उचलून तोंडांत टाकायला वेळ लागत नसे. पण, फराळाच्या वेळीं, ब्रजेश्वरानं आपली वांकडी मान आणखी वांकवून, "पाहा बाबू, काय आणलंय्!" असं म्हटलं, कीं बहुतेक कागदी पिशवींत मुईमुगाच्या भाजक्या शेंगा आणलेल्या दिसायच्या. मला भाजक्या शेंगा आवडत नव्हत्या, असं कांहीं नाहीं; पण त्यांची किंमत ब्रजेश्वरला मनपसंत असायची. मधल्या वेळच्या खाण्याच्या वेळीं भाजक्या शेंगांवर भागवावं लागलं, तरी चुकून कधीं तोंडावाटें ब्र काढला नाहीं मी. इतकंच काय, पण ज्या दिवशीं पत्रावळीच्या पुड्यांतून तिळाची मिठाई निघायची, त्या दिवशीं सुद्धां मीं कधीं कुरकुर केली नव्हती.

दिवसाचा उजेड मंद होत आल्यावर मी एकदां गच्चीवर फेरी मारून यायचा आणि मग खालीं वांकून पाहायचा—तळ्यांतलीं बदकं परत गेलेलीं असायचीं; लोकांची ये-जा सुरू झालेली असायची; निम्म्या तळ्यावर वडाच्या झाडाची सांवली पडलेली दिसायची; रस्त्यावरच्या जोडघोड्यांच्या गाड्यांच्या सईसांच्या हांका सुरू झालेल्या असायच्या.

---

[1] एका प्रकारची बटाट्याची अंगाबरोबर रस असलेली भाजी. लहान लहान सबंध—मोठे असल्यास अर्धे अर्धे बटाटे करून विशिष्ट पद्धतीनं, विशिष्ट मसाला घालून ही भाजी करतात; चवीला छान असते.

: १ :

दिवस याप्रमाणें ठराविक चालीनं चाललेले असत. पैकीं मधल्या वेळेवर शाळेची पकड असे; आणि उरलेली सकाळ-संध्याकाळ घरांत निघायची. वर्गांत गेल्याबरोबर शाळेंतलीं टेबलं बाकं जशीं कांहीं कोंपरखळ्या मारायची अगदीं. ती शाळा अन् त्या आठवणी, दोघांचाहि मुखडा दररोज ठराविक मासल्याचा असे.

संध्याकाळीं घरीं परतत होतों. वर्गाच्या खोलींत तेलाचा दिवा दुसऱ्या दिवसाच्या अभ्यासाच्या तयारीचा सिग्नल देत असे. कधीं कधीं घरीं,अंगणांत अस्वलाचा खेळवाला येत असे. कधीं कधीं गारुडी येत असे,सापाचे खेळ दाखवायला. एखादे वेळीं डोंबारी यायचा अन् जरा नव्या गंमती पाहायला मिळायच्या. आमच्या चित्पूर रोडवर आतां त्या लोकांचं कुडमुडं वाजलेलं ऐकूं येत नाहीं. सिनेमाला लांबून नमस्कार करून त्यांनीं 'देशत्याग' केलेला असावा. एक प्रकारचे टोळ वाळलेल्या पानांशीं आपला रंग मिसळून असतात ना, त्याप्रमाणें माझा जीव त्या रुक्ष दिवसांच्या रंगाशीं मिसळून फिकट बनून असायचा.

तेव्हांचे खेळ कांहीं ठराविक प्रकारचे असत. गोट्या होत्या; चेंडू-फळी—म्हणजे क्रिकेटचा एक लांबचा नातेवाईक होता म्हणाना; आणि भोंवरे फिरवणं, पतंग उडवणं, असले खेळ असायचे तेव्हां. शहरांतल्या मुलांचे सगळे खेळ असले कमजोराचे असत. मोकळ्या मैदानावर फुटबॉल खेळाच्या उड्या अन् धांवपळ अजून समुद्रापलीकडे होती. याप्रमाणें,

एकाच मापाचे, ठराविक ठशाचे दिवस माझ्या भोंवतीं चाळल्या खुंट्या रोंवीत, वेढा घालीत फिरत होते.

अशा वेळीं, एके दिवशीं सनईचे सूर वाजले. आमच्या घरांत नवी नवरी आली—माझी वहिनी ती. कोंवळ्या, नाजूक सांवळ्या हातांत बारीक, सोन्याच्या बांगड्या होत्या तिच्या. डोळ्याचं पातं लवतां लवतां भोंवतींचा वेढा विरळ झाला. ओळखीच्या सीमेपलीकडचं; जसं कांहीं मायावी जगांतलं नवं माणूस आलं आमच्या घरांत! लांबून लांबून तिच्या आंवतींभोंवतीं फिरत राहायचा मी, पण जवळ जायला मन धजायचं नाहीं. ती येऊन कौतुकाच्या आसनावर बसली होती; अन् मी होतों उपेक्षित एक मुलगा!

आमच्या वाड्याचे तेव्हां दोन भाग होते. बाहेरच्या भागांत पुरुष; आणि आंतल्या भागांत बायकांचा कारभार चालायचा. नबाबी रीत-रिवाज तेव्हांहि चालू होता. मला आठवतं आहे, आक्का एक दिवस नव्या नवरीला बरोबर घेऊन गच्चीवर शतपावली करत होती. मनांतल्या गुजगोष्टी चालल्या होत्या त्यांच्या. मी जरा कुठं जवळ जायचा प्रयत्न केल्याबरोबर लगेंच आक्कानं दरडावलं! वाड्यांतल्या त्या नव्या वातावरणांत मुलांना प्रवेशबंदी होती ना! मुलांना आंखून दिलेल्या सीमेच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न केला होता ना मीं! पुनः तोंड वांकडं करून बुरसट लेल्या जुन्या वातावरणांत परतणं भाग पडलं मला.

उंच पर्वतावरून पावसाचं पाणी वाहत यावं आणि खालच्या बंधाऱ्याचा पाया डळमळीत व्हावा, तसं झालं एकदम—आमच्या घरांतल्या स्वामिनींनं नवा कायदा सुरू केला. वाड्यांतल्या आंतल्या गच्चीला लागून असलेल्या खोलींत वहिनीची जागा झाली. त्या गच्चीवर मग तिचीच पुरती ताबेदारी झाली. बाहुलीच्या लग्नांतल्या जेवणावळींचीं पानं त्याच गच्चीवर मांडलीं जाऊं लागलीं. तशा मेजवानीच्या दिवशीं मला मुख्य पाहुण्याचा मान मिळायला लागला. वहिनी स्वयंपाक कसा छान करायची; अन् तिला दुसऱ्यांना चांगलंचुंगलं करून वाढायची पण हौस होती; ती तिची हौस वहिनी मला गोडधोड वाढून पुरवून घेत असे

आणि अर्थातच तिची हौस पुरवली जावी म्हणून मी नक्कीच हजर होत असे. मी शाळेंतून आल्यावरोबर तिच्या स्वतःच्या हातचा प्रसाद तयार असायचा. पान्ताभात[१], कोळंवी माशांची परतलेली भाजी, आणि किंचित् हिरवी मिरची लावून वहिनी ज्या दिवशीं कालवून वाढायची त्या दिवशीं तर बोलायलाच नको असे. मधून मधून वहिनी कुटल्यातरी नातेवाइकांकडे गेली, म्हणजे शाळेंतून आल्यावर तिच्या खोलीपुढें तिच्या सपाता दिसायच्या नाहींत; मग मला तिचा राग यायचा; आणि मग मी तिची एखादी उंची वस्तु लपवून ठेवून ती परत आल्यावर आमचं भांडण होण्याची तरतूद करून ठेवायचा. ती आल्यावरोबर तिला ती वस्तु दिसेनाशी झाली, कीं आमचं भांडण सुरू. मी म्हणायचा, "तूं आपली बाहेर जाणार! तुझं घर राखीत कोणी बसावं? मी काय पहारेकरी आहे काय?"

वहिनी रागाचा आव आणून म्हणायची, "कांहीं नको आहे माझं घर संभाळायला; स्वतःचे हात संभाळा म्हणजे झालं!"

हें वाचून हल्लींच्या वायकांना हंसूं येईल. त्या म्हणतील, "मुलखावेगळा हाच एक दीर होता कीं नाहीं! जसं कांहीं जगांत कोणाला दीर नसतातच!" हें म्हणणं वरोबर आहे, कबूल करतों. कारण, आजकाल सर्वच बाजूंनीं वय वाढलेलं आहे; तेव्हां लहानमोठ्या सर्वांतच एक प्रकारचा बालिशपणा होता.

याप्रमाणें माझ्या निर्मनुष्य, वाळवंटासारख्या रुक्ष गच्चीवर नव-जीवन सुरू झालं—माणसाचं प्रेम, माणसाचा सहवास मिळायला लागला. माझ्या ज्योतिदादांनीं तो जिव्हाळा आणखी रंगदार व्हायला मदतच केली!

---

[१] बंगालमध्यें शिळा भात पाण्यांत घालून ठेवतात; म्हणजे, तो तेथील उकाड्यामुळें नासत नाहीं. तो भात जेवावयाला घेतांना आधीं त्यांतलें पाणी मीठ घालून पितात; तें थंड असतें.

: १० :

गच्चीच्या राज्यांत नवे वारे वाहूं लागले; नवीन ऋतु आला.

पितृदेवांनीं आतां जोडासांकोहून[१] मुक्काम हालवला होता. बाहेरच्या तिसऱ्या मजल्यावरच्या खोलींत ज्योतिदादांनीं ठाणं मांडलं होतं. त्याच खोलीच्या एका कोंपऱ्यांत मी थोडीशी जागा पटकावली होती.

अंतःपुरांतला पडदा बाजूला झाला होता. आज ही गोष्ट नवीन वाटणार नाहीं; पण त्या वेळीं ती इतकी नवी होती कीं, सांगायची सोय नाहीं. त्याच्या पुष्कळ आधीं, म्हणजे मी अगदीं लहान असतांना सत्येंद्रदादा आय्. सी. एस्. होऊन स्वदेशीं परत आलेले होते. पहिल्यानदां मुंबईला आपल्या कामावर हजर होण्यासाठीं जातांना बाहेरच्या सर्वांना आश्चर्यचकित करून त्यांच्या डोळ्यांसमोरून खुशालपणें वहिनीला बरोबर घेऊन गेले होते ते. घरच्या सुनेला घरांत न ठेवतां आपल्याबरोबर परक्या ठिकाणीं घेऊन जाणं, हेंच विशेष होतं त्या काळीं; त्यांत पुनः दादा तिला चार चौघांसमोरून, पडदाबिडदा कांहीं न ठेवतां घेऊन गेले, म्हणजे थोडं का गैरशिस्त वागणं झालं! आप्तेष्टांच्या डोक्यावर आकाश कोसळल्यासारखं झालं होतं तेव्हां!

बायकांमधें तेव्हां बाहेर नेसून जाण्याच्या साड्या-पातळांचा सुळसुळाट सुरू झाला नव्हता. आतांशा साड्या-पोलक्यांची जी साजशृंगाराची रीत चालू आहे, त्याची सुरुवात आमच्या वहिनीनं केली होती.

---

[१] ठाकुरांच्या वाड्याचें नांव.

तेव्हां मुलींनीं अजून फ्रॉक ( झगे ) घालायला आणि पाठीवर वेण्यांचे शेपटे सोडायला आरंभ केला नव्हता—निदान आमच्या घरीं. लहान मुली पेशवाज ( घागरा ) घालीत असत. आमची आक्का वयानं लहान असतांनाच 'वेथून स्कूल'[१] सुरू झालं. मुलींच्या शिक्षणाची वाट मोकळी करून देणाऱ्या पहिल्या मुलींच्या दलांत आक्का होती. असं म्हणतात कीं, एकदां ती मेण्यांतून शाळेंत जात असतांना, पळवलेली इंग्रज मुलगी समजून, तिला पोलिसांनीं धरली होती; इतकी गोरीपान होती आक्का.

आधींच सांगितलं आहे, कीं त्या काळीं मोठीं माणसं आणि लहान मुलं यांच्यांत दळणवळण ठेवणारा, त्यांना सांधणारा पूल नव्हता. परंतु, त्या सगळ्या पुराण्या रीतिरिवाजांच्या भाऊगर्दीत ज्योतिदादा निर्भेळ नवं मन घेऊन आलेले होते. मी त्यांच्याहून बारा वर्षांनीं लहान होतों. वयांत इतकं अंतर असून मी त्यांना दिसत होतों, हेंच आश्चर्य आहे. आणि विशेष आश्चर्य म्हणजे, त्यांच्याशीं बोल्लोंसंवरलों तर 'जादा शिष्टपणा' केल्याबद्दल रागावून त्यांनीं माझी कधीं मुस्कटदाबी केली नाहीं. त्यामुळं कशाचाहि विचार करतांना मला कधीं धीराचा अपुरेपणा भासला नाही. हल्लीं, मुलांमधेंच, मुलांच्या मेळाव्यांतच मी राहतों आहे. निरनिराळे विषय काढले, तरी त्यांचं आपलं तोंड गप्पच असतं. कांहीं विचारायला त्यांना धीर होत नाहीं, कुठंतरी खटकत असतं. माझ्या लक्षांत येतं, कीं हीं मुलं त्या म्हाताऱ्या माणसांच्या, मोठ्या माणसांनीं बोलायचं अन् लहान मुलांनीं मुक्याचं व्रत पाळायचं अशी रीत असलेल्या पुराण्या काळांतलीं आहेत. नव्या काळांतल्या मुलांना 'कां ?' 'कसं ?' विचारण्याचा धीर आहे; जुन्या काळांतलीं मुलं मुकाट्यानं सगळं ऐकून घेत असत.

गच्चीवरच्या खोलींत पियानो आला. तसंच, 'बहुबाजारांत'[२] त्या वार्निस केलेल्या टेबलखुर्च्या आल्या. छाती ताठ झाली माझी. घसरगुंडीच्या कारकीर्दीतली सस्ता आमिरी गरिबाच्या दृष्टीस पडली जशी कांहीं !

---

[१] कलकत्त्यांतील एक मुलींचें सुविख्यात हायस्कूल. २. कलकत्त्यांतील एक सुविख्यात बाजार पेठ.

माझ्या गाण्यांचा कारंजा उडूं लागला. ज्योतिदादा पियानो वाजवायचे. नवे नवे राग बसवायचे ते; आणि मला शेजारीं बसवून घ्यायचे. तिथल्या तिथं, सूरांच्या पाठोपाठ शब्द बसवून गाणीं तयार करण्याचं माझं काम होतं.

दिवस संपायच्या वेळीं गच्चीवर हांतरी अंथरली जायची. त्यावर तक्क्या ठेवलेला असायचा. एका चांदीच्या तबकांत ओल्या रुमालांत मोगऱ्याच्या माळा, बर्फ टाकलेल्या पाण्याचा एक ग्लास आणि एका छोट्या ताटलींत विडे ठेवलेले असायचे.

वहिनी अंग धुऊन, वेणीफणी करून तयार होऊन बसलेली असे. अंगावर एक बारीक उपरणं घेऊन ज्योतिदादा यायचे; ते वेहाला (व्हायोलीन) वाजवायला बसायचे आणि माझं खुल्या आवाजांत गाणं सुरू व्हायचं. परमेश्वरानं माझ्या आवाजाला जेवढी कांहीं सुराची देणगी दिलेली होती, त्यांतली मुळींसुद्धां तोंवर त्यानं परत हिरावून घेतलेली नव्हती. सूर्यास्त झालेल्या आकाशांत, भोंवतालच्या गच्ची गच्चीवर माझं गाणं पसरत असे. दूर समुद्रावरून दक्षिणेचा वारा सुटायचा; आकाश चांदण्यांनीं भरून जायचं.

वहिनीनं त्या गच्चीची अगदीं बागच बनवून टाकली होती. कठड्याच्या भिंतीवर तिनं मोठीं मोठीं पाम झाडं ओळीनं ठेवलीं होतीं. आसोपास चमेली, रातराणी, निशिगंध, भुईचांफा होता. गच्चीला इजा होईल कदाचित्, असा विचारहि तिच्या डोक्यांत आलेला नव्हता; सगळेच लहरी होते आमच्या घरीं !

अक्षय चौधरी बहुतेक येत असत. त्यांचा आवाज चांगला नव्हता, हें त्यांनाहि माहीत होतं अन् त्यांच्यापेक्षां बाकीच्यांना तें आणखी जास्त चांगलं माहीत होतं. विशेषतः बेहाग राग त्यांच्या फार आवडीचा होता. ते आपले डोळे मिटून गात असत; त्यामुळं ऐकणारांचे चेहरे कसे व्हायचे तें कांहीं त्यांना दिसत नसे. हातांशीं आवाज निघायसारखं कांहीं सांपडलं, कीं त्याचा तबला डग्ग्यासारखा उपयोग करून, त्यावर धपकू धपकू ते हात वडवायचे. त्या वेळीं ते दांतांनीं ओठ आवळून धरून,तल्लीन

होऊन आपलं वादन चालू ठेवीत असत. जाड पुठ्ठ्यांचीं पुस्तकं हाताशीं लागलीं, म्हणजे त्यांचं काम झकास चालायचं. स्वप्नाळू व्यक्ति होती ती. त्यांचा सुट्टीचा दिवस आणि कामाचा दिवस यांतला फरकच कळत नसे.

संध्याकाळची सभा बरखास्त व्हायची. मी सदांचा रात्रीं जागणारा मुलगा होतों. सगळे झोंपायला जायचे अन् मी ब्रह्मसमंधाच्या चेल्यासारखा फिरत राहायचा. सगळी वाडी चूपचाप व्हायची. चांदण्या रात्रीं, गच्चीवरच्या झाडांची ओळीनं पडलेली सांवली रांगोळी काढल्यासारखी दिसायची. गच्चीच्या जवळच असलेल्या शिसवीच्या झाडाचा माथा वाऱ्यानं डुलायचा, पानं हालायचीं. कां कोणाला माहीत, समोरच्या गल्लींतल्या एका घराच्या गच्चीवरची, उतरत्या छपराची खोली माझं लक्ष वेधून घेत असे. उभ्या उभ्या ती खोली जशी कांहीं कुणीकडे तरी बोट दाखवून कांहींतरी दाखवीत असावी, असंच मला आपलं वाटत असे, तें उतरतं छप्पर पाहून !

रात्रींचा एक वाजायचा— दोन वाजायचे-समोरच्या रस्त्यावरून ऐकूं यायचं—

"बलो हरिऽ ! हरि बोऽऽल !!"[1]

---

[1] बंगालमध्यें प्रेत रस्त्यानें नेतांना 'बलो हरि ! हरि बोल!' असें मोठ्यानें, विशिष्ट सूर काढून म्हणत जातात. पुण्यांत 'राम बोलो, भाई राम' म्हणत जसें प्रेत नेतात, त्यावरून कल्पना येण्यासारखी आहे.

## : ११ :

त्या काळीं, घरोघरीं पिंजऱ्यांत पक्षी पाळण्याची हौस होती. वाडींतल्या कोणाच्या तरी घरांतून पिंजऱ्यांत बांधून घातलेल्या कोकिळेचं कुहू कुहू ऐकूं आलं, म्हणजे मला अतिशय वाईट वाटायचं. वहिनींनं चीनमधला एक काळा पक्षी मिळवला होता. फडकं झांकून ठेवलेल्या पिंजऱ्यांतून त्याची शीळ ऐकूं यायची. आणखीहि निरनिराळ्या जातींचे पक्षी होते. त्यांचे पिंजरे पश्चिमेकडल्या व्हरांड्यांत लोंबत असायचे. रोज सकाळीं एक किडेवाला त्या पक्ष्यांना खाद्य पुरवीत असे. त्याच्या झोळींतून टोळ, चतुर, आणि सातू खाणाऱ्या पक्ष्यांसाठीं सातू निघत असत.

ज्योतिदादा माझ्या सगळ्या शंकांचं निरसन करीत असत. पण, बायकांपाशीं तितकी अपेक्षा करण्यांत अर्थ नव्हता. वहिनीला एकदां पिंजऱ्यांत खार पाळायची लहर आली होती. मी तिला म्हणालों, " हा अन्याय आहे. " त्यावर ती मला म्हणाली, " पंतोजीपणा नको आहे ! " हें काय सरळ, बरोबर बोलणं झालं ? अर्थातच, तिच्याशीं वाद घालीत बसण्याऐवजीं, गुपचूप त्या दोन जीवांना पिंजऱ्यांतून सोडून देणं मला भाग पडलं ! त्याबद्दल बोलून घ्यावं लागलं तिचं, पण कांहीं उत्तर न देतां मी गप्प बसलों.

आमच्या दोघांत एक ठरलेलं भांडण होतं. तें कधीं संपलं नाहीं. त्या-बद्दल सांगतों—

उमेश फार हुशार होता. विलायती शिंप्याच्या दुकानांतून नाहीं नाहीं त्या चिट्यांबुट्यांचे रेशमी कापडांचे तुकडे, पाण्यासारख्या स्वस्त दरांत तो विकत घेऊन यायचा; त्याला नेट (जाळीचं कापड) आणि लेस लावून बायका-मुलींचे कपडे तयार व्हायचे. कागदाचं पुडकं सोडून मुलींच्या समोर ते कपडे घेतानंच घड्या उलगडून धरायचा अन् तो म्हणायचा, "अशी आजकालची फॅशन आहे." त्या मंत्राची ओढ मुलींना अनावर वाटायची. पण, मला किती वाईट वाटायचं, तें मला सांगतां येत नाहीं: बेचैन व्हायचा मी. कितीदां तरी वहिनीपाशीं मी माझी नापसंती बोलून दाखवली होती. त्यावर, "शिष्टपणा नको आहे!" असं ऐकून घ्यावं लागलं होतं मला. तसल्या कपड्यांपेक्षां जुन्या पद्धतीच्या काळ्या कांठाच्या पांढऱ्या साड्या, किंवा ढाक्याच्या साड्या कितीतरी चांगल्या, असं कितीदांतरी मी वहिनीला सांगितलं होतं.--मला वाटतं, आजकालच्या जॉर्जेट गुंडाळलेल्या, रंगरंगोटी केलेल्या बाहुलीवजा वहिनीचं स्वरूप पाहून दिरांच्या तोंडांतून शब्दच उमटत नसावेत. उमेशनं शिवलेलीं 'अंगांतलीं' घातलेली वहिनी किती चांगली होती! त्या काळांत आतांसारखा चेहऱ्या-वर इतका खोटेपणा नव्हता!

वहिनीशीं वादांत माझी नेहमीं हार व्हायची. कारण, ती उत्तरच द्यायची नाहीं! आणखी, बुद्धिबळांत मी हरत असे. बुद्धिबळं खेळण्यांत ती अगदीं पटाईत होती.

* * * *

ज्योतिदादांचा विषय निघालाच आहे, तेव्हां त्यांची चांगली ओळख होण्यासाठीं आणखी थोडं सांगायला हवं. त्यासाठीं आणखी आधींच्या जुन्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत.

जमीनदारीचं कामकाज पाहायला त्यांना तेव्हां वरचेवर शिलाईदहला जावं लागत असे. एकदां त्यांनीं मला बरोबर नेलं होतं. त्या दिवसांत तें त्यांचं कृत्य अगदीं गैरवाजवी होतं; म्हणजे ज्याला लोक 'अधिकपणा' किंवा, 'फाजीलपणा' म्हणूं शकत, त्या सदरांतलं होतं. ज्योतिदादांना

नक्कीच वाटत होतं कीं, त्याप्रमाणें घरांतून बाहेर जाण्यायेण्यानं चालतं बोलतं शिक्षण होतं. तो एक शिक्षणाचा फिरता वर्गच होता म्हणानां. माझं आकाशांत, वाऱ्यावर चरत हिंडणारं मन होतं; त्या वातावरणांतून माझ्या मनाला आपसूक खुराक मिळत असे, हें दादांना कळून चुकलं होतं. त्यानंतर जीवन आणखी वरच्या वर्गांत गेल्यावर मी शिलाईदहला ल्हानाचा मोठा होत होतों.

जुनी नीलकोठी[1] तेव्हां अजून उभी होती. पद्मा नदी जरा दूर होती. खालच्या मजल्यावर कचेरी अन् वरच्या मजल्यावर आमची राहायची जागा होती. समोर मोठीच्या मोठी गच्ची होती. गच्चीच्या आसोपास मोठमोठीं सुरूचीं झाडं होतीं. एके काळीं नीळकरसाहेबाच्या व्यापारा-बरोबरच तीं झाडं वाढलीं होतीं. कोठीवाल्या साहेबाचा काय दरारा असायचा त्या काळीं! यमदूतासारखा तो नीळकोठीचा दिवाणजी! खांद्यावर काठ्यालाठ्या आणि कमरेला पट्टे बांधलेले ते पोलिस! लांब टेबल असलेलं तें खानाघर!—बाहेरून घोड्यावर बसून आलेले साहेब त्या खानाघरांत रात्रीचा दिवस करीत असत. मेजवानीबरोबर जोडीच्या नाचाची गिरगिर भिरभिर चालू असायची अन् रक्तांत शॅम्पेनची धुंदी चढलेली असायची! दुर्दैवी रयतांचं हातापायां पडणं. आणि गयावया करून रडणं त्या 'उप्परवाल्यां'च्या कानांत शिरत नसे. त्यांच्या शासनाचा मार्ग थेट तुरुंगापर्यंत पोंचणारा होता. तें सारं आतां दृष्टीआड झालेलं आहे; दृष्टीला फक्त दोन गोष्टी दिसतात आज—त्या म्हणजे, त्या वेळच्या तिथल्या दोन साहेबांच्या दोन कबरी! उंच उंच नारळीच्या झावळ्या अजून वाऱ्यानं डोलत असतात; आणि त्या वेळच्या रयतांच्या नातवंडांना कधीं कधीं मध्यान्हरात्रीं नीळ कोठीच्या जुन्या बागेंत साहे-बाचं भूत फिरत असलेलं दिसतं!

---

[1] नीळेची वखार किंवा, कारखाना. त्या काळीं बंगालमधें नैसर्गिक नीळ, म्हणजे नीळेच्या झाडापासून नीळ पैदा करीत असत. बंगालमधें त्या नीळेचा खूप मोठा व्यापार होता. नीळेच्या मळ्याचा मालक असलेल्या अधिकारी साहेबाला नीळकरसाहेब म्हणत असत.

एकलकोंड्या मनानं राहत होतों मी; एकान्त आवडायचा. कोंपऱ्यांतल्या एका खोलींत होतों. त्या खोलीची गच्ची जितकी मोठी, तितकी माझी सुट्टी फायद्याची होती. अज्ञात जुन्या काळांतली सुट्टी; जुन्या तळ्याच्या काळ्यापाण्यासारखा त्या सुट्टीचा तळठाव लागायचा नाहीं! कवडा ओरडायला लागला, कीं ओरडतच राहायचा; मी विचार करीत बसलों, म्हणजे कितीतरी वेळ विचारच करीत बसायचा; आणि, त्याचबरोबर माझी वही कवितांनीं भरत राहायची. त्या माझ्या कविता म्हणजे गळून पडणारा, माघ महिन्यांतला आंब्याचा पहिला वहिला मोहोर होता जसा कांहीं. तो गळूनसुद्धां पडला.

तेव्हांच्या काळीं लहान मुलानं, विशेषत: मुलीनं, 'अक्षर-गुणानं' दोन चरणांचं कवन लिहिलं, म्हणजे गांवांतल्या जाणत्यांना वाटायचं अहाहा! असं कधीं झाल्यं, का कधीं होणं तरी शक्य आहे!'

तशा कवयित्रींचीं नांवं मी पाहिलीं होतीं; वर्तमानपत्रांत छापून आलेलीं होतीं तीं! नंतर, तीं अगदीं जपून, चौदा अक्षरांचा तोल संभाळून लिहिलेलीं, कच्च्या हातांचीं चांगलीं चांगलीं काव्यं अदृश्य झालीं, आणि त्या नांवं पुसलेल्या पटावर आजकालच्या मुलींचीं नांवं ओळीनं दिसायला लागलीं.

मुलांना तेव्हां मुलींपेक्षां जरा कमी धीर होत असे; आणि भीडहि जरा जास्तच वाटायची. त्या काळीं, लहान वयांत कविता लिहिणारा 'बालकवि' बहुतेक मी एकटाच होतों. माझ्याहून वयानं जरा मोठा असलेल्या माझ्या एका भाच्यानं मला एकदां दाखवलं, कीं चौदा अक्षरांच्या साच्यांत शब्द ओतले, म्हणजे त्यांची कविता तयार होते. मी स्वत: ती जादूची विद्या साधते का तें पाहलं! अन् हातोहात चौदा अक्षरांच्या छंदांत कमळ उमललं! इतकंच काय, त्यावर मधुकराला बसायलाहि जागा झाली. कवींच्यांतलं माझं अंतर तुटलं! तेव्हांपासून तें अंतर तुटलेलंच आहे.

मला आठवतं आहे, विद्यार्थी असतांना, खालच्या वर्गांत जेव्हां शिकत होतों, तेव्हां सुपरिंटेंडंटना मी कविता लिहीत असल्याची वदंता समजली.

सुपरिंटेंडंट गोविंदबाबूंनीं फर्माइश केली; त्यांना वाटलं, नॉर्मलस्कूलचं नांव चमकेल. मला कविता लिहावी लागली; वर्गांतल्या मुलांना वाचून दाखवावी लागली;—आणि ती मी 'नक्कीच चोरली असावी' असंहि ऐकून घ्यावं लागलं! पुढं जरा शहाणपण आल्यावर, मी कल्पना चोरून कवितेचा हात घटवलेला मात्र टीकाकारांना कळलं नाहीं. अर्थातच, तो चोरीचा माल मोलाचा असायचा.

मी एकदां एका विशिष्ट वृत्तांत एक कविता लिहिली होती. त्यांत, पोहतां पोहतां कमळ खुडायला गेलों, तर आपल्याच हातांनीं पाण्यावर आलेल्या लाटांमुळं तें कमलाचं फूल सरकत राहतं, हाताला सांपडत नाहीं, याबद्दल मनाला वाईट असल्याचं व्यक्त केलं होतं. अक्षयबाबू मला बरोबर घेऊन हिंडले आणि ती कविता त्यांनीं मला त्यांच्या नातेवाईकां-पुढं घरोघर म्हणायला लावली. ती मंडळी म्हणाली, "पोराला लिहिण्याचा ढंग आहे!"

वहिनीची तऱ्हाच उलटी होती. मी कधीं काळीं लेखक होऊं शकेन, हें तिला मुळींच पटत नव्हतं. ती नेहमीं टोंचून म्हणायची कीं, बिहारी चक्रवर्तीसारखं मला कधींच लिहितां यायचं नाहीं. माझं मन खट्टू व्हायचं आणि वाटायचं, 'हिच्यापेक्षां एखादी साधीभोळी वहिनी असती, तर आपल्या लहानशा, कवि असलेल्या भाऊजींची बायका-मुलींच्या कपड्यालत्त्यासंबंधींची नापसंती अशा रीतीनं उडवून लावतांना मन कचरलं असतं तिचं!'

* * * *

ज्योतिदादांना घोड्यावर बसायला आवडत असे. त्या काळांत, वहिनीला घोड्यावर बसवून चित्पूरच्या रस्त्यानं एडन गार्डनवर फिरायला जात असत ते. शिलाईदहाला दादांनीं मला एक तट्टू दिला. तो तट्टू कांहीं कमी जोरांत नाहीं पळायचा. मला रथतोल्याच्या मैदानावरून त्या घोड्याला पळवून आणायला सांगितलं होतं. त्या खडबडीत मैदानावरून 'पडूं पडूं' करीत घोड्यावरून फेरफटका करून येत होतों. मी पडणार नाहीं, असा त्यांचा विश्वास होता, म्हणूनच मी पडलों नाहीं. त्यानंतर

कांहीं दिवसांनीं दादांनीं मला कलकत्त्याच्या रस्त्यावरूनसुद्धां घोड्यावरून पळवला होता. पण, तो मात्र तट्टू नव्हता; चांगला मिजासी घोडा होता तो. एक दिवस तो मला पाठीवर घेऊनच, देवडीच्या आंतल्या बाजूला जिथं घोडे दाणापाणी घेत असत, तिथवर सरळ गेला होता. तेव्हांपासून त्याची अन् माझी फारकत झाली.

बंदूक उडवण्यांत ज्योतिदादा पटाईत होते, हें आधीं सांगितलंच आहे. त्यांच्या मनांतून वाघाची शिकार करायची होती. एक दिवस विश्वनाथ शिकाऱ्यानं शिलाईदहाच्या जंगलांत वाघ आल्याची बातमी सांगितली. लगेच बंदूक रोंखून ते तयार झालेच. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्या वेळीं मलाहि त्यांनीं बरोबर नेला होता. एखादं संकट उभं राहण्याचा संभव होता, असं त्यांच्या मनांत सुद्धां आलं नाहीं.

विश्वनाथ शिकारीच्या कामांत मोठा वस्ताद होता. मचाणावरून शिकार करणं, हें मर्दाचं काम नव्हे, असं त्याला ठामपणें वाटत असे. समोर हांक मारून तो वाघाला गोळी घालत असे. एकदांहि त्याचा नेम चुकला नव्हता.

दाट जंगल. तशा जंगलांत छाया–प्रकाशांत वाघ नीटसा दिसतच नाहीं. एका लठ्ठ बांबूच्या झाडाला खोबण्या पाडून शिडीसारखं केलेलं होतं. ज्योतिदादा बंदूक हातांत घेऊन वर चढले. माझ्या पायांत जोडे सुद्धां नव्हते. आलाच वाघ धांवून तर त्याला जो–जोड्यांनीं मारायची पण सोय नव्हती! विश्वनाथानं खूण केली. दादांना किती वेळ तरी वाघ दिसलाच नाहीं. बराच वेळ पाहतां पाहतां, शेवटीं त्यांच्या चाळिशी घातलेल्या डोळ्यांना एका झुडपांत वाघाच्या अंगावरचा एक डाग दिसला. लगेच त्यांनीं झाडली गोळी. सुदैवानं ती वाघाच्या कणाठ्यालाच लागली. त्यामुळें त्याला उठतां आलं नाहीं. कांटकी-बिटकी जें काय समोर सांपडेल तें दांतांत चावून धरून तो शेंपटी हापटीत डरकाळ्या फोडायला लागला. विचार केला म्हणजे मन थोडंसं साशंक बनतं; इतका वेळ तो वाघ मरणाची वाट पाहात थांबला कसा? कारण वाघाच्या स्वभावांत तें नाहीं, असं म्हणतात. तर मग आदले रात्रीं

अनुक्रम: ३३९०३ वि: ५।२ क्रमांक १०५२ नों. दि: १२।५

त्याच्या खाद्यपदार्थांत बेतानंच कोणी अफू मिसळून ठेवली नव्हती ना ! नाहीं तर त्याला इतकी झोंप कां यावी ?

आणखी एकदां शिलाईदहाच्या जंगलांत वाघ आला होता. आम्ही दोघं भाऊ हत्तीवरून वाघाच्या तपासाला निघालों. उसाच्या मळ्यांतून सोंडेनं ऊस उपटून ते चघळत चघळत, पाठीवर धरणीकंपाचे धक्के देत गजराज चालले होते झोंकांत. समोर वन आलं. झाडं गुडघ्यानं दाबून, सोंडेनं ओढून उपटून टाकीत चालला हत्ती. आधींच मला विश्वनाथाच्या भावानं, चामरूनं, गोष्ट सांगितली होती; त्यावरून मला माहीत झालं होतं कीं, वाघ उडी मारून हत्तीच्या पाठीवर चढून बसकण मारून बसला, कीं, भयंकर भानगड होते ! हत्ती म्हणे मग चीं चीं करत जंगलांत सैरा-वैरा धांवत सुटतो; पाठीवर कोण असतील त्यांना झाडांच्या बुंध्यांचे तडाखे बसत बसत शेवटीं त्यांच्या हात-पाय-डोक्याची धडगत राहत नाहीं ! त्या दिवशीं हत्तीच्या पाठीवर बसल्या बसल्या तें हाडं मोडणारं चित्र सारखं माझ्या डोळ्यापुढं दिसत होतं; पण शरमेनं मनांतली भीति मनांत दाबून ठेवली होती. बेदरकारपणा चेहऱ्यावर दाखवीत इकडे तिकडे पाहत होतों. जणुं कांहीं, वाघ दिसतो केव्हां असं झालं होतं मला ! गजराज घुसले दाट जंगलांत. एका जागेवर पोंचतांच थबकून उभे राहिले. माहुतानं हत्तीला चेव आणण्याचा कांहींच प्रयत्न केला नाहीं. दोन्ही शिकारी प्राण्यांपैकीं वाघावरच त्यांचा जास्त विश्वास होता. ज्योतिदादांच्या डोक्यांत वाघाला घायाळ करून, घाबरवून कसं टाकतां येईल, याचाच विचार होता. एकाएकीं वाघानं झुडपांतून बाहेर उडी टाकली; ढगांतून वीज चमकून, सोसाट्याची वावटळ उठावी, तसं वाटलं ! आमच्या डोळ्यांना कुत्रीं, मांजरं, कोल्हे पाहून संवय झालेली; त्या प्राण्याचा आपादमस्तक डौल कांहीं न्याराच वाटला ! इतका वजनदार दिसत होता, पण त्याचा त्याला कांहींच भार वाटत नसावा, इतकी सहज, अलगत उडी मारली त्या वाघानं ! उघड्या मैदानावरून दुपारच्या उन्हांत तो धांवत निघाला. काय सुंदर दिसत होती त्याची ती सहज-डौलाची चाल ! रानांत पीक नव्हतं; ऊन ओतत असलेल्या पिंवळ्या रंगाच्या

अफाट रानावरून वाघ पळत चालला होता. धांवत्या वाघाला मन भरून पाहण्याची तीच जागा होती खरी!

* * * *

आणखी एक गोष्ट राहिली आहे. ऐकून मजा वाटण्याचा संभव आहे. शिलाईदहाला माळी फूलदानांत फुलं लावून ठेवीत असे. माझ्या डोक्यांत एक लहर आली. फुलाच्या रंगीत रसानं कविता लिहाव्यात असं वाटलं. फुलं कुसकरून जेवढा रस निघायचा, तो कांहीं टांकाच्या टोंकावर चढायचा नाहीं. एखादं यंत्र तयार केलं पाहिजे, असं वाटायला लागलं. एखादी, छिद्र असलेली लांकडी वाटी आणि त्यांत फिरत राहील असं, बत्त्यासारखं कांहींतरी असलं म्हणजे जमेल, असं मला सुचलं. दोरीनं बांधलेल्या एका चक्राच्या साहाय्यानं तें फिरेल, अशी युक्ति करतां येईल, असंहि वाटलं. ज्योतिदादांना माझी कल्पना सांगितली. ते मनांतल्या मनांत हंसले असतील कदाचित्, पण तें हंसूं बाहेर तरी दिसलं नाहीं. त्यांच्या हुकुमाप्रमाणं सुतार आला; माझ्या कल्पनेप्रमाणं यंत्र तयार झालं. वाटीभर फुलांवरून बत्ता घुरुं घुरुं किती फिरवला, तरी नुसता लगदा तयार व्हायला लागला, रस कांहीं केल्या निघेचना. फुलाचा रस आणि यंत्राचा दाब याचा छंद जुळला नाहीं, हें ज्योतिदादांच्या लक्षांत आलं. तरीपण, माझ्या तोंडावर हंसून त्यांनीं माझी चेष्टा केली नाहीं.

आयुष्यांत ती एकदांच मी इंजिनिअरी करण्याचा प्रयत्न केला होता. शास्त्रांत म्हटलं आहे, कीं नाहीं त्यानं नाहीं त्याला हात घातला, कीं मान खालीं करायला लावणारं एक दैवत आहे. त्यालाच म्हणतात, '–येरा गबाळ्याचें काम नोहे.' त्या दैवताची त्या दिवशीं माझ्यावर दृष्टि खिळली. तेव्हांपासून माझा यंत्राला हात लागला असेल तर शपथ! इतकंच काय, दिलरुबा, सतारीला सुद्धां मी हात लावला नाहीं तो.

फ्लॉटिला कंपनीशीं स्पर्धा करायला जाऊन, बंगालच्या नदींत स्वदेशी आगबोट चालविण्याच्या उद्योगांत ज्योतिदादा कसे फसले होते, त्याबद्दल जीवनस्मृतींत मीं लिहिलंच आहे. त्याच्या आधींच वहिनी देवाघरीं गेली होती. ज्योतिदादांनीं तिसऱ्या मजल्यावरचा मुक्काम हलवला–कायमचा! अखेरीस त्यांनीं रांचीला, टेंकडीवर एक बंगला बांधला.

## : १२ :

आतां तिसऱ्या मजल्यावर आणखी एक पर्व सुरूं झालं. तें नवं पर्व म्हणजे माझा संसार.

एके काळीं धान्याचं कोठार, जुना मेणा आणि तिसऱ्या मजल्यावरची मोकळी गच्ची, या तीन ठिकाणीं बहुतेक माझा फिरता मुक्काम असायचा. पुढें वहिनी आली, गच्चीवरच्या घरीं बाग फुलली, पियानो आला, नव्या नव्या सुरांचे झंकार कारंजासारखे उडायला लागले.

गच्चीवरच्या पूर्वेकडेच्या खोलीच्या सांवलींत सकाळीं ज्योतिदादांचा कॉफीपानाचा कार्यक्रम व्हायचा. त्या वेळीं ते त्यांच्या एखाद्या नव्या नाटकाची रूपरेखा वाचून दाखवायचे. त्यांत कांहींबाही नवीन घालण्यासाठीं मला हांक मारत असत दादा. माझ्या कच्च्या हाताच्या ओळी त्यांच्या नाटकांत घालतांना दादांना किती आनंद व्हायचा! हळूं हळूं ऊन चढायचं–खोलीच्या छपरावर बसून कावळे रोटीच्या तुकड्या-साठीं काव काव करायला लागायचे. दहा वाजयाला आले, कीं सांवली जाऊन गच्ची तापायची.

दोन प्रहरीं ज्योतिदादा खालच्या मजल्यावर असलेल्या कचेरींत जायचे. वहिनी निरनिराळ्या फळांच्या साली सोलून, फोडी करून, रुप्याच्या तबकांत व्यवस्थित ठेवायची; त्याबरोबर, तिनं स्वतः केलेलं कांहीं गोड-धोड पण घालायची तबकांत; आणि वर गुलाबाच्या पाकळ्या विखुरलेल्या असायच्या; एखाद्या ग्लासांत शहाळ्याचं पाणी, नाहींतर कसल्यातरी फळांचा रस असायचा; किंवा बर्फांत थंडगार केलेले ताडगोळे तरी

असायचे. सबंध तबकावर एक फुलाफुलाचा रेशमी रुमाल झांकून, तें मुरादाबादी ट्रे मधें ठेवून, दोन प्रहरीं एक किंवा दोनच्या सुमाराला वहिनी तें सगळं कचेरींत पाठवून देत असे.

त्याच सुमाराला 'वंगदर्शन' नियतकालिक धूमधडाक्यांत निघत होतं. त्यांतल्या बातम्यांकडे लोक डोळे लावून बसलेले असत. 'वंगदर्शन' आलं, कीं दुपारीं वाडींत कुणाला झोंप नसायची. मला एक सोय होती. माझ्या जवळून 'वंगदर्शन' कुणी हिसकावून नेण्याची भीति नव्हती; कारण, माझ्यांत एक गुण होता. मला चांगलं वाचून दाखवायला येत असे; वहिनीला आपलं आपण मनांतल्या मनांत वाचण्यापेक्षां मी वाचून दाखवलेलं ऐकायला आवडत असे. तेव्हां विजेचे पंखे नव्हते; त्यामुळं मी वाचत असलों, म्हणजे वहिनीच्या हातपंख्याचं वारं मला थोडंसं मिळायचंच.

## : १३ :

मधून मधून ज्योतिदादा गंगेकडेच्या बागेंत हवा-बदल करण्यासाठीं राहायला जात असत. तोंपर्यंत विलायती व्यापाऱ्यांचा संसर्ग बाधून गंगेच्या कांठाची जात गेलेली नव्हती; दोन्ही कांठावरच्या पक्ष्यांचीं घरटीं उध्वस्त झालेलीं नव्हतीं; आकाशांतल्या प्रकाशांत लोखंडी यंत्रांच्या सोंडानीं आपले धुरकट काळे फुत्कार तेव्हां सोडलेले नव्हते.

गंगेजवळचं आमचं पहिलं घर मला आठवतं आहे, तें म्हणजे ल्हानसं दुमजली घर. नुक्ता पावसाळा सुरू झाला होता. मेघांची सांवली गंगेच्या प्रवाहावर, लाटांवर तरंगत असायची; पलीकडच्या वनाच्या माथ्यावर ढगांची काळी छाया दिसायची. अशा वेळीं कितीदां तरी मी माझीं गाणीं लिहिलीं होतीं. पण एक दिवस तें जमलं नाहीं. विद्यापतींचं कवन त्या दिवशीं मला आठवलं; तें असं—

"ए भरा बादर, माह भादर,
शून्य मंदिर मोर"

( भाद्रपद महिन्यांतल्या आजच्या भर बादळ-पावसाच्या वेळीं माझं मंदिर—सुनं आहे ! )

स्वतःच्या सुरांत बसवून, रागिणीचा छाप मारून, तें पद मीं माझं करून टाकलं. गंगेच्या आसमंतांत पावसाळी हवेंत सुरांत बसवलेलं तें पद अद्याप माझ्या वर्षाऋतूंतल्या गाण्यांच्या संदुकींत आहे. मला आठवतं आहे, वहिनी घरीं नव्हती सोसाट्याचा वारा झाडांवर सपाटे मारीत

होता जसा कांहीं. झाडांच्या डहाळ्या-पानांत-झोंबाझोंबी चालू होती. शीडांत वारं भरल्यानं नांवा वाऱ्याच्या दिशेला कलून धांवतांना दिसत होत्या. पांढऱ्या पांढऱ्या शीडांच्या नांवा कशा सुरेख दिसत होत्या. लाटा सपासप् येऊन कांठावर आदळत होत्या. वहिनी परत आल्यावर तिला गाणीं म्हणून दाखवलीं; 'आवडलीं' असं कांहीं ती म्हणाली नाहीं; नुसतीं मुकाट्यानं गाणीं ऐकून घेतलींन् तिनं. तेव्हां सुद्धां आमची नाहीं नाहीं त्या विषयांवर वादावादी व्हायची, पण त्यांतला ताव जरा मंदावला होता.

त्यानंतर कांहीं दिवसांनीं आम्हीं घर बदललं आणि मोरान-साहेबांच्या बागेंतल्या घरांत राहायला गेलों. तें नवं घर म्हणजे एक राजवाडाच होता म्हटलं तरी चालेल. घराचा कांहीं भाग उंच, कांहीं भाग ठेंगणा होता; रंगीत कांचेच्या खिडक्या होत्या; जमिनी होत्या संगमरवरी; गंगेपासूनच वरच्या लांब व्हरांड्यापर्यंत पायऱ्या चढल्या होत्या. तिथं मला रात जागविण्याची लहर यायची. साबरमती नदीच्या कांठीं मी करीत असलेल्या शतपावली आणि इथल्या शतपावलीचा ताल जुळवण्याचा प्रयत्न करीत असे मी. ती बाग आतां नाहीं. डांडीच्या कारखान्यानं आपल्या लोखंडी दांतांनीं ती कडम् कडम् चावून गिळंकृत केली आहे.

त्या मोरान-बागेची आठवण झाली, म्हणजे आणखी पुष्कळ गोष्टी आठवतात. तिथं असतांना कधीं कधीं बकुळीच्या झाडाखालीं स्वयंपाक व्हायचा. त्या स्वयंपाकांत मसालेबिसाले फार नसत, हाताचा गुण असे; त्यामुळं तो स्वयंपाक किती गोड लागायचा! मुंजीच्या वेळीं वहिनी आम्हां दोघां भावांसाठीं हविष्यान्न करून देत असे, त्यांत गाईचं तूप पडलेलंच असायचं. मुंजीच्या वेळचे ते तीन दिवस त्याचा स्वाद,वास यांनीं मन नुसतं खुशींत होतं; खाबूच आम्हीं!

घरांतलीं बाकीचीं मुलं आजारी पडलीं, कीं वहिनी त्यांची सेवा, शुश्रूषा करायची; त्या मुलांना आजारी पडायचं माहीत होतं. आजारी न पडणं, हा माझा प्रकृतिदोष होता ना! त्यामुळं वहिनी माझ्या वांटणीला कमीच यायची.

ते तिसऱ्या मजल्यावरचे दिवस मावळले; वहिनीला आपल्याबरोबर घेऊन गेले! त्यानंतर तिसऱ्या मजल्यावर माझं राज्य सुरू झालं. मागच्या त्या दिवसांबरोबर या दिवसांची तुलना करणं ठीक नाहीं.

* * * *

फिरत फिरत तारुण्याच्या दिंडीदरवाजापर्यंत पोहोंचलों. इथवर आल्या-वर वयाच्या सोळाव्या वर्षाचा हिशोब द्यायला हवा. त्या वर्षाच्या सुरुवातीलाच 'भारती[1]' चा जन्म झालेला होता. आजकाल जिकडे तिकडे वर्तमानपत्र काढण्याची अहमहमिका दिसते. आमच्या त्या काळां-तली ती वर्तमानपत्राची धुंदी आठवली, म्हणजे आतांच्या या धुंदीची कल्पना येतेच. माझ्यासारखा, ना विद्या, ना शहाणपण असलेला मुलगा देखील त्या बैठकींत जागा अडवून बसला होता; पण तें कोणाच्या नजरेंत आलं नव्हतं;—यावरून तेव्हां चहूंकडे किती पोरसवदा वाता-वरण तयार झालं होतं, हें ध्यानांत येईल. त्या वेळीं 'वंगदर्शन' हें एक-मेव अनुभवी हातचं वर्तमानपत्र होतं. आमची 'भारती' अनुभवी आणि अननुभवी अशा दोन्हीं सरमिसळीची होती. थोरले दादा जसं लिहीत असत, तसं लिहिणं जितकं अवघड होतं, तितकंच तें समजणं कठिण होतं; त्यांतच 'भारती' मधें मी एक गोष्ट लिहून बसलों. ती गोष्ट म्हणजे कसल्या बडबडीची विणकर होती, त्याची पारख करण्याचं वय तेव्हां माझं नव्हतं; आणि समजून, लक्ष देऊन पाहण्यासारखी दुसऱ्यांनाहि दृष्टि जशी कांहीं आलेली नव्हती.

याच वेळीं दादांबद्दल सांगितलं पाहिजे. ज्योतिदादांचं बस्तान होतं तिसऱ्या मजल्यावर; आणि थोरल्या दादांची बैठक होती आमच्या दक्षिणे-कडल्या व्हरांड्यांत. एके काळीं ते बड्या बड्या तत्त्वज्ञानांत बुडून असायचे; ते विषय आमच्या अकलेच्या बाहेरचे होते तेव्हां. ते जे कांहीं लिहीत असत, किंवा ज्याचा विचार करीत असत, तें वाचून दाखवायला, नाहींतर सांगायला माणसं कमी होतीं. त्यामुळं, तें ऐकून

---

[1] एक बंगाली नियतकालिक.

घेणारा सांपडला कीं, दादा त्याला सोडत नसत; किंवा, ती व्यक्ति त्यांना सोडत नसे, असं म्हटलं तरीहि चालेल. कारण, तत्त्वज्ञानाच्या चर्चेखेरीज आणखीहि आकर्षण वाटायसारखं दादांपाशीं बरंच होतं. दादांना एक सोबती मिळाला होता. त्या गृहस्थांचं नांव माझ्या लक्षांत नाहीं, पण लोक त्यांना 'तत्त्ववेत्ता' म्हणत असत. ते नेहमीं नेहमीं दादांपाशीं हजर होत असत, म्हणून माझे बाकीचे सगळे बंधु त्यांची थट्टा करीत. कोणी कोणी म्हणत, कीं दादांजवळ मिळणाऱ्या मटन-चॉपची त्यांना ओढ होती; पण, वास्तविक त्यांचीं निरनिराळीं कामंच असत. तत्त्वज्ञानाखेरीज, दादांना गणितांतले नवे नवे प्रश्न तयार करण्याचा नाद होता. गणितानं चितारलेलीं पानं व्हरांडयांत दक्षिणेच्या वाऱ्यानं उडत असायचीं. दादांना गायला येत नसे; ते विलायती वांसरी वाजवीत;— पण, तें गाण्यासाठीं नाहीं, आंकडयानं एकेका रागिणीचे सूर मोजण्या-मापण्यासाठीं! नंतर, एकदां त्यांनीं 'स्वप्नप्रयाण' लिहायला सुरुवात केली. आधीं नवीं वृत्तं तयार करून घेतलीं त्यासाठीं. संस्कृत भाषेचा ध्वनि बंगालीच्या पासंगाशीं तोलून जोखून लिखाण चालू झालं. त्यांतलं बरंचसं त्यांनीं बाद करून टाकलं आणि बरंचसं ठेवलं. बाद केलेलीं फाटकीं पानं इकड तिकड झालीं. त्यानंतर ते काव्य लिहायला लागले. लिहिलेलं जेवढं ठेवत असत, त्याहून टाकून देत असत जास्ती. ते जें लिहीत असत, त्यांतलं त्यांनाच बरंचसं पसंत नसायचं. त्यांचं तें नापसंत लिखाण, काव्याच्या ओळी गोळा करून उचलून ठेवण्याची आम्हांला तेव्हां अक्कल नव्हती. लिहून होईल तसतसं दादा तें वाचून दाखवीत असत. ऐकायला त्यांच्या भोंवतीं लोक गोळा व्हायचे. आम्ही घरची सारी मंडळी त्यांच्या काव्यरसानं अगदीं वेडावून गेलों होतों. त्यांचं वाचन चालू असतांना मधून मधून हास्याचे फवारे उडत असत. त्यांचं हंसूं आभाळभर असायचं जसं कांहीं! त्यांच्या हंसण्याच्या लहरींत जवळपास कोणी असलं, तर त्याला ते थापट्या मारून बेजार करीत. तो दक्षिणेचा व्हरांडा, म्हणजे आमच्या जोडासांकोच्या घरांतला एक निर्मळ जिवंत झरा होता! दादा शांतिनिकेतन-आश्रमांत निघून गेले आणि त्या

झऱ्याचा प्रवाह सुकला. मला मधून मधून एका गोष्टीची आठवण येते. त्या व्हरांड्याच्या समोरच्या बागेंत शरदाचं ऊन पडलेलं होतं; मनाला कसली तरी हुरहूर वाटत होती, अशा वेळीं नवीन गाणं लिहून मी गात होतों——

" आज शरद्तपनीं, प्रभातस्वपनीं
न कळे जीवा का हुरहुर ! "

आणखी एक दिवस ऊन रणरणत होतं; त्या वेळेचं माझं एक गाणंहि आठवतं मला.

नजरेंत भरायसारखी दादांना आणखी एक संवय होती; ती म्हणजे त्यांचं पोहणं. तळ्यांत उतरल्यानंतर किमान पन्नासदां तरी ते इकडून तिकडे आणि तिकडून इकडे पोहत फिरत असत. पेनेटीच्या बागेंत असतांना ते गंगेंत कितीतरी लांबवर पोहत जात असत. त्यांचं पाहून पाहून आम्ही पण लहानपणापासून पोहायला शिकलों होतों. पोहायचं शिक्षण आपलं आपणच आम्ही सुरूं केलं होतं. विजार भिजवून, तिच्यांत वारं भरत होतों. पाण्यांत उतरल्याबरोबर ती कमरेभोंवतीं हवा भरलेल्या कंबरपट्ट्यासारखी फुगायची; आणि मग बुडायची भीति नसायची. मोठा झाल्यावर शिलाईदहाला राहत असतांना मीं एकदां पद्मानदी पार झालों होतों. ही गोष्ट ऐकून वाटते, तितकी आश्चर्यचकित करणारी नाहीं. मधून मधून बेटं असल्यामुळं पद्मा नदीच्या प्रवाहाला इतकी कांहीं ओढ नव्हती. तरीपण, किनाऱ्यावरच्या लोकांना ती पद्मा ओलांडून गेल्याची हकीकत नुसती ऐकून भयंकर वाटण्यासारखी होती खरीच; आणि मी पण ती पुष्कळांना ऐकवली होती. लहानपणीं डलहौसीला गेलों असतांना पितृदेवांनीं मला एकटा एकटा फिरायला कधीं मना केली नव्हती. डोंगरावरच्या पाऊलवाटेनं मी हातांत एक बाणासारख्या टोंकाची काठी घेऊन एका टेकडीवरून दुसऱ्या टेकडीवर चढून जात असे. त्या-वेळेची सर्वांत मजा होती, मनांतल्या मनांत भीति उभी करण्यांत. एक दिवस उतारावरून चालतांना एका झाडाखालच्या वाळल्या पानांच्या ढिगावर माझा पाय पडला; पाय जरासा लटपटल्याबरोबर हातांतली

काठीं टेकून उभा राहिलों. काठी टेकली नसती तरी कांहीं बिघडत नव्हतं. उतारावरून गडगडत गडगडत खालच्या झऱ्याच्या पाण्यांत पडायला फारसा वेळ लागला नसता. त्या वेळीं काय झालं असतं, अन् काय नाहीं, त्याचं येवढं मोठं वर्णन करून आईला सांगितलं होतं. देवदाराच्या दाट वनांत फिरतां फिरतां एकाएकीं आमोरासमोर अस्वलाशीं गांठ पडण्याची शक्यता होती, हीहि बाब मुद्दाम आईला सांगायसारखी होती. ' घडण्याची शक्यता असलेल्या गोष्टीं'तलं कांहींच घडलेलं नव्हतं; त्यामुळं न घडलेल्या गोष्टी मनांत जुळवल्या होत्या. मी पोहून पद्मा नदी ओलांडल्याची हकीकत आणि त्या गोष्टींत फारसा फरक नव्हता.

सतरावं वर्ष लागल्यावर मला ' भारती'च्या संपादक-मंडळांतून बाजूला व्हावं लागलं.

*　　*　　*　　*

त्याच सुमाराला मला विलायतेला पाठवायचं ठरलं. त्याचबरोबर, अगोदर सत्येंद्रदादांकडे जाऊन, चार दिवस राहून, विलायती रीतरिवाज शिकून घेण्याचं ठरलं होतं.ते तेव्हां अहमदाबादला न्यायाधीश होते. वहिनी आणि मुलं इंग्लंडला होतीं. मोठी रजा घेऊन सत्येंद्रदादाहि विलायतेला जाणार होते, म्हणून वहिनी तिकडे त्यांची वाट पाहत बसली होती.

मुळासकट एका शेतांतून उपटून मला दुसरीकडे नेलेल्या रोपट्या-सारखं झालं. नव्या वातावरणाची संवय होण्यासाठीं खटपट सुरू झाली. पहिल्यापहिल्यानं जिथं तिथं खटकायला लागलं; संकोच वाटायचा ज्यांत त्यांत. नव्या मंडळींशीं ओळखपाळख करतांना आपला मान कसा टिकवायचा याचीच मला काळजी वाटायची. जिथं मिळूनमिसळून राहणंहि सहज सोपं नव्हतं, आणि टाळीन म्हटल्यानं टाळतां येणं शक्य नव्हतं, अशा वातावरणांत माझ्यासारख्या मुलाच्या मनाला पावलागणिक ठेचकाळल्यासारखं होत असे.

अहमदाबादला जुन्या इतिहासाचं चित्र डोळ्यांसमोर दिसायला लागलं.त्या चित्राभोंवतीं मन घिरट्या घालायला लागलं. जज्जसाहेबांचं घर बादशाही कारकीर्दीतल्या राजवाड्यांत, शाहीबागेंत होतं. दिवसां

सत्येंद्रदादा कामावर जात असत. मोठमोठे, भकास, आ वांसल्यासारखे दिवाणखाने होते त्या वाड्याचे. त्यांत मी आपला भूत लागल्यासारखा फिरत राहायचा. समोर मोठीच्या मोठी गच्ची होती. तिथून साबरमती नदी दिसायची. तिचं तें गुडघ्यायेवढं पाणी आणि वाळूंतून वाट काढणारा, वळणावळणाचा प्रवाह पाहून कसंतरी वाटायचं. गच्चीवर कांहीं कांहीं ठिकाणीं दगडी हौद होते; त्यांत जणुं कांहीं बेगमांच्या स्नानाच्या आमिरी रंगढंगाच्या बातम्या सांठवलेल्या होत्या.

आम्हीं कलकत्त्याचीं माणसं; तिथं इतिहासाचा मान वर केलेला चेहरा आम्ही कधीं पाहिलेला नव्हता. आमची नजर अगदीं अलीकडच्या खुज्या काळावरच खिळलेली. अहमदाबादला गेल्यानंतर पहिल्या प्रथम जुन्या, इतिहासकाळाची कल्पना आली. चालतां चालता इतिहास जणुं कांहीं थांबला होता. त्याला पाठमोरा पाहूनहि त्याच्या बड्या घरंदाजपणाची कल्पना येत होती. त्याचे जुने वैभवसंपन्न दिवस यक्षाच्या संपत्तीसारखे जमिनींत गाडले गेले होते. तिथंच माझ्या मनांत 'क्षुधित पाषाणा'च्या गोष्टीची कल्पना अंकुरली होती—

किती जुन्या काळची, शेंकडों वर्षांमागची कथा ती! तेव्हां नगारखान्यांत रात्रंदिवस, आठही प्रहराच्या रागिणींत रोशनचौकि (वाजंत्री) वाजत असे. रस्त्यावर घोड्यांच्या टापा तालावर वाजत असत; घोडेस्वारांची तुर्की फौज कूच करीत असतांना सैनिकांच्या भाल्यांचीं टोकं उन्हांत झगझगत असत. बादशहांच्या दरबारांभोंवतीं सत्यानाश करणारी कुजबूज चालू असे. अंतःपुरांत नंग्या तलवारी हातांत घेतलेले हबशी खोजे पहारा करीत असत. बेगमांच्या हमामखान्यांत गुलाबपाण्याचे फवारे उडत असत; आणि बांगड्या-बाजूबंदांचे किणकिण आवाज निघत असत. आम्ही होतों त्या वेळचा शाहीबागवाडा, म्हणजे विसरलेल्या गोष्टीसारखं त्याचं रूप होतं. भोंवतालीं कुठंहि तो रंग नव्हता, ते सूर नव्हते—रुक्ष दिवस, आणि रस संपलेल्या रात्रीं!

जुन्या इतिहासाचीं हाडं निघालेलीं होतीं; डोक्याची कवटी होती, त्यावरचा मुकुट नव्हता. त्यावर एखादं कवच चढवून, मुखवटा घालून

मी मनांतल्या जादुघरांत एक संपूर्ण मूर्ति रचली होती, असं म्हटलं, तर अधिक सांगितल्यासारखं नाहीं व्हायचं. कल्पनेनं मनांत एक चित्र रंगवून, गोष्टीची रूपरेखा तयार केली होती. तो माझ्या कल्पनेचाच खेळ होता. कांहीं लक्षांत राहतं, आणि बरंचसं मी विसरतों; म्हणून, असं जोडून चिकटवून कांहींतरी उभं करणं सोपं होतं. आज ऐंशी वर्षांनंतर माझं स्वतःचंच जें चित्र माझ्यापुढं उभं राहिलं आहे, तें वस्तुस्थितीशीं अगदीं तंतोतंत जुळणारं आहे, असं म्हणतां येणार नाहीं.

अहमदाबादला मी कांहीं दिवस राहिलों. पुढं दादांना वाटलं, कीं परक्या ठिकाणीं आनंदी वातावरण निर्माण करून, परक्या देशांत ज्या स्त्रिया आपल्या देशाचं स्वारस्य पोहोचवूं शकतात, अशा इंग्रजी शिक-लेल्या बायकामुलींशीं ओळखपाळख झाली, तर मला घरची आठवण होणार नाहीं. त्यामुळं इंग्रजीचं शिक्षणहि सहजासहजीं होईल. म्हणून, मला कांहीं दिवस मुंबईला त्यांच्या एका स्नेह्यांच्या घरीं पाठवलं दादांनीं. त्या घरांतल्या एका मुलीनं, नुकतीच आपली विद्या विलायतेहून घासून पुसून झगझगीत करून आणली होती. माझी विद्या बेतासबात होती. माझी उपेक्षा केली असती, तरी त्यांना दोष देता आला नसता. पण त्यांनीं तसं केलं नाहीं. पुस्तकी विद्येंतलं शहाणपण दाखवण्यासारखी पुंजी माझ्याजवळ नव्हती; तेव्हां, सवड सांपडली, कीं मला कविता लिहायला येत होत्या हें त्यांना मी सांगत होतों. दुसऱ्याकडून कौतुक करून घेतां येण्यासारखं तेवढं एकच माझं मूळभांडवल होतं. त्यांनीं पण माझी योग्यता मोजूनमापून, तोलूनजोखून पाहण्याची आटापिटी केली नव्हती. माझं म्हणणं मुकाट्यानं मानून घेतलं होतं त्यांनीं. त्यांचं मी एक टोपण नांव ठेवावं, अशी त्यांची इच्छा होती; म्हणून मी त्यांचं एक नांव पण ठेवलं होतं; आणि त्यांनाहि तें आवडलं होतं. तें त्यांचं नांव एका कवितेंत घातलं आणि पहाटेच्या भैरवींत ती कविता त्यांना मी म्हणूनही दाखवली. ती ऐकल्यावर त्या म्हणाल्या होत्या, "अहो कवि, मरतांना जरी तुमचं गाणं ऐकलं, तरी मला जीव येऊन मी पुनः नव्यानं जिवंत होईन बरं !"

यावरून लक्षांत येईल, कीं बायकांना एखाद्याचं कौतुक करायचं असलं, म्हणजे जरा जास्तीचा गोडवा गाऊन त्या दुसऱ्याला खूष करीत असतात. त्यांनीं एकदां माझ्या चेहऱ्याची तारीफ केली होती. त्या म्हणाल्या, "माझं एक म्हणणं तुम्ही ऐकलंच पाहिजे. तुम्हीं कधींही दाढी ठेवूं नका; तुमच्या चेहऱ्याचा सुरेखपणा झांकला जाता कामा नये."

त्यांच्या त्या आग्रहाचा मान आजतागायत राखतां आला नाहीं मला, हें सर्वांना दिसतंच आहे. त्यांचा शब्द मी मोडण्यापूर्वींच त्या देवाघरीं गेलेल्या होत्या.

आमच्या त्या वडाच्या झाडावर कधीं कधीं परदेशी पक्षी येऊन घरटीं बांधत असत. त्यांच्या पंखाचा नाच आमच्या ओळखीचा होतो न होतो, तोंच ते उडून जात असत. दूरच्या वनांतून अनोळखी सूर घेऊन ते यायचे. त्याचप्रमाणें, आयुष्यांत मधून मधून जगांतल्या अनोळखी भागांतून आपलेपणा मिळतो, हृदयाची माया वाढते. न हांक मारतांच ती आपुलकी लाभते अन् शेंवटीं हांक मारली तरी ती ओ देत नाहीं. जातां जातां तीं आपलीं माणसं जिवंतपणाच्या उपरण्यावर कशिद्याची किनार बसवितात आणि दिवसरात्रींच्या किंमतीनं त्याचं मोल वाढवून जातात!

## : १४ :

ज्या मूर्तिकारांनीं मला घडवलं, त्यांचं पहिलं वहिलं काम त्यांनीं बंगालच्या मातीनं केलं. एक प्रकारचा चेहरा दिसला पहिल्यानं; त्याचंच नांव 'ल्हानपण.' त्यांत सरमिसळ फारशी नाहीं. त्याचा मालमसाला माझ्यांतच होता; आणि कांहींबाही घरच्या वातावरणांत अन् घरच्या जिव्हाळ्याच्या माणसांत होता. पुष्कळदां घडवायचं काम लहानपणाच्या दारांतच थांबतं. पुढं विद्याभ्यासाच्या शाळारूपीं कारखान्यांत ज्यांच्यावर जास्तीचे घाव पडतात, त्यांना बाजारांत जास्त भावाचा शिक्का मिळतो.

दुर्दैवानं, मी त्या कारखान्यांतले बहुतेक घाव चुकवले होते. ज्यांना मुद्दाम मला शिकवण्यासाठीं ठेवलं होतं, त्या गुरुजींनीं माझ्यापुढं हात टेकले होते. आनंदचंद्र वेदान्तवागीश महाशयांचे चिरंजीव ज्ञानचंद्र भट्टाचार्य—ते बी. ए. झालेले होते;—त्यांनीं ओळखलं होतं, कीं या मुलाला शिक्षणाच्या ठराविक चाकोरींत घालून उपयोग होणार नाहीं. तेव्हांच्या शहाण्यासुरत्यांना शिक्षण, म्हणजे परीक्षेच्या सांच्यांतून मुलांना काढणं, हें आतां सारखं ठामपणानं वाटत नसे, येवढं बरं होतं. त्या काळांत श्रीमंत-गरीब साऱ्यांच्याच मुलांना कॉलेजी–विद्येच्या वेढ्यांत अडकविण्याचा असा तगादा नसे. आमच्या घराण्यांत त्या सुमाराला धन राहिलं नव्हतं, पण मान राहिला होता टिकाव धरून; त्यामुळं परंपरा टिकून होती. लिहिण्यावाचण्यांत, म्हणजे शिक्षणांत जरा ढिलाई होती. शिक्ष-

णाच्या पहिल्या वर्गांतून आम्हांला एकदां 'बेंगॉल अकादमीं 'त घातल्याचं आठवतं आहे. तिथं दुसरं कांहीं पदरांत नाहीं पडलं, तरी निदान शिष्ट-समाजांत मान राहण्याइतपत इंग्रजी येईल, अशी पालकांना आशा होती. लॅटिनच्या वर्गांत मी 'बहिरा अन् मुका' होऊन बसत होतों. माझ्या वह्यांचीं पानं विधवेच्या पांढऱ्याशुभ्र पातळासारखीं अथपासून इतिपर्यंत कोरीं करकरीत होतीं. अभ्यास न करण्याचा माझा विचित्र हेका पाहून वर्गशिक्षकांनीं डिक्रूज-साहेबांकडे तक्रार केली, तेव्हां साहेबांनीं त्यांना समजावून सांगितलं होतं, 'अभ्यास करण्यासाठीं तीं मुलं जन्माला आलेलीं नाहींत; महिन्याच्या महिन्याला शाळेची फी भरण्यासाठीं त्यांचा जन्म आहे !' ज्ञानबाबूंनाहि बहुतेक तसंच वाटत असावं. पण, त्यांनीं मला शिकवण्याची एक मधली वाट काढली होती. मला त्यांनीं 'कुमारसंभव' साद्यंत पाठ करायला लावलं होतं; खोलींत कोंडून ठेवून, 'मॅकबेथ 'चा अनुवाद करवून घेतला होता. इकडं रामसर्वस्व पंडित महाशयांनीं 'शाकुंतल' शिकवून टाकलं होतं. याप्रमाणं, त्या मंडळींनीं मला शाळेच्या अभ्यासक्रमाबाहेर मोकळा सोडला होता; त्याचा उपयोग झाला होता, असंहि त्यांना वाटत होतं. असल्या मालमसाल्यानं लहानपणीं माझं मन घडवलं गेलं. त्याच्या जोडीला हाताला येतील तीं बंगाली पुस्तकं होतीं. पुस्तकांची वेंच-निवड करण्याचं शहाणपणच नव्हतं मला.


विलायतेला गेल्यानंतर जीवनाच्या घडणीवर विलायती कारागिरी सुरू झाली. रीतसर कांहीं शिकावं म्हणून गेलों होतों त्या दृष्टीनं कांहीं बाही प्रयत्नहि झाले, पण यश आलं नाहीं त्यांत. वहिनी, म्हणजे सत्येंद्रदादांची पत्नी होती, त्यांचीं मुलं होतीं; आपल्या घरांतल्या जाळ्यांत गुरफटून राहिलों. आयुष्यांत शाळेच्या आजुबाजूनं फिरलों-शाळा चुकवून; घरीं मास्तर शिकवायला आले, मी चुकवाचुकवी केली. जें कांहीं माझ्या पदरांत पडलं, तो चांगल्या, ज्ञानी माणसांच्या जवळ जवळ राहून आपो-आप झालेला लाभ आहे. विलायतेंतहि तिथल्या वातावरणाचा निरनिराळ्या तऱ्हेनं माझ्या मनावर परिणाम व्हायला लागला.

पालित-साहेबांनीं मला घरच्या पाशांतून बाहेर काढला. एका डॉक्ट-

रांच्या घरीं माझी राहण्याची व्यवस्था केली. त्या मंडळींनीं चुकूनसुद्धां मला मी परदेशांत असल्याची आठवण होऊं दिली नव्हती. मिसेस स्कॉट माझ्यावर मनापासून प्रेम करीत असत. अगदीं आईसारखी त्यांना माझी काळजी असे. माझं तेव्हां लंडन-विद्यापीठांत नांव घातलं होतं. हेन्री मोर्ले इंग्रजी शिकवत असत. त्यांचं शिकवणं म्हणजे जिवंत शिक्षण होतं; नुसतं पुस्तकांतलं वाळलं ज्ञान आमच्या घशांत उतरवण्याचा प्रयत्न नव्हता. त्यांच्या मनांत, आवाजांत साहित्याला नवजीवन मिळत असे;— मनुष्याच्या जीवाला, अंतकरणाला जो साहजिक खुराक लागतो, तो मोर्ले-साहेबांच्या शिकवण्यांतून मिळत असे; मधें मुळींहि रसहानि व्हायची नाहीं. घरीं आल्यानंतर क्लॅरेंडन प्रेसच्या पुस्तकांतून अभ्यासाचा विषय मी उलट सुलट करून आपला आपण समजून घेत असे. म्हणजे, आपला आपणच मास्तर होत होतों मी. मिसेस स्कॉटना आपलं राहून राहून उगीचच माझं तोंड सुकलेलं दिसायचं आणि त्या बेचैन व्हायच्या. माझ्या शरीरांत दुखण्याबाण्यांना प्रवेशबंदी होती, हें त्यांना माहीत नव्हतं. रोज पहाटें उठून बर्फासारख्या थंड पाण्यानं मी आंघोळ करीत असे.तशाप्रकारें नियमावेगळं वागून जगणं, म्हणजे जणुं कांहीं शास्त्राची मर्यादा ओलांडणं होतं, असं तेव्हांच्या डॉक्टरांना वाटत असे.

फक्त तीन महिने मी विद्यापीठांत टिकाव धरून राहिलों होतों. परंतु, माझं विलायतेंतलं बहुतेक शिक्षण माणसांच्या सहवासानं मला मिळालं. मला घडवणाऱ्या कारागिरानं (परमेश्वरानं) संधि पाहून नवीन नवीन कुसरीचं काम केलं, नवीन साहित्य मिसळलं आपल्या कलाकृतींत. तीन महिने इंग्रजांच्या हृदयाजवळ राहिल्यामुळं एक प्रकारच्या नव्या साहित्याची मिसळ झाली होती. रोज संध्याकाळीं, रात्रीं अकरा अकरा वाजेपर्यंत, आळीपाळीनं काव्य,नाटक,इतिहास, अशा विषयांचीं पुस्तकं वाचून दाखवण्याची माझ्यावर जबाबदारी टाकण्यांत आली होती.तेवढ्या अल्पावधींत बरंच वाचन झालं, अभ्यासहि झाला. तो अभ्यास, म्हणजे शाळेच्या वर्गांतला अभ्यास नसला, तरी साहित्याच्या अभ्यासाबरोबर माणसांच्या मनाचं मिलन होतं तें.

विलायतेला गेलों, पण बॅरिस्टर झालों नाहीं. मूळचा स्वभाव हलण्या-बदलण्यासारखा जोराचा धक्का मिळाला नव्हता. आपल्या मनांत मी पूर्व-पश्चिमेचा मिलाफ मात्र करून घेतला. माझ्या नांवाचा अर्थ अंतःकरणांत उमगला, जिवंत माणसांकडे जिवंत दृष्टीनं पहायला शिकलों, येवढं मात्र खरं !



# नाट्यविभाग



# मालिनी

## अंक पहिला

[ राजवाड्याचा सौध; समोर प्रांगण. ]

**मालिनी**—माझी वेळ जवळ आलेली आहे. कमळाच्या पानावरच्या दंवबिंदूप्रमाणं माझं जीवन या अथांग काळाच्या हृदयावर डळमळूं लागलं आहे. डोळे मिटले, कीं आकाशांतलं वादळ ऐकूं आल्यासारखं वाटतं. —आणि—मनाला कसली तरी हुरहुर लागून राहिली आहे; कसली हुरहुर आहे, कांहीं कळत नाहीं !

**राणी**—[ आंतून ] मालिनी, मालिनी ! ( बाहेर सौधावर येऊन ) हें काय वरं बाळ ? तुझ्या सौंदर्याला आणि तारुण्याला साजेसा साजशृंगार करायला विसरतेस कशी ? तुझे अलंकार कुठं आहेत ? सोन्याचा स्पर्श सुद्धां तुला कसा वरं नकोसा वाटतो ?

**मालिनी**—माताजी, राजवाड्यांत सुद्धां कांहीं जन्मदारिद्री निपजतातच. गरिबींत श्रीमंती शोधणं ज्यांच्या नशिबीं असतं, त्यांच्या अंगीं धनदौलत लागतच नाहीं.

**राणी**—जिला बालहट्टापलीकडे बोलतां येत नव्हतं, तिनं माझ्याशीं असं उखाण्यापाखाण्यांनीं बोलावं अं ! असं तूं बोलूं लागलीस, म्हणजे माझ्या छातींत कसं धडधडूं लागतं. आपल्या परमपवित्र शास्त्रांविरुद्ध असलेले तुझे हे विचार कुठं शिकलीस ? तुला शिकवणारे ते बुद्ध भिक्षु चेटूक

माटूक करतात म्हणे; खोट्यानाट्यांनीं लोकांचीं मनं ते भारून टाकतात, असंहि म्हणतात बरं का!

**मालिनी**—माताजी! माताजी!—

**राणी**—मी विचारतें, धर्म हीं शोधून मिळायची का गोष्ट आहे? आपोआप रोज मिळणाऱ्या सूर्यप्रकाशासारखाच नाहीं का धर्म? मी आपली साधीभोळी बायको आहे. पुरुषांचे ते पंथ, तीं मतं,तीं तत्त्वं, यांतलं मला कांऽहीं कळत नाहीं. पति आणि मुलं-बाळं, हीं स्त्रियांचीं पूजादैवतं असतात; तीं विनासायास त्यांना लाभतात, येवढं मला कळतं.

[ राजा सौधावर येतो. ]

**राजा**—बाळे, राजवाड्यावर वादळी ढग जमायला लागले आहेत. तुझी भयंकर वाटचाल आतां पुरे; निदान थोडीशी थांब तरी.

**राणी**—काय काळवाणी ही!

**राजा**—वेडे पोरी, आपल्या पुरातन राज्यांत नव्या धर्माचा तुला प्रसार करायचाच असेल, तर तीरावरच्या लोकांना भीतिप्रद होणाऱ्या लोंढ्याप्रमाणं तो यायला नको. तुझा धर्म तुझ्याच जवळ राहूं दे. त्याच्या विरुद्ध लोकांच्या मनांत कुचेष्टा किंवा विद्वेष जागा करूं नको. ब्राह्मणांच्या पारंपारिक भावनांना चिडवूं नको.

**राणी**– उगीच मुलीला धमकावूं नका, कीं आपल्या राजकारणांतले डावपेंच तिला शिकवूं नका. मालिनीनं आपले आपण आचार्य पसंत केले आणि ती आपल्या धर्ममार्गानं जात असली, तर कोणी तिला नांवं ठेवायचं कांहींच कारण नाहीं.

**राजा**—देवी, आपली प्रजा खवळून उठली आहे; मालिनीला हद्दपार केलीच पाहिजे, अशी लोकांनीं ओरड चालविलेली आहे.

**राणी**—हद्दपारी? कुणाची? आपल्या मुलीची!

**राजा**—तिच्या नास्तिकपणामुळें घाबरलेले ब्राह्मण एक झाले आहेत, आणि—

**राणी**—नास्तिकपणा अं! सारीं सत्य तत्त्वं फक्त त्यांच्या बुरसटलेल्या ग्रंथांत बांधून ठेवलीं आहेत वाटतं? त्यांना म्हणावं, तुमचीं तीं

वाळवी लागलेलीं धर्ममतं हवेवर सोडून द्या आणि या धडे घ्यायला या मुलीकडे. महाराज, ऐका माझं, ही कांहीं अशी तशी सामान्य मुलगी नव्हे–निव्वळ आगीची ज्वाला आहे ही. कोणीतरी दैवी आत्माच हिच्या रूपानं जन्माला आलेला आहे. तिला अशी तिरस्कारूं नका; अशानं एखादे दिवशीं ती कायमची नाहींशी होईल, आणि कपाळ बडवीत रडत बसायची पाळी येईल.

**मालिनी**—पिताजी, लोकांची मागणी मान्य करा. महत्त्वाचा क्षण आला आहे; करा मला हद्दपार.

**राजा**—कां ? तुझ्या बापाच्या घरीं तुला काय कमी पडलं आहे ?

**मालिनी**—ऐकून तर घ्या माझं, पिताजी. माझ्या हद्दपारीसाठीं ओरड करणाऱ्यांना माझी हद्दपारी नको आहे, मी पाहिजे आहे. माताजी, माझ्या मनांतलं तुम्हांला बोलून दाखवायला माझ्यापाशीं शब्द नाहींत. फुलं सांडतांना झाडाला वाईट वाटतं का ? तसंच मला जाऊं द्या— जग महाराजांपाशीं माझी मागणी करतं आहे.

**राजा**—मुली, तुझ्या मनांत काय आहे तें समजत नाहीं !

**मालिनी**—पिताजी, आपण राज्यकर्ते आहां. कर्तव्यासाठीं आपलं मन घट्ट करा.

**राणी**—बाळे, तुला तुझ्या जन्मभूमींत जागा नाहीं का ? जगाची जोखीम तुझ्या कोंवळ्या खांद्यांच्या आसऱ्याची वाट पाहात राहिली आहे का ?

**मालिनी**—माझ्या जागत्या डोळ्यांपुढं एक स्वप्न दिसतं आहे; वाटतं कीं, रात्रीचा काळोख दाटला आहे, वारा झंझावतो आहे, पाणी खवळलं आहे, आणि नाव धक्क्याला बांधली आहे. भटकत सुटलेल्यांना घरीं पोंचवणारा नेता आहे कुठं ? मला आपलं वाटतं, कीं मला मार्ग माहीत आहे; आणि माझ्या स्पर्शाबरोबर ती नाव सजीव, सचेतन होईल आणि पुढें चालूं लागेल.

अनुक्रम 339.03...... दि: ४।२।७
क्रमांक ...2052........ नों. दि: 23



**राणी**—ऐकलंत महाराज ? कोण बोलतं आहे हें ? या येवढ्याशा मुलीचे का हे शब्द आहेत ? आपलीच मुलगी का ही ? माझ्याच कुशींत उपजली का ही ?

**राजा**—हं ! उषःकालाचा जन्म रात्रींच्या पोटीं होत असला, तरी तो साऱ्या जगाचा असतो—नुसता रात्रींचाच नसतो.

**राणी**—ही प्रकाशाची पुतळी आपल्या वाड्यांतल्या वाड्यांत राहील, असा कांहीं उपाय नाहीं का महाराज ? बाळ, तुझे केंस मोकळे सुटले आहेत; ये, बांधतें मी. म्हणे तडीपार करा ! हाच जर त्यांच्या धर्माचा एक महत्त्वाचा भाग असेल, तर नवा धर्म खुशाल येऊं दे आणि सत्य म्हणजे काय, तें त्या ब्राह्मणांना एकदां कळूं दे.

**राजा**—देवी, मालिनीला घेऊन आपण इथून जाऊंयाच कसे. ( " हद्दपार ! राजकन्या हद्दपार झालीच पाहिजे " अशा घोषणा आंतून ऐकूं येतात. ) रस्त्यावरची ती गर्दी पाहिलीत ना ? चला चला.

[ तिघेहि लगबगीनें जातात. पुनः पूर्ववत आंतून घोषणा ऐकूं येतात. क्षणभरांत ब्राह्मणांचा घोळका प्रांगणांत येऊन त्याच घोषणा करतो. ]

**क्षेमंकर**—मित्रांनों, आपला निश्चय ढळूं देऊं नका. साऱ्यांत स्त्री शत्रु भयंकर ! बुद्धिवाद निष्फळ ठरतो तिच्या पुढं; शक्ति तर लाजतेच; पुरुषाची शक्ति तिच्या अबलत्वाला शरण जाते आणि आमच्या हृदयाचा कोटकिल्ला ती काबीज करते.

**एक ब्राह्मण**—क्षेमंकर, या राजवाड्यांतच एक नागीण आहे; फणा काढून ती आमच्या पवित्र धर्माच्या मर्मस्थानावरच फुत्कार टाकते आहे; हें सारं बजावून सांगण्याकरतां महाराजांची भेट झालीच पाहिजे.

**सुप्रिय**—धर्म ?—मी आपला मठ्ठ आहे—तुम्ही काय म्हणताहांत तें मला कळतच नाहीं. एका अजाण बालिकेला हद्दपार केलीच पाहिजे, असं तुमचा धर्म सांगतो का ?

**पहिला ब्राह्मण**—सुप्रिया, आमच्या संकल्पाचा तूं विध्वंसक आहेस. सदान्कदां तूं आमच्या बेतांना आडवा होत असतोस.

**दुसरा ब्राह्मण**—धर्मसंरक्षणासाठीं आम्ही सारे एक झालों आहोंत; आणि तूं--तूं म्हणजे आमच्या तटबंदींतलं एक खिंडार आहेस;—आंवळून धरलेल्या ओठांवरचं तिरस्कारचं स्मितच जसं कांहीं.

**सुप्रिय**—संख्येच्या जोरावर म्हणूं तें सत्य ठरवूं अन् एकमुखी आरोळ्यांत सारासार विचाराला बुडवून टाकूं, असं का तुम्हां ब्राह्मणांना वाटतं ?

**पहिला ब्राह्मण**—दर्पट उद्धटपणा आहे तुझा हा, सुप्रिया.

**सुप्रिय**—उद्धटपणा असेल, तर आपल्या आकुंचित अंतःकरणावर धर्मशास्त्र वेतून घेणाऱ्यांचा तो उद्धटपणा आहे, माझा नाहीं.

**दुसरा ब्राह्मण**—अरे, हा आमचा नव्हे ! हांकला, हांकला याला.

**पहिला ब्राह्मण**—राजकन्येच्या हद्दपारीबद्दल आमच्यांत दुमत नाहीं. ज्याला तें पटत नसेल, त्यानं या मेळाव्यांतून चालतं व्हावं.

**सुप्रिय**—भटानों, तुमच्या संघटनेंत मला सामील करून घेतलांत, ही तुमची चूक आहे. मी तुमची सांवली नव्हें, कीं तुमच्या धर्मशास्त्राचा आवाजहि नव्हें. सत्य किंकाळ्यांची बाजू घेतं, हें मला मुळींच मान्य नाहीं. बळजबरीवर टिकूं पाहणारा धर्म माझा म्हणायला मला लाज वाटते. ( क्षेमंकराला उद्देशून ) मित्रा क्षेमंकरा, जातों मी; सोड मला.

**क्षेमंकर**—मुळींच नाहीं. कृतीला तूं घट्ट आहेस; वादंगांत पडलास. म्हणजेच तूं डळमळतोस, हें मला माहीत आहे. वेळ वाईट आहे; मित्रा, तोंड आंवर.

**सुप्रिय**—मूर्खपणाची अंधश्रद्धा अत्यंत दुःसह; एका अजाण मुलीला बेघर करून तुम्ही धर्माचं संरक्षण करणार अं ! पण, तिचा अपराध काय, तें तर कळूं दे ना. सत्य हें धर्माचं शरीर आणि प्रेम हा त्याचा आत्मा, असंच ती मानते ना ? तें जर खरं, तर तेंच सर्व धर्मांचं सार आहे कीं नाहीं ?

**क्षेमंकर**—सर्व धर्मांचा आत्मा एक असला, तरी त्यांचीं रूपं भिन्न भिन्न असतात. पाणी एकच, पण निरनिराळ्या बांधबंधाऱ्यांनीं तें निर-

निराळ्या लोकांसाठीं सांठवलं जातं—राखलं जातं. स्फूर्तीचा झरा तुझ्या अंत:करणांतच सांठवून ठेवावास, हेंच ठीक. सनातन फळं-बहारांच्या वृक्षांनीं युगायुगांत रंगदार केलेल्या हिरव्यागार उतारांच्या पाणोठ्यावर पाणी-पुरवठ्यासाठीं जाणाऱ्या आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना, सुप्रिया, असं धिक्कारूं नकोस,—लाथाडूं नकोस.

**सुप्रिय**—ठीक आहे. क्षेमंकर, तुझ्याशीं वाद नको. तुझ्या पाउलावर पाऊल टाकून जन्मभर मी चालत आलों आहे; तसाच या पुढेंही चालेन.

[ एक ब्राह्मण युवक लगबगीनें येतो. ]

**ब्रा. युवक**—आनंदाची वार्ता ! आनंदाची वार्ता ! ! आपलं म्हणणं पटून सारे सैनिक राजरोसपणें आमच्या बाजूला उभे राहायला सिद्ध झाले आहेत.

**दुसरा ब्राह्मण**—सैनिक ? सैनिक ? ब्राह्मणांच्या कारभारांत सैनिकांनीं कां लक्ष घालावं ? आपल्याला हें मुळींच पसंत नाहीं.

**पहिला ब्राह्मण**—मलाहि तें पसंत नाहीं. बंडखोरीचा वास आहे त्यांच्या उठावाला.

**दुसरा ब्राह्मण**—क्षेमंकर, असले आत्यंतिक उपाय मला पटत नाहींत.

**पहिला ब्राह्मण**—निष्ठेनंच आपला जय होईल, शस्त्रांनीं नाहीं. वेद-पठणानं इष्ट देवतांना आपण आवाहन करूं या.

**दुसरा ब्राह्मण**—देवी भगवती, तुझा क्रोध हेंच तुझ्या भक्तांचं शस्त्र. कृपा करून अवतार घे आणि पाखंड्यांचा आंधळा उद्धटपणा धुळीला मिळव. आमच्या निष्ठाबलाची खात्री पटवून देऊन आम्हांला विजयी कर.

**सर्व ब्राह्मण**—माते, आमची प्रार्थना ऐक, स्वर्गांतून भूतलावर ये आणि आपला प्रभाव दाखव.

[ मालिनी प्रांगणांत येऊन, घोळक्यासमोर अंतरावर उभी राहते. क्षेमंकर आणि सुप्रियाखेरीज सर्वजण तिला अभिवादन करतात. ते दोघे बाजूला उभे राहून तिच्याकडे पाहत राहतात. ]

**मालिनी**—ही आलें मी.

**दुसरा ब्राह्मण**—देवी, अखेरीस तूं अवतरलीस अं ! तुझी सर्व भयंकर

शक्ति सुकुमार सौंदर्यांत सामावून घेऊन एक मानवकन्यका म्हणून तूं अवतरलीस ? माते, कुठून आलीस तूं ? काय इच्छा आहे तुझी ?

**मालिनी**—तुमच्या मागणीप्रमाणं हद्दपारी भोगण्याकरतां मी आलें आहे.

**दुसरा ब्राह्मण**—या तुझ्या लेंकरांचा धांवा ऐकून, स्वतःला तूं स्वर्गांतून हद्दपार करून घेतलं आहेस का ?

**पहिला ब्राह्मण**—सर्वनाशाच्या धास्तीमुळं हें जग तुझा धांवा करतं आहे मातोश्री. माते, आम्हांला क्षमा कर.

**मालिनी**—राजवाड्याच्या सुखसंपत्तींत लोळत असतांना माझ्या हद्दपारीच्या तुमच्या आरोळ्यांनीं मला जाग आली. तुमचे दरवाजे मला उघडे आहेत, याची मला सतत जाण होती. नाहीं, मी तुम्हांला कधींहि सोडून जाणार नाहीं.

**क्षेमंकर**—ही तर राजकन्या !

**ब्राह्मणांसह सर्व**—राजकन्या !

**मालिनी**—तुमचं घर आपलं करण्यासाठीं स्वतःच्या घरांतून मी बाहेर पडलें आहे. मला सांगा, खरीच का माझी तुम्हांला गरज आहे ? एकान्तांत राहणाऱ्या या एकाकी मुलीला खरंच का तुम्ही बाहेरच्या जगांतून हांक दिलीत ? मला स्वप्न तर पडलं नाहीं ना ?

**पहिला ब्राह्मण**—आई, अवतरून तूं आमच्या हृदयांतल्या हृदयांत अधिष्ठित झाली आहेस.

**मालिनी**—मी राजवाड्यांत जन्मलें; कधींहि खिडकीबाहेर डोकावून पहायला मला मिळालं नाहीं. हातापलीकडे असलेल्या जगांत दुःख भरलं आहे, असं मी नुसतं ऐकत होतें. पण, जगाचं तें दुःख कुठं आहे तें मला कळत नाहीं. तें शोधून काढायला मला शिकवा.

**पहिला ब्राह्मण**—अहाहा ! आई, तुझा मधुर स्वर कानीं पडतांच आमच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरंगूं लागतात !

**मालिनी**—पहा, चंद्र नुकताच ढगांतून बाहेर आला आहे; आकाश कसं महत् शांततेनं भरून गेलं आहे; चंद्रप्रकाशाच्या विस्तीर्ण वस्त्रांत गुंडाळून त्यानं साऱ्या सृष्टीला आपल्या बाहूंत घेतलंसं वाटतं आहे. अहा,



गुरुदेवांनीं लिहिलेल्या 'वाल्मिकी-प्रतिभा' या नाटिकेंत
त्यांनीं स्वत: वाल्मिकीची भूमिका केली होती;
त्या भूमिकेंतील त्यांचें छायाचित्र

गंभीर दिसणाऱ्या वृक्षांच्या स्तब्ध छायेंत तो रस्ता चालला आहे, तो पहा. हीं इकडं घरं दिसताहेत, अन् तिथं तें देऊळ आहे; अस्पष्ट आणि उजाड नदीकिनारा दूर तिकडं दिसतो आहे; एखाद्या अवचित सरी-प्रमाणं स्वप्नांच्या ढगांतून मी या रस्त्यावरच्या लोकांत उतरलें आहे, असं वाटतं.

**पहिला ब्राह्मण**—या जगाचा तूं देवात्मा आहेस.

**दुसरा ब्राह्मण**—तुझ्या हृदपरीसाठीं ओरडणाऱ्या आमच्या जिभा दुभंगून कां नाहीं गेल्या?

**पहिला ब्राह्मण**—चला, ब्रह्मवृंदहो, आपल्या या आईची तिच्या मंदिरांत प्रस्थापना करूं या.

**सर्व ब्राह्मण**—(उच्च स्वरांत) जगन्मातेचा विजय असो. मानव-कन्येच्या हृदयांतील जगन्मातेचा विजय असो.

[मालिनीच्या मागून सारा घोळका जातो.]

**क्षेमंकर**—जाऊं दे. आभास नाहींसा होऊं दे. पण, सुप्रिया, झोंपेंत चाललेल्या माणसासारखा तूं कुठं चाललास? (त्याचें मनगट धरतो).

**सुप्रिय**—सोड, सोड, जाऊं दे मला.

**क्षेमंकर**—संयम सोडूं नको. या आंधळ्या झुंडीबरोबर तूंही आगींत उडी टाकणार का?

**सुप्रिय**—क्षेमंकर, तें स्वप्न होतं का?

**क्षेमंकर**—नाहींतर काय होतं? जागा हो, डोळे उघड.

**सुप्रिय**—क्षेमंकर, तुझी स्वर्गाची आशा व्यर्थ आहे. फुकट आजपर्यंत धर्मतत्त्वांच्या अरण्यांत भटकत राहिलों;—केव्हांहि मनःशांति मला मिळाली नाहीं. ग्रंथांतला या झुंडीचा परमेश्वर, तो माझा परमेश्वर नव्हे' ग्रंथांनीं कधींहि माझं शंकानिरसन केलं नाहीं, कीं समाधान दिलं नाहीं. पण, शेवटीं, आज, मानवांच्या सजीव सृष्टींत चैतन्याचा मला साक्षात्कार झाला.

**क्षेमंकर**—अरे अरे अरे! आत्मवंचनेचा क्षण भयंकर असतो. अशाच वेळीं माणूस आंधळ्या वासनेला वेदांचं प्रामाण्य बहाल करतो

आणि त्याची चंचल कल्पना देवांचं सिंहासन बळकावून बसते. स्त्रीच्या फसव्या मोहकतेनें विणलेल्या जाळ्याची जादू अशी असते ! तिला सर्व-श्रेष्ठ सत्याची पदवी प्राप्त होणं शक्य आहे का? कल्पनेच्या पोटीं निर्माण झालेल्या धर्मतत्त्वांनीं रणरणलेल्या मध्यान्हकाळची तहान शमूं शकेल का?

**सुप्रिय**—मला तें कांहीं कळत नाहीं !

**क्षेमंकर**—तर मग स्वप्नांतून आधीं जागा हो आणि समोर काय दिसतं तें नीट पहा. युगंरूपीं तान्हुल्यांनीं भरलेल्या सनातन घराला आग लागली आहे. विस्कटलेल्या कोटरांभोंवतीं कलकलाट करणाऱ्या पक्ष्यांप्रमाणं आपल्या पूर्वजांचे आत्मे होणाऱ्या विनाशाभोंवतीं भिरभिर-ताहेत. रात्र अंधेरी आहे, शत्रु दारावर धडका देताहेत, नागरिक गाढ झोंपेंत आहेत, आणि मोहानं झिंगलेले लोक आपल्या बांधवांचे गळे दाबायला उठले आहेत; अशा प्रसंगीं धरसोड करणं बरं का ?

**सुप्रिय**—तुझ्या खांद्याला खांदा लावून उभा राहायला मी तयार आहे.

**क्षेमंकर**—मला इथून गेलंच पाहिजे.

**सुप्रिय**—कुठं ? आणि कशासाठीं ?

**क्षेमंकर**—परदेशांत. बाहेरून मी सैन्य आणणार आहे.

**सुप्रिय**—पण, आपले सैनिक तर तयारच आहेत कीं.

**क्षेमंकर**—त्यांच्या मदतीची आशा व्यर्थ आहे. पतंगाप्रमाणं आगींत ते आधींच उड्या टाकूं लागले आहेत. मूर्खांप्रमाणं ते कशा आरोळ्या ठोकताहेत तें तुला ऐकूं येत नाहीं वाटतं ? सारं राजनगर कसं वेडं झालं आहे. आपल्या सद्धर्माच्या चितेवर लोक उत्सवाचे दिवे पेटवून घेऊं लागले आहेत !

**सुप्रिय**—जाणारच, तर मलाहि घेऊन चल.

**क्षेमंकर**—नाहीं; इथं काय काय होईल त्यावर लक्ष ठेवून मला कळ-वण्यासाठीं तुला इथं राहिलंच पाहिजे. मात्र, सुप्रिया, या अद्भुत अधर्माला माझ्यापासून तुला ओढून नेऊं देऊं नकोस.

**सुप्रिय**—तूं ज्याला अधर्म म्हणतोस, ती बाब नवी आहे, पण आपली मैत्री जुनी आहे. बाळपणापासून आपण एकत्र आहोंत. हा आपला दुरावा पाहिलाच आहे.

**क्षेमंकर**—शेवटचाच ठरावा तो ! आपत्काळी बळकटांतले बळकट ऋणानुबंध सुद्धां तुटतात. भाऊ भावावर प्रहार करतात, मित्र मित्रांचे विरोधक होतात. मी अंधारांत शिरणार आहे आणि रात्रींच्या अंधारांतच वेशीपुढें उभा राहीन. हा माझा मित्र त्या वेळीं दिव्याचा प्रकाश घेऊन तिथं उभा असलेला मला दिसेल ना ? तेवढ्या आशेवरच मी जाणार आहे.

( दोघेही जातात ).

[ राजपुत्रासह राजा सौधावर येतो. ]

**राजा**—मालिनीला तडीपार करावी लागणारच, अशी भीति वाटूं लागली आहे.

**राजपुत्र**—त्याला यापुढं उशीर होईल, तर तो घातकच ठरेल.

**राजा**—दमादमानं घेतलं पाहिजे. कर्तव्याला मी चुकेन, अशी कधींहि शंका नको. मालिनीला मी हद्दपार करीन, अशी खात्री असूं दे.

[ राणी येते. ]

**राणी**—सांगा महाराज, सांगा कुठं आहे ती ? माझ्यापासूनहि आपण तिला लपवून ठेवली आहे का ?

**राजा**—कोणाला ?

**राणी**—माझ्या मालिनीला.

**राजा**—काय, ती आपल्या महालांत नाहीं ?

**राणी**—नाहीं, ती मला कुठं सांपडत नाहीं. सैनिकांना बरोबर घेऊन नगरांतलं घरन् घर धुंडाळा. नागरिकांनीं तिला पळवली आहे. साऱ्या-साऱ्यांना सीमेपलीकडे हाकलून द्या. ते तिला परत देईतों सारं गांव उजाड राहूं दे.

**राजा**—राज्याची धुळधाण झाली तरी चिंता नाहीं, मी तिला परत आणीनच.

[ ब्राह्मण व सैनिक मशालींच्या प्रकाशांत मालिनीला घेऊन येतात. ]

**राणी**—माझी लाडकी ! किती निष्ठुर आहेस ग तूं ! जराहि मी तुला दृष्टीआड होऊं देत नाहीं, तरीहि मला चुकवून कशी बाहेर पडलीस ग तूं ?

**दुसरा ब्राह्मण**—देवी, रागावूं नका. आम्हांला आशीर्वाद देण्यासाठीं त्या आमच्या घरोंघरीं आल्या होत्या.

**पहिला ब्राह्मण**—राजकन्या केवळ आपल्याच आहेत का ?

**दुसरा ब्राह्मण**—माते, आम्हांला विसरूं नको. मार्गरहित भवसागरावरचा तूं आमचा ध्रुवतारा आहेस.

**मालिनी**—राजद्वार तुम्हांला उघडं केलं आहे. तुमच्या माझ्या आड ही तटबंदी यापुढं कधींहि येणार नाहीं.

**सर्व ब्राह्मण**—( एक स्वरांत ) आमची जन्मभूमि आणि आम्ही धन्य धन्य आहोंत ! ( जातात. )

**मालिनी**—आई, मी बाहेरचं जग आपल्या घरीं आणलं आहे. माझीं सारीं बंधनं जशीं कांहीं गळून पडलीं आहेत, असं वाटतं आहे. या जगाच्या जीवनाशीं मी एकरूप झालें आहे.

**राणी**—होय बाळ. आतां तुला कधींहि बाहेर जायचं कारणच नाहीं. तुझ्यासाठीं आणि माझ्यासाठीं बाहेरची दुनिया इथंच येऊं दे ! मध्यरात्रीचा सुमार झाला आहे. जरा इथं बैस; विश्रांति घे. जीवनाची धग तुझ्या डोळ्यांतली झोंप करपवून टाकते आहे जशी कांहीं.

**मालिनी**—( आईला बिलगून ) अगदीं थकून गेलें आहे मी आई ! सारं अंग कसं थरथरतं आहे;—विश्व किती अफाट आहे;—डोळे पाण्यानं भरले आहेत आणि विषण्णतेनं मन कसं भारावून गेलं आहे.—आई, अंगाई गीत म्हणतेस का ?

[ पडदा ]

# अंक दुसरा

[ राजवाड्याची बाग. मालिनी आणि सुप्रिय. ]

**मालिनी**—काय बोलूं मी सुप्रिय? माझं म्हणणं कसं पटवावं, तें मला माहीत नाहीं. तुमच्या ग्रंथांचा मी अभ्यास केलेला नाहीं.

**सुप्रिय**—मी एक पढतमूर्खांतला शहाणा आहे झालं! सारे ग्रंथ, सारे वाद, मागं सोडून मी आलों आहे. तुम्ही मला वाट दाखवा, ज्योती-मागं जशी छाया तसा मी तुमच्या मागून येईन.

**मालिनी**—पण, ब्रह्मश्री, तुम्ही मला कांहीं विचारलं, कीं माझी शक्ति हरवल्यासारखी होते, आणि काय उत्तर द्यावं, तें मला कळतच नाहीं. तुमच्यासारख्या सर्वज्ञानं माझ्याकडं यावं आणि आपल्या शंका मला विचाराव्या, हें मोठं आश्चर्य आहे!

**सुप्रिय**—ज्ञानलालसेनं मी तुमच्याकडे येत नाहीं. आतांपर्यंत मिळव-लेलं सारं ज्ञान विसरून जाऊं दे मला. मार्ग असंख्य आहेत, पण प्रकाश मात्र नाहीं.

**मालिनी**—हं! जितकं जितकं मला तुम्ही अधिक विचारूं लागतां तितकं तितकं मला माझ्या ज्ञानाचं दारिद्र्य जाणवूं लागतं. न देखल्या विजेच्या चमकाऱ्याप्रमाणं स्वर्गांतून उतरून माझ्या अंतःकरणांत ठाव घेणारा सूर कुठं गेला? त्या दिवशीं कां नाहीं आलांत? संभ्रमानं दूर कां राहिलांत? आमोरासमोर जग पाहिलं आणि माझं मन भित्रट झालं; जी महानौका मींच हांकारली पाहिजे, तिचं सुकाणूं कसं चालवावं तें मला कळेनासं झालं आहे. अफाट विश्वांत मी एकटी आहेसं वाटतं आहे.

मार्ग अनेक आहेत—आकाशांत प्रकाश चटकन् चमकून,झटकन् नाहींसा होतो आहे. तुम्ही पंडित आहांत, जाणते आहांत; मला साह्य कराल का ?

**सुप्रिय**—तुम्ही माझं साह्य मागितलंत, माझं भाग्य उजरीला आलं असं मी समजतो.

**मालिनी**—पुष्कळदां, निराशा जीवनाचे प्रवाह तटवतेत; तशा स्थितींत मी गडबड—गोंधळांत असलें तरीहि माझी दृष्टि अंतर्मुख होते आणि भीतीनं माझा थरकांप उडतो. तशा विरागी प्रसंगांत स्नेहानं प्रोत्साहन देऊन तुम्ही मला पुनः सजीव कराल का ?

**सुप्रिय**—केव्हांहि मी सरळ, निर्मळ आणि शांत मनानं तुमच्या साह्याला सिद्ध आहे.

[ सेवक येतो. ]

**सेवक**—आपल्या दर्शनासाठीं नागरिक आले आहेत.

**मालिनी**—मनाचा शीण घालविण्यासाठीं मला कांहीं वेळ विश्रांति घेणं भाग आहे. आज भेटीगांठी नकोत. जा, पौरांना म्हणावं मला क्षमा करा. ( सेवक जातो ) सुप्रिय, क्षेमंकरांबद्दल मला अधिक कांहीं सांगा. आतांपर्यंतचं तुमचं आयुष्य आणि तुमचे अनुभव समजून घ्यायला मी फार उत्सुक आहे.

**सुप्रिय**—क्षेमंकर माझा भाऊ, माझा मित्र —माझा गुरु आहे तो ! पहिल्यापासून तो मनाचा घट्ट— आणि मी, मी नेहमीं संशयानं डळमळणारा. तरीहि, चंद्रानं आपले डाग वागवावेत तसं त्यानं मला आपल्या हृदयाशीं धरून ठेवलेलं आहे. तारूं कितीहि बंदबळकट असलं, तरीहि एखाद्या ल्हानशा छिद्रामुळं तें बुडतंच;—क्षेमंकरा, मी तुलाहि डुबकी दिलीच. पण, तें अगदीं सहज होतं.

**मालिनी**—तुम्ही त्यांना बुडवलंत ?

**सुप्रिय**—हं ! होय ! ज्या दिवशीं तुमच्या तेजानं लोकांचा पुंडावा विरघळून गेला, तुम्हांला वेढणाऱ्या स्वर्गीय संगीतांत तो जेव्हां वाहून गेला, तेव्हां, त्या दिवशीं, एकटा क्षेमंकरच घट्ट राहिला. हा नवा धर्म

काशीच्या पवित्र भूमींतून उखडून टाकण्यासाठीं परदेशी सैन्य आणण्या-करितां जात असल्याचं त्यानं मला सांगितलं. मला मागं ठेवून तो निघून गेला.--पुढं काय झालं, तें तुम्हांला माहीतच आहे. नव्या जन्मभूमींत तुम्ही मला नवजीवन दिलंत. "सर्वांभूतीं, सर्वांठायीं प्रेम" हे पोकळ शब्द खऱ्या अर्थाची पुरातन काळापासून वाट पहात होते. तो खरा अर्थ तुमच्या रूपानं माझ्यापुढं एकदम चमकला. तेव्हांपासून माझं मन माझ्या मित्रासाठीं हळहळूं लागलं; पण, तो माझ्यापासून दूर दूर, पार पकडीपलीकडं होता. पुढं त्याचं पत्र आलं; नवा धर्म रक्तानं धुऊन काढण्यासाठीं आणि तुम्हांला कंठस्नान घालण्याकरतां परदेशी सैन्य घेऊन येत असल्याचं क्षेमंकरानं त्या पत्रांत लिहिलं होतं.--मला धीर निघेना;--महाराजांना मी तें पत्र दाखवलं !

**मालिनी**--कां तुम्ही स्वतःला विसरलांत ? कशाला भ्यालांत ? साऱ्या सैन्यासह क्षेमंकरांना सामावून घेण्याइतकी आमच्या या वाड्यांत जागा नाहीं का ?

[ राजा येतो. ]

**राजा**--ये, ये, सुप्रिया, मला भेट. अगदीं योग्य वेळीं मी गेलों आणि अचानकपणें गांठून क्षेमंकराला कैद केला. एका तासाचा जर अधिक उशीर झाला असता, तर झोंपेंतच आमच्या वाड्यावर ती वीज कडाडून पडली असती. सुप्रिया, मित्रा,--

**सुप्रिय**--परमेश्वर मला क्षमा करो !

**राजा**--राजाचा लोभ पोकळ नसतो, हें तुला माहीत नाहीं का ? मन मानेल तें माग; आमची अनुज्ञा आहे. सांग तुला काय हवं तें.

**सुप्रिय**--नको, महाराज, मला कांहींहि नको. दारोदार भिक्षा मागून मी जगेन.

**राजा**--एखाद्या राजाला मोह पडावा इतक्या तोलमोलाचे प्रांत मी तुला देऊन टाकीन; फक्त सांग मला तूं.

**सुप्रिय**--मला त्यांचा मोह नाहीं.

**राजा**--समजलं; कोणत्या चंद्रासाठीं तूं हात पसरतो आहेस, त्याची मला छान कल्पना आहे. वेड्या मुला, तितकीहि अशक्य दिसणारी गोष्ट मागून पहा, भिऊं नको. असा गप्प कां? माझ्या मालिनीच्या हद्दपारीची मागणी केलीस तो दिवस आठवतो का तुला? माझ्या मुलीला माझ्या घराबाहेर काढण्याची मागणी पुनः करतोस का? मालिनी, या उदारधी तरुणाला तूं आपल्या जीवाचं ऋण लागतेस, हें तुला माहीत आहे का? तें ऋण फेडणं तुला अवघड वाटतं का?...

**सुप्रिय**--राजन्, दया करा, त्या बाबतींत आतां आणखी कांहीं बोलूं नका. जन्मभर निष्ठा राखून पाहिजे असलेलं मिळवणारे पुजारी जगांत पुष्कळ आहेत. त्यांच्यापैकींच मी एक गणला गेलों, तर मला समाधान वाटेल. परंतु, द्रोहाचं पारितोषिक म्हणून हवं तें आपल्याकडून मिळवा-यचं? राजकुमारी, श्रीमंतीपासून लाभणारी विपुलता आणि मनःशांति तुमच्याजवळ असेल; परन्तु, दारिद्र्यानं थिथथिथलेल्या आत्म्याच्या गुप्त आशा-आकांक्षा काय असतात, त्या तुम्हांला माहीत नाहींत. पृथ्वीवरच्या प्रत्येक प्राण्याबद्दल तुमच्या अंतकरणांत प्रेम आहे; त्याहून मला एक अणु-भरहि अधिक कांहीं नको आहे.

**मालिनी**—पिताजी, पकडलेल्या शत्रूला तुम्ही काय शिक्षा देणार आहां?

**राजा**—देहान्तशासन.

**मालिनी**—त्यांच्यासाठीं हात जोडून मी आपल्या क्षमेची भीक मागते.

**राजा**—बंडखोर आहे तो बाळ.

**सुप्रिय**—आपण त्याला न्याय देणार? त्यानंहि आपला न्याय-निवाडा केला होता; तो आपल्याला शासन करण्याकरतां आला होता, आपल्यापासून आपलं राज्य लुबाडण्याकरतां आला नव्हता तो.

**मालिनी**—जीवदान द्या त्यांना पिताजी. तसं कराल, तरच तुमच्या-वरचं महान् संकट निवारण करणाऱ्याशीं स्नेहसंबंध जोडण्याचा तुम्हांला अधिकार प्राप्त होईल.

**राजा**—तुझं काय म्हणणं आहे, सुप्रिय?

**सुप्रिय**—राजेश्वरांना शोभेलसंच होईल तें. (राजाचे पाय धरतो.)

**राजा**—जें व्हायचं तें योग्य वेळीं होईलच; तुझा मित्र तुला परत मिळेल. पण, आमची देणगी तेवढ्यावरच संपणार नाहीं. तुझ्या आकांक्षेच्याहि पलीकडे असलेलं असं कांहीं आम्ही तुला बहाल करूं—पारितोषिक म्हणून मात्र नव्हे. माझं हृदय तूं जिंकलंच आहेस, आणि तें आपल्या जवळचा सर्वोत्तम ठेवा तुला द्यायला तयार आहे. मालिनी, लाजतेस ? ही लज्जा या आधीं कुठं होती ? तुझ्या जीवनाच्या उषःकालाचा रंग शुभ्र आणि दिपवणारा होता, त्यांत गुलाबी छटा नव्हती; पण, आज कोमलतेच्या बाष्पानं त्याच्या झगझगाटांत गोडसा मंदपणा मिसळलेला आहे, असं दिसतं. (सुप्रियाला) सुप्रिया, सोड माझे पाय; ऊठ, मला आलिंगन दे. माझं हृदय सुखानं खुपूं लागलं आहे.—मालिनीशीं मला कांहीं बोलायचं आहे; (सुप्रिय जातो). माझी बाळ मला परत मिळाली. आभाळांत चमचमणारी चांदणी नव्हे !—तर भूमीवर उमललेलं मनोहर फूल मला मिळालं. माझी बाळ !—माझी लाडकी !

[सेवक येतो.]

**सेवक**—महाराज, राजबंदी क्षेमंकर देवडीवर आला आहे.

**राजा**--आणा त्याला इथं.

[सेवक जातो. त्या दिशेकडे राजा कांहीं वेळ पहात उभा राहतो, नंतर]——

**राजा**—तो पहा क्षेमंकर येतो आहे. नजर रोखलेली आहे, स्वाभिमानी शिर तसंच उंचं आहे ! विद्युल्लतेनं भाराक्रांत झालेल्या वादळी मेघाप्रमाणं असणाऱ्या विचारांची छाया त्याच्या मुद्रेवर पसरलेली आहे.

**मालिनी**—बंदित्वाला धिःकारणाऱ्या एखाद्या देवात्म्यासारखे दिसताहेत क्षेमंकर. त्यांच्या देहावरच्या लोहशृंखलांना आपल्या स्थितीची लाज वाटते आहे जशी कांहीं. उदात्ततेचा अपमान, म्हणजे अपमानानं आपला आपणच अपमान करून घेतल्यासारखं असतं.

[शृंखलाबद्ध क्षेमंकराला घेऊन सेवक येतात.]

**राजा**--आम्ही तुझं काय शासन करावं, असं तुला वाटतं क्षेमंकर ?

**क्षेमंकर**—देहान्तशासन.

**राजा**—आणि आम्ही तुला क्षमा केली तर ?

**क्षेमंकर**—तर, माझं काम पुरं करायला मला संधि मिळेल.

**राजा**—एकूण, तूं जीवाला कंटाळल्यासारखा दिसतो आहेस ! तुझी शेवटची इच्छा काय आहे, ती सांग.

**क्षेमंकर**--माझा मित्र सुप्रिय याची मरणापूर्वी मला एकदां भेट पाहिजे आहे.

**राजा**--( सेवकाला ) अरे, सुप्रियाला बोलावून आणा वरं.

**मालिनी**--यांच्या मुद्रेकडे पाहून मला भीति वाटूं लागली आहे ! पिताजी सुप्रिय नकोत इथं यायला.

**राजा**--मालिनी, उगीच भितें आहेस तूं.

[ सुप्रिय येतो आणि बाहू पसरून क्षेमंकराकडे जाऊं लागतो. ]

**क्षेमंकर**--हं, हं,--जरा थांव. बोललंच पाहिजे, तें आधीं बोलून घेऊं या. प्रेमाचं अभिवादन, अभिनंदन--त्यांचं नंतर पाहूं. मला फार बोलायला नको असतं, हें तुला माहीत आहे. माझी वेळ भरत आली आहे. ये, आणि थोडा जवळ ये. माझी परीक्षा झाली आहे; तुझी व्हायची आहे. सांग, सुप्रिया, विश्वासघाताचं कृत्य तूं कां केलंस, तें सांग.

**सुप्रिय**--क्षेमंकर, मी तें कृत्य कां केलं तें तुला कळायचं नाहीं. प्रेमाची किंमत देऊन विश्वासाचं रक्षण करणं मला भाग होतं.

**क्षेमंकर**—समजतंय मला सारं. मनःप्रकाशानं या पोरीचा चेहरा उजळला आहे.--आंतल्या आवाजाचं रूप आहे तें. पूर्वजांच्या धर्मा-वरची निष्ठा, मायभूमीच्या हिताची निष्ठा, यांची या डोळ्यांतल्या तेजाला तूं आहुति दिलीस आणि विश्वासघाताच्या पायावर नव्या निष्ठेची उभा-रणी केलीस !

**सुप्रिय**—खरं आहे तुझं म्हणणं. या स्त्रीमूर्तीतच मला माझ्या निष्ठेचं संपूर्ण दर्शन घडलं. उत्पत्तीचा पुराण-ग्रंथ या डोळ्यांच्या प्रकाशांत संपूर्ण-पणें मला वाचतां आला. जिथं मानवता आहे, तिथं प्रेम आहे; आणि

जिथं प्रेम आहे, तिथंच खरा धर्म आहे, हें मला समजलं. वात्सल्यांतून मुलाला त्या धर्माची दीक्षा मिळते आणि मुलाच्या प्रेमांतून त्याचं परतवाण आईला मिळतं. देणाऱ्याच्या हातून त्याचं अर्घ्य ओझरतं आणि घेणाऱ्याच्या हृदयांत प्रतीत होतं. या सगळ्या बाबतींत तुमचे पुराण धर्मग्रंथ अगदीं मुके आहेत. सुप्त ज्ञानाची शांतता, प्रेम आणि प्रकाश यांनीं तळपणाऱ्या या मुद्रेकडे मी पाहिलं मात्र आणि मानव्यांतून प्रकट होणाऱ्या अनंताच्या धर्माशीं मी जखडला गेलों.

**क्षेमंकर**--माझीहि नजर एकदां, क्षणभर, या मुखावर स्थिरावलेली होती. त्या क्षणीं माझ्या हृदयसंगीतानं माझ्या जीविताच्या आशा फुलविल्या होत्या. मनुष्याला स्वर्गाचं दर्शन घडविणारा धर्मच या स्त्रीच्या रूपानं उभा आहे, असा मला त्या क्षणीं आभास झाला होता. तरी, तीं सारीं जाळीं तोडून, परदेशांत भटकण्यासाठीं मी तडीपार झालोंच ना ? अनधिकारी लोकांनीं केलेले अपमान मी सहन केले कीं नाहीं ? तुझ्यासारख्या जिवलग बालमित्राच्या विरहाचं दुःखहि मी सोसलं;--होय ना ? आणि त्या वेळीं तूं इथं काय करत होतास ? राजोद्यानाच्या गार छायेंत आरामानं लोळतां लोळतां, आपल्या वासनेवर असत्याचीं आभारणं चढवून तिला धर्माचं रूप देण्यांत तूं गुंग झाला होतास !

**सुप्रिय**—भिन्न भिन्न प्रकृतींच्या माणसांना राहतां येईल इतकी ही पृथ्वी विपुल नाहीं का क्षेमंकर ? आकाशांतल्या असंख्य ताऱ्यांचा एकत्वावर स्वामित्व मिळवण्यासाठीं कधीं संघर्ष होतो का ? वेगवेगळ्या मनोभूमींना अवश्य असलेले, निरनिराळ्या रागरंगांचे प्रकाश अनेकविध धर्म सुशांतपणें देत राहिले आहेतच ना ?

**क्षेमंकर**--शब्द, नुसते शब्द ! सत्य आणि असत्य यांना समाधानाच्या शेजारानं एकत्र नांदूं देण्याइतकी ही अनंत सृष्टि विशाल नाहीं. मनुष्याला पोसणाऱ्या धान्याच्या पिकानं कांटेरी झाडझडोऱ्यांना खुशाल जागा करून द्यावी, इतका प्रेमाचा सर्व-व्याप तिरस्करणीय नाहीं. एखाद्यानं विश्वासघातानं स्नेहधर्माचा भक्कम पाया निःशंकपणें उखडून, उधळून टाकावा, इतकी का सहिष्णुता विश्वासघातकी असते

सुप्रिया? धर्मरक्षकाला चोर दरवडेखोराप्रमाणं मरण मिळावं आणि धर्माचा विश्वासघात करणाऱ्याला धनसंपत्ति, मानसन्मान यांचा लाभ व्हावा!—नाहीं, सुप्रिया, असल्या विरोधांना अंगाखांद्यावर खेळवण्याइतकी ही पृथ्वी पाषाणहृदयी नाहीं.

**सुप्रिय**—राजकुमारी, तुमच्यासाठीं मी या जखमा, हे अपमान सहन करतो आहे! क्षेमंकर,तूं आपल्या धर्मासाठीं प्राणांचं मोल देतो आहेस—तुझ्यावरचं माझं प्रेम प्राणापेक्षांही मला अधिक आहे; त्यांचीच ती फार मोठी किंमत मोजायला मी तयार झालों आहे.

**क्षेमंकर**—आतां अधिक बडबड नको. खऱ्याखोट्यांचा कस मृत्यूच्या दरबारांतच ध्यावा लागतो. विद्यार्जनाच्या कालांत, वादविवादांत रात्रींच्या रात्रीं घालवून, सकाळीं खऱ्याखोट्याचा निर्णय आपण आचार्यांकडून एका क्षणांत करून घेत असूं;—सुप्रिया, आठवतं तुला? तशीच हीं एक सकाळ आहे, असं समज. आपल्या शंकाकुशंकांचं निरसन करून घेण्यासाठीं, निर्णयाच्या भूमीवर आपण आज यमधर्मापुढं उभं राहूं या. त्याच्या एका निःश्वासानं संग्रामाचं आपल्यापुढचं हें हलतंबदलतं धुकं नाहींसारखं होईल; चिरंतन सत्याच्या अचल शिखराचं तुला, मला तत्क्षणींच दर्शन घडेल—आणि मग? आपण दोघं मूढ, मूर्ख, एकमेकांकडं पाहून हंसायला लागूं!-सुप्रिया, तुला जें सर्वोत्तम आणि चिरंतन असं वाटतं, तें पारखून घेण्यासाठीं आतां, इथंच मृत्यूपुढं सादर कर.

**सुप्रिय**--ठीक आहे--होऊं दे-तुझ्या इच्छेप्रमाणंच होऊं दे.

**क्षेमंकर**—ये, आतां आपण भेटूं या. सुप्रिया, अनंत अवकाशांत तूं माझ्यापासून दूर भटकत राहिलास. आतां कायमचा माझ्याजवळ ये. (सुप्रिय उत्साहानें बाहू पसरून त्याच्याजवळ जातो. क्षेमंकर हाताला बांधलेल्या शृंखलांचे सुप्रियाला तडाख्यावर तडाखे देतो. सुप्रिय धाडकन् पडतो.) मित्रोत्तमा, घे, घे, हा माझा तुला प्रेमाचा आहेर आहे! (क्षणभर बांधल्या नजरेनें सुप्रियाकडे पाहतो, नंतर पटकन् खालीं गुडघे टेंकून, सुप्रियाच्या प्रेताला आलिंगन देतो. गहिंवरून—) सुप्रिया!

( झटकन् उठून उभा राहतो. राजाला---) बोलवा आतां तुमच्या शीर्षच्छेदकाला--

**राजा**---( त्वेषानें ) डोईमाऱ्या कशाला! आणा-आणा माझी तलवार!---

**मालिनी**---( चटकन् गुडघे टेंकून त्याच्या पायाला मिठी मारते. ) पिताजी,-पिताजी,-क्षेमंकरांना क्षमा करा!

**राजा**---( साश्चर्य आवेगानें ) मालिनी!---

[ पडदा ]



# विसर्जन

( ‘ **विसर्जन** ’ या नाटकाची कथा )

त्रिपुरा राज्यांत एक राजा राज्य करीत होता. त्याचें नांव होतें **गोविंदमाणिक्य**. मोठा कर्तबगार आणि प्रभावशाली राजा होता तो. गोविंद माणिक्याच्या पत्नीचें, राणीचें नांव होतें **गुणवती**. राजाराणी मोठ्या सुखानें संसार करीत होतीं.

पण, त्यांच्या संसारांत एक फार मोठी उणीव होती. त्यांना मूलबाळ नव्हतें. राजानें **ध्रुव** नांवाच्या एका राजपुत्राला जवळ केला होता. ध्रुवावर राजाचें मुलाप्रमाणें प्रेम होतें. तोहि राजापाशीं मुलासारखाच हंसे, खेळे. त्याचा मुकुट घेऊन सुद्धां खेळे.

राणीला मात्र राजाचें ध्रुवावर इतकें प्रेम असलेलें आवडत नसे. तिला वाटे, आपल्यालाच एक मूल व्हावें; त्याला आपण अंगाखांद्यावर खेळवावें; बाळाच्या स्पर्शानें आपलें मातृहृदय ममतेनें भरून जावें. आपल्या कुशींत जन्माला येणाऱ्या चिमण्या जीवाचें जतन करून आपण धन्य व्हावें. आई होण्यासाठीं राणीचा जीव उतावीळ झाला

होता. बाळाशिवाय आपलें जीवन, म्हणजे पाण्याविणें वाळवंटासारखें रुक्ष वाटूं लागलें होतें तिला.

गांवांत एक महाकालीचें देऊळ होतें. त्या देवीपुढें पशुबलि देण्याची प्रथा होती. तिला रक्ताचा नैवेद्य दाखविल्याशिवाय पूजेची सांगता होऊंच शकत नाहीं, अशी पूर्वापार समजूत होती. आपल्याला मूल व्हावें, म्हणून राणी गुणवतीनें त्या महाकालीला नवस करण्याचें ठरविलें.

देवळाची सारी व्यवस्था राजगुरु **रघुपति** पाहात असे. रघुपति मोठा तेजस्वी आणि धर्मशास्त्र-रूढि पाळणारा कर्मठ ब्राह्मण होता. देवीच्या पूजेंत तो यत्किंचित्‌हि कमतरता होऊं देत नसे. पूजाअर्चा, धूप-दीप, आरती-नैवेद्य, सारें सारें यथासांग करीत असे रघुपति; आणि त्यानें अगदीं बालपणापासून लहानाचा थोर केलेला, त्याचा मानलेला मुलगा **जयसिंग** त्याला सर्वतोपरि साह्य करीत असे.

राणी गुणवतीनें देवीला नवस करण्याचें ठरविल्यानंतर ती महाकालीच्या देवळांत गेली आणि तिनें आपला नवस बोलून दाखविला; "आई, मी तुझा कांहीं अपराध केला आहे का? माते, नको त्यांना मुलं देतेस तूं; अन् मला कां बरं मुलाचं सुख नसावं? माझ्या ओटींत मूल टाक. या वर्षी पूजेसाठीं लागणारे बलीचे पशु मी स्वतः पुरवीन; आणि दरसाल, एकशेंएक म्हशी आणि तीनशेंएक शेळ्या तुझ्यापुढें बलिदानासाठीं पाठवीन मी." याप्रमाणें, आपल्या ओटींत जिवंत बाळ खेळावें म्हणून, राणी गुणवती दरसाल चारशेंदोन जीव देवीपुढें बलि द्यायला तयार झाली! रघुपतीचें आणि राणीचें त्याबद्दल बोलणें होऊन, तीं दोघें आपापल्या ठिकाणीं गेलीं.

तेवढ्यांत **अपर्णा** नांवाची एक भिकाऱ्याची मुलगी आक्रोश करीत देवळांत आली. तिनें जीवापाड जतन केलेलें कोंकरूं देवीच्या सेवकांनीं बलीसाठीं पकडून आणलें होतें. ती आली त्याच सुमारास राजा गोविंद-माणिक्यहि देवळाशीं आला होता. अपर्णेचें दुःख पाहून, राजानें जय-सिंगाला विचारलें,

**राजा**:—या गरीब मुलीचें कोंकरूं तुम्ही बलिदानासाठीं आणलें आहे का?

**जयसिंग**:—महाराज, अनुचर बलीसाठीं पशु कुठून आणतात, तें आम्हांला कसें माहीत असणार? माझ्या जीवाचा अंशभाग देऊन जरी तें कोंकरूं मला वांचवितां आलें असतें, तरी मी तें केलें असतें. पण काय उपयोग? स्वतः आईनेंच तें घेतलें, त्याला कसें परत आणतां येणार!

जयसिंगाचें उत्तर ऐकून अपर्णेचें दुःख आणि संताप अनिवार झाला. ती म्हणाली—

**अपर्णा**:—आईनं घेतलं? खोटं आहे हें! राक्षसिणीनं घेतलं आहे त्याला! मीच आहे त्याची आई! मुलासारखं सांभाळलं होतं मी त्याला!

त्या एकंदर प्रकाराचा राजाच्या मनावर फार परिणाम झाला. दुसऱ्याच्या जीवाला असें दुःख देऊन, जीव मारून, त्याच्या रक्तानें देवीची पूजा करायची, यांतला भयंकर अमानुषपणा राजाच्या मनाला जाणवला. जयसिंगालाहि अपर्णेची कींव आली. तिच्याबद्दल त्याच्या मनांत एक प्रकारची माया उत्पन्न झाली. देवीच्या सेवकाच्या मनांत उत्पन्न झालेली ती माया, म्हणजे जणुं कांहीं त्या देव-मंदिरांत निनादित झालेलें एक नवें संगीत होतें!

अपर्णेचें दुःख पाहून राजाचें मन हाललें होतें. त्यानें पुष्कळ विचार केला आणि देवीपुढें पशुबलि देण्याला बंदी करण्याचें ठरविलें. आपला बंदी हुकूम त्यानें स्पष्ट जाहीर केला. रघुपति राजभांडारांतून बलीसाठीं पशु आणण्याकारितां राजदरबारीं गेला असतां गोविंदमाणिक्यांनीं त्याला सरळ सांगितलें—

**गोविंद**:—यंदापासून मंदिरांत जीवबालि बंद करण्यांत येत आहे.

**रघुपति**:—स्वप्नांत तर नाहींना ऐकत मी हें!

**गोविंद**:—गुरुजी, हें स्वप्न नव्हें. इतके दिवस मी स्वप्नांत होतों,

आज जागा झालों आहे. बालिकेच्या रूपानें स्वतः आई मला सांगून गेली.—तिला जीवरक्त आतां सोसेनासें झालें आहे !

**रघुपति**:—इतके दिवस सोसलें कसें ? हजारों वर्षें रक्तपान करून आईला आज अशी अरुचि उत्पन्न झाली !

**गोविंद**:—नाहीं, आई रक्तपान करीत नसे. तुम्ही रक्तपात करीत असलां, म्हणजे ती तोंड फिरवीत असे.

**रघुपति**:—महाराज, काय करीत आहां, नीट विचार करून पाहा. शास्त्रविधि आपल्या अधिकारांत नाहींत.

**गोविंद**:—देवीचा आदेश सर्व शास्त्रांहून श्रेष्ठ आहे.

याप्रमाणें, राजा आणि राजगुरु यांचा बराच वादविवाद झाला. रघुपतीनें धर्म-शास्त्राचें महत्त्व, ब्राह्मणाच्या अधिकाराची महती राजाला पटविण्याचा प्रयत्न केला. परंतु, राजाचा निश्चय अढळ होता. त्यानें ठामपणानें सांगितलें, "इतःपर त्रिपुरा राज्यांत जीवबलि देणाऱ्याला हद्दपार केलें जाईल."

रघुपति संतापला. "देवी त्रिपुरेश्वरी, म्हणजे त्रिपुराराज्याची प्रजाजन नव्हे; तिच्यावर तुमचा अधिकार काय ?—तुम्ही नास्तिक आहां, पाखंड आहां" इत्यादि बोलून रघुपति परत गेला.

याप्रमाणें राजाचा अधिकार, त्याचा भूतदयामय बलिबंदी हुकूम आणि ब्राह्मण राजगुरूचा अधिकार, त्याची धर्मावरील अंधश्रद्धा, यांत संघर्ष निर्माण झाला. राजाच्या हुकुमाचें राजदरबारी मंडळींनाहि आश्चर्य वाटलें. कारण, परंपरागत रूढींचे ते दासच बनल्यासारखे झाले होते. या आश्चर्यचकित झालेल्या मंडळींत राजाचा धाकटा भाऊ, **नक्षत्रराय** आणि सेनापति व मंत्रि **नयनराय** हे होते.

: २ :

**योग्य** वेळीं राणी गुणवतीनें वाजतगाजत आपलें पूजासाहित्य देवळाकडे पाठविलें. बळीचे पशूहि अर्थातच पाठविण्यांत आले होते. परंतु, राजाचा हुकूम! बलिदान, रक्ताचा नैवेद्य, बंद! करायचें काय? राणीनें पाठविलेली पूजा आली तशी परत पाठवावी लागली. राणी झाली म्हणून राजाच्या हुकुमाविरुद्ध तिचा नवस पुरा होऊं शकला नाहीं.

पूजासाहित्य परत गेल्याची वार्ता परिचारिकेनें राणीला कळविली. देवीला आपली पूजा पोंचलीच नाहीं, हें समजल्याबरोबर राणी कावरी-बावरी झाली. राणीपदाचा अवमान झाला असेंहि वाटलें तिला.

तेवढ्यांत गोविंदमाणिक्य अंतःपुरांत आले. राणी म्हणाली—

**गुणवती**:—महाराज, ऐकलं का? आईच्या दारीं पोंचलेले माझे पूजेचे बळी परत पाठवले!

**गोविंद**:—माहीत आहे मला.

**गुणवती**:—माहीत आहे आपल्याला? तरी नको म्हटलं नाहीं आपण? जाणून बुजून महिषीचा अपमान होऊं दिला?

**गोविंद**:—प्रिये, त्याला क्षमा कर.

**गुणवती**:—आपण मोठे दयाळू आहां! पण, महाराज, ही दया नव्हे, हा भित्रेपणा आहे. दयेनं दुबळे झालां आहां आपण. आपल्याला शिक्षा करवत नसेल, तर मी करीन शिक्षा. सांगावं मला त्या अपराध्याचं नांव.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनु. क्र. 33903 वि. ९
क्रमांक 7042 नों. दि.

**गोविंद**:—देवी, मीच तो अपराधी. अपराध दुसरा-तिसरा नाहीं, तुमचं मन दुखवण्याचा अपराध केला आहे मीं !

**गुणवती**:—म्हणतां काय महाराज !

**गोविंद**:—आजपासून देवीच्या नांवानें जीवरक्तपाताला माझ्या त्रिपुरा राज्यांत बंदी करण्यांत आली आहे.

**गुणवती**:—कोणी केली बंदी ?

**गोविंद**:—आईनें.

**गुणवती**:—कोणी ऐकली तिची वाणी ?

**गोविंद**:—मी.

**गुणवती**:—आपण ? महाराज, हंसूं येतं हें ऐकून ! आपलं निवेदन सांगायला भुवनेश्वरी राजाच्या दाराशीं आली !

**गोविंद**:—निवेदन नव्हे; मनाच्या वेदना व्यक्त केल्या तिनें.

असा त्या पति-पत्नींचा संवाद झाला. राणीनें राजाची पुष्कळ विनवणी केली. परंतु, राजाचा निर्धार पक्का होता. गुणवती म्हणाली—

**गुणवती**:—माझी वाट आपण मोकळी करा. मला माझे बली घेऊन जाऊं द्या.

**गोविंद**:—मला आईची आज्ञा मोडतां येणे शक्य नाहीं.

**गुणवती**:—मलाहि देवीला दिलेला शब्द परत घेणें शक्य नाहीं.

झालें ! राजाची अहिंसा आणि राणीचा नवस, यांत संघर्ष निर्माण झाला.

राणी आणि रघुपति हे एका बाजूला झाले आणि राजा आणि अपर्णा यांची दुसरी बाजू झाली.

अहिंसा—हिंसा आणि राजाधिकार—राजगुरूंचा अधिकार, यांत पुनः संघर्ष उत्पन्न झाला.

रघुपतीचा अहंकार हार मानायला तयार होईना. राजाच्या दुर्बुद्धीच्या परिणामीं त्रिपुरा राज्यावर महान् संकट ओढवल्यावांचून राहणार नाहीं, राजसिंहासनावर आपत्ति कोसळेल, इत्यादि नाना तऱ्हांचें भय त्यानें

बोलून दाखविण्यास सुरुवात केली. त्यानें राणीच्या मनांत त्या आपत्तींची कल्पना भरवून दिली. आईची रक्ताची तृष्णा अतृप्त राहिली, दाराशीं पोंचलेला पशुबली परतवला; त्याचे परिणाम काय होतील न कळे, असें वाटून राणीचें मन बेचैन झालें. दुखावलेल्या स्वाभिमानामुळें आणि भीतीनें तिला कांहीं सुचेना.

तशा स्थितींत रघुपतीनें तिला सांगितलें कीं, कसेंहि करून देवीची तहान भागविल्याशिवाय आतां उपाय नाहीं. परंतु, राजानें आपल्या ब्राह्मण्याचा अधिकारच हिरावून घेतल्यानें आपल्याला कांहीं करतां येत नाहीं. कलिकालांतील ब्राह्मण्याचा धिक्कार करून, 'त्रिपुरा राज्यांतील विफल ब्रह्मतेज वृश्चिक-दंशाप्रमाणें माझ्या उरांत जळतें आहे!' असें रघुपति राणीपाशीं बोलला व तावातावानें आपलें जानवें तोडण्याचाहि आविर्भाव केला त्यानें.

त्या प्रकारानें राणीच्या मनावर रघुपतीला हवा होता तो परिणाम झाला- "द्या तर मग ब्राह्मणाचा अधिकार परत!" रघुपतीनें असें म्हटल्या बरोबर आपल्या महिषीपदाच्या अधिकारानें, "मी ब्राह्मणाचा अधिकार परत देतें आहे, आपण परत जा, आपल्या पूजेंत कोणताहि व्यत्यय येणार नाहीं," असें म्हणून राणीनें रघुपतीला पुनः अधिकारदान केलें. राजाच्या अपरोक्ष, त्याचा हुकूम डावलून रघुपतीला अप्रत्यक्षपणें जीवबलीची मुभाच दिली राणीनें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

नंतर, राजगुरूंनीं दुसराच डाव रचला. राजाचा भाऊ नक्षत्रराय याला गांठून सांगितलें कीं, देवीचा रक्ताचा नैवेद्य बंद झाल्यानें ती अप्रसन्न झाली आहे. तिला राजरक्ताची तहान लागल्याचेंहि त्यानें नक्षत्ररायाच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला. देवीच्या देवळांतच त्या दोघांची भेट झाली. "देवी काल माझ्या स्वप्नांत आली होती आणि तिनें मला सांगितलें कीं, नक्षत्रराय राजा होणार आहे," असें रघुपतीनें नक्षत्ररायाला सांगितलें. त्याला तें खरें वाटेना. तेव्हां तें त्याच्या मनावर बिंबविण्याचा पुनः प्रयत्न करून रघुपतीनें राजबंधूस सांगितलें—

**रघुपतिः**—पण, राजपदावर विराजमान होण्याआधीं तूं देवीला राजरक्त आणून दिलें पाहिजेस.

**नक्षत्रः**—तें कसें शक्य आहे ? कुठें मिळायचें राजरक्त ?

**रघुपतिः**—घरीं गोविंदमाणिक्य आहे ना ? देवीला त्याचें रक्त हवें आहे !

**नक्षत्रः**—काय ! त्यांचें रक्त !

अशीं दोघांचीं बोलणीं झालीं. नक्षत्ररायाला रघुपतीचें बोलणें ऐकून धक्काच बसल्यासारखें झालें. गुप्तपणानें राजाची हत्या करून, त्याचें ऊन ऊन रक्त आणून देवीच्या वेदीवर अभिषेक करण्याचें कारस्थान राजगुरु नक्षत्ररायाच्या मनांत भरवूं लागला. परंतु, भावाची हत्या करून राजा होण्याला नक्षत्रराय मुळींच तयार झाला नाहीं.

रघुपतीच्या मुलासारखा जयसिंग. पण, त्यालाहि तें कृत्य भयंकर आणि किळसवाणें वाटलें. परंतु, आपल्याला महाकालीची पूजा अव्याहतपणें करतां यावी, म्हणून रघुपतीनें राजहत्या करविण्याचें ठरविलेंच होतें. हत्येचें त्याला कांहीं वाटत नसे. तो देवीपुढें बलिदान करून सरावलेला होता. जयसिंगालाहि सांडलेलें रक्त पाहायची संवय झालेली होतीच. तरीपण, राज्याधिकारासाठीं एका भावानें दुसऱ्या भावाचें रक्त सांडण्याची कल्पना त्याला चमत्कारिक वाटली. तेव्हां, 'हत्या करण्यांत पाप नाहीं; सारी दुनिया हत्येवरच चालली आहे; जगांत कोठेंहि पाहा, कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची हत्या चालूंच आहे,' इत्यादि रघुपतीनें आपल्या मुलाला, जयसिंगाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

राणीला जेव्हां देवीला राजरक्त हवें असल्याची बातमी समजली; तेव्हां तिनें ध्रुवाची हत्या करण्याचा नक्षत्ररायाला सल्ला दिला. ध्रुव मेला, तर एक अडचण दूर होईल, महाकालीला राजरक्त मिळेल आणि आपल्या पतीचे प्राण सुरक्षित राहतील, राज्यावरील आपत्ति अनायासें टळेल, असें गुणवतीला वाटूं लागलें होतें. "ध्रुवाचें अतीच कौतुक झालें आहे. राजांचा मुकुट देखील हातीं घेऊन खेळ चालतात त्याचे. असले भलतेच खेळ करतां करतां कधीं तरी तो खराच मुकुटाचा अधिकारी होऊन बसायचा ! अन् भाऊजी, तुमच्या अधिकारावर गदा यायची !" असेंहि तिनें सांगायला कमी केलें नाहीं. अर्थातच, हा साराच घाट अखेरीस उघडकीस आला.

नक्षत्ररायाकरवीं गोविंदमाणिक्याची हत्या करण्याचा बेत फसला. परंतु, राजरक्तानें महाकालीची पूजा सांग करण्याची रघुपतीची ईर्षा बलवत्तर झाली. राजा आणि राजगुरु यांच्या मधला संघर्ष वाढत गेला.

पशुबली होतां नयेत, म्हणून गोविंदमाणिक्यानें आपला सेनापति नयनराय याला मंदिराशीं पहारा ठेवायला सांगितला होता. परंतु, "देवीच्या देवळांत या सेवकाचा अधिकार चालणार नाहीं;" असें नयनराय बोलला होता. तेवढ्या आधारावर रघुपतीनें सेनापति नयनरायाला वितरविण्याचा आणि त्याच्याकडून राज्याला सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला. परंतु, तोहि सफल होऊं शकला नाहीं. राजनिष्ठ नयनराय राजाच्या हितार्थ राजाच्याच बाजूला उभा राहिला.

## : ४ :

ध्रुवाला मारण्याचा कट उघडकीला आला. त्याला मारण्यासाठीं, महाकालीच्या देवळांत नेण्यांत आलें होतें. निष्पाप बालक तें ! गाढ झोंपलें होतें. नक्षत्रराय आणि रघुपति दोघे होते देवळांत. मध्यरात्रीची वेळ. त्या तशा निशीथकालीं देवीपुढें बालकाचा बलि देण्यासाठीं खड्ग उचललें गेलें, तेवढ्यांत गोविंदमाणिक्य तेथें हजर झाला. ध्रुवाचा जीव वांचला; आणि राजानें नक्षत्रराय व राजगुरु या दोघांना अटक केली.

न्यायनिवाड्याच्या वेळीं नक्षत्ररायानें गुन्हा कबूल केला. राजाचे पाय धरून त्यानें क्षमेची याचना केली. " कोणाच्या सल्ल्यानें हें कृत्य करायला तयार झालास ? " असें विचारलें असतां नक्षत्रराय म्हणाला, " कोणाच्याहि नाहीं. माझीच पापवासना ! मीच दोषी आहे. पण, मला क्षमा करा महाराज. "

**राजा**:—क्षमा करणं माझ्या हातीं नाहीं. अपराध शाबीत झाला आहे. त्रिपुराराज्याच्या सीमेबाहेर, ब्रह्मपुत्रा नदीच्या कांठीं, तीर्थस्नानासाठीं राजगृह बांधलेलें आहे. तेथें आठ वर्षं तुम्ही राहावें......पण जाण्याआधीं मला आलिंगन देऊन जा ! तुम्हांला दिलेल्या या शिक्षेचें दुःख जितकें तुमच्या मनाला वाटतें आहे, तितकेंच माझ्या हृदयांत बोंचतें आहे !...

याप्रमाणें नक्षत्ररायाला आठ वर्षं हद्दपारीची शिक्षा झाली.

रघुपतीला राजानें विचारलें,–

**गोविंदः**—आणखी कांहीं सांगायचें आहे ?

**रघुपतिः**—कांहीं नाहीं.

**गोविंदः**—गुन्हा कबूल आहे ?

**रघुपतिः**—गुन्हा ? हो, गुन्हा झाला आहे खरा ! देवीची पूजा पुरी करतां आली नाहीं मला ! मोहानें मूढ होऊन अकारण विलंब केला, त्याची शिक्षा देते आहे देवी; तुम्ही निमित्तमात्र आहां !

रघुपतीलाहि आठ वर्षे हद्दपारीची शिक्षा फर्मावण्यांत आली. रघुपतीनें अगदीं गयावया करून दोन दिवसांचा अवधि मागून घेतला. "आजवर देवीखेरीज कोणापुढें मी गुडघे टेकले नाहींत. मी ब्राह्मण, तुम्ही शूद्र; तरीपण, दोन्ही हात जोडून, गुडघे टेंकून मी याचना करतों आहें," असें म्हणून रघुपतीनें श्रावणाचे शेवटचे दोन दिवस मागून घेतले. त्यानंतर, तें 'अभिशप्त' राज्य कायमचें सोडून जाण्याचें त्यानें कबूल केलें.

राजानें दोन दिवसांची सवड दिल्याबरोबर, "महाराज ! राजाधिराज ! तुम्ही दयेचा सागर आहां ! मी धूलीहूनहि अधम, दीन, अभागी आहे. माझ्यावर कृपा झाली." असे उद्गार रघुपतीनें काढले. कां ?—

रघुपतीला अजून महाकालीची पूजा संपूर्ण करायची होती. अर्धी राहिली होती त्याची पूजा; अजून त्याला राजरक्त समर्पण करायचें होतें देवीला.

शेवटीं, देवीसाठीं राजरक्त, गोविंदमाणिक्याचें रक्त आणण्याची जबाबदारी रघुपतीनें जयसिंगावर सोंपविली. आपला मानलेला पिता, गुरु, याची ती भयंकर आज्ञा शिरसावंद्य करून, जयसिंगानें गोविंदमाणिक्याचें रक्त आणण्याचें मान्य केलें.

जयसिंग त्या उद्योगांत असतां, एकदां राजा देवीच्या दर्शनाला आला. देवळांत दुसरें तिसरें कोणी नव्हतें. राजा देवीपुढें गुडघे टेकून बसला आणि वांकून तिच्या पायावर डोकें ठेवायला जाणार, इतक्यांत सुरा हातांत घेऊन जयसिंग त्याच्या मागें येऊन उभा राहिला. जयसिंगानें

देवीला विचारलें, "आई, तुला राजरक्त हवें आहे ना?" देवीच्या गाभाऱ्यांतून शब्द उमटले, "होय, हवं आहे!"

गाभाऱ्यांतून आलेला आवाज देवीचा नव्हता, राजगुरु रघुपतीचा होता! राजानें तो ओळखला आणि– आणि मग जयसिंगाच्या हांतून त्या वेळीं राजहत्या घडली नाहीं. त्याच्या हांतून सुरा गळून पडला– नव्हें, त्यानें तो फेकून दिला.

नंतर राजा तेथून गेला. रघुपति पुढें आला. जयसिंगाच्या हांतून आज्ञाभंग झाला होता. रघुपति त्याला कठोरपणें बोलला, "सारें मोडून टाकलेंस. ब्रह्मशाप अर्ध्या वाटेवरून परत फिरवलास! गुरूचा आदेश ओलांडलास. देवीचा आदेश व्यर्थ केलास! जन्मावधीचें प्रेमाचें ऋण असें फेडलेंस तूं!"

आपल्या त्या सर्व अपराधांबद्दल जयसिंगानें आपल्याला देहान्ताची शिक्षा देण्याबद्दल रघुपतीला विनंती केली; परंतु, रघुपतीनें त्याला निराळी शिक्षा दिली. देवीच्या पायांवर हात ठेवून, 'श्रावण महिन्याच्या शेवटच्या रात्रीं देवीच्या चरणांवर राजरक्त आणून ओतण्याची' त्याला प्रतिज्ञा करायला लावली.

जयसिंगानें प्रतिज्ञा केली, "श्रावणाच्या शेवटच्या रात्रीं, माते, तुझ्या पायांवर राजरक्त वाहीन!"

× × × ×

श्रावणाची शेवटची रात्र आली. काळरात्रच ती. जयसिंग महाकालीच्या देवळांत मूर्तीपुढें बसला. त्यानें देवीला विचारलें, "राजरक्त हवें आहे नाहीं का तुला? करुणामयी, जगत्पालिनी माते, राजरक्ताशिवाय तुझी तहान शांत व्हायची नाहीं?– ठीक आहे! मी रजपूत आहे– माझे पूर्वज राजेच होते–राजघराण्यांतलाच माझा पिंड. माझ्या देहांत असलेलें रक्त, राजरक्तच आहे! हेंच रक्त वाहतों तुला. हें शेवटचें रक्तपान ठरावें तुझें! तुझी रक्ताची अनंत तृषा या माझ्या रक्तानें कायमची

शांत होऊं दे!" असें म्हणून जयसिंगानें स्वतःच्या छातींत सुरा खुपसला. देवीपुढें तें राजरक्त भळांभळां वाहूं लागलें!

तेवढ्यांत रघुपति धांवत आला. समोरचें दृश्य पाहून त्याच्या शोकाला पारावार उरला नाहीं. तान्हा असल्यापासून मायाममतेनें ल्हानाचा मोठा केलेल्या आपल्या प्रिय मानसपुत्रानें अशा रीतीनें देवीपुढें आपलें बलिदान केल्यामुळें रघुपतीला वेड लागायची पाळी आली. देवीला आपण राजरक्त वाहणार होतों, तें, अखरीस, आपल्या लाडक्या, जीवापाड जतन केलेल्या, राजकुलोत्पन्न जयसिंगाच्याच नसांतून वाहणारें रक्त तिला समर्पित होईल, याची कालत्रयींहि त्याला कल्पना नव्हती! त्यानें पुष्कळ आक्रोश केला; "माझा अहंकार, देवता, ब्राह्मणत्व, सर्व जळूं दे; मला फक्त तूं हवा आहेस. बाळा जयसिंगा, ऊठ रे तूं; जागा हो!" असा टाहो फोडला रघुपतीनें. राजगुरु रघुपति, तेजस्वी रघुपति, धार्मिक निष्ठावान् रघुपति, करारी ब्राह्मण!–पण त्याचें माथें भिराभिरूं लागलें. जीवरक्त पिणाऱ्या देवीचा त्याला संताप आला. काय करावें तें त्याला सुचेना. बेभान झाला तो! आणि अखेरीस दुःखातिशयानें, रघुपतीनें ती महाकालीची मूर्ति उचलली आणि गोमती नदीच्या पाण्यांत फेकून दिली!–राजगुरु रघुपतीला खरी जाग आली!

रक्तपिपासू महाकालीच्या मूर्तीचें अशा प्रकारें विसर्जन झालें! आणि–ती भीषण, अमानुष प्रथाहि विसर्जन पावली.

त्रिपुराराज्यांत, जगाचा अनंत मायेनें प्रतिपाळ करणाऱ्या, संरक्षक, संवर्धकारिणी जगन्मातेचें साम्राज्य सुरू झालें.

◆ ◆ ◆



# प्रवासवर्णनें

# युरोप-प्रवासाचीं पत्रें[1]

## पत्र १ लें

### समुद्रपीडा

वीस सप्टेंबरला आम्ही 'पूना' आगबोटीवर चढलों. पांच वाजतां आगबोट सुटली. आम्ही तेव्हां बोटीच्या गच्चीवर (डेकवर) उभे होतों. आमच्या डोळ्यांसमोरून भारताची शेवटची सीमारेषा आस्ते आस्ते अदृश्य झाली. भोंवतींच्या लोकांचा गलबला सहन होईना, म्हणून मी माझ्या खोलींत (केबिनमध्यें) जाऊन आडवा झालों. एक गोष्ट लिहितोंच,– चोरून ठेवण्याचं तसं कांहीं कारण नाहीं,–माझं मन कसं निर्जीव, उदास आणि कष्टी झालेलं होतं. पण, जाऊं दे तें;–तसल्या साऱ्या करुणरसात्मक हकीकती लिहायला अवसर नाहीं, आणि इच्छाहि नाहीं; लिहिल्याच, तर तुझ्या डोळ्यांचं पाणी खळायचं नाहीं, तुला धीर निघायचा नाहीं.

समुद्राच्या पायीं दंडवत ! ता. २० पासून ता. २६ पर्यंतचे दिवस कसे काढले, ते माझे मला माहीत ! समुद्रपीडा कशाला म्हणतात, तें तुला नक्कीच माहीत आहे; पण, ती कशी असते, तें तुला नाहीं माहीत. मला ती पीडा झाली होती, त्याचं काय, कसं, तें सविस्तर लिहिलं, तर वाचून डोळ्यांना पाणी येईल ! सहा दिवस, महाराज, अंथरुणावरून उठलोंच नाहीं. ज्या खोलींत मी राहत होतों, ती अगदीं अंधेरी, लहान,

---

[1] पाहिल्यानें, म्हणजे वयाच्या सतराव्या वर्षी रवींद्रनाथ युरोपला गेले त्या वेळीं त्यांनीं आपल्या बंधूंना हीं पत्रें लिहिलीं होतीं.

आणि समुद्राचं पाणी आंत येऊं नये म्हणून जिच्या चोहींकडच्या खिडक्या पुरत्या बंद केलेल्या, अशी होती. असूर्यम्पश्यरूप आणि अवायुस्पर्शदेह होऊन सहा दिवस कसाबसा जिवंत होतों, इतकंच. पहिले दिवशीं आमच्या एका सहप्रवाशानें मला अळेंबळें जेवणाच्या टेबलाशीं नेला. त्या वेळीं उठून उभा राहिलों, तेव्हां माझ्या डोक्यांत म्हणून जें कांहीं आहे, त्यांत जशी कांहीं मारामारी, कापाकापी सुरू झाली; डोळ्यांना दिसेना, पाय उचलेनात, झोंकांड्या जाऊं लागल्या ! दोन पाउलं टाकलीं अन् एका बाकावर जाऊन बसलों. मला आधार देऊन, माझ्या सहप्रवाशानें धरून डेकवर नेलं. एका कठड्याचा आधार घेऊन मी उभा राहिलों. तेव्हां रात्र अंधारी होती. आकाश मेघांनीं झाकलेलं होतं. आमच्या उलट दिशेनं वारे वाहूं लागले होते. त्या अंधारांत, असीम समुद्रांत, दुतर्फा आग ओकीत आमची बोट एकटीच निराधार चालली होती. जिकडं पाहावं, तिकडं अंधार ! समुद्राला उधाण येत होतं.–तें एक महा गंभीर दृश्य होतं !

तिथं फार वेळ उभं राहावेना. चक्कर यायला लागली. पुनः दुसऱ्याच्या आधारानें माझ्या केबिनमध्यें आलों; आणि जो एकदां अंथरुणावर झोंपलों, तो सहा दिवस ! एक क्षणहि डोकं वर केलं नाहीं. आमचा जो स्टुअर्ट (प्रवाशांचा सेवक) होता– कां कोणाला माहीत– त्याची माझ्यावर विशेष कृपादृष्टि होती. दिवसाच्या काठीं कितीदां तरी, ऊठसूठ तो माझ्यासाठीं खाद्यपदार्थ घेऊन येई; आणि मी कांहीं खाल्ल्याखेरीज मला तो सोडत नसे. तो म्हणायचा, "खाल्लं नाहींस, तर उंदरासारखा अशक्त (Weak as a rat) होशील." तो म्हणायचा, "तुमचं हवं तें काम मी करीन." मीहि, अर्थातच त्याला मनापासून धन्यवाद देत असे; 'बोटीवरून उतरून येतांना नुसत्या पोंकळ धन्यवादांखेरीज भरीव असं आणखी कांहीं मी त्याला देऊन आलों.

सहा दिवसांनंतर, आम्ही जेव्हां एडनच्या जवळ जवळ पोंचलों, तेव्हां समुद्र जरा शांत झाला होता. त्या दिवशीं स्टुअर्ट आला आणि मला जरा हालचाल करण्याबद्दल आग्रह करायला लागला. त्याच्या सल्ल्याप्रमाणं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ................ वि: १११ ..........
क्रमांक ................ नों: दि: ..........

मी अंथरूण सोडून उठलों, अन् माझ्या लक्षांत आलं कीं, मी खरोखरच उंदरासारखा अशक्त झालों होतों. डोकं जसं कांहीं उसनं आणलं होतं! खांद्याशीं त्याचा मेळ बसत नव्हता. चोरून आणलेल्या कपड्यांप्रमाणं माझं अंग मलाच अंगीं लागत नव्हतं! खोलींतून बाहेर पडलों आणि डेकवर जाऊन एका आरामखुर्चीवर रेलून बसलों. फारां दिवसांनीं हवा मिळाली अन् हायसं वाटलं. दुपारच्या वेळीं त्या समुद्रांतून एक लहानशी बोट जात असलेली दिसली; चोहों बाजूंना किती तरी दूरपर्यंत किनारा नव्हता; आमच्या बोटीवरचे सारे लोक आश्चर्यचकित झाले. त्या बोटींतले लोक आमच्या बोटीला हांका मारूं लागले, तेव्हां आमची आगबोट थांबली. ते आरबी लोक होते. एडनहून मस्कतला चालले होते ते. वाटेंत त्यांची दिशाभूल झाली होती; त्यांच्या बरोबरचं पाण्याचं पीप फुटून पाणी नाहींसं झालं होतं; आणि प्रवासी तर बरेच होते. आमच्या बोटीवरच्या लोकांनीं त्यांना पाणी दिलं. एक नकाशा उलगडून मस्कत कोणीकडे आणि किती दूर होतं, तें त्यांना दाखवलं; आणि मग ते लोक पुनः पुढं चालते झाले! त्यांची बोट मस्कतपर्यंत पोंचेल कीं नाहीं, याबद्दल आमच्या मंडळींना शंका वाटूं लागली अन् ते तसं बोलूनहि दाखवूं लागले.

ता. २८ सप्टेंबरला, शनिवारीं, सकाळीं झोंपेंतून उठून पाहतों तों आमच्या समोर किनाऱ्यावर पहाड–पर्वत! समुद्र शांत होता; नुकता सूर्योदय झालेला; निर्मळ स्वच्छ प्रभात! दुरून त्या पर्वतमय भूभागावरचं प्रातःकाळचं दृश्य इतकं सुंदर दिसत होतं, कीं काय सांगूं! पर्वतांवर रंगीबेरंगी मेघ असे वांकले होते कीं, अपरिमित सूर्यकिरण-पान केल्यामुळं त्यांना उभं राहण्याची शक्ति नव्हती, असं वाटत होतं; जणुं कांहीं पर्वतांवर विसांवले होते ते. आरशासारख्या स्वच्छ, शांत समुद्रावरच्या शीडहोड्या दिसत होत्या.

एडनला पोंचून घरीं पत्र लिहायचा प्रयत्न केला, तेव्हां, धक्के, हेलकावे खाऊन डोक्यांत या कांहीं दिवसांत सारं उलटंपालटं झालेलं आणि बुद्धीच्या राज्यांत अराजक माजलं असल्याचं माझ्या लक्षांत आलं. काय,

कसं लिहावं, नीटसं ध्यानांत येईना. साऱ्या कल्पना जशा कांहीं कोळ्याच्या जाळ्यासारख्या बनल्या होत्या; जरा शिवलं कीं जाळं तुटायचं. कशामागून काय लिहावं, त्याची नीट ओळ लागेना. अशा परिस्थितींत लिहायला सुरुवात केली होती, त्यामुळं तुला पत्र लिहून झालं नाहीं; त्याबद्दल रागावूं नको.

हें पहा, समुद्राबद्दल माझ्या मनांत जरा अनादर उत्पन्न झाला आहे. समुद्राबद्दल मनांत जी कल्पना होती, प्रत्यक्ष समुद्रांत आल्यानंतर तिच्याशीं वस्तुस्थितीचा नीट मेळ बसत नसल्याचं ध्यानांत आलं. तीरावरून समुद्र खूप अफाट वाटतो, पण समुद्राच्या पाण्यांत शिरल्यानंतर तो तितकासा मोठा वाटत नाहीं. त्याला कारण आहे. मी जेव्हां मुंबईच्या समुद्रकांठीं उभा राहून समुद्राकडे पाहात असे, तेव्हां दूर, दिगन्तापर्यंत निळं पाणी दिसायचं आणि निळ्या आकाशाशीं त्याचा संगम झाल्यासारखं वाटायचं. जर कधींतरी मला तें दिगंताचं आवरण भेद करतां आलं, तो दिगंताचा पडदा बाजूला सारता आला, तर माझ्यासमोर पुन: अपार समुद्र एकदम उफाळून येईल, असं वाटायचं. त्या सीमेपलीकडे काय असावं, त्याची कल्पना माझ्या मनांतल्या मनांतच राहत असे; वाटत असे, कीं त्या दिगंतानंतर आणखी एक दिगंत येईल. पण समुद्रांत प्रत्यक्ष शिरल्यानंतर वाटतं कीं, जहाज जणुं कांहीं चालतच नाहीं, फक्त एका ठराविक दिगंताच्या सीमेंत तें बांधून ठेवलेलं आहे. आमच्या कल्पनेपेक्षां प्रत्यक्ष ही सीमा इतकी बारीक वाटते, आणि कांहीं तरी असमाधान वाटतं. पण, हें पहा, हें सारं गुप्त ठेवलं पाहिजे हं. वाल्मिकीपासून बायरनपर्यंत सर्वांना समुद्र पाहून मनपसंत वाटला असला अन् मला निराळाच वाटला, तर लोक हंसतील. गॅलिलिओच्या काळांत मी असं बोललों असतों, तर कदाचित् मला कैद झाली असती! इतक्या कवींनीं समुद्राचीं इतकीं स्तुतिस्तोत्रं गायलीं आहेत, कीं आजच्या माझ्या टीकेनं त्याला (समुद्राला) कांहींच वाटायचं नाहीं. लाटा येऊं लागल्या, म्हणजे मात्र समुद्र चांगला दिसत असावा; पण, माझ्या दुर्दैवानं, समुद्राच्या लाटा उंचावायला

लागल्या, कीं मला घेरी यायला लागते आणि दुसरं तिसरं पाहणं संवरणं राहतं बाजूलाच.

## सहप्रवासी

मी केबिनमधून बाहेर पडून हिंडा-फिरायला लागल्यानंतर माझं सहप्रवाशांकडे लक्ष गेलं आणि त्यांचंहि माझ्याकडे गेलं. स्वभावतःच मला ‘ लेडी ’ ( स्त्री ) जातीची जरा भीति वाटते. त्यांच्या आसपास गेल्यास इतकीं संकटं येण्याचा संभव आहे, कीं चाणक्यपंडित असते, तर त्यांनीं ‘ लेडीज-’ पासून दहा हजार हात दूर राहायचा सल्ला दिला असता. एक तर, मनोराज्यांत नाना प्रकारच्या दुर्घटना होण्याचा संभव—त्याखेरीज, एक बोलतां एक बोलून बसायची सारखी भीति; आणि आमच्या असहिष्णु ‘ लेडीज ’ ना त्यांच्या रीतिरिवाजांचं उल्लंघन न सोसून, त्यांचा अवमान होण्याची धास्ती. त्यांच्या त्या गाऊनच्या अरण्यांत गोंधळल्यासारखं व्हायचं, नाहींतर जेवायच्या वेळीं त्यांना मांसाचा तुकडा कापून द्यायला जाऊन आपलंच बोट कापून बसायला व्हायचं--अशा दहा-पांच विचारांनीं मी आपला बोटीवरच्या ‘ लेडीज ’पासून लांबच असायचा. आमच्या बोटीवर त्यांचा अभाव नव्हता, बऱ्याच होत्या. पण, त्यांच्यांपैकीं कोणी लहान वयाच्या किंवा, सुंदर नव्हत्या, म्हणून ‘ जेंटलमेन ’ सदोदित ठिस्फिस् करीत असत.

पुरुष प्रवाशांपैकीं पुष्कळांशीं ओळखपाळख झाली. ब- महाशयांशीं आमची चांगलीच गट्टी जमली होती. ते अस्खलित बोलायचे, अजस्र हंसायचे आणि अपरिमित जेवायचे. ते सगळ्यांशींच हंसून खेळून असतात, सर्वांशींच त्यांची दोस्ती, ओळख होते. त्यांच्या अंगीं एक विशेष गुण आहे. ते कधीं विचार करून, बोलायचे ते घासून पुसून बोलत नाहींत; थट्टामस्करी करतात, त्याला कांहीं अर्थ वा नसो, स्वतःच हंसून बेजार होतात. ते आपलं वय किंवा पद यांचा बोज लक्षांत घेऊन

हिशोब करून कधीं बोलत नाहींत; तोलून जोखून कधीं हंसत नाहींत; दोन्ही बाजू राखून आपलं मत व्यक्त करत नाहींत; या साऱ्या त्यांच्या स्वभावामुळं मला ते फार आवडत असत. किती पोरकटपणा करत असत ते, त्याला कांहीं मोजमाप नाहीं. वृद्धत्वाची बुद्धिमत्ता आणि बालसुलभ निर्व्याज साधेभोळेपणा एकत्र पाहिला, म्हणजे मला फार आनंद वाटतो. मला ते 'अवतार' म्हणायचे; ग्रेगरी साहेबांना म्हणायचे 'गड्डू;' आणि दुसऱ्या एका प्रवाशाचं नांव त्यांनीं 'रूहीमासा' ठेवलं होतं; त्या बिचाऱ्याचा अपराध काय, आहे माहीत? सर्वसाधारण माणसांपेक्षां त्याची मान जरा आंखूड होती- त्याचं डोकं आणि बाकीचं शरीर यांना जोडणारा तो भाग नव्हताच म्हटलं तरी चालेल.-म्हणून, ब- महाशयांनीं त्याला मत्स्यश्रेणींत घातला होता. पण, मला मात्र 'अवतार' श्रेणींत काय म्हणून टाकलं होतं, त्याचं कारण सहजासहजीं सांगतां येण्यासारखं नाहीं.

आमच्या बोटीवरचे T- महाशय, ही जरा आधुनिक नमुन्याची व्यक्ति होती. भयंकर तत्त्वज्ञानी व्यक्ति! त्यांना कधीं मी बोली भाषेत बोलतांना ऐकलंच नाहीं. ते मुळीं बोलतच नसत, व्याख्यान देत असत नेहमीं! एक दिवस आम्ही दोघं-चौघं मिळून डेकवर घटकाभर हास्य-विनोद करीत होतों, तेवढ्यांत दुर्दैवानं ब- महाशय त्यांना म्हणाले, 'चांदण्या काय सुंदर दिसताहेत!' बस्, आमच्या 'फिलॉसॉफर' महाराजांनीं ताऱ्यांचा मनुष्यजीवनाशीं एक प्रगाढ संबंध जोडून व्याख्यान आरंभलं;-आम्ही 'मूर्खांसी हे मौनची फार साजे' या तत्त्वाप्रमाणें गप्प बसून, डोळे विस्फारून नुसते पाहत राहिलों.

आमच्या बोटीवर एक सोळा आणे जॉनबुल होता. त्याचा देह ताडवृक्षासारखा, केरसुणीसारख्या मिशा, कांट्यासारखे केंस, मडक्यासारखं तोंड, आणि माशाच्या डोळ्यांसारखे बटबटीत डोळे;-त्यांना पाहिलं कीं माझं अंग शिवशिवल्यासारखं होत असे; म्हणून मी त्यांच्यापासून पांच हात दूर सरकत असे. कांहीं कांहीं व्यक्तींनीं कांहीं अपराध केलेला

नसतांना, त्यांचा चेहरा मात्र अपराध करत असतो; जसा कांहीं. रोज सकाळीं उठल्याबरोबर ते गृहस्थ त्यांना येत असलेल्या इंग्रजी, फ्रेंच, हिंदुस्थानी, अशा सर्व भाषांत अजस्र शिवीगाळ करत जिकडे तिकडे आरडाओरड, आदळ आपट करत फिरत असलेले ऐकूं येई. त्यांना कधीं हंसतांना मी पाहिलं नाहीं; कोणाशीं बोलत नसत, संवरत नसत, आपले आपल्या कॅबिनमधें घुम्यासारखे बसून राहत. कधीं कधीं डेकवर हवा खायला यायचे ते. फिरतां फिरतां एखाद्यावर कृपाकटाक्षाची नजर पोंचलीच, तर त्या व्यक्तीला ते अगदीं एखाद्या मुंगीसारखा समजत असत.

रोज जेवायच्या वेळीं माझ्या अगदीं शेजारींच B– बसत असत. ते युरेशिअन आहेत. परंतु, इंग्रजाप्रमाणं शीळ घालायला आणि खिशांत हात घालून, दोन्ही पाय बाजूला करून उभं राहायला छान शिकले आहेत. माझ्यावर त्यांची मर्जी होती. एक दिवस माझ्याजवळ येऊन ते गंभीर आवाजांत म्हणाले, "यंग मॅन, तूं ऑक्सफर्डला चालला आहेस कीं काय? ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी फार चांगलं शिक्षणकेंद्र आहे." एक दिवस मी ट्रेंच साहेबांचं Proverbs and their lessons हें पुस्तक वाचत होतों, तेव्हां B–आले आणि माझ्या हातांतलं पुस्तक घेऊन शीळ घालत घालत, दोन-चार पानं उलटून पालटून म्हणाले, "पुस्तक खरंच चांगलं आहे!"

एडनहून सुएझला जायला पांच एक दिवस लागले. जे ब्रिंदिसिमार्गानं इंग्लंडला जातात, त्यांना जहाजांतून उतरून सुएझच्या आगगाडीनं आलेक्झांड्रियाला जावं लागतं; आलेक्झांड्रिया बंदरावर त्यांच्यासाठीं एक आगबोट उभी असते– त्या बोटीनं भूमध्यसागर पार होऊन इटलीला पोहोंचावं लागतं. आम्ही 'Overland' (जमिनीवरील), खुष्कीच्या मार्गानं प्रवास करणारे प्रवासी; म्हणून, आम्हांला सुएझला उतरावं लागलं.

## सुएझ

आम्ही तिघं बंगाली आणि एक इंग्रज अशा चौघांनीं एक भाड्याची नाव केली. मनुष्याची Divine (देवासारखी) मुद्रा कशी आणि किती जनावरासारखी होऊं शकते, तें त्या नावेच्या तांडेलाला पाहिलं असतंस, तर तुझ्या लक्षांत आलं असतं. रंग काळाकुट्ट, डोळे वाघासारखे, कपाळपट्टी बारीक, जाड जाड ओठ, सारं मिळून एकंदर चेहऱ्याचा भाव भयंकर दिसायचा. बाकीच्या नावाड्यांशीं भाड्यांत जमलं नाहीं; तो जरा कमी दरांत घेऊन जायला तयार झाला. ब-महाशय त्या नावेंत चढायलाच तयार नव्हते; ते म्हणाले, 'आरब लोकांवर विश्वास ठेवूं नये,–ते खुशाल दुसऱ्याच्या गळ्यावर सुरी फिरवूं शकतात.' सुएझमधल्या कांहीं अराजकतेच्या भयानक गोष्टीहि त्यांनीं सांगितल्या. परंतु, कांहीं कां असेना, आम्ही त्या नावेंत चढलों. तिथल्या तांडेलांना मोडकं तोडकं इंग्रजी बोलतां येतं आणि समजतं पण थोडं थोडं. कांहीं दूरवर आम्ही विनतक्रार पोहोंचलों. आमच्या इंग्रज मित्राला सुएझच्या पोस्ट ऑफिसशीं उतरायचं होतं. पोस्ट ऑफिस खूप लांब होतं आणि पोंचायला बराच उशीर लागेल म्हणून नावाडी जरा कुर-कुरला; पण लवकरच त्याची कुरकुर थांबली. त्यानंतर, आणखी थोडं अंतर कापल्यावर त्यानंच विचारलं, "पोस्ट ऑफिसला जायचंय काय? दोन-एक तासांत तिथं जातां येणं अशक्य आहे."– आमचे तापट स्वभावाचे साहेब चिडले आणि खेंकसले "Your grandmother! (तुझी आजी)!" झालं; आमचा नावाडी संतापला, "What? Mother? Mother? What mother? Don't say mother. (काय? आई? आई? आई काय? आईचं नांव काढाल तर खबरदार)." आम्हांला वाटलं, तो साहेबाला उचलून पाण्यांत फेकून देणार! पुनः त्यानं विचारलं, "What did say? (काय म्हणालास)." साहेबानं आपला हेका सोडला नाहीं. तो म्हणाला, "Your grandmother." अरे बापरे!! नावाडी नुसता अंगावर धावून गेला. एकंदर रागरंग पाहून साहेब-

मजकूर नरम आले आणि म्हणाले, " You don't seem to understand what I say ! ( माझं बोलणं तुला समजत नाहींसं दिसतं ). " असं म्हणून, " Grandmother " म्हणणं म्हणजे शिवी नव्हे, हें त्या नावाड्याला ते पटवून देऊं लागले. तेव्हां इंग्रजी भाषा सोडून देऊन तो नावाडी एकदम ओरडला, " बस्–चूप. " साहेब गोंधळून खरंच चूपचाप झाले; त्यांना अधिक बोलायची स्फूर्ति झाली नाहीं. आणखी कांहीं लांबवर गेल्यावर साहेबांनीं विचारलं, " आणखी किती लांब आहे ? " नावाडी भडकून म्हणाला, " Two shillings give, ask what distance ? ( दोन शिलिंग देतां आणि वर किती लांब आहे म्हणून विचारतां ? ) " त्यावरून आम्ही समजून चुकलों कीं, दोन शिलिंग भाडें देणाऱ्यांना तसले प्रश्न विचारण्याचा हक्क सुएझ राज्याच्या कायद्यांत नाहीं ! नावाडी आम्हांला असा धमकावीत होता, तेव्हां बाकीच्या नावाड्यांना मोठी मौज वाटत होती; ते एकमेकांकडे पाहून गालांतल्या गालांत हंसूं लागले. नावाड्याची भयंकर मिजास बिघडलेली पाहून त्यांना हंसूं आवरणं कठीण झालं होतं. इकडे नावाडी धमकावीत होता अन् तिकडे ते बाकीचे हंसत होते; नावाड्यावर सूड उगवण्याला कांहीं उपाय दिसेना, तेव्हां आम्ही तिघंहि हंसूं लागून त्यांच्यांत सामील झालों;–पुष्कळ वेळां निरुपाय होऊन अशी सुबुद्धि वापरावी लागते. आपला मान राखून घेऊन, कसेबसे सुएझ शहरीं तरी पोंचलों. सुएझ शहराबद्दल कांहीं बोलण्याचा मला अधिकार नाहीं. कारण, अर्ध्या मैलापेक्षां जास्त कांहीं मी तिथलं पाहिलंच नाहीं. शहराच्या चारी बाजूंनीं एकदां प्रदक्षिणा घालण्याची इच्छा होती; परंतु, माझ्या सहप्रवाशांपैकीं ज्यांनीं पूर्वी सुएझ पाहिलं होतं ते म्हणाले, " या यातायातींतून थकवा आणि कंटाळा येणं याहून फारसं अधिक कांहीं पदरांत पडायचं नाहीं." तरीहि मी निरुत्साही झालों नव्हतों. परंतु, जेव्हां ऐकलं कीं, **त्या शहरांत गाढवावरून फिरण्याखेरीज फेरफटका करायला दुसरं साधन नाहीं**, तेव्हां शहर पाहण्यासाठीं फिरण्याबद्दलची माझी ओढ जरा कमी झाली. नंतर ऐकलं कीं, त्या देशांतील गाढवांचं आणि त्यांच्या

स्वारांचं सहसा एकमत होत नाहीं; गाढवांनाहि व्यक्तिस्वातंत्र्य आहे, स्वतंत्र इच्छा आहे; त्यामुळं, गाढव आणि त्यावर बसलेली व्यक्ति यांच्या इच्छेंत वरचेवर विरोध उत्पन्न होतो आणि परिणामीं गाढवाची इच्छा विजयी होते. सुएझला एक प्रकारचा डोळ्यांचा भयंकर विकार आहे;–रस्त्यावर तसल्या विकारी डोळ्यांचे शेंकडों शेंकडों लोक दिसतात. तिथल्या माशा तो रोग चहूंकडे पसरवतात. रोगी डोळ्यांवरून त्या रोगाचं बीं घेऊन त्या निरोगी डोळ्यांवर बसतात आणि त्या रोगाचा फैलाव होतो. सुएझला आम्ही आगगाडींत बसलों. त्या आगगाडीला बऱ्याच खोडी आहेत. एकतर, झोंपण्याची कांहीं सोय नाहीं, कारण, बसायच्या जागेचे वेगवेगळे भाग पाडलेले आहेत–( सलग बाक नाहीं );–आणि दुसरी खोड म्हणजे, अशी गजगामिनी गाडी दुसरीकडे पाहायला मिळत नाहीं. सारी रात्र गाडी चाललेली होती आणि सकाळीं उठून पाहतो तों धुळीनं आमची फक्त कबर बांधली गेली नव्हती! बाकी सगळं झालं होतं. केसांना हात लावून पाहिलं, त्यांवर धुळीचे इतके थर बसले होते कीं, त्यावर खुशाल भात पेरायला हरकत नव्हती. तशा धुळीनं माखलेल्या वैराग्याच्या अवतारानं आम्ही आलेक्झांड्रिआला पोंचलों.

## आलेक्झांड्रिआ

आगगाडीच्या रुळाच्या दुतर्फा हिरवींगार शेतं, ठिकठिकाणीं खजुराच्या झाडांना खजुराचे घोंस लटकलेले; रानाच्या मधें मधें कुंडं; अधून मधून एखाददुसरं बैठं घर;–घरं चौकोनी, त्यांना खांब नाहींत, गॅलरी नाहीं– सगळंच्या सगळं भिंतीसारखं, अन् त्या भिंतींत मधून मधून एखाददुसरी खिडकी. या सर्व कारणांनीं त्या घरांना जशी कांहीं कळाच नव्हती. कांहीं असो, पण मला पूर्वीं वाटत असे कीं, आफ्रिका म्हणजे नखशिखान्त नापीक वाळवंट असेल; पण वस्तुस्थिति मात्र तशी कांहीं भासली नाहीं. उलट, सकाळच्या

वेळीं भोंवतालच्या त्या हिरण्यागार खजुराच्या बनावरची शोभा मला छानदार वाटली.

आलेक्झांड्रिआ बंदरावर आमच्यासाठीं 'मंगोलिआ' जहाज उभं होतं. आतां आम्ही भूमध्यसागरांत प्रवेश केला. मला जरा जरा थंडी वाजूं लागली. आगबोटीवर चढल्यानंतर आधीं एकदां चांगली आंघोळ केली. माझ्या तर हाडांपर्यंत धूळ पोंचली होती जशी कांहीं. स्नान झाल्यानंतर आलेक्झांड्रिआ शहर पाहायला गेलों. जहाजावरून तीरापर्यंत जाण्यासाठीं एक भाड्याची होडी ठरवली. तिथला एक एक नावाडी म्हणजे जसा कांहीं सर विल्यम जोन्सची दुसरी आवृत्ति होती म्हटलं तरी चालेल. त्यांना ग्रीक, इटालियन, फ्रेंच, इंग्रजी, इत्यादि भाषा कामचलाऊ येत होत्या. फ्रेंच भाषाच तिथली सर्वसाधारण भाषा, असं ऐकलं. रस्त्याचीं नांवं, दुकानांच्या पाट्या बहुतेक फ्रेंच भाषेंतच दिसल्या. आलेक्झांड्रिआ शहर सुसमृद्ध वाटलं. तिथं किती जातीचे लोक आणि किती प्रकारच्या लोकांचीं दुकानं, बाजारपेठा आहेत त्याचा पत्ता नाहीं. रस्ते दगडी असल्यामुळं अगदीं स्वच्छ राहतात; पण गाड्यांचे आवाज जरा जास्त होतात. खूप मोठमोठ्या इमारती, मोठालीं दुकानं; शहर कसं गजबजलेलं आहे. आलेक्झांड्रिआचं बंदरहि खूप मोठं आहे. खूप जहाजं तिथं नांगरण्यांत येतात. युरोपिअन, मुसलमान, सर्वांच्या आगबोटी त्या बंदरावर आहेत, फक्त हिंदूंच्याच तेवढ्या नाहींत!

## इटली

चार पांच दिवसांत इटलीला जाऊन पोहोंचलों. तेव्हां रात्रीचा एक किंवा दोन वाजले असतील. ऊबदार बिछाना सोडून, सामानसुमान घेऊन आम्ही डेकवर गेलों. चांदणी रात्र अन् खूप थंडी होती. मी अंगांत तसं विशेष कांहीं गरम घातलं नव्हतं, त्यामुळं फार थंडी वाजायला लागली. आमच्यासमोर शहर दिसत होतं; तिथं निःशब्द शांतता नांदत होती; घरांच्या खिडक्या,

दारं सगळीं बंद होतीं– सारं शहर झोंपलेलं होतं. आमच्या प्रवासी मंडळींत एक गलबला सुरू झाला. कोणी म्हणत होते, 'गाडी मिळेल,' कोणी म्हणत होते, 'मिळणार नाहीं.' सामानसुमान घेऊन काय करावं कांहीं सुचेनासं झालं होतं; बोटीवर थांबायचं कीं, बाहेर पडायचं, कांहींच नक्की ठरेना. एक इटालियन अधिकारी आला आणि त्यानं आमची मोजणी करायला सुरुवात केली– पण, कां तो मोजीत होता, तें मात्र कळेना. बोटीवर अशी वदंता ऐकूं येऊं लागली कीं, त्या मोजणीचा आणि आम्हांला गाडींत जागा मिळण्याचा कांहींतरी संबंध होता. पण, त्या रात्रीं मुळांतच गाडी मिळाली नाहीं. समजलं कीं, दुसरे दिवशीं तीनच्या आंत गाडी मिळणार नव्हती. प्रवासी भयंकर चिडले. शेवटीं, त्या रात्रीं ब्रिंदिसीच्या होटेलमधें मुक्काम करावा लागला.

हा मी पहिल्यांदां युरोपच्या भूमीवर पाय ठेवला. कोणत्याहि नवीन ठिकाणीं जाण्यापूर्वीं मी त्या ठिकाणच्या नवीनपणाचं असं कांहीं चित्र मनांत रंगवून ठेवलेलं असतं, कीं प्रत्यक्ष तिथं गेल्यानंतर मला फारसं कांहीं नवं वाटतच नाहीं. युरोप मला तितकासा नवीन वाटला नाहीं, हें ऐकून सर्वांना आश्चर्य वाटलं!

आम्ही रात्रीं तीनच्या सुमाराला ब्रिंदिसीच्या होटेलमधें जाऊन झोंपून टाकलं. सकाळीं एक अर्धमेला घोडा जुंपलेल्या अर्धवट मोडक्या गाडींत बसून शहर पाहायला बाहेर पडलों. गाडीवान आणि–गाडी-घोडा यांच्यांत असं कांहीं वैषम्य होतं, कीं काय सांगूं? आमच्या सारथीचं वय असेल चौदा; आणि घोड्याचं वय असावं पन्नास– आणि गाडी तर पौराणिक युगांतलीच वाटत होती! एखादं छोटंसं शहर जसं असावं, तसं आहे ब्रिंदिसी. कांहीं बैठीघरं, दुकान-बाजार, रस्ते-बिस्ते, सगळं ठाकठीक आहे. भिकारी भिक्षा मागत फिरत असतात, दोघे चौघे दारूच्या दुकानांत गप्पा मारत बसलेले असतात, चारचौघे रस्त्याच्या कोंपऱ्यावर हास्यविनोद करत उभे असलेले दिसतात; लोक आपले निश्चितपणें, गजेंद्रगतीनं चाल-लेले दिसतात; जणुं कांहीं कोणाला कांहीं कामधंदा नाहीं, कोणाला

कशाची काळजी नाहीं— साऱ्या शहराला आपली सुट्टी! रस्त्यावर गाडी-घोड्यांची गर्दी नाहीं, लोकांची गर्दी नाहीं. आम्ही जरा दूर गेलों, तेवढ्यांत हातांत टरबूज घेतलेल्या एका छोकऱ्यानं आमची गाडी थांबवली आणि तो गाडीवानाशेजारीं जाऊन बसला. ब– महाशय म्हणाले, "विना-सायास या गृहस्थाचा कांहीं रोजगार मिळवायचा बेत दिसतो आहे." तो आला आणि मधून मधून हात लांब करून, "तें चर्च, ती बाग, तें मैदान", अशी आम्हांला माहिती पुरवूं लागला. त्याच्या माहितीनं आमच्या ज्ञानांत कांहीं भर पडली नाहीं, आणि तिच्या अभावीं कांहीं कमतरताहि झाली नसती. त्याला कोणी आमच्या गाडीवर चढायलाहि सांगितलं नव्हतं, कीं कोणी त्याला कांहीं माहिती विचारीतहि नव्हतं; तरीपण, त्याच्या त्या अनपेक्षित अनुग्रहाच्या मोबदल्या-दाखल त्याची इच्छा पूर्ण करावी लागली. ते आम्हांला एका फळबागेंत घेऊन गेले. तिथं किती प्रकारच्या फळांचीं झाडं होतीं, त्यांची गणती नव्हती. जिकडं तिकडं द्राक्षांचे घोंस लोंबत होते; दोन तऱ्हेचीं द्राक्षं होतीं— काळीं आणि पांढरीं; त्यांतलीं काळींच मला जास्त गोड लागलीं. मोठमोठ्या झाडांना सफरचंद, पीच, वगैरे नाना प्रकारचीं फळं लागलेलीं होतीं. एक म्हातारी ( बहुतेक ती राखणदारीण असावी ) बरीं-चशीं फळंफुलं घेऊन हजर झाली. आम्ही तिकडं लक्षच दिलं नाहीं. पण तिला फळं विकायची खुबी चांगलीच माहीत होती. आम्ही इकडे तिकडे फिरत होतों, तेवढ्यांत एक सुंदर मुलगी कांहीं फळं आणि फुलांचे गुच्छ घेऊन आमच्या समोर हजर झाली; मग मात्र नाहीं होय म्हणा-यची सोय राहिली नाहीं.

इटलीच्या स्त्रिया दिसायला मोठ्या सुंदर. आपल्याकडच्या स्त्रियांशीं त्यांचं बरंच साम्य आहे. सुंदर रंग, काळे काळे केंस, काळ्या भुंवया, काळे डोळे, आणि चेहऱ्याची घडण मोठी सुरेख!

तीनच्या गाडीनं ब्रिंदिसीहून निघालों. आगगाडीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना द्राक्षाचे मळे होते. पर्वत, नदी, तळीं, झोंपड्या, धान्याचीं शेतं, लहान लहान खेडीं, इत्यादि जें जें कांहीं कवींच्या स्वप्नाची संपत्ति

समजलं गेलेलं आहे, तें चोहींकडं शोभिवंत दिसत होतं. वृक्षलतांमधून दूर एखादं नगर, त्याचं प्रासादशिखर, तिथल्या चर्चचं शिखर, चित्रासारखीं तिथलीं घरं हळू हळू दिसूं लागलीं, कीं मोठं मनोहर वाटायचं. संध्याकाळच्या सुमाराला एका डोंगराच्या पायथ्याशीं एक अतिशय सुंदर तळं पाहिलं होतं, तें मी कधींहि विसरणं शक्य नाहीं; त्याच्या भोंवतालीं झाडंझुडपं, लतावल्लरी होत्या आणि त्यांची सांवली संध्या-प्रकाशांत तळ्याच्या पाण्यावर पडली होती; इतकं सुंदर दिसत होतं, कीं मला कांहीं त्याचं वर्णन करतां येणं शक्य नाहीं.

आगगाडीनं जात असतांना आम्हांला Mont cenis चा प्रख्यात बोगदा लागला. डोंगराच्या एका बाजूनं फ्रेंचांनीं आणि दुसऱ्या बाजूनं इटालियन लोकांनीं खोदायला सुरुवात केली होती. कांहीं वर्षं खोदतां खोदतां दोन्ही बाजूंनीं दोन्ही गट मधोमध पोंचले आणि आमोरासमोर भेटले. त्या बोगद्यांतून बाहेर पडायला आम्हांला बरोबर अर्धा तास लागला. अंधारांत जीव वर वर यायला लागला. त्या आगगाडींत रात्रंदिवस दिवे लावलेलेच असतात. कारण, कांहीं कांहीं ठिकाणीं, पांच पांच मिनिटांनीं गाडी बोगद्यांतून जाते— त्यामुळं दिवसाचा प्रकाश फारच थोडा वेळ मिळतो. इटलीपासून फ्रान्सपर्यंतच्या सबंध प्रवासांत निर्झर, नदी, पर्वत, खेडीं, तळीं पाहात पाहात गेल्यामुळं प्रवासाचा शीण आम्हांला जाणवला नाहीं.

## पॅरिस

सकाळीं पॅरिसला पोंचलों. काय गजबजलेलं आणि भव्य शहर आहे! गगनभेदी इमारतींचं अरण्य पाहून थक्क व्हायला होतं. पॅरिसमधें गोरगरीब नसतीलच असं वाटतं. या साडेतीन हात माणसांसाठीं येवढ्या अवाढव्य, सुसज्ज इमल्यांची जरूरी काय, असंहि मनांत आलं. होटेलमधें गेलों; तिथला अफाट प्रकार पाहून, कसं चुकल्याचुकल्यासारखं, अस्वस्थ वाटायला लागलं—जरूरीपेक्षां

मोठे अन् सैल कपडे घातले म्हणजे जसं चुकल्याचुकल्यासारखं होतं, तसंच. स्मारकस्तंभ, झरे, बागबगीचे, मोठाले इमले, दगडीरस्ते, गाड्या-घोडे, माणसांची गर्दी, इत्यादि पाहून आश्चर्यचकित होतं माणूस. पॅरिसला पोंचल्याबरोबर आम्ही एका 'टर्किश-बाथ' मधें गेलों. पहिल्याप्रथम एका खूप उबदार खोलींत जाऊन बसलों. तिथं बराच वेळ बसल्यावर कोणाकोणाला घाम यायला लागला. मला घाम आला नाहीं, तेव्हां मला दुसऱ्या एका आणखी गरम खोलींत नेण्यांत आलं; ती दुसरी खोली नुसती आगीसारखी होती. तिथं डोळे उघडे ठेवून बसवत नाहीं, आग व्हायला लागते. कांहीं मिनिटांहून जास्त वेळ मला तिथं बसवलं नाहीं. तिथून बाहेर पडल्यावर अंगाला सडकून घाम यायला लागला. नंतर आणखी एके ठिकाणीं नेऊन मला आडवा घातला. एक भीमकाय व्यक्ति आली आणि माझं सारं अंग रगडूं लागली. तो उघडा होता. तसं मांसल, घोटीव शरीर मी कधीं पाहिलं नव्हतं; 'व्यूढोरस्को वृषस्कंधः शालप्रांशुर्महाभुजः' हें वर्णन त्याला लागूं झालं असतं. माझ्यासारखा बारीकसा डांस चेंगरायला येवढ्या मोठ्या अगडबंब तोफेची मुळींच जरूरी नव्हती, असं माझ्या मनांत आलं. तो मला म्हणाला, 'तुम्ही उंचीनं चांगले आहांत, आडव्या बाजूनं जरा वाढ झाली, तर एक 'पुरुषोत्तम' व्हाल.' चांगलं अर्धा तास त्यानं माझं सारं अंग अविश्रांतपणानं झकास रगडलं! जन्माला आल्यापासून देहाला लागलेली होती नव्हती ती सारी धूळ निघाली! यथास्थित रगडून झाल्यावर मला आणखी एका खोलींत नेला. तिथं गरम पाणी ओतून साबण लावून, स्पंजानं घांसून पुसून अंग स्वच्छ केलं. स्वच्छी-करण पर्व समाप्त झाल्यावर, पुनः आणखी दुसऱ्या खोलींत नेला मला. तिथं एका मोठ्या पिचकारीनं अंगावर गरम पाणी जोरांत उडवायला लागले; आणि मधेंच गरम पाणी उडवायचं बंद करून, बर्फासारखं थंडगार पाणी उडवायला लागले. याप्रमाणं, एकदां गरम पाणी, एकदां थंड पाणी, पुनः गरम पाणी, पुनः थंड पाणी, या पद्धतीनं अरतून परतून पुनः पुनः गरम-थंड पाण्याची आंघोळ उरकून, तिसऱ्याच एका

'जलयंत्रां'त गेलों. तिथं खालून, वरून, चोहों बाजूनं बाणा-प्रमाणं पाणी येऊन सर्वांगाला बोंचायला लागलं. त्या बर्फासारख्या थंड पाण्याच्या तीर-वर्षावांत कांहीं वेळ सांपडल्यानंतर माझं छातीचं रक्त गोठणारसं वाटायची पाळी आली— मला रणांगणावरून पळ काढावा लागला; धांपा टाकीत बाहेर पडलों तिथून. त्याच्यापुढं एके ठिकाणीं तळ्यासारखं कांहींतरी आहे. मला 'पोहायचं आहे का ?' असं विचारलं. मी कांहीं पोहायला पडलों नाहीं, पण माझे सहप्रवासी पोहायला पडले. त्यांना पोहतांना पाहून तिथले लोक आपसांत कुजबुजायला लागले, "पाहा, पाहा, हे लोक किती अद्भुत पोहतात, अगदीं बरोबर कुत्र्यासारखं !" इतक्या वेळानं एकदांचं स्नान संपलं. मी एकंदरीनं पाहिलं, कीं टर्किश-बाथमध्यें स्नान करणं, आणि आपलं शरीर परटाला देणं सारखंच ! त्यानंतर, साऱ्या दिवसासाठीं एक पौंड भाडं देऊन एक गाडी ठरवली. पॅरिसचं प्रदर्शन पाहायला गेलों. हं, आतां मात्र तूं खूप उत्सुकतेनं कान टवकारले असशील; वाटत असेल, कीं न जाणो मी पॅरिस-प्रदर्शनाचं काय, कसं, नि किती वर्णन करणार आहे. पण, खेदाची गोष्ट अशी आहे कीं कलकत्ता विद्यापीठांत विद्यार्जन केल्याप्रमाणं, परिस-प्रदर्शनाचं सारंच पाहून, धडपणानं कांहींच मी पाहिलं नाहीं. एका दिवसाहून जास्त आम्ही पॅरिसला राहूं शकलों नाहीं— तो अफाट प्रकार एका दिवसांत पाहण्याची करामत करणं कुणालाहि शक्य नाहीं. सारा दिवसभर आम्ही पाहत होतों, पण तसल्या पाहण्यानं पाहण्याची एक लालसा उत्पन्न झाली, पण पाहून मात्र झालं नाहीं. तें एक शहरच आहे म्हणेनास. महिनाभर राहिलों असतों, तर त्याचं वर्णन करण्याचा अवघड प्रयत्न करूं शकेन, अशी आशा उत्पन्न झाली असती. पॅरिसचं प्रदर्शन ठोकळ मानानं, गोळा बेरजेनं कांहींसं ध्यानांत आहे, पण ओळीनं नाहीं. येवढं आठवतं आहे, कीं चित्रशाळेंत जाऊन असंख्य असंख्य उत्तमोत्तम चित्रं पाहिलीं, शिल्पशाळेंत अगणित दगडी पुतळे पाहिले, देशोदेशींच्या नानाविध वस्तु पाहिल्या, पण विशेष कांहींच आठवत नाहीं. पॅरिसहून लंडनला आलों. असली उदास, अंधारनगरी पूर्वी कधीं

मी पाहिली नव्हती !– धूर, ढग, पाऊस, धुकं, चिखल, आणि लोकांची घाईगर्दी. मी दोन एक तास लंडनमध्यें होतों; जेव्हां लंडन सोडलं, तेव्हां ‘ हुश्श ’ झालं मला. माझी मित्र-मंडळी मला म्हणाली, “लंडनवर प्रथम-दर्शनीं प्रेम बसत नाहीं; कांहीं दिवस राहून चांगली ओळख पटली, म्हणजे मग लंडनचा गोडवा कळतो ! ”

# हाऊस ऑफ कॉमन्स

**पत्र ४ थें** ( इंग्लंडची लोकसभा )

**आम्ही** त्या दिवशीं हाउस ऑफ कॉमन्सला गेलों होतों. पार्लमेंटचं गगनभेदी शिखर, अवाढव्य इमारत, आ वांसल्यासारखे दिवाणखाने पाहून थक्क व्हायला होतं. एका मोठ्या दिवाणखान्यांत लोकसभा भरते; दिवाणखान्याच्या चारी बाजूंना गॅलरी आहे; त्याच्या एका बाजूला प्रेक्षकवर्ग आणि दुसऱ्या बाजूला वर्तमानपत्राचे बातमीदार बसतात. गॅलरी पुष्कळशी प्रेक्षागृहाच्या ड्रेस-सर्कलसारखी आहे. गॅलरीखालीं, स्टॉलवर सभासद मंडळी बसतात. त्यांच्यासाठीं समोर फक्त दहा बाकं आहेत. एका बाजूच्या पांच बांकांवर सरकारपक्षाचे लोक बसतात, आणि दुसऱ्या बाजूच्या पांच बांकांवर विरोधी पक्षाचे लोक बसतात. समोरच्या व्यासपीठावर एक मोठी खुर्ची आहे. तीवर अध्यक्षासारखी एक व्यक्ति— तिला स्पीकर म्हणतात— लांब केंसांचा टोप घालून बसलेली असते. जरा कोणी गैरशिस्त वागला, किंवा कायद्याला सोडून कांहीं केलं, कीं लगेच स्पीकर उठून त्याला हरकत घेतो. वर्तमानपत्रांचे बातमीदार बसतात, त्याच्या मागच्या बाजूला शटर्स असलेल्या ( उघडझांपांचीं दारें असलेल्या खिडक्या ) गॅलरींत स्त्रियांची बसायची जागा आहे— बाहेरून त्या दिसत नाहींत. आम्ही गेलों त्या वेळीं ओडोनेल नांवाचे एक आयरिश सदस्य भारतीय संक्रमणाबद्दल व्याख्यान देत होते; प्रेसॲक्ट ( वृत्तपत्रांवरील निर्बंधांचा कायदा ) विरुद्ध आणि आणखी निरनिराळ्या विषयांसंबंधीं त्यांनीं खळबळ उडवून दिली. त्यांचा ठराव फेटाळला गेला.

सभागृहाचा रागरंग पाहून मला मोठं आश्चर्य वाटलं. एखादा सभासद बोलत असतांना बाकीचे आपले खुशाल "इया" "इया" "इया" "इया" करून ओरडत होते. आपल्या देशांत शाळकरी मुलं सुद्धां सभेंत असं ओरडत नाहींत. पुष्कळ वेळां, इकडे व्याख्यान चालू असतं आणि सभासद मंडळी सरळ डोक्यावरच्या टोप्या कपाळावर ओढून खुशाल झोंपा काढीत असतात! एकदां तर भारतासंबंधीं कोणाचं तरी भाषण चालू होतं, तेव्हां सभागृहांत नऊ किंवा दहाहून जास्त सभासद नव्हतेच. सगळे बाहेर हवा खायला, नाहींतर 'सपर'ला (रात्रींच्या जेवणाला) गेले होते; आणि मतं घेण्याची वेळ झाल्यावरोबर चहूंकडून सगळे येऊन हजर झाले. तिथलं भाषण ऐकून, किंवा युक्तिवाद ऐकून कोणाचीं मतं ठरतात, असं कांहीं वाटलं नाहीं.

गेल्या गुरुवारीं हाऊस ऑफ कॉमन्समधें भारताविषयीं खूप वाद-विवाद झाला. त्या दिवशीं ग्लॅडस्टनसाहेबांनीं ब्राइट सिव्हिल सर्व्हिस, कापूसनिर्यात कर आणि अफगाणयुद्धासंबंधींची भारताची दरखास्त दाखल केली होती. चार वाजतां पार्लमेंट उघडलं. आम्ही कांहीं बंगाली चार वाजायच्या आधींच तिथं हजर झालों होतों. तेव्हां सभागृह उघडलं नव्हतं. बरेच प्रेक्षक एका मोठ्या हॉलमधें उभे होते. तिथं चारी बाजूंना बर्क, फॉक्स, चॅथम, वॉलपोल, इत्यादि राजकारणी थोर पुरुषांचे दगडी पुतळे होते. प्रत्येक दारापाशीं, पांढऱ्या केंसांचे टोप घातलेले पहारेकरी उभे होते. अंगावर गाऊन (झगे) चढवलेले पार्लमेंटचे अधिकारी हातांत एक-दोन वह्या कागद घेऊन इकडून तिकडे ये-जा करीत होते. चार वाजतां सभागृह उघडलं. आमच्यापाशीं स्पीकर्स गॅलरीचीं तिकिटं होतीं. हाऊस ऑफ कॉमन्समधें पांच वर्गांच्या गॅलरी आहेत. स्ट्रेंजर्स गॅलरी (विदेशी लोकांची गॅलरी), स्पीकर्स गॅलरी (सभापतींची गॅलरी), डिप्लोमॅटिक गॅलरी (परराष्ट्रीय वकिलातींची गॅलरी), वार्ताहरांची गॅलरी आणि स्त्रियांची. कोणत्याहि सदस्यांकडून विदेशी लोकांच्या गॅलरीचं तिकिट मिळूं शकतं; आणि वक्त्याची कृपा असेल, तरच स्पीकर्स गॅलरीचं तिकिट मिळतं. डिप्लोमॅटिक गॅलरी हा काय प्रकार आहे, तें मला कांहीं

नीटसं सांगतां येणार नाहीं. कारण मी जेव्हां जेव्हां गेलों, त्या त्या वेळीं त्या गॅलरींत एकदोनच माणसं दिसलीं. स्ट्रेंजर्स गॅलरींतून नीटसं दिसत नाहीं, आणि ऐकूंहि चांगलं येत नाहीं; त्याच्या पुढं स्पीकर्स गॅलरी आणि त्याच्यापुढं डिप्लोमॅटिक गॅलरी आहे. आम्ही तरी जाऊन बसलों. डोक्यावर टोप घातलेले सभापति महाशय गरुडपक्षाच्या ऐटीनं सिंहासनावर आरूढ झाले. बाकीचे सभासद स्थानापन्न झाले. सभेचं कामकाज सुरू झालं. त्यांत पहिल्याप्रथम प्रश्नोत्तरांचं काम असतं. पूर्वीच्या अधिवेशनांत सदस्यांनीं 'पुढील खेपेला मी अमुक अमुक प्रश्न विचारणार आहे, त्याचं उत्तर हवं,' असं सांगून ठेवलेलं असतं. त्या दिवशीं ओडोनेल नांवाच्या एका आयरिश सभासदानं विचारलं, "झुलु लोकांवर इंग्रज सैनिकांनीं केलेल्या अत्याचारांची जी बातमी 'एको' आणि आणखी एक-दोन वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली आहे, त्याबद्दल सरकारला कांहीं माहिती आहे का? आणि ते सारे अत्याचार ख्रिस्ती धर्मीयांना न शोभणारे आहेत कीं नाहींत?" लगेच सरकारपक्षातर्फे सर मायकेल हिक्सविच उठले आणि त्यांनीं ओडोनेलला खणखणीत उत्तर सुनावलं. लगेच सभागृहांतले सगळे आयरिश सभासद एकामागून एक उठून तितक्यांच खणखणीत प्रत्युत्तरं ऐकवूं लागले. याप्रमाणं बराच वेळ दोन्ही पक्ष भांडले आणि मग शांत बसले. उत्तर-प्रत्युत्तरांची भानगड संपून जेव्हां भाषणांची वेळ आली, तेव्हां सभागृहांतून बहुतेक सभासद उठून चालूं लागले. एक दोन व्याख्यानं झाल्यावर ब्राइट उठले आणि त्यांनीं सिव्हिल सर्व्हिसच्या ढीगभर दरखास्ती सभागृहापुढं सादर केल्या. वृद्ध ब्राइट साहेबांना पाहिल्यावर मनांत एक प्रकारची भक्ति उत्पन्न होते. त्यांच्या मुद्रेवर औदार्य, प्रेम आणि ममता माखलेली आहे जशी कांहीं. आमच्या दुर्दैवानं ब्राइट त्या दिवशीं कांहीं बोलले नाहींत. सभागृहांत फारच थोडे सदस्य शिल्लक राहिले होते, आणि त्यांच्यापैकीं बहुतेक झोंपेची आराधना करीत होते; तेवढ्यांत ग्लॅडस्टन उठले. ग्लॅडस्टन उठून उभे राहिल्याबरोबर सारं सभागृह स्तब्ध झालं. ग्लॅडस्टनचा आवाज ऐकूं यायला लागल्याबरोबर बाहेरून एकामागून एक सभासद

आंत आले आणि दोन्हीकडचीं बाकं भरलीं. तेव्हां एखाद्या संपूर्ण झऱ्या-प्रमाणं ग्लॅडस्टनच्या वक्तृत्वाचा ओघ सुरू झाला. आरडाओरड, गर्जना असला कांहींएक प्रकार नव्हता. तरीपण, सभागृहांत बसलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांचा प्रत्येक शब्द ऐकूं येत होता. त्यांच्या बोलण्यांत एक प्रकारच्या आत्मविश्वासाचं वजन आहे; त्यामुळं, त्यांचा प्रत्येक शब्द ऐकणाऱ्याच्या अंतःकरणावर ठसला जाऊन त्याच्या मनांत एक विश्वास उत्पन्न करीत असतो. एक एक शब्द उच्चारतांना ते मुठी वळून, अगदीं वांकून वांकून बोलत असतात. जसा कांहीं प्रत्येक शब्द ते अगदीं पिळून पिळून बाहेर काढताहेत असं वाटतं; आणि त्याप्रमाणं जोर देऊन उच्चारलेला त्यांचा प्रत्येक शब्द जसा कांहीं ऐकणाऱ्यांच्या मनाचीं दारं-खिडक्या मोडून तोडून आंत प्रवेश करीत असतो ! ग्लॅडस्टन जरी अस्खलित बोलत असले, तरी त्यांचा प्रत्येक शब्द जोखून उच्चार-लेला असतो. कोणतंहि म्हणणं असमाधानकारक आणि अपुरं असत नाहीं. त्यांचं भाषण अथपासून इतिपर्यंत एक साच्याचं मात्र नसतं. कारण, तशा साचेबंद भाषणाचा ऐकणाऱ्यांना फार कंटाळा येतो. आवश्यक वाटेल, त्या शब्दावरच ते जोर देतात; त्यांचं बोलणं ओजस्वी असतं, पण उगीच मोठा आवाज काढत नाहींत ते. संपूर्ण आत्मविश्वा-सानं ते बोलत आहेतसं सारखं वाटत असतं.

ग्लॅडस्टन साहेबांचं बोलणं संपलं अन् सारं सभागृह मोकळं झालं. दोहों बाजूंच्या बाकांवर सहासात काय ती मंडळी शिल्लक राहिली. ग्लॅडस्टननंतर जेव्हां स्मॉलेट बोलायला उठले, तेव्हां त्या बाकांवर कोणी नव्हतंच म्हटलं तरी चालेल. परंतु, स्मॉलेट म्हणजे कांहीं अशी तशी, दमणारी व्यक्ति नव्हती. जवळ जवळ मोकळ्या सभागृहापुढं त्यांनीं चांगलं लांबलचक व्याख्यान झोडलं. त्या अवधींत मीहि झकास झोप काढली. जे चार दोन तुरळक सभासद सभागृहांत होते, ते एक-मेकांशीं गप्पा मारीत होते, आणि कोणी कोणी कपाळावर, डोळ्यांपुढं टोपी ओढून घेऊन, डिझरॅलीनंतर मुख्य मंत्री होण्याचीं स्वप्नं पाहात होते !

सभागृहांत आयरिश सदस्यांची भारी पंचाईत होते. ते बोलायला उठले, कीं सगळीकडे गोंगाट सुरू होतो. सभासदवर्ग "इया" "इया" करून ओरडायला आरंभ करतो. चेष्टेखोर 'इया' 'इया' च्या आवाजांत वक्तृत्वाचा आवाज बुडून जातो. भाषणाला असे अडथळे झाले, कीं वक्ता बेभान होतो, चिडतो आणि तो जास्त जास्त चिडला, कीं बाकीचे सभासद जास्तच हंसतात त्याला. असला त्रास सोसावा लागल्यामुळं आयरिश सभासदांनीं आतांशा सूड उगवायला सुरुवात केली आहे. प्रत्येक विषयाला विरोध करायचा आणि प्रत्येक ठरावावर एकामागून एकानं उठून, लांबलचक भाषणं करून सभाहागृला 'दे माय धरणी ठाय' करून सोडायचं, असला प्रकार त्यांनीं सुरू केला आहे !

# जावा प्रवासांतील पत्रें

## पत्र ७ वें[1]; ( सुरुवातीचा अर्धा भाग )

## विचित्र पुराणें

कल्याणीय राणीस,

गियानयारच्या राजवाड्यांत आलों आहे. दोन प्रहरच्या जेवणापूर्वी सुनीतींनीं[2] राजवाड्यांतल्या ब्राह्मण पुरोहितां-बरोबर मजलिस चांगलीच जमविली होती. जेवणाच्या वेळीं राजेसाहेबांनीं मला थोडं संस्कृत पाठांतर म्हणून दाखवायला सांगितलं. दोन चार प्रकारचे श्लोक म्हणून दाखविले. सुनीतींनीं एका श्लोकासंबंधीं माहिती सांगायला सुरुवात करून 'शार्दूलविक्रीडित' असं म्हणतांक्षणींच राजे-साहेबांनीं तो शब्द लगेच उच्चारला आणि शार्दूलविक्रीडित आपल्याला माहीत असल्याचं सांगितलं. येथील राजाच्या तोंडीं येवढा मोठा एक अवघड संस्कृत शब्द ऐकून मी आश्चर्यचकित झालों. त्यानंतर, राजे-साहेबांनीं शिखरिणी, स्रग्धरा, मालिनी, वसंततिलका आणि आणखी कांहीं अलंकारांचीं नांवं घेतलीं. हे भाषालंकार आजवर आपल्या ( बंगाली ) अलंकारशास्त्रांत कुठं आढळले नव्हते. हीं वृत्तं आणि छंद त्यांच्या भाषेंत प्रचलित असल्याचं त्यांनीं सांगितलं. तरीपण, 'मंदाक्रांता' आणि 'अनुष्टुभ्' मात्र या मंडळींना माहीत नाहींत.

---

[1] हें पत्र गुरुदेवांनीं श्रीमति निर्मलकुमारी महालानवीश यांना लिहिलें होतें. २. श्रीयुत सुनीतिकुमार चट्टोपाध्याय.

भारतीय विद्याभ्यासाचं येथील मोडकंतोडकं स्वरूप पाहिलं म्हणजे एखादी प्राचीन महानगरी धरणीकंपानं उध्वस्त होऊन भुईखालीं गडप् झाली असावी, अन् नंतरच्या काळांत त्याच जागेवर इमारती उभारल्या गेल्या असाव्या, जमिनीची नांगरट अन् शेती झाली असावी, असं मनांत येतं; त्याच बरोबर, त्या जुन्या कीर्ति-संस्कृतींचे अवशेषहि ठिकठिकाणीं आढळतात. या दोहोंच्या संमिश्रणानं येथील जीवन बनलेलं आहे.

पूर्वीच्या भारताचं इथं सांप्रत जें कांहीं शिल्लकबाकी आहे, त्यावरून त्या वेळच्या भारताची बरीचशी कल्पना करतां येते. येथील हिंदुधर्म मुख्यत्वेंकरून शैव आहे. दुर्गादेवी आहे, परंतु कपालमालिनी, लोलरसना, उलंगिनी कालीमाता इथं नाहीं. कोणत्याहि देवींपुढं इथं पशुबलि देण्याची प्रथा नाहीं. पूर्वीं अश्वमेधादि यज्ञांच्या निमित्तानं पशुवध होत असे, परंतु देवीला रक्ताचा नैवेद्य दाखविण्यांत येत नसे. यावरून लक्षांत येतं कीं, त्या वेळच्या भारतांत, व्याध-शबरांच्या उपास्य देव-देवतांनीं उच्च श्रेणीच्या हिंदुदेवालयांत प्रवेश करून रक्ताभिषेकी देवपूजेचा प्रचार केला नव्हता.

त्याचप्रमाणं, रामायण-महाभारताचे जे पाठ इथं प्रचलित आहेत, त्यांत आणि आपल्याकडील पाठांत पुष्कळच फरक आहे. यांचे ते सारेच पाठ अशुद्ध आहेत, असं मात्र ठांसून म्हणतां येणार नाहीं. येथील रामायणांत सीता आणि राम बहीण-भाऊ आहेत; त्या बहिणी-भावंडांचं लग्न झालं होतं. एका वलंदेज ( डच ) पंडिताशीं माझं बोलणं झालं; त्यांच्या मतें तीच कथा प्राचीन असून, नंतरच्या काळांत ती दाबली गेली.

हें मत जर खरं मानायचं ठरविलं, तर रामायण आणि महाभारतांत पुष्कळच साम्य असल्याचं दिसतं. दोन्ही कथांच्या मुळाशीं दोन लग्नं आहेत. दोन्हीं लग्नं आर्यविवाहपद्धतीनुसार असंमत व विसंगत आहेत. बौद्ध इतिहासांत बहीणभावंडांचीं कुठं कुठं लग्नं झाल्याचं ऐकिवांत आहे. परंतु, तो प्रकार आपल्याकडे संपूर्णतया शास्त्रविरुद्ध मानला जातो. तसंच, एका स्त्रीशीं पांच भावांनीं मिळून लग्न करणंहि तितकंच चमत्कारिक आणि शास्त्रविरुद्ध आहे. दुसरं साम्य म्हणजे, दोन्ही लग्नांच्या प्रारंभीं शस्त्रपरीक्षा आहे; मात्र ती परीक्षा विवाहाच्या योग्यायोग्यतेच्या हिशोबीं निरर्थक आहे.

क्रमांक ........................ नों. दि.१.३.३........

तिसरं साम्य, दोन्ही कन्यकांनीं मानवाच्या पोटीं जन्म घेतलेला नाहीं- सीता ही पृथ्वीची कन्या, जमीन नांगरतांना सांपडलेली; तर, कृष्णा (द्रौपदी) यज्ञांत उपजलेली. दोहोंतील नायकांची राज्यच्युति आणि सपत्नीक वनवास, हें चौथं साम्य, अन् पांचवं म्हणजे दोहोंतहि शत्रूकरवीं पत्नीचा अवमान आणि त्या अवमानाचं परिमार्जन.

म्हणूनच, हे दोन्ही विवाह रूपकात्मक असल्याबद्दलचं माझं मत मीं अन्यत्र व्यक्त केलेलं आहे. रामायणांतील रूपक अगदीं स्पष्ट आहे. शेत- कऱ्यानं जमीन नांगरतांना उमटणाऱ्या रेषेला जर कांहीं रूप द्यायचं झालं, तर तिला पृथ्वीची कन्या म्हणतां येईल. शस्याबद्दल जर नवदुर्वादल- श्याम राम, अशी कल्पना केली, तर शस्य पृथ्वीचा पुत्र ठरतं. या रूपका- प्रमाणं (उपरोक्त) रेषा आणि शस्य, हीं बहीणभावंडं होतात आणि उभयतां परिणयबंधनानं एकजीव झालेलीं आहेत.

शिवधनुर्भंगांतच रामायणाचा मूळ अर्थ आहे. वस्तुतः, साराच प्रकार शिवधनुर्भंगाचा आहे. सीतेचं (पाणि) ग्रहण, संरक्षण आणि उद्धार हा त्याचा उद्देश आहे. आर्यावर्ताच्या पूर्वेपासून भारताच्या दक्षिणप्रांता- पर्यंत शेतीच्या उद्देशानं क्षात्रियांनीं जी प्रगति केली, ती सहजासहजीं झाली नाहीं; त्यानिमित्तानं घरांत अन् बाहेर फार मोठा झगडा चालू होता. त्या ऐतिहासिक झगड्याचा इतिहास रामायणांत गुंफला गेला आहे; —तो म्हणजे अरण्यजीवनाशीं शेतकीजीवनाचा संघर्ष.

महाभारताच्या खांडववनदहनांतहि या ऐतिहासिक संघर्षाचा आभास आढळतो. तो प्रकार, म्हणजे नुसता वनांतील झाडपाला भस्मसात् कर- ण्याचा नसून, त्या वेळीं वनांत आश्रय घेणाऱ्या प्रतिकूल मानवशक्तीचं उच्चाटन, हें त्याचं उद्दिष्ट होतं. त्याला फक्त अनार्यांचाच विरोध होता असं नाहीं, तर इंद्र ज्यांचा देव, त्यांचाहि विरोध होता. इंद्रानं पाऊस पाडून खांडववनाची आग विझविण्याचा यत्न केला होता.

लक्ष्यवेधांत महाभारताचा अर्थ सांपडतो. अधांतरींच्या या लक्ष्यवेधांत एक विशेषसा साधनेचा संकेत आहे. तो हा कीं, एकाग्रतेनं केलेल्या साधनेमुळं कृष्णेचा (द्रौपदीचा) लाभ होऊं शकतो; आणि ही यज्ञसंभवा

द्रौपदी, म्हणजे एक विशेष तत्त्व होतं. या तत्त्वासंबंधानं भारतांत एके काळीं भयानक द्वंद्व निर्माण झालं होतं. एका समुदायानं तें तत्त्व मान्य केलं होतं, तर दुसऱ्या समुदायाला अमान्य होतं. पांच पांडवांनीं द्रौपदीचा स्वीकार केला होता, तर कौरवांनीं तिचा अपमान करायला कमी केलं नाहीं. या युद्धांत कौरवांचे सेनापति होते ब्राह्मण, द्रोणाचार्य; आणि पांडववीर अर्जुनाचे सारथि होते श्रीकृष्ण. रामानं विश्वामित्राकडून शस्त्रदीक्षा घेतली, तर अर्जुनानं श्रीकृष्णाकडून युद्धाची दीक्षा घेतली. विश्वामित्र स्वतः लढले नाहींत; परन्तु, त्यांनीं लढाईची प्रेरणा दिली. श्रीकृष्णहि स्वतः लढले नाहींत; परन्तु, कुरुक्षेत्रयुद्धाचे संचालक तेच होते. भगवद्गीतेंतच या युद्धांतलं ‘ सत्य ’, या युद्धांतला धर्म, घोषित झालेला आहे. द्रौपदीचा सखा, अपमानकाळीं ज्याचं स्मरण-धांवा केल्यानं द्रौपदीची लज्जा रक्षण झाली, ज्याच्या सन्मानार्थ पांडवांनीं राजसूययज्ञ केला, तो श्रीकृष्ण आणि भगवद्गीतेंतील धर्म एकात्म, एकजीव आहेत. राम सीतेबरोबर दीर्घकाल ज्या वनांत हिंडले, तें वन अनार्यांचं होतं; आणि द्रौपदीबरोबर पांडव ज्या वनांत हिंडले, तें होतं ब्राह्मण ऋषींचं. पांडवांबरोबर द्रौपदीला या वनांत प्रवेश मिळाला होता. तिथं द्रौपदीनं आपल्या अक्षय अन्नपात्रांतून अतिथींना अन्नदान केलं होतं. भारतांत दोन संघर्ष होते. एक होता अरण्यजीवन आणि कृषिजीवन यांमधें; आणि दुसरा होता वेदांतील धर्म आणि श्रीकृष्णाचा धर्म यांमधें. लंका, म्हणजे अनार्यांच्या शक्तीनं संपन्न असं शहर होतं; तिथं आर्यांचा विजय झाला. कुरुक्षेत्र, हें कृष्णविरोधी कौरवांचं क्षेत्र होतं; तिथं कृष्णभक्त पांडव विजयी झाले. सर्वच इतिहासांत बाह्यांगीं अन्नासाठीं युद्ध असतं आणि अंतर्यामीं तत्त्वासंबंधीं झगडा असतो. प्रजा ( म्हणजे लोकसंख्या ) वाढली, कीं अन्नटंचाई निर्माण होते आणि मग नव्या नव्या जागीं शेतीचा प्रसार करावा लागतो.

गियानयार,

१ ऑगस्ट १९२७

# बालिबेटांत

## पत्र ९ वें[1]; ( पत्राचा कांहीं भाग )

कल्याणीय सूनबाई,

मलाया उपबेटाचं वर्णन, मजबरोबर असलेल्या मित्रमंडळींनीं लिहिलेल्या पत्रांत वाचलं असशीलच. मला सावचितपणं कांहीं पाहायला, विचार करायला किंवा लिहायला सवडच मिळाली नाहीं. पेनांगहून जहाजानं पहिल्यानं जाव्हाची राजधानी बटेव्हिआला पोंचलों. आतांशा पृथ्वीवरील सगळींच मोठीं शहरं त्या त्या देशाचीं शहरं नसतात, तर चालू काळाचीं शहरं असतात. सगळींच आधुनिक; सगळ्यांचे चेहरे सारखेच असतात; वेषभूषेंत काय तो थोडासा फरक असतो. कोणाच्या डोईचा रुमाल झकपक असतो, पण अंगरख्याला बटणं नसतात; धोतर गुडघ्यापर्यंत असतं अन् अंगावरच्या फाटक्या उपरण्याला परटाचं घर दिसत नसतं—उदाहरणार्थ, ( आपलं ) कलकत्ता शहर. कोणी आपाद-मस्तक व्यवस्थित,धुऊन पुसून स्वच्छ,कपडेलत्ते झकपक असलेलेअसतात—जसं बटेव्हिआ शहर. या शहरांची चेहरेपट्टी सारखी, असं म्हटलं खरं,पण तें ( तितकंसं ) बरोबर नाहीं. कारण, चेहरा दिसतच नाहीं, वरचा मुखवटाच दिसतो. हे मुखवटे एकाच कारखान्यांत, एकाच सांच्यांतून काढलेले असतात. कोणी आपला मुखवटा घासून पुसून स्वच्छ ठेवतात, तर कोणी

१. हें पत्र गुरुदेवांनीं आपली स्नुषा श्रीमती प्रतिमादेवी यांस लिहिलें होतें.

हल्गर्जीनं तो मळकट करून टाकतात. कलकत्ता आणि बटेव्हिआ दोनहि शहरं एकाच आधुनिक काळाच्या कन्या आहेत; फक्त जांवई स्वतंत्र असल्यानं दोघींच्या निर्गेत तफावत आहे. श्रीमती बटेव्हिआच्या भांगापासून पायांपर्यंत दागदागिन्यांना कमतरता नाहीं; वर साबणानं न्हाणं-धुणं, अंगलेप, इत्यादींनीं तेजस्विता राखण्यांत येतेच. कलकत्त्याच्या हातांत लोखंडी वाळा[1] आहे, पण बाजूबंद पाहिले नाहींत. तिचं अंगधुण्याचं पाणी अन् अंगपुसण्याच्या पंचाचीहि तीच दशा असते. आम्हां चित्पूर विभागांतल्या रहिवाशांना, बटेव्हिआला आल्यानंतर कृष्णपक्षांतून शुक्लपक्षांत आल्यासारखं वाटतं.

तीन एक दिवस होतों हॉटेलच्या पिंजऱ्यांत; आगतस्वागताला कांहीं कमी नव्हतं. त्याबद्दलची सविस्तर हकीकत केव्हांतरी सुनीति लिहितील. कारण, त्यांची दर्शनशक्ति आणि धारणाशक्ति दोन्ही सारख्याच तीक्ष्ण आहेत. आग्रह अन् संग्रह दोन्ही त्यांच्यापाशीं समान आहेत.पाहिलेलं सर्व कांहीं त्यांच्या मनांत घर करीत असतं. कांहींहि वायां जात नाहीं,— म्हणजे, ते मनांत जीं चित्रं सांठवतात, त्यांचा आनंद दुसऱ्यांना देतात. 'तन्नष्टम् यन्न दीयते'.त्यांच्या हातीं आमचा भ्रमण-वृत्तान्त मुळींहि व्यर्थ होणार नाहीं, अन् लुप्तहि होणार नाहीं.

बटेव्हिआहून जहाजानं बालिबेटाकडे रवाना झालों. कांहीं तासांसाठीं आम्हांला सुरबाया शहरांत उतरविण्यांत आलं. हेंहि एक आधुनिक शहर आहे; जाव्हाचा भाग नव्हे,पण जाव्हाला लागून, त्याशीं हें संबंधित आहे. अलाउद्दीनच्या दिव्याच्या मंत्रानं हे शहर न्यूझीलंडमधें नेऊन वसविलं तरी चुकल्यासारखं वाटायचं नाहीं.

बालिबेटाला येऊन पोंचलों. धरित्रीची चिरयौवनी मूर्ति पाहायला मिळाली. इथं पुराणं शतक जसंच्या तसं, ताजंतवानं आहे. येथील जमिनीवर अन्नपूर्णेच्या पायांखालच्या, दिशादिशांना व्यापणाऱ्या चौरंगावर हिरवागार गालिचा पसरलेला आहे; वनछायेच्या अंकावर खेळणाऱ्या

---

[1] बंगाली सुवासिनींच्या हातांत एक लोखंडी वाळा असतो.आपल्याकडे मंगळसूत्राला असलेलें महत्त्व या वाळयाला तिकडे समजतात.

(येथील) लोकांना निवांत अवकाश असतो; तो अवकाश उत्सव, अनुष्ठान, इत्यादींनीं सदोदित भरलेला असतो.

या बेटांत आगगाडी नाहीं. आगगाडी म्हणजे आधुनिक काळांतलं वाहन. आधुनिक काळ-(वेळ)-इतका चिकू आहे, कीं जराहि इकडे तिकडे जास्त खर्चाची त्याची तयारी नसते. या काळांतलीं माणसं म्हण-तात, "Time is money!" म्हणून, वेळेचा अपव्यय टाळण्यासाठीं आगगाडीचं एंजिन धांपा टाकीत, धुराचे लोळ ओकीत देशोदेशीं धांवत पळत सुटलेलं असतं. परन्तु, या बालिबेटांत वर्तमानकाळ शतकानुशत-कांच्या भूतकाळाशीं एकरूप होऊन बसलेला आहे. इथं काळ-वेळ आंखडता करण्याची मुळींच जरूरी नाहीं; इथं जें कांहीं आहे, तें कायमचं आहे; जितकं तें चालू काळाचं, तितकंच पुरातन काळाचं आहे. ऋतूंनीं ज्याप्रमाणं नाना रंगी फुलं उमलवत, फळं पिकवीत सतत आपलं काम चालू ठेवलेलं आहे, तसंच इथले लोक वंशपरंपरेनं, आपले नाना रूपरंगांचं, नृत्यगानांचं, अनुष्ठानांचं कार्य करताहेत.

इथं आगगाडी नसली, तरी (आमच्यासारख्या) इथं येणाऱ्या जग-प्रवासी वध्यांसाठीं मोटारी आहेत. त्यांची देखभाल घेणं अगदीं झटपट् आंवरावं लागतं. त्या, म्हणजे (जणुं कांहीं) आंखडत्या काळांतलीं माणसं, अन् आलीं आहेत अपार काळाच्या देशांत! येथील अरण्य, पर्वत आणि लोकांच्या वस्तीमधून धुरळा उडवीत चाललों आहे, आणि सारखं वाटतं आहे कीं, इथं पायीं फिरायला हवं. रस्त्याच्या दुतर्फा जिथं इमारती असतात, तिथं मोटारीबरोबर (तिच्या गतीनं) आपल्या दोन्ही डोळ्यांना पळवीत नेलं, तर फारसं नुकसान होत नाहीं. पण, वाटेच्या दोहों बाजूंला सौंदर्याचा मेळावा असतांना तेथील निमंत्रणाचा मान राखायचा झाला तर गरजेची मोटार गराजांत ठेवून येणंच चांगलं. शिकारीसाठीं दुष्यन्तानं रथ सोडला होता, त्या वेळीं त्याचा वेग किती होता, लक्षांत आहे ना? याला म्हणतात 'प्रोग्रेस,'—लक्ष्यवेध करण्यासाठीं धांवपळ. पण, तपो-वनाशीं आल्यानंतर दुष्यन्तराजाला रथांतून खालीं उतरावं लागलं—लक्ष्य मिळविण्याच्या लोभानं नव्हे, तृप्ति (समाधान) मिळविण्याच्या आशेनं.

सिद्धीच्या मार्गानं धांवायचं असतं, सौंदर्याच्या मार्गानं सावकाश चालायचं असतं. आधुनिक काळांत सिद्धीचा लोभ अफाट असतो, प्रबळ असतो; म्हणून, आधुनिक काळांतल्या वाहनांचा वेग सारखा वाढतो आहे. जें विशेषत्वानं आकलन करायला हवं, तें (लक्षांत) न घेतां दृष्टि त्यांना नुसता स्पर्श करून पुढं चालूं लागते. आजकाल हॅम्लेटचा अभिनय अशक्य होऊं लागला आहे, हॅम्लेटच्या सिनेमाची जित आहे!

आमची मोटार जिथं येऊन थांबली, तिथं एक मोठा उत्सव होता. त्या ठिकाणाचं नांव होतं बाङलि. कोणा एका राजघराण्यांतल्या कोणाची तरी उत्तरक्रिया होती. त्यांत शोकाचा लवलेश नव्हता. तें साहजिकच होतं; कारण, राजा मरण पावून बरेच दिवस झाले होते, येव्हांना त्याचा आत्मा देवसभेंत पोंचला असावा, म्हणूनच तर उत्सव होता. रस्त्यानं दूरदूरच्या गांवांहून स्त्रिया आणि पुरुष नानाविध नैवेद्य-भाऱ्याभाऱ्यानं घेऊन येत असलेले दिसत होते; कोणत्या तरी पुराणांत वर्णन केलेलं युग एकदम आमच्या डोळ्यांपुढं जिवंत झाल्यासारखं वाटलं; जणुं, अजंठ्याची शिल्पकला चित्रलोकांहून सूर्यप्रकाशाचा उपभोग घेण्या-साठीं जीवलोकांत अवतरली होती! स्त्रियांची वेषभूषा अजंठ्याच्या चित्रां-प्रमाणंच होती. इथं आवरणाच्या विरळतेंत असलेल्या साहाजिकशा घरंदाज भारदस्तपणांत एक प्रकारचं सौंदर्य होतं; तें भोंवतालच्या वाता-वरणाला साजेसंच होतं. तसं कां? तिथं प्रेक्षक म्हणून आलेल्या कांहीं अमेरिकन मिशनऱ्यांना देखील त्या दृश्यांतील शोभिवंत सदभिरुचि सहज-सुंदर वाटली असावी, असं वाटतं.

यज्ञभूमीवर अलोट गर्दी होती. त्या उत्सवानिमित्त उंच बांबूंनीं तयार केलेल्या माच्यांवर खोल्या तयार करण्यांत आल्या होत्या. इकडील ब्राह्मण वेषभूषा करून, शेंड्या बांधून, अनेकविध मुद्राभिनय करत मंत्रपाठ म्हणत होते. त्यांच्या आंवतींभोंवतीं फळं, फुलं, पत्री, नैवेद्य यांच्या राशी होत्या. कांहीं ब्राह्मण नानाविध अर्घ्यांच्या उपकरणांची जुळवाजुळव करत होते. कांहीं ठिकाणीं इकडील विविध वाद्यांवर संगीत चालूं होतं; एका ठिकाणीं तंबूमधें पौराणिक नाट्याभिनय चालूं होता.

उत्सवाचं असं अफाट अन् वैचित्र्यपूर्ण अनुष्ठान मीं कुठंहि पाहिलं नव्हतं. इतकं असून, कुठंहि कुरूपता किंवा अव्यस्थितपणा नव्हता. सामानसुमानाच्या सांवळ्यागोंधळानं किंवा, माणसांच्या गर्दीतील धक्काबुक्कीनं तशा अवाढव्य समारंभाला कुठंहि गालबोट लागलेलं नव्हतं. इतकी मंडळी जमली होती; पण आरडाओरडा, घाणेरडेपणा, अगर अव्यास्थितपणा मुळींच नव्हता. सारा उत्सव कसा विशेष एकोप्यानं सुसंघटित झालेला होता. एकंदरीनं साराच प्रकार इतका व्यापक, विविधतापूर्ण आणि आम्हांला इतका अपूर्व होता कीं, त्याचं विस्तृत वर्णन करतां येणंच अशक्य आहे. हिंदु अनुष्ठानविधि आणि इकडील लोकांची चित्तवृत्ति, यांच्या संमीलनानं निर्माण झालेलं अमाप सौंदर्य विशेष पाहण्यासारखं आणि विचार करण्यासारखं आहे.

ता. ३० ऑगस्ट १९२७,

कारेम आसन. बालि.

# संस्कृति-संगम

## पत्र १० वें[1] (कांहीं भाग)

कल्याणीय मीरा ईस,

जिथं बसून लिहितों आहे, तो एक डाक-बंगला आहे; पहाडावर सकाळच्या वेळीं (हिंवाळ्यासारखा) थंड वारा आहे. आकाशांत ढगांचे जमाव ये जा करताहेत; केव्हां सूर्याला झांकून टाकताहेत, केव्हां त्याला उघडीप देताहेत. पहाड म्हटल्यानं मनापुढं जें चित्र उभं राहतं, तशी येथील परिस्थिति नाहीं. पर्वतांच्या शिखरांच्या रांगा कुठं दिसत नाहींत. व्हरांड्यांतून जवळच, समोर दरीचा उतार दिसतो आहे; तळाशीं बारीकसा एक पाण्याचा प्रवाह वळणावळणानं वाहतो आहे. पलीकडची बाजू अर्धचंद्राकृति असून, तिच्यावरील नारळीवनांतील झाडं ओळीनं आकाशाला भिडूं पाहताहेत.

दरीच्या वरपासून खालपर्यंत पाहिरी-पाहिरीनं शेतं दिसताहेत. पाण्याच्या प्रवाहाला लागूनच एक झरा आहे. या देशांतील लोक तो पवित्र मानतात; दिवसभर स्त्रिया तिथं स्नान करीत असलेल्या आणि पाणी भरून नेत असलेल्या दिसतात. त्या पाण्यांत स्नान केल्यानं सर्व पापं धुतलीं जातात, असं येथील लोक म्हणतात. विशेष विशेष पर्वण्यांना खूप लोक स्नानाला येतात. या ठिकाणाचं नांव 'तीर्त आम्पूल.' तीर्त, म्हणजे तीर्थ; आणि आम्पूल, म्हणजे झरा; सारांशानं तीर्थझरा.

---

[1] हें पत्र गुरुदेवांनीं आपली कन्या श्रीमती मीरादेवी यांना लिहिलें होतें.

या झऱ्यासंबंधीं एक गोष्ट आहे. फार वर्षांपूर्वी, एका राजाला एक सुंदर मुलगी होती. त्या मुलीचं एका राजवल्लभावर प्रेम होतं. त्या राजवल्लभाचंहि राजकन्येवर प्रेम होतं; परन्तु, तिच्याशीं लग्न करण्यासारखी त्याची उच्च जात नव्हती. तें लक्षांत घेऊन, कर्तव्य म्हणून, राजवल्लभानं राजकन्येचं प्रेम झिडकारलं. राजकन्येला राग आला आणि तिनं त्याच्या पेयांत विष घातलं. तें पेय थोडंसं पितांक्षणीं खरा प्रकार त्या तरुणाच्या लक्षांत आला. तरीपण, राजकन्येच्या नांवाला अपवाद लागूं नये, म्हणून तो पळून त्या जागेच्या जंगलांत गेला आणि तिथं मरण्यास तयार झाला. देवांनीं दयावंत होऊन त्याला त्या पवित्र झऱ्याचं पाणी पाजलं आणि जिवंत केला.

हिंदूंच्या भावना आणि चालीरीती यांशीं इकडील लोकांचं जीवन किती संलग्न झालेलं आहे, त्याचा क्षणोक्षणीं अनुभव येऊन आश्चर्य वाटतं. असं असून, इथं कुठंहि हिंदुधर्म निर्भेळ स्वरूपांत नाहीं; येथील लोकांच्या प्रकृतीशीं मिलाफ होऊन, त्याला एक विशिष्ट रूप प्राप्त झालं आहे. त्याचा ढंग हिंदु आहे अन् अंग या लोकांचं आहे. इथं आल्याबरोबर, प्रथमच, एका राजाची उत्तरक्रिया पाहायला गेलो होतों[1] ........येथील ब्राह्मणांच्या गळ्यांत जानवं नाहीं. चौकशीं करतां समजलं कीं, यांना ‘ गायत्री ’ हा शब्द माहीत आहे, परंतु गायत्रीमंत्र नीटसा माहीत नाहीं. असं मनांत येतं कीं, एके काळीं यांना हिंदुधर्म अवगत होता; त्याच्या देवदेवी, उत्सव-अनुष्ठान, रीती-नीती, पुराणस्मृति सारंच ( इथं ) होतं. नंतर मूळचा संबंध तुटून भारत लांब झाला—हिंदूंच्या लेखीं समुद्रपर्यटन निषिद्ध मानलं गेलं; हिंदूंनीं स्वतःला एका सीमारेषेंत बांधून घेतलं; घराबाहेर असलेलं आपलं प्रशस्त अंगण हिंदु विसरले. परन्तु, समुद्रपार असलेला, भारताचा आप्त बालि भारताची विविध वाणी, मूर्ति, चिन्हं, उपकरणं संपूर्णपणें विसरूं शकलेला नाहीं.[2]

---

[1] या उत्तरक्रियेचें वर्णन मागील पत्रांत आल्यानें, येथें मूळच्या पत्रांत असलेल्या, त्याच उत्तरक्रियेच्या वर्णनात्मक कांहीं ओळी गाळल्या आहेत.

२. यापुढील थोडा भाग गाळला आहे.

राजवाड्यांत प्रवेश करतांच, अंगणांत, एका व्यासपीठावर नानाविध उपकरणं सजवून ठेवलेलीं दिसलीं. येथील चार ब्राह्मण शेजारीं शेजारीं बसलेले दिसले. पैकीं, एकजण बुद्धाचा, एक शिवाचा, एक ब्रह्म्याचा आणि एक विष्णूचा पुजारी होता. त्यांच्या डोक्यावर नक्षीकाम केलेल्या उंच टोप्या होत्या. टोपीच्या वरच्या भागावर कांचेच्या शिखरासारखं कांहींसं होतं. ते आपापल्या देवांचे स्तवमंत्र म्हणत होते. एक वयस्क स्त्री आणि एक मुलगी, अशा दोघीजणी हातांत अर्घ्यांचीं तबकं घेऊन उभ्या होत्या. एकंदरीनं सारा सरंजाम विविधतापूर्ण आणि समारंभवजा दिसला. नंतर समजलं, कीं तो मंगलमंत्रपाठ राजवाड्यांत माझ्या आगमनाप्रीत्यर्थच चालला होता. माझ्या आगमनाच्या पुण्याईनं प्रजेचं मंगल व्हावं, भूमि सुफला व्हावी, यासाठीं स्तवन, मंत्रपाठ होते, असं राजेसाहेबांनीं सांगितलं. त्यांनीं आपण विष्णुवंशीय असल्याचंहि सांगितलं.

संध्याकाळीं साडेचारच्या सुमाराला स्नान उरकून व्हरांड्यांत येऊन बसलों. कोणी कांहीं बोलत नव्हतं. अशा स्थितींत सुमारें दोन तास गेल्यानंतर राजेसाहेबांनीं स्थानिक बाजारांतून, मुंबई प्रांतांतल्या एका खोजा मुसल्मान दुकानदाराला हांक मारून आणायला लावलं. त्यानं मला काय काय हवं, कशा प्रकारच्या खाण्यापिण्याची व्यवस्था माझ्यासाठीं करावी, इत्यादि प्रश्न मला विचारले. राजेसाहेब मला ( मोकळीक देऊन ) सोडून, विश्रांतीला गेले, तर मला सर्वांत आनंद वाटेल, असं मी त्यांना कळवायला सांगितलं.

त्याच्या दुसरे दिवशीं, राजवाड्यांतील कांहीं ब्राह्मण पंडित ताडपत्रावर लिहिलेल्या पोथ्या वगैरे घेऊन उपस्थित झाले. पैकीं एक पोथी महाभारताच्या भीष्मपर्वाची होती,—इकडील लिपींतच लिहिलेली. वरची ओळ संस्कृतमधें आणि खालच्या ओळींत ( येथील ) देशी भाषेंत त्याचं स्पष्टीकरण. कागदाच्या एका पोथीवर संस्कृत श्लोक लिहिलेले होते. राजेसाहेब ते श्लोक मोठ्यानं वाचूं लागले; उच्चार विकृत असल्यानं, त्यांचं आकलन करायला फार प्रयास पडले. सारा योगतत्त्वाचा उपदेश होता. ‘ आम्ही येथें संस्कृत पंडित पाठवून देऊं, ते येथील ग्रंथांतील विकृत आणि विसर-

लेला भाग आणि त्याचा अर्थ, इत्यादि बरोबर करून देतील,' असं मी राजेसाहेबांना आश्वासन दिलं.

इकडे, मला अत्यंत थकवा यायला लागला होता. आपला एकंदर निभाव लागणं शक्य नाहीं, असं मला सारखं वाटूं लागलं होतं, सुदैवानं सुनीति आमच्याबरोबर आहेत. त्यांची उमेद आणि उत्साह अपरिमित आहे. धोतर नेसून, कमरेला पट्टवस्त्र (महावस्त्र) गुंडाळून, ते येथील 'पेदंडां' बरोबर (पंडितांबरोबर) बैठकीला बसले. त्यांच्याबरोबर आपल्याकडील पूजेचीं उपकरणं होतीं. आपली पूजा-पद्धति त्यांनीं (येथील मंडळींना) दाखविली. सर्वांची विचारविनिमय करण्याची आणि चर्चेची उत्सुकता त्यांनीं बरीच वाढवली.

# बोरोबुदूर

## ( महान् बुद्ध )

### पत्र १९ वें[1]

वांडुंग्-जाव्हा

कल्याणीय मीरा ईस,

इथं पाहण्यासारखं होतं, तें पाहून संपलं आहे. "योग्य"हून बोरोबुदूरला गेलों होतों; तिथं एक रात्र राहून आलों.

पहिल्यानं मुंडु नांवाच्या एका ठिकाणीं एक लहानसं देऊळ पाहिलं. त्याची मोडतोड झालेली होती, परन्तु, येथील सरकारनं त्याची डागडुजी केलेली आहे. देवळाची घडण मला आवडली. आंत बुद्धाचे तीन भाव दाखविणाऱ्या तीन अवाढव्य मूर्ती आहेत. त्यांकडं पाहात स्तब्ध उभा राहिलों. मनाला कसं वाईट वाटत होतं ! एके काळीं कितीतरी लोकांनीं मिळून तें देऊळ बांधलं, त्या मूर्ती घडविल्या. तेव्हां किती कोलाहल, किती जय्यत तयारी ( झाली असणार ), किती लोकांचा जीव त्या कामावर असणार. ज्या वेळीं त्या प्रचंड प्रतिमा पहाडावर चढविल्या जात होत्या त्या वेळीं येथील झाडपाल्याखालीं, सूर्यप्रकाशानं उज्ज्वल असलेल्या आकाशाखालीं, मानवी महा-प्रयास ( जणुं कांहीं ) सजीव होऊन तरंगत होता. त्या वेळीं जगांत बातम्यांचा प्रचार होत नसे. या छोट्याशा बेटांत ( मानवाची ) प्रबल इच्छा जें कार्य करीत होती, त्याची वार्ता समुद्रपार होऊन बाहेर पोंचली नव्हती. कलकत्त्याच्या मैदानाकडेला 'व्हिक्टोरिआ

---

[1] हें पत्र श्रीमती मीरादेवी यांना लिहिलें होतें.

मेमोरिअल' तयार होत असतांना त्याचा गाजावाजा जगांतील साऱ्या समुद्रकिनाऱ्यांपर्यंत पोहोंचला होता !

देऊळ व्हायला नक्कीच दीर्घकाल लागला असणार. एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या आयुष्यांत हें कार्य पुरं होण्यासारखं नव्हतं. हें देऊळ रचण्या-मागं असलेली प्रगाढ श्रद्धा त्या साऱ्या काळांतील एक सत्य होतं. त्या देवळाच्या निर्मितीसंबंधानं या बेटावरील त्या काळांतील (लोकांच्या) सुखदुःखमय दैनंदिन जीवनाचे कितीतरी विस्मय, किती वितर्क, किती खऱ्याखोट्या कहाण्या संलग्न असतील ! नंतर कधींतरी मंदिर पूर्ण रचलं गेलं (असणार). त्यापुढं, नित्यानियमानं कितीतरी दिवस त्यांत पूजेचा प्रदीप लागला असेल, लोकांनीं झुंडींनीं अर्घ्य आणले असतील, वर्षाच्या विशेष विशेष दिवशीं पर्वण्या असतील, देवळाच्या अंगणांत तीर्थयात्रा करणाऱ्या स्त्री-पुरुषांची किती गर्दी झाली असेल !

त्यानंतर, त्या काळाच्या भाषेवर, भावनेवर धूळ पडली. तेव्हां, जें अत्यंत सत्य होतं, त्याचा अर्थ हरपला. (जिवंत) झरा आटल्यानंतर ज्या-प्रमाणं दगड दिसूं लागतात, तशी स्थिति आज या सर्व मंदिरांची झाली आहे. यांच्याभोंवतीं निरंतर वाहणारा सजीव झरा सुकल्याबरोबर, यांचे दगड बोलेनासे झाले; यांवर त्या वेळच्या जीवनप्रवाहाचीं चिन्हं आहेत, पण त्याची गति नाहीं, वाणी नाहीं. आम्ही चारचौघं मोटारींत बसून पाहायला आलों, पण पाहायला प्रकाश होताच कुठं ! मनुष्याची ती कीर्ति आपल्या प्रकाशासाठीं लोकांच्या ज्या दृष्टीची अपेक्षा करीत असते, ती कधींच लुप्त झालेली आहे !

याआधीं, बोरोबुदूरचीं चित्रं पुष्कळदां पाहिलीं होतीं. त्यांची रचना माझ्या डोळ्यांना कधींच बरी वाटली नव्हती. प्रत्यक्ष पाहिल्यानंतर कदा-चित् त्याचा रस घेतां येईल, असं मला वाटलं होतं. पण, पाहून मन प्रसन्न झालं नाहीं. पाहिरी-पाहिरीनं त्याचे विभाग पाडले आहेत; वरचं शिखर बाकीच्या आकारप्राकाराच्या मानानं इतकं लहान आहे कीं, कितीहि मोठा आकार असला, तरी याला महिमा नाहीं, (असं वाटतं);

पहाडाच्या माथ्यावर एक दगडी टोपण बसविल्यासारखं वाटतं. जणुं कांहीं हा एक नुसता मोठा आधार आहे. शेंकडों बुद्धमूर्ती आणि जातककथांचीं चित्रं समाविष्ट करणारी जणुं एक भली मोठी परडी आहे. त्या परडींतून उचलून, वेंचून पाहिल्यास पुष्कळ चांगल्या वस्तु पाहायला मिळतात. दगडांत कोरलेल्या जातकमूर्ती मला फार आवडल्या. नित्य जीवलीलेच्या अजस्र प्रतिकृती असून, त्यांत इतर विशोभित किंवा अश्लील कांहींहि नाहीं. दुसऱ्या देवळांत सर्व देव-देवींच्या मूर्ती पाहिल्या; रामायण–महाभारताच्या कथाहि खोदलेल्या आहेत. या देवळांत राजापासून रंकापर्यंत सर्व दिसतात. बौद्धधर्माच्या प्रभावानं सर्वसामान्य जनतेविषयींची श्रद्धा जोरदारपणें प्रभूत झालेली आहे; या ठिकाणीं नुसत्या मनुष्यमात्रालाच नव्हे, तर दुसऱ्या प्राण्यांनाहि यथोचित स्थान आहे. जातककहाणींत एक फार मोठं तत्व आहे; युगानुयुगं बुद्ध सर्वसामान्यांमधूनच क्रमशः प्रकाशित झाला, असं त्यांत म्हटलं आहे. प्राणीजगांत बऱ्यावाईटाचा जो सदैव संघर्ष चालू आहे, त्या संघर्षाच्या प्रवाहाला धरूनच धर्माचा श्रेष्ठ आदर्श बुद्धाच्या रूपानं व्यक्त झाला. अतिसामान्य प्राण्यांतहि, अतिसामान्य रूपांनच या सत्‌शक्तीनं वाईटामधून स्वतःचा विकास केलेला आहे; तिचा सर्वोत्तम विकास म्हणजे,अपरिमित मैत्रीच्या शक्तींत आत्मत्याग. .... ........ एका परटाच्या घरीं एक गाढव दोरीनं बांधून ठेवलं होतं; एक गाय प्रेमळपणें त्या गाढवाला चाटीत होती; असं लहानपणीं पाहिलेलं मला आठवतं आहे. तें दृश्य पाहून मला मोठं आश्चर्य वाटलं होतं. बुद्धच त्यांच्या कोण्या एका जन्मीं ती गाय असले पाहिजेत, असं म्हणायला जातककथा लेखकाला दिक्कत वाटली नसती !

(आम्हांला) सर्व कांहीं नीट समजावून सांगण्यासाठीं दोन वलंदेज (डच) पंडित आमच्याबरोबर होते. ते जितके विद्वान् होते, तितकेच ते सहृदय होते. त्यांचा तो स्वभाव मला फार आवडला. त्याच्या निष्ठेबद्दल आपल्याला सर्वांत जास्त श्रद्धा वाटते. मुक्या दगडांना वाचा फोडण्यासाठीं त्यांनीं आपलं सारं आयुष्य वाहिलेलं आहे. त्यांच्यांत पांडित्याचा किंचित्‌हि कंजूषपणा नाहीं, अजस्र दाक्षिण्य आहे. भारताचा इतिहास संपूर्ण समज-


त्यासाठीं त्यांनाच गुरु मानायला हवं. ज्ञानावर विशुद्ध निष्ठा ठेवूनच ते आपला व्यासंग चालू ठेवीत असतात. भारताची विद्या, भारताचा इतिहास या कांहीं त्यांच्या जवळच्या गोष्टी नाहींत; तरीपण, त्यांसाठींच त्यांची आयुष्यभर साधना चालू असते; त्यांच्या आयुष्याचं तेंच ध्येय आहे. आणखीहि कांहीं पंडितांची गांठभेट झाली. त्यांच्या स्वभावांतील सहज नम्रता मला विशेष आवडली.

२६ सप्टेंबर, १९२७

● ● ●



# गुरुदेवांच्या गोष्टी

# गुप्त  धन

अमावस्येची मध्यरात्र. मृत्युंजय त्यांच्या पुरातन कुलदैवताच्या, जयकालीच्या पूजेला बसला होता. पूजा आटोपून तो उठला, तेव्हां जवळच्या आंबराईंत पहाटेचा पहिला कावळा ओरडला.

मृत्युंजयानें मागें वळून पाहिलें—देवळाचें दार बंद होतें. त्यानें देवीच्या पायांवर एकदां डोकें टेकलें आणि तिचें आसन सरकविलें. आसनाखालून त्यानें एक फणसाच्या लाकडाची पेटी बाहेर काढली. जानव्याला किल्ली होती. त्या किल्लीनें मृत्युंजयानें पेटी उघडली. पेटीचें झांकण उघडतां-क्षणीं मृत्युंजय दचकला आणि त्यानें कपाळावर हात मारून घेतला.

मृत्युंजयाच्या मागीलदारच्या बागेला भिंतीचा तट होता. त्या बागेंत, एका बाजूला, मोठमोठ्या झाडांच्या सावलींत तें देऊळ होतें. देवळांत जयकालीच्या मूर्तीखेरीज आणखी कांहींहि नव्हतें; आणि फक्त एकच प्रवेशद्वार होतें देवळाला. मृत्युंजयानें बराच वेळ पेटी हलवून, वर खालीं करून पाहिली. त्यानें उघडण्यापूर्वी पेटी बंदच होती;—कोणीहि ती मोड-लेली नव्हती. दहा-दहादां मृत्युंजयानें देवीच्या प्रतिमेभोंवतीं फिरून चांचपडून पाहिलें—पण त्याला कांहींहि मागमूस लागला नाहीं. वेड्यासारखा होऊन त्यानें देवळाचें दार उघडून टाकलें;—तेव्हां दिवस उजाडायला

आला होता. देवळाच्या चहूं बाजूंस तो आशेनें व्यर्थ फिर फिरून शोधून पाहूं लागला.

चांगलें फटफटलें, तेव्हां बाहेर चंडीमंडपांत येऊन मृत्युंजय कपाळाला हात लावून विचार करीत बसला. साऱ्या रात्रींच्या जागरणानंतर थकवा आल्यानें त्याला डुलकी लागली. तेवढ्यांत, ' भला करे भगवान् ! ' असे शब्द त्याच्या कानावर पडले आणि तो खडबडून जागा झाला.

समोरच्या अंगणांत एक जटाधारी गोसावी उभा होता. मृत्युंजयानें भक्तीनें त्याला नमस्कार केला. गोसाव्यानें त्याच्या मस्तकावर हात ठेवून आशीर्वाद दिला आणि तो म्हणाला, " बाबा, तूं उगीच वाईट वाटून घेतो आहेस. "

तें ऐकून मृत्युंजय आश्चर्यचकित झाला; तो म्हणाला, " तुम्ही अंतर्ज्ञानी आहां. नाहींतर, माझ्या मनाचं दुःख तुम्हांला कसं कळलं ? मी तर कोणापाशीं कांहीं बोल्लेलों नाहीं. "

गोसावी म्हणाला, " वत्सा, तुझं जें हरवलं आहे, त्याबद्दल तूं आनंद मान. वाईट वाटून घेऊं नको. " मृत्युंजयानें त्याचे दोन्ही पाय घट्ट धरून म्हटलें, " आपल्याला तर मग सारंच समजलं आहे—कसं हरवलं, कुठं गेल्यानं परत मिळेल, तें सांगितल्याशिवाय मी आपले पाय सोडणार नाहीं. " गोसावीबुवा म्हणाले, " तुमचं अकल्याण व्हावं असं माझ्या मनांत असतं, तर मीं तें सांगितलं असतं.पण, आई भगवतीनं कृपा करून जें हरण केलं आहे, त्याबद्दल खेद मानूं नका. "

गोसाव्याला प्रसन्न करण्यासाठीं मृत्युंजयानें सारा दिवस त्याची नाना तऱ्हेनें सेवा केली. दुसरे दिवशीं पहाटें, तो आपल्या गोठ्यांतून खास गोसाव्यासाठीं फेसाळ दुधाचा तांब्या आणून पाहतो तों गोसावी कोठें दिसेना.

## : २ :

मृत्युंजय अगदीं ल्हान असतांना, त्याचे आजोबा हरिहर, एके दिवशीं त्याच चंडीमंडपांत गुडगुडी ओढीत बसले होते; तेव्हां असाच एक गोसावी येऊन ' भला करे भगवान् ' म्हणून अंगणांत उभा राहिला होता. हरिहरनें त्या गोसाव्याला कांहीं दिवस घरीं ठेवून घेऊन,रीतसर सेवेनें त्याला संतुष्ट केलें होतें.

निरोप घेतांना गोसाव्यानें विचारलें, " वत्सा, तुला काय हवं ? " हरिहर म्हणाला, " बाबा जर संतुष्ट झाले असतील, तर माझी परिस्थिति एकदां ऐकावी. एके काळीं या गांवांत आम्ही सर्वांत बडे होतो. माझ्या पणजोबांनीं त्यांची एक मुलगी दूरच्या एका थोर कुलीन घराण्यांत दिली होती. त्या मुलीच्या वंशजांनीं आम्हांला फसवलं आणि ते आतांशा या गांवांत थोर होऊन बसले आहेत. हल्लीं आमची परिस्थिति बरी नाहीं; साहाजिकच त्यांचा अहंकार सोसावा लागतो. पण, आतां सोसवेनासं झालं आहे. काय केलं म्हणजे आमचं घराणं पुनः भरभराटीला येईल, तें सांगा. तोच आशीर्वाद द्या. "

गोसावी किंचित् हंसून म्हणाला, " बाबा, छोटे होऊन सुखांत राहा; मोठे होण्याची आशा करण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. "

परंतु, हरिहरनें माघार घेतली नाहीं. घराण्याच्या उन्नतीसाठीं तो काय हवें तें पत्करायला तयार होता.

तेव्हां, गोसाव्यानें आपल्या झोळींतून एक कापडी सुरळी बाहेर काढली. तो जन्मपत्रिकेसारखा एक लांब कागद होता; आणि त्याची

गुंडाळी करून ठेवलेली होती. गोसाव्यानें तो कागद उलगडून जमिनी-वर पसरला. त्यावर नाना तऱ्हेचीं चिन्हें असलेलीं, नाना चक्रें काढलीं असल्याचें हरिहरला दिसलें. सर्वांखालीं एक लांबच्या लांब कवन लिहि-लेलें होतें. त्याची सुरुवात अशी होती,—

पायीं धरून साधा,
रा उणा राधा ॥
शेवटीं आला रा
पागोल[1] सोडी पा ॥
चिंच–वडाच्या वळचणीं
चालूं लागा दाक्षिणीं ॥
ईशान्य कोनीं ईशान्यीं
सांगितली निशाणी ॥ इत्यादि

हरिहर म्हणाला, "बाबा, कांहींच उमगलं नाहीं यांतलं." गोसावी म्हणाला, "जवळ ठेवून दे. देवीची मनोभावें पूजा करीत जा. तुझ्या घराण्यांत कोणाला ना कोणाला हें लिहिणं उमगेल आणि त्याला अजोड ऐश्वर्य मिळेल." हरिहरनें काकुळतीनें विनंती केली, "आपण समजावून नाहीं का सांगणार?"

गोसावी म्हणाला, "नाहीं, त्यासाठीं साधनाच केली पाहिजे."

तेवढ्यांत हरिहरचा लहान भाऊ शंकर येऊन हजर झाला. त्याला पाहतांच हरिहर घाईघाईनें तें लिखाण उचलूं लागला. गोसावी हंसून म्हणाला, "श्रीमंत होण्याच्या मार्गांतलं दुःख आतांपासूनच सुरूं झालं! पण, लपवालपवी करण्याचं कारणच नाहीं. यांतलं रहस्य फक्त एकालाच उमगणार आहे; वाटेल ते प्रयत्न केले, तरी दुसऱ्या कोणालाहि तें समजणार नाहीं. तुमच्यापैकीं कोणाला तें समजेल, कोणालाच माहीत नाहीं. तेव्हां, साऱ्यांसमोर तूं हा कागद खुशाल उघडा ठेवूं शकतोस."

गोसावी निघून गेला. परंतु, हरिहरला तो कागद लपवून ठेवल्या-शिवाय चैन पडलें नाहीं. न जाणो, दुसऱ्या एखाद्याला तें ऐश्वर्य

[1] बंगालींत वेड्याला पागोल म्हणतात.

मिळायचें, नाहींतर शंकरालाच त्याचा फायदा मिळायचा, अशा भीतीनें त्यानें तो कागद फणसाच्या लाकडाच्या पेटींत कुलूप-बंद करून ठेवला आणि ती पेटी कुलदेवता जयकालीच्या मूर्तीच्या आसनाखालीं लपवून ठेवली. दर अमावस्येच्या मध्यरात्रीं देवीची यथासांग पूजा करून, तो एकदां तो कागद उलगडून पाहत असे. प्रसन्न होऊन, देवी तें गूढ उकलण्याची पात्रता कदाचित् आपल्याला देईल, असें त्याला वाटत असे.

"दादा, मला तो कागद एकदां नीटपणें पाहूं द्या ना—", असा शंकर हरिहरला कांहीं दिवस विनंतीपूर्वक आग्रह करीत असे.

हरिहर म्हणत असे, "हात् वेडया, त्या कागदांत काय आहे! लुच्चा लेकाचा गोसावी, एका कागदावर कांहींतरी गिरगटून मला फसवून गेला—मीं तो कागद जाळून सुद्धां टाकला."

तें ऐकून शंकर गप्प बसत असे. त्यानंतर अकस्मात् शंकर घरांतून नाहींसा झाला. तेव्हांपासून त्याचा कांहींच पत्ता नव्हता.

हरिहरनें सारा कामधंदा सोडला. त्याला नुसतें त्या गुप्त ऐश्वर्याचें ध्यान लागलें होतें.

मृत्युसमयीं हरिहरनें तो कागद आपला थोरला मुलगा श्यामापद याच्या हवालीं केला.

कागद मिळाल्यापासून श्यामापदनें नोकरी सोडून दिली. जयकालीच्या पूजेअर्चेत आणि त्या चमत्कारिक कागदाच्या वाचन-मननांत त्याचें आयुष्य कसें निघून गेलें, तें त्याला कळलेंहि नाहीं.

मृत्युंजय हा श्यामापदचा थोरला मुलगा. पित्याच्या मृत्यूनंतर तो त्या गुप्त-लेखाचा वारसदार झाला. त्याची परिस्थिति खालावूं लागली, तसतसे त्याचें सारें लक्ष त्या लेखानें गुंतवून घेतलें. अशा स्थितींत गेल्या अमावस्येच्या रात्रीं, पूजासमाप्तीनंतर त्याला तो गुप्तलेख दिसला नाहीं; अन् गोसावीहि अंतर्धान पावला होता!

मृत्युंजय मनांत म्हणाला, "त्या गोसाव्याला सोडून उपयोगाचें नाहीं. त्याच्यापाशींच सारा तपास लागेल." तो त्या गोसाव्याच्या शोधार्थ घरांतून बाहेर पडला. रस्तोरस्तीं हिंडण्यांत एक उभें वर्ष गेलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों: दि: ..................

## : ३ :

गांवाचें नांव होतें धारागोल; त्या गांवांत एका वाण्याच्या दुकानांत बसून मृत्युंजय गुडगुडी ओढत विमनस्कपणें निरनिराळे विचार करीत होता. एका दूर, मैदानाच्या कडेनें एक गोसावी जातांना दिसला; मृत्युंजयाला प्रथम त्याचें कांहीं वाटलें नाहीं. पण थोड्या वेळानें त्याच्या एकदम मनांत आलें कीं, गेला तो तोच गोसावी असावा ! घाईघाईनें हुक्का खालीं ठेवून तो पळत सुटला. त्याची ती आकस्मिक धांवपळ पाहून दुकानदाराला आश्चर्य वाटलें.—तो गोसावी कांहीं मृत्युंजयाला पुनः दिसला नाहीं.

संध्याकाळ झाली होती; अंधारून आलें होतें. त्या तशा अनोळखी ठिकाणीं गोसाव्याचा कोठें तपास करावा, मृत्युंजयाला कांहीं सुचेना. तो दुकानांत परत आला आणि त्यानें वाण्याला विचारलें, "तें जें तिकडे मोठं वन दिसतं आहे, तिथं काय आहे ?"

वाणी म्हणाला, "एके काळीं तिथं एक शहर होतं. पण, अगस्ति-मुनींच्या शापानं तिथला राजा, प्रजा, सगळे महामारीनं मेले. असं म्हण-तात, कीं आजहि शोधलं तर तिथं खूप धनदौलत सांपडेल. परंतु, दिवसा-ढवळ्या देखील त्या वनांत जायला कोणी धजत नाहीं. कारण, जे जे त्या वनांत गेले, ते मुळीं परत आलेच नाहींत."

मृत्यंजयाचें मन अस्वस्थ झालें. वाण्याच्या दुकानांत, एका हांतरीवर पडल्या पडल्या, सारी रात्र तो तें वन, तो गोसावी आणि हरवलेलें लिखाण, यांचाच विचार करीत होता. इकडे डांस चावत होते; अंगावर डांस

बसला, कीं हातानें फटकन् अंगावर मारून ध्यायचें अन् डोक्यांत तोच तो विचार घोळवायचा; असें त्याचें चाल्लें होतें. पुनः पुनः वाचून वाचून तें कवन मृत्युंजयाला जवळ जवळ पाठ झालें होतें; त्यामुळें त्या जागरणांत तें त्याच्या डोक्यांत घिरट्या घालूं लागलें—

पायीं धरून साधा,
रा उणा राधा ।।
शेवटीं आला रा,
पागोल सोडी पा ।।

त्याचें डोकें गरम झालें;–कांहीं केल्या ते चरण डोक्यांतून जाईनात. अखेरीस पहाटेच्या सुमारास त्याला डुल्की लागली, तेव्हां त्या चारीं चरणांचा अर्थ पटकन् अगदीं सहज त्याच्या ध्यानांत आला. 'रा उणा राधा', म्हणजे, राधा या शब्दांत जर 'रा' नसेल, तर 'धा' बाकी राहिलें; 'शेवटीं आला रा', म्हणजे झालें, 'धारा !'; 'पागोल सोडी पा', म्हणजे, 'पागोलां'तला 'पा' सोडला, तर उरलें 'गोल !'—एवंच, सारें मिळून झालें 'धारागोल !'—आणि त्या गांवाचें नांव तर धारागोल होतें खरेंच !

स्वप्न उडालें; मृत्युंजय उडी मारून उठला.

## : ४ :

सारा दिवस वनांत फिरफिरून, संध्याकाळीं महा प्रयासानें वाट शोधून काढून मृत्युंजय गांवांत परतला. दिवसभर पोटांत कांहीं नव्हतें, थकून गेला होता अगदीं तो— मृतप्राय झाला होता जसा कांहीं.

दुसरे दिवशीं उपरण्यांत पोहे बांधून घेऊन, पुन: तो वनांत गेला. अपराह्णाच्या सुमाराला एका तळ्याच्या कांठीं तो पोंचला.तळ्याच्या मध्यावर स्वच्छ पाणी— कडेला चोहों बाजूंनीं कमळें फुललेलीं आणि त्याच्या कांठावर कुमुदाचें बन होतें. दगडी घाट होता, त्याची मोडतोडून नासधूस झालेली होती. तेथें पोहे पाण्यानें भिजवून त्यानें खाल्ले आणि तळ्याला प्रदक्षिणा घालत तो शोधूं लागला.


तळ्याच्या पश्चिमेच्या कडेनें चालतां चालतां एकाएकीं मृत्युंजय दचकून उभा राहिला;—पाहतो तों एका चिंचेच्या झाडाशीं गुंतलेला एक अवाढव्य वड उभा ! लगेच त्याला आठवलें,—

‘ चिंच–वडाच्या वळचणीं,
चालूं लागा दक्षिणीं ॥’

मृत्युंजय त्या चिंच–वडाच्या दक्षिणेस चालूं लागला. चालतां चालतां तो एका घनदाट जंगलांत पोंचला. तेथील झाडांझुडुपांची दाटी कांपीत वाटचाल करणें जवळ जवळ अशक्यप्राय होतें. कांहीं झालें, तरी त्या चिंच-वडाची खूण विसरून चालणार नाहीं, असें मृत्युंजयानें आपल्या मनाशीं ठरवलें.

त्या झाडापाशीं परत येतेवेळीं झाडाच्या फटींतून जवळच त्याला एक देवळाचें शिखर दिसलें. शिखराच्या दिशेनें चालतां चालतां मृत्युंजय एका भंगलेल्या देवळाशीं पोहोंचला. देवळाशेजारीं एक धुनी, जळकीं लाकडें आणि राख पडलेली त्याला दिसली. अगदीं बेतानें, हळूच देवळाच्या मोडक्या दारांतून मृत्युंजयानें आंत डोकावलें.आंत कोणीहि नव्हतें;—देवमूर्ति देखील नव्हती !—फक्त एक घोंगडें, कमंडलु आणि भगवें वस्त्र तेथें पडलेलें होतें.

तेव्हां संध्याकाळ समाप्त व्हायला आली होती; गांव खूप दूर होतें; अंधारांतल्या वनांतून मार्ग काढीत जातां येणें शक्य होईल कीं नाहीं, याची मृत्युंजयाला शंका वाटत होती;त्यामुळें त्या देवळांत मनुष्यवस्तीच्या खुणा पाहून मृत्युंजयाला आनंद वाटला. देवळाचा एक मोठा दगड निखळून दाराशीं पडला होता. त्या दगडावर बसल्याबसल्या खालीं मान घालून मृत्युंजय विचार करूं लागला. विचार करतां करतां, एकाएकीं त्याला त्या दगडावर कांहीं तरी लिहिलेलें दिसून आलें. त्यानें खालीं वाकून पाहिलें; दगडावर एक चक्र काढलेलें होतें. त्या चक्रांत कांहीं स्पष्ट, कांहीं अस्पष्ट अशीं खालील सांकेतिक अक्षरें होतीं—




तें चक्र मृत्युंजयाला चांगलेंच माहीत होतें. कित्येक अमावस्यांच्या रात्रीं, घरच्या देवळांत, धुपारतीच्या सुगंधांत, तुपाच्या दिव्याच्या प्रकाशांत

त्या विशिष्ट कागदावरच्या त्या सांकेतिक चक्राचें रहस्य जाणण्यासाठीं त्यानें एकाग्रमनानें देवीच्या प्रसादाची याचना केलेली होती. आज अभीष्ट-सिद्धीच्या अगदीं जवळ आल्यानंतर त्याचें सर्वांग कांपूं लागलें. न जाणो, अगदीं किनाऱ्याशीं येऊन नाव बुडायची; हांतून एखादी कुसळाएवढी चूक होऊन सारेंच मुसळ केरांत जायचें; कदाचित् तो गोसावी आधींच येऊन सारें घेऊन गेलेला असायचा; अशा निरनिराळ्या शंकांनीं त्याचें मन बेचैन झालें; उरांत धडधडूं लागलें त्याच्या. येथवर आल्यानंतर पुढें काय करावें, त्याला सुचेना. त्याच्या मनांत आलें, कदाचित्, तो त्याच्या ऐश्वर्यभांडाराच्या वरच बसला असूनहि तें त्याला समजण्याला कांहीं मार्ग नसावा.

बसल्या बसल्या तो कालीचें नामस्मरण करूं लागला. अंधार दाटूं लागला; रातकिड्यांच्या किरकिरीनें वन भरून गेलें.

## : ५ :

अशा वेळीं, दाट वनांत थोड्याशा अंतरावर जाळ दिसूं लागला. मृत्युंजय आपल्या दगडाच्या आसनावरून उठला आणि त्या जाळाच्या अनुरोधानें चालूं लागला.

बऱ्याच कष्टानें कांहीं दूरवर तो पोंचला. तेथें एक अश्वत्थाचा वृक्ष लागला. त्याच्या बुंध्याच्या आडून त्यानें स्पष्ट पाहिलें,—त्याचा तो ओळखीचा गोसावी जाळाच्या प्रकाशांत तो सूडाचा कागद पसरून बसला होता आणि एका काटकीनें राखेवर कांहींतरी गणित करीत होता.

मृत्युंजयाच्या घरचा तो वडिलार्जित कागद! त्याच्या मनांत आलें, 'अरे चोरा! येवढ्याचसाठीं मला वाईट वाटून घेऊं नको म्हणालास काय!'

गोसावी एकदां गणित करत होता आणि मधेंच उठून एका मापकाठीनें जमीन मोजत होता. कांहीं अंतरापर्यंत जमीन मोजून झाली, कीं चुकल्यासारखें होऊन, मान हलवत तो निराशेनें परत येत होता आणि पुन: गणित करत होता.

अशा प्रकारें रात्र संपत आली. पहांटेचा गार वारा वनांतल्या झाडांच्या पानांतून सळसळूं लागला; तेव्हां तो कागद गुंडाळून घेऊन गोसावी निघून गेला.

मृत्युंजयाला काय करावें तें सुचेना. येवढें मात्र तो निश्चितपणें समजून चुकला कीं, गोसाव्याच्या साहाय्याशिवाय त्या कागदांतलें रहस्य उकलणें शक्य नाहीं; तो आशाळभूत गोसावी त्याला साहाय्य करणार नाहीं, हेंहि तितकेंच खरें होतें. एवंच, गुप्तपणें गोसाव्याच्या पाळतीवर

राहण्याखेरीज दुसरा उपाय नव्हता. दिवसा गांवांत गेल्याखेरीज त्याला पोटाला मिळणें शक्य नव्हतें. सबब, उजाडल्यानंतर गांवांत जाणेंहि जरूरच होतें.

झुंजूमुंजू व्हायला लागल्याबरोबर मृत्युंजय झाडावरून खालीं उतरला. गोसावी जेथें राखेवर गणित सोडवीत होता, तेथें जाऊन त्यानें नीट निरखून पाहिलें; परंतु कांहींच समजलें नाहीं त्याला. चोहींकडे फिरून पाहिलें, दुसऱ्या वनविभागांत आणि त्या वनांत तसा कांहींच फरक नव्हता.

वनांत थोडा थोडा उजेड दिसूं लागल्यावर मृत्युंजय अगदीं सावधपणें, इकडे तिकडे पाहत पाहत गांवाकडे निघाला. एखादे वेळीं गोसावी त्याला पाहायचा, अशी भीति वाटत होती त्याला.

ज्या दुकानांत मृत्युंजय राहिला होता, त्याच्या जवळच्याच एका घरांतील कोणी कायस्थ माउली त्या दिवशीं आपल्या व्रतांचें उद्यापन करणार होत्या. त्यानिमित्त ब्राह्मणभोजन होतें. त्या घरीं मृत्युंजयाच्या जेवणाची सोय झाली. कांहीं दिवस पोटापाण्याचे हाल झालेले होते, त्यामुळें साहजिकच त्याचें जेवण जरा जास्त झालें. तशा भरपूर जेवणानंतर दुकानांत गुडगुडी ओढून, जरा विश्रांतीसाठीं मृत्युंजय हांतरीवर लवंडला; अन् थकलाभागला असल्यामुळें लगेच त्याला गाढ झोंप लागली.

लवकर जेवण उरकून, लवकरच बाहेर पडण्याचें त्यानें ठरविलें होतें. परंतु, झालें उलटेंच. तो झोंपेंतून जागा झाला, तेव्हां सूर्यास्त झाला होता. अंधारांतच तो पुनः त्या वनांत गेला.

पाहतां पाहतां रात्रीचा काळोख दाट होऊं लागला. झाडांच्या सांवल्यांमधून कांहीं दिसणें मुष्कील झालें. जंगलांत रस्ता बंद झाल्यासारखें होऊं लागलें, वाट दिसेना. मृत्युंजय कोठून कोठें चालला होता, तें त्याचें त्यालाच कळेना. उजाडल्यावर त्याच्या लक्षांत आलें कीं, रात्रभर वनाच्या एकाच भागांत आपण घिरट्या घालीत राहिलों होतों.

कावळ्यांचे थवे 'काव' 'काव' करीत गांवाकडे उडाले, तेव्हां तो आवाज त्याला व्यंगात्मक धिक्कारासारखा वाटला.

: ६ :

जमीन मोजण्यांत पुनः पुनः चुकत चुकत आणि चुकीची दुरुस्ती करत करत अखेरीस गोसाव्याला एका भुयाराची वाट सांपडली. मशाल हातांत घेऊन तो भुयारांत उतरला. बाजूच्या चिरेबंद भिंतीवर शेंवाळें आलें होतें. मधून मधून कांहीं ठिकाणीं पाणी झिरपत होतें. दुसऱ्या कांहीं ठिकाणीं बरेच बेडूक एकमेकांवर झोंपल्यानें, बेडकांच्या ढिगासारखे दिसत होते. त्या निसरड्या वाटेवरून थोडें दूर चालत गेल्यावर गोसाव्याला समोर एक भिंत दिसली; तेथें मार्ग बंद झालेला आढळला. त्याला कांहीं कळेचना. हातांतल्या लोखंडी दांडक्यानें त्यानें भिंतीवर सगळीकडे ठोकून पाहिलें, पण कोठेंहि पोकळपणाचा आवाज आला नाहीं. कोठें एखादें छिद्रहि नव्हतें. तो मार्ग तेथेंच संपला होता, हें निःसंशय झालें.

पुनः तो कागद उलगडून, कपाळाला हात लावून, तो विचार करीत बसला. अशांतच ती रात्र निघून गेली.

दुसरे दिवशीं पुनः मोजणीचें काम संपवून, गोसावी पुनः भुयारांत शिरला. त्या दिवशीं गुप्तसंकेताप्रमाणें बरोबर जाऊन, एका विशिष्ट जागेचा एक दगड सरकवून त्यानें दुसऱ्या बाजूचा मार्ग शोधून काढला. त्या वाटेनें जातां जातां पुनः एके ठिकाणीं मार्ग बंद झाल्याचें त्याला आढळलें.

शेवटीं, पांचवे रात्रीं गोसावी भुयारांत शिरला आणि उद्गारला, " आज मला रस्ता सांपडला ! आज मुळींच चुकणार नाहीं. "

ती वाट अतिशय घोंटाळ्याची होती; वळणा-आडवळणांना मोजमाप

नव्हतें; कांहीं ठिकाणीं वाट इतकी निमुळती होती, कीं वांकून, जवळ जवळ रांगत जावें लागत होतें. अगदीं जपून, मशाल हातांत धरून चालतां चालतां गोसावी एका गोलाकृति घरासारख्या जागीं येऊन पोहोंचला. घराच्या मध्यावर एक मोठी, खोल विहीर होती. मशालीचा उजेड पाडून गोसाव्यानें वांकून पाहण्याचा प्रयत्न केला, पण त्याला तळ–ठाव कांहीं दिसला नाहीं. घराच्या छतापासून एक लठ्ठ, मोठीच्या मोठी लोखंडी सांखळी विहिरींत लोंबकाळत होती. गोसाव्यानें सर्व शक्ति एकवटून ती सांखळी जरा हलवल्याबरोबर खाळून 'ढण्ण्' असा आवाज निघाला, आणि त्याचा पडसाद त्या घरभर उमटला. "सांपडलं !" असें गोसावी एकदम मोठ्यानें ओरडला.

त्याच्या तोंडून तो शब्द निघाल्याबरोबर मोडक्या, जुन्या भिंतीचा एक दगड निखळून दण्कन् खालीं पडला आणि त्याच्या पाठोपाठ धपकन् कांहीं तरी सजीवसें खालीं आपटून, मोठ्यानें किचाळलें! त्या अचानक आवाजानें गोसावी दचकला आणि त्याच्या हातांतील मशाल खालीं पडून विझून गेली.

: ७ :

गोसाव्यानें विचारलें, " कोण तूं ? " पण त्याला कांहींच उत्तर मिळालें नाहीं. तेव्हां तो अंधारांत हातानें चांचपडूं लागला. चांचपडता चांचपडतां, त्याच्या हाताला माणसाचें शरीर लागलें. तें हलवून गोसाव्यानें पुन: विचारलें, " कोण आहेस तूं ?" तरी कांहीं उत्तर मिळालें नाहीं. ती व्यक्ति बेशुद्ध झालेली होती.

तेव्हां, चकमकी ठोकून ठोकून, महाप्रयासानें गोसाव्यानें मशाल पेटवली. तेवढ्यांत ती व्यक्ति शुद्धीवर आली आणि वेदनांनीं ओरडूं लागली.

गोसावी म्हणाला, " आँ ! हें काय ! मृत्युंजय ! तुला ही दुर्बुद्धि कां आठवली ? "

मृत्युंजय म्हणाला, " बाबा, मला क्षमा करा. परमेश्वरानं मला शिक्षा केली आहे. तुम्हांला दगड फेकून मारण्याचा प्रयत्न केला, पण तोल सांभाळतां आला नाहीं आणि घसरून दगडासह मी खालीं आपटलों. "

गोसावी म्हणाला, " मला मारून तुला काय मिळणार होतं ? "

मृत्युंजय म्हणाला, " हा प्रश्न तुम्ही विचारतां ? तुम्ही कशासाठीं माझ्या देवघरांतून तो कागद चोरून आणून या भुयाराच्या वाटेंत फिरताहांत ? तुम्ही चोर आहां ! भोंदू आहां ! माझ्या आजोबांना ज्या बुवांनीं तो कागद दिला होता, त्यांनीं सांगितलं होतं कीं, आमच्या घराण्यांतल्याच कोणाला तरी तो गुप्त संकेत समजेल; तें ऐश्वर्य आमच्याच घराण्याला मिळालं पाहिजे म्हणून, गेले कांहीं दिवस मी बायकामुलं घरीं टाकून अन्न-पाणी-झोंप सोडून सांवलीसारखा तुमच्या पाठीमागून फिरतों आहे.

आज तुम्ही जेव्हां 'सापडलं' म्हणून ओरडलांत, तेव्हां माझ्याच्यानें राहवलं नाहीं;—मी तुमच्या मागोमाग येऊन त्या खबदाडींत दडून बसलो होतों;—तिथला एक दगड काढून तुम्हांला मारायला गेलों, पण अशक्तपणामुळं आणि ती जागाहि निसरडी असल्यानं, पाय घसरून पडलों मी! आतां तुम्ही मला ठार मारलंत तरी हरकत नाहीं—मी समंध होऊन ही दौलत राखीत बसेन;—पण, तुम्हांला ती घेतां येणार नाहीं, केव्हांहि नाहीं! मी ब्राह्मण आहे, ही दौलत लुबाडण्याचा प्रयत्न केलांत, तर तुम्हांला शाप देऊन, या विहिरींत उडी टाकून मी आत्महत्या करीन. हें धन तुम्हांला ब्रह्मरक्त, गोरक्ताप्रमाणं बाधेल,—हें तुम्हांला कधींहि लाभणार नाहीं, सुखानं उपभोग घेतां येणार नाहीं याचा तुम्हांला. या धनसंपत्तीवर जीव ठेवून माझे वाडवडील वारले; या धनसंपत्तीचं ध्यान करत आम्ही दरिद्री झालों; याचा शोध लागावा म्हणून गेले कांहीं दिवस मी अन्न, पाणी, झोंप सगळं सोडून, एखाद्या दळभद्या माथेफिरूसारखा रस्तोरस्तीं, रानावनांतून भटकत राहिलों आहे; माझ्या डोळ्यांदेखत ही धनसंपत्ति तुम्हांला कदापि घेतां येणार नाहीं."

# : ८ :

गोसावी म्हणाला, " मृत्युंजया, ऐक तर मग; सारी हकीकत तुला सांगतों. तुझ्या आजोबांना एक धाकटा भाऊ होता आणि त्याचं नांव शंकर होतं, हें तुला माहीत आहे?"

मृत्युंजय म्हणाला, " हो; ते घरांतून नाहींसेच झाले होते खरे. "

गोसावी म्हणाला, " मीच तो शंकर ? "

मृत्युंजयानें हताश होऊन उसासा टाकला. त्या गुप्तधनावर इतका वेळ त्याला आपला एकमेव हक्क सांगतां येत होता; त्यांच्याच घराण्यांतील एक व्यक्ति तेथें उपस्थित झाल्यानें त्याचा तो एकमेव हक्कवाद संपला.

शंकर म्हणाला, " त्या गोसाव्याकडून कागद मिळाल्यानंतर दादा तो पद्धतशीरपणें माझ्यापासून लपवून ठेवूं लागला; आणि जसजसा तो जास्त लपवालपवी करूं लागला, तसतशी माझी उत्सुकता, कुतूहल वाढूं लागलें. त्यानं तो देवीच्या आसनाखालीं पेटींत लपवून ठेवला होता. मला त्याचा पत्ता लागला आणि दुसरी किल्ली तयार करून मी दररोज त्याची थोडी थोडी नक्कल तयार करून घेऊं लागलों. ज्या दिवशीं माझं तें काम संपलं, त्याच दिवशीं मी त्या गुप्तधनाच्या शोधार्थ घराबाहेर पडलों. घरीं माझी बायको आणि मूल होतं. आज त्या दोघांपैकीं कोणीच हयात नाहीं.

" देशोदेशीं कुठं अन् कसा कसा मी फिरलों, त्याचं विस्तृत वर्णन करून सांगत बसण्याची जरूरी नाहीं. गोसाव्यानं दिलेला कागद एखादा गोसावी किंवा संन्यासी कदाचित् आपल्याला समजावून सांगूं शकेल, असं वाटून कितीतरी बुवांची मीं सेवा केली. पुष्कळ भोंदू बुवांनीं तो

कागद माझ्याजवळून पळवण्याचाहि प्रयत्न केला. अशा रीतीनं वर्षा-मागून कितीतरी वर्षं गेलीं. मला एक क्षणभर सुख नव्हतं, कीं मनाला क्षणाची शांतता नव्हती.

" अखेरीस पूर्वपुण्याई उभी राहिली आणि कुमायुन पर्वतावर बाबा स्वरूपानंद स्वामींची गांठ पडली. त्यांनीं मला सांगितलं कीं, बावा, हांव सोड, तरच विश्वव्यापी अक्षय संपत्ति तुझ्या हातांत गवसेल.'

" त्यांनीं माझ्या मनाचा दाह शांत केला. त्यांच्या प्रसादानं आकाशींचा प्रकाश आणि धरणीची श्यामलता मला राजसंपदेप्रमाणं वाटूं लागली. एके दिवशीं संध्याकाळच्या गार वेळीं डोंगराच्या एका शिळेपाशीं परमहंस बाबांची धुनी पेटली होती—त्या विस्तवांत मीं माझा कागद समर्पण करून टाकला ! बाबा किंचित् हंसले. त्यांच्या त्या हंसण्याचा अर्थ तेव्हां मला कळला नव्हता, आज कळतो आहे. त्यांना नक्कीच वाटलं असावं, कीं कागदाची राख करून टाकणं सोपं असलं, तरी वासना इतकी सहजपणें भस्मसात् होणं शक्य नाहीं.

" कागद जळून, त्याचं कांहीं चिन्हं सुद्धां जेव्हां राहिलं नाहीं, तेव्हां माझ्या भोंवतींचा मला लपेटणारा मोहाचा नागपाश संपूर्णपणें सुटल्यासारखं वाटलं मला. मुक्तीच्या अपूर्व आनंदानं माझं मन कसं भरून गेलं. मला वाटलं, आतां मला कशाचं भय नाहीं—मला जगांतलं कांहींच नको आहे.

" त्यानंतर कांहीं दिवसांनीं परमहंसबाबांची आणि माझी ताटातूट झाली. त्यांना पुष्कळ शोधलं, पण त्यांची दृष्टिभेटहि झाली नाहीं.

" मी तेव्हांपासून बैरागी बनून,निरासक्त मनानं भटकूं लागलों. अशीं बरींच वर्षं गेलीं. त्या कागदाचं मला जवळ जवळ विस्मरणच झालं होतं.

" अशा वेळीं या धारागोलच्या वनांत आलों आणि एका भंगलल्या देवळांत वस्तीला राहिलों. एक दोन दिवस राहिल्यानंतर, देवळाच्या भिंतीवर ठिकठिकाणीं निरनिराळ्या आकृती काढल्या असल्याचं माझ्या ध्यानांत आलं. त्या आकृती माझ्या ओळखीच्या असल्याचं लक्षांत आलं माझ्या.

"एके काळीं ज्याच्या शोधार्थ फिरलों होतो, तें अगदीं हाताशीं सांपडण्यासारखं होतं, यांत कांहीं संशय राहिला नाहीं. मीं म्हटलं, 'आतां इथ राहून उपयोग नाहीं. हें वन सोडून गेलं पाहिजे.'

"पण हातून तें झालं नाहीं. वाटलं, 'पाहूं या तर खरं, काय आहे तें. कुतूहलाचं पुरतं समाधान करून घेऊन मगच जावं, हें बरं.' नंतर, त्या आकृतींचं पुष्कळ निरीक्षण, मनन केलं, पण कांहीं फायदा झाला नाहीं. पुनः पुनः वाटूं लागलं, 'उगीच तो कागद जाळून टाकला; ठेवला असता तसाच, तर काय बिघडणार होतं?"

"तेव्हां मग, पुनः माझ्या जन्मगांवीं गेलों.आमच्या वडिलार्जित वास्तूची झालेली दुर्दशा पाहून मनांत आलं,'मी बैरागीच आहे. मला धनदौलतीची कांहींच गरज नाहीं;पण हे गरीब लोक तरी प्रापंचिक आहेत.ती गुप्त संपत्ति यांच्या साठीं मिळवून आणली, तर त्यांत दोष नाहीं.'

"तो कागद कुठं होता, तें माहीत होतं, त्यामुळं तो हस्तगत करणं मला मुळींच अवघड झालं नाहीं.

"त्यानंतर, तो कागद घेऊन एक वर्षभर या निर्मनुष्य वनांत मोजणी आणि संशोधन करीत बसलों. दुसरी कसलीच मनाला विवंचना नव्हती. जसजशी अडचण येई, तसतसा आग्रह वाढत चालला—एखाद्या वेड्यासारखा अहोरात्र या एकाच गोष्टीचा पाठपुरावा करीत बसलों.

"तेवढ्यांत, तूं केव्हां माझा पाठलाग करूं लागलास, तें मला कळलंच नाहीं. मी नेहमींसारखा असतों, तर तूं मुळींच माझ्यापासून लपून राहूं शकला नसतास. पण मी अगदीं तन्मय झालों होतों, बाहेरच्या घटना माझ्या लक्षांतच येत नव्हत्या.

"पुढं, ज्याचा शोध करीत होतों,तें आतां हेंच मला सांपडलं. इथं आहे, तितकी संपत्ति जगांतल्या कोणत्याहि राजराजेश्वराच्या देखील भांडारांत नाहीं. आणखी फक्त एकच संकेत उमगला, कीं ती संपत्ति हातीं लागेल

"हा शेवटचा संकेतच सर्वांत कठिण आहे. पण, मनांतल्या मनांत मी हाहि उकलला आहे; म्हणूनच, एकदम आनंदानं 'सांपडलं' असा शब्द मोठ्यानं माझ्या तोंडून निघून गेला. मनांत आलं, तर एका क्षणांत या सोन्यामाणकाच्या रत्नभांडारांत जाऊन मी उभा राहूं शकतों."

शंकरचे पाय घट्ट आवळून धरून मृत्युंजय म्हणाला, "तुम्ही संन्यासी आहां. तुम्हांला धनसंपत्तीची कांहीं जरूरी नाहीं,—मला त्या भांडारांत घेऊन जा. मला त्यापासून वंचित करूं नका."

शंकर म्हणाला, "आज माझा शेवटचा पाश तुटला आहे. तूं जो दगड फेकून मला मारण्याचा प्रयत्न केलास, तो माझ्या शरीराला लागला नाहीं, पण त्यामुळं माझ्यावरचं मोहाचं आवरण तुटलं. लालसेचं भयाण रूप आज मला दिसलं. माझे गुरु परमहंसदेवाचं तें गूढ, प्रशांत हास्य आज मला उमगलं!—त्यानं इतक्या कालावधीनंतर माझ्या अंतःकरणांतल्या कल्याणप्रदीपांत संतत प्रकाशाची ज्योत पेटवली आहे."

शंकरचे पाय धरून मृत्युंजय पुनः काकुळतीनें म्हणाला, 'तुम्ही मुक्त आहां, मी मुक्त नाहीं; मला मुक्ति नको आहे. या संपत्तीपासून मला वंचित करूं नका." गोसावी म्हणाला, "वत्सा, तर मग हा तुझा कागद घे. शोधून सांपडली, तर ती संपत्ति तूं खुशाल घे!"

असें म्हणून आपली काठी आणि तो कागद मृत्युंजयाजवळ ठेवून, गोसावी निघून गेला. मृत्युंजय म्हणाला, "माझ्यावर दया करा; मला इथं टाकून जाऊं नका—मला तें सारं दाखवा."

कांहीं उत्तर आलें नाहीं.

तेव्हां, काठी टेकत, हातानें चांचपडत मृत्युंजय भुयारांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करूं लागला. परंतु, वाट अतिशय घोंटाळ्याची, चक्रव्यूहासारखी होती; सारखें अडखळायला होऊं लागलें. शेवटीं, हिंडून हिंडून तो थकला आणि एके ठिकाणीं आडवा झाला; थकल्यामुळें त्याला झोंप लागायला मुळींच वेळ लागला नाहीं.

झोंपेंतून जागा झाला, तेव्हां दिवस होता, कीं रात्र होती, किंवा ती दिवसाची कोणती वेळ होती, कांहीं कळायला मार्ग नव्हता. अतिशय भूक

लागली, तेव्हां उपरण्यांतून पोहे काढून त्यानें खाल्ले. नंतर पुनः चांचपडत भुयारांतून बाहेर येण्याचा मार्ग तो शोधूं लागला. पुनः ठिकाठिकाणीं धडकायला व्हायला लागलें; तेव्हां खालीं बसून तो मोठ्यानें ओरडला, "अहो बुवा, तुम्ही कुठं आहां ?"

त्याच्या त्या हांकेचे प्रतिध्वनि भुयाराच्या वाटा, आडवाटांतून घुमूं लागले. जवळूनच कोठून तरी उत्तर आलें, "मी तुझ्या जवळच आहे; काय हवं आहे तुला ?" मृत्युंजय काकुळतीनें म्हणाला, "कुठं आहे धन-भांडार ? कृपा करून मला दाखवा तें."

त्यावर कांहीं उत्तर आलें नाहीं. मृत्युंजयानें पुनः पुनः हांका मारल्या; तरी काहीं उत्तर आलें नाहीं.

घटका-पळांचे विभाग न पाडलेल्या, भूगर्भांतील त्या अनंत रात्रींत मृत्युंजय पुनः झोंपला. झोंप झाल्यावर जागा झाला तो पुनः अंधार. तो जोरांत ओरडला, "अहो बुवा, आहांत का ?"

जवळूनच उत्तर आलें, "आहे इथंच; काय हवं आहे ?" मृत्युंजय म्हणाला, "मला या भुयारांतून बाहेर घेऊन चला—दुसरं कांहीं नको आहे मला."

" गोसाव्यानें विचारलें, "तुला संपत्ति नको आहे ?" मृत्युंजय म्हणाला, "नको आहे."

तेव्हां चकमकी ठोकल्याचा आवाज झाला आणि कांहीं वेळानें उजेड दिसूं लागला. गोसावी म्हणाला, "ये तर मग मृत्युंजय, या भुयारांतून बाहेर जाऊं या."

मृत्युंजय अगदीं केविलवाणेपणानें म्हणाला, "तर मग, इतकं सारं केलेलं अगदींच व्यर्थ होणार का ? इतके कष्ट सोसूनहि संपत्ति नाहींच का मिळणार ?"

लगेच मशाल विझली. "काय निष्ठुर आहे !" असें म्हणून मृत्युं-जय धपकन् तिथेंच खालीं बसला आणि विचार करूं लागला. वेळेला मोजमाप नव्हतें अन् अंधाराला अंत नव्हता. सारी देहाची, मनाची शक्ति एकवटून तो अंधार मोडून काढावा, असें मृत्युंजयाला वाटलें

प्रकाश, आकाश आणि विश्वांतील विविधतेसाठीं त्याचा जीव वर वर येऊं लागला. तो म्हणाला, " अहो बाबा, अहो निष्ठुर गोसावीबुवा, मला धन-संपत्ति नको. मला बाहेर घेऊन चला. " गोसावी म्हणाला, " संपत्ति नको ? तर मग माझा हात धर. माझ्याबरोबर चल. "

या खेपेला मशाल पेटली नाहीं. एका हातांत काठी आणि एका हातानें गोसाव्याचें वस्त्र धरून मृत्युंजय हळू हळू चालूं लागला. बराच वेळ वळणा आडवळणाच्या वाटांनीं चालून, शेवटीं एका जागीं आल्यावर गोसावी म्हणाला, " थांब. "

मृत्युंजय थांबला. एक गंजलेला लोखंडी दरवाजा उघडल्याचा किर्रकिर्र आवाज ऐकूं आला. कांहीं वेळानें मशाल पेटली आणि—समोरील दृश्य पाहून मृत्युंजय आश्चर्यचकित झाला ! चोहों बाजूंच्या भिंतींना जाड जाड सोन्याचे पत्रे मारलेले होते. जमिनीच्या पोटांत कोंडलेल्या कठिण सूर्यकिरणां-प्रमाणें सोन्याच्या पत्र्यांचे थरांवर थर रचून ठेवलेले होते. मृत्युंजयाचे डोळे चमकूं लागले. एखाद्या वेड्यासारखा तो एकदम उद्गारला, " हें सोनं माझं आहे—हें मला मुळींच टाकून जातां येणार नाहीं. " गोसावी म्हणाला, " बरं, टाकून जाऊं नको; ही मशाल इथं ठेवतों; हें सातूचं पीठ, पोहे आणि हें तांब्याभर पाणी ठेवून जातों. "

पाहतां पाहतां गोसावी तेथून बाहेर पडला; आणि त्या सुवर्णभांडाराचा लोखंडी दरवाजा बंद झाल्याचा आवाज झाला.

मृत्युंजय पुनः पुनः त्या सोन्याच्या राशींना स्पर्श करीत खोलीभर फिरूं लागला, लहान लहान सोन्याच्या चिपा ओढून जमिनीवर टाकूं लागला, मांडीवर घेऊं लागला; एकावर एक सोन्याची चीप आपटून आवाज काढूं लागला; अंगावर सगळीकडे सोनें फिरवूं लागला आणि त्याच्या स्पर्शाचा आनंद घेऊं लागला. शेवटीं, जेव्हां तो थकून गेला तेव्हां एक सोन्याचा पत्रा पसरून, त्याच्यावरच तो झोंपला.

जागा होऊन पाहतो तों, चोहींकडे सोनें चकाकतें आहे, सोन्याखेरीज दुसरें कांहींहि नाहीं. मृत्युंजयाच्या मनांत आलें, पृथ्वीवर येव्हांना सकाळ झाली असेल, सारे पशु-पक्षी आनंदानें जागे झाले असतील. त्यांच्या घरच्या

छोट्या पुष्करिणी शेजारच्या बागेंतून अशा वेळीं येणारा मोहक सुगंध कल्पनेनें जणुं कांहीं त्याच्या नाकांत शिरूं लागला. सकाळच्या वेळीं डुलत डुलत, किलबिल करीत बदकें त्या पाण्यांत येऊन पडताहेत, आणि घरची मोलकरीण पदर बांधून, वर धरलेल्या उजव्या हाताच्या तळव्यावर पितळ, कांशाचीं ताटें, वाट्या इत्यादि बरींच भांडीं घेऊन पाणोठ्यावर येतें आहे; अशीं चित्रें त्याला डोळ्यासमोर स्पष्ट दिसूं लागलीं.

मृत्युंजय दाराला धडके देऊन हांका मारूं लागला, "अहो बाबा, आहांत का?"

दरवाजा उघडला गेला. गोसाव्यानें विचारलें, "काय हवं आहे?"

मृत्युंजय म्हणाला, "मला बाहेर यायचं आहे-पण, बरोबर यांतल्या एक दोन मुद्रां सोन्याच्या चिपा नाहीं का नेतां येणार?"

त्यावर कांहींहि उत्तर न देतां गोसाव्यानें मशाल पेटविली, आणि पाण्यानें भरलेलें एक कमंडलू आणि कांहीं मुठी पोहे जमिनीवर ठेवून तो निघून गेला. दरवाजा बंद झाला.

मृत्युंजयानें पातळसा एक सोन्याचा पत्रा घेतला, तो दुमडला आणि त्याचे तुकडे तुकडे केले. सोन्याचे ते तुकडे मग तो खापराच्या तुकड्यां-प्रमाणें खोलीभर फेंकूं लागला. मधेंच केव्हां तरी चावून, सोन्याच्या पत्र्यां-वर दांतांच्या खुणा उमटवूं लागला. एखाद वेळीं सोन्याचा एखादा पत्रा जमिनीवर टाकून ' त्याच्यावर पाय आपटूं लागला. मनांत तो म्हणत होता, 'असं सोनं घेऊन खेळणारे, सोन्याची फेकाफेक, आपटधोपट करूं शकणारे किती सम्राट जगांत आहेत!' मृत्युंजयाला जणुंकांहीं प्रलयाचा चेव आल्यासारखा झाला होता. त्या सोन्याच्या राशींची मोडून तोडून धुळधाण करावी, सोन्याची धूळ केरसुणीनें झाडून, उडवून टाकावी आणि अशा प्रकारें पृथ्वीवरील साऱ्या सुवर्णलोभी राजामहाराजांना हिणवावें, असें त्याला वाटत होतें.

जितका वेळ शक्य झालें तितका वेळ मृत्युंजय त्या सोन्याची ओढा-ताण करून, सोनें घेऊन खेळला आणि दमून गेल्यावर मग झोंपला. झोंपेंतून उठल्यावर पुनः त्याला भोंवतीं ते सोन्याचे स्तूप दिसूं लागले.

तेव्हां मग, जोरांत दारावर धडके देऊन तो मोठ्यानें ओरडूं लागला, " अहो गोसावीबुवा, मला नको हें सोनं–नको मला सोनं ! "

पण दरवाजा उघडला नाहीं. हांका मारून मारून मृत्युंजयाचा घसा बसला, परन्तु, दार उघडलें नाहीं. एक एक सोन्याची लड घेऊन तो दारावर फेकून मारूं लागला, तरीहि कांहीं उपयोग झाला नाहीं. मृत्युंजयाच्या छातींतला दम कमी झाला. त्याला वाटलें, 'आतां तर मग तो गोसावी येणारच नाहीं कीं काय ? या सोन्याच्या कारागृहांत तिळा-तिळानं, पळापळाला झिजून मरायचं कीं काय ! '

तें सोनें पाहून त्याला भीति वाटूं लागली. विभीषिकेच्या निःशब्द, कठोर हास्याप्रमाणें चोहींकडे सोन्याचे ढीग तस्से उभे होते–त्यांत स्पंदन नव्हतें, परिवर्तन नव्हतें–त्या वेळीं मृत्युंजयाचें हृदय कांपत होतें, व्याकुळ झालें होतें; पण त्याशीं त्यांचा कांहीं लागाबांधा नव्हता–संवेदनांचा कांहीं संबंध नव्हता. त्या सोन्याच्या पिंडांना प्रकाश, आकाश, हवा, प्राण, मुक्ति, कशाचीहि गरज नव्हती. ते सोन्याचे तुकडे त्या चिरंतन अंधारांत, सतत उज्वल राहून ( दगडासारखे ) घट्ट होऊन बसले होते.

'पृथ्वीवर येव्हांना कदाचित् संध्याकाळ झाली असेल. गोधूलीचा मुहूर्त तो. अहाहा ! क्षणभरच डोळ्यांना तृप्त करून, अश्रू गाळीत अंधाराच्या प्रदेशांत निरोप घेणारे ते गोधूलीचें सोनें कोणीकडे ! त्यानंतर, संध्यातारा घरकुलाच्या अंगणाकडे टक लावून पाहत राहते; कुलवधू गोठ्यांत दिवा लावून ठेवून, नंतर घरांतील कोनाड्यांत संध्यादीप लावून ठेवते; देवळांत आरतीची घंटा वाजूं लागते. '

अशा, गांवांतील कितीतरी बारीकसारीक, उपेक्षणीय गोष्टी देखील आज मृत्युंजयाच्या कल्पनादृष्टीपुढें चमकूं लागल्या. संध्याकाळनंतर त्यांचा भोला कुत्रा शेपटींत डोकें खुपसून, अंगाचें वेटोळें करून, अंगणाच्या एका कोंपऱ्यांत झोंपत असे, त्याच्या आठवणीनें देखील त्याला एक प्रकारची हुरहूर वाटूं लागली. धारागोल गांवांत ज्या वाण्याच्या दुकानांत त्यानें कांहीं दिवस वस्ती केली होती, तो वाणी येव्हांना दिवा मालवून, दुकानाच्या फळ्या बंद करून, हळूं हळूं गांवांत आपल्या घराकडे जेवा-

यला निघाला असेल; त्याची आठवण होऊन त्याला वाटूं लागलें, कीं वाणी किती सुखांत आहे! त्याच्या मनांत आलें 'आज कोणता वार आहे कोणाला माहीत! रविवार असेल, तर बाजारांतील लोक येव्हांना आपापल्या घरीं परतूं लागले असतील; कांहींजण वाट चुकलेल्या सोबत्यांना मोठ्यानें हांका मारत असतील; चारचौघे मिळून नावेनें नदीपार होत असतील; रानांच्या कडेनें, शेतांच्या वाटेनें, डोक्यावर टोपल्या आणि हातांत एखादद्दुसरा मासा लोंबकाळता धरून, खेडयांतील घर-कुलांच्या वाळलेल्या बांबूच्या पानांनीं तडीबंद केलेल्या अंगणाशेजारून अंधारांतल्या तारकांच्या क्षीण प्रकाशांत शेतकरी गांवोगांवीं परत चालले असतील.

जामिनीवरच्या त्या विचित्र, विराट, सतत, हलत्या-बदलत्या जीवन-क्रमाशीं त्यानें आपलें जीवन मिसळावें म्हणून, जणुंकांहीं, मातीच्या शेंकडों थरांचा भेद करून,मनुष्यवस्तींतून त्याला साद येत होती.तें जीवन, तें आकाश, तो प्रकाश,जगांतील साऱ्या माणि-माणिक्याहून त्याला अमोल वाटूं लागला होता. त्याला वाटूं लागलें, 'फक्त एकच क्षण, एकदांच, मुक्त आकाशाखालीं, श्यामला धरित्रीमातेच्या धूलिधूसर मांडीवर, त्या तृण-पत्रांच्या वासानें सुवासिक झालेल्या हवेंत शेवटचा श्वास घेऊन मरण्याची संधि मिळाली, तरी माझ्या जीवनाचं सार्थक होईल!'

इतक्यांत दरवाजा उघडला गेला. गोसावी आंत येऊन म्हणाला, "मृत्युंजया, काय पाहिजे?"

तो एकदम म्हणाला, "मला दुसरं कांहीं एक नको आहे—या भुयारांतून, या अंधारांतून, चक्रव्यूहांतून, या सोन्याच्या थडग्यांतून मला बाहेर पडायचं आहे! मला प्रकाश हवा आहे, आकाश हवं आहे, मोकळीक हवी आहे."

गोसावी म्हणाला, "या सोन्याच्या भांडाराहून मूल्यवान रत्नभांडार इथं आहे. एकदां जायचं नाहीं तिथं?"

मृत्युंजय म्हणाला, "नाहीं, नाहींच जायचं मला!"

गोसावी म्हणाला, "एकदां पाहून तरी यावंसं वाटत नाहीं का?"

मृत्युंजय म्हणाला, "नाहीं, मला पाहायचं सुद्धां नाहीं. मला कफनी घालून भीक मागत हिंडावं लागलं, तरी चालेल, पण आणखी एक क्षणहि इथं राहायची इच्छा नाहीं मला."

गोसावी म्हणाला, "ठीक आहे, ये तर मग."

हाताला धरून गोसाव्यानें मृत्युंजयाला त्या विहिरीपाशीं नेला. त्याच्या हातांत तो कागद देऊन गोसाव्यानें विचारलें, "हा घेऊन तूं काय करणार?"

मृत्युंजयानें त्या कागदाचे फाडून तुकडे तुकडे केले आणि त्या विहिरींत फेकून दिले!!



# काबुलिवाला

माझी पांच वर्षांची छोटी मिनी अतिशय बोलकी आहे. बोलल्याशिवाय तिला एक क्षणभरहि चैन पडत नाहीं. जगाच्या पाठीवर जन्म घेतल्यापासून अवघ्या एका वर्षांत ती बोलायला लागली; आणि बोलायला लागल्यापासून, ती जागेपणीं क्षणभरहि गप्प नसते. पुष्कळदां तिची आई तिला रागावून तिचें तोंड बंद करते, पण मला तें साधत नाहीं. मिनी चूप बसली, कीं तें अगदीं अस्वाभाविक वाटतें अन् मला मुळींच सहन होत नाहीं. त्यामुळें माझ्या अन् तिच्या गप्पा जरा उत्साहानेंच चालतात.

सकाळीं माझ्या कादंबरींतलें सतरावें प्रकरण मी लिहायला सुरुवात करणार होतों, तेवढ्यांत मिनी हजर झाली अन् तिनें टकळी सुरूं केली, "बाबा, रामदयाळ दारवान किनई, कावळ्याला म्हणाला, 'कौवा'. त्याला कांहीं कळतच नाहीं; होय कीं नाहीं हो?"

जगांतील भाषाभिन्नत्वासंबंधीं तिला मी कांहीं सांगायला सुरुवात करण्याच्या आंत तिनें दुसरा विषय सुरूं केला. "हें बघा बाबा, भोला म्हणत होता कीं, आकाशांत हत्ती सोंडेनं पाणी उडवतात म्हणून पाऊस



काबुलिवाला आणि मिनी

अनुक्रम .. ............... .. विः ..
क्रमांक ............... नोंः दिः ...१७७......


पडतो. अय्या ! भोला कांहीं तरीच बडबडत असतो. सारखा बडबडतो; रात्रन् दिवस बडबडत असतो."

लगेच दुसऱ्या क्षणीं माझ्या लिहायच्या टेबलाशेजारीं, माझ्या पायापाशीं बसून, आपल्या दोन्ही गुडघ्यांवर हात थापटीत तिनें खेळ सुरू केला आणि तोंडानें भराभर 'आपडी थापडी गुळाची पापडी,' म्हणायला सुरुवात केली.

आमचें घर रस्त्याला लागून आहे. मिनीनें मधेंच 'आपडी थापडी' खेळायचें सोडलें आणि खिडकीपाशीं पळत जाऊन, 'काबुलिवाला, ए काबुलिवाला' अशी मोठ्यानें हांक मारायला सुरुवात केली.

अंगावर मळके, डगळ कपडे, डोक्याला फेटा, खांद्याला एक झोळी अडकवलेली, हातांत दोन-चार द्राक्षांचे घोंस असलेलें खोकें, असा एक उंच काबुलिवाला धीरे धीरे रस्त्यानें चालला होता. त्याला पाहतांच माझ्या कन्यारत्नाच्या मनांत काय आलें कोणास ठाऊक, ती मोठमोठ्यानें हांका मारूं लागली. मला वाटलें, आतां ती झोळीदार पीडा येऊन हजर होणार अन् आपलें सतरावें प्रकरण कांहीं पुरें होणार नाहीं.

परंतु, मिनीच्या हांका ऐकून, हंसून इकडे तोंड वळवून काबुलिवाला आमच्या घराकडे येऊं लागल्याबरोबर मिनीनें जोरांत आंत धूम ठोकली आणि ती दिसेनाशी झाली. त्या झोळींत हाताळून पाहिल्यास तिच्यासारखीं दोन चार जिवंत मुलें त्यांत सांपडतील, असा कांहींतरी तिचा अंधविश्वास होता.

इकडे काबुलिवाला आंत आला आणि मला सलाम करून तो उभा राहिला. (माझ्या कादंबरींतले) प्रतापसिंह आणि कांचनमाला जरी अत्यंत संकटांत सांपडलीं असलीं, तरी त्या माणसाला आंत बोलावून त्याच्याकडून कांहीं विकत न घेणें कांहीं बरें नव्हे, असें माझ्या मनांत आलें.

कांहीं विकत घेतलें. नंतर थोडेंफार बोलणें क्रमप्राप्त झालें. आबदर रहमान, रूस, इंग्रज यांजविषयीं आणि सीमासंरक्षण नीतीबद्दल आमच्या गप्पा सुरू झाल्या.

अखेरीस, जायच्या वेळीं त्यानें विचारलें, "बाबू, तुमची लडकी कुठं गेली ?"

मिनीचें अकारण भय नाहींसें करण्यासाठीं मी तिला आंतून बोलावून घेतली. माझ्या अंगाशीं बिलगून उभी राहून ती काबुलिवाल्याच्या चेहऱ्याकडे अन् त्याच्या झोळीकडे साशंकदृष्टीनें पाहूं लागली. काबुलिवाला झोळींतून किसमिस व सुकामेवा काढून तिला द्यायला लागला, पण ती कांहीं केल्या घेईना; उलट जास्तच साशंक होऊन, माझ्या गुडघ्याशीं आणखी चिकटून उभी राहिली. तिची आणि काबुलिवाल्याची पहिली ओळख अशा रीतीनें पार पडली.

त्यानंतर कांहीं दिवसांनीं, एके सकाळच्या वेळीं मी कांहीं कामानिमित्त बाहेर पडणार तों दाराशेजारच्या बांकावर माझी कन्यका बसलेली आणि तिच्या पायापाशीं तो काबुलिवाला बसलेला, असें दृश्य माझ्या दृष्टीस पडलें. मिनी अविश्रांत बडबडत होती आणि काबुलिवाला हंसत हंसत तें ऐकत होता. मधून मधून, आपल्या अरध-बाटग्या बंगालींत तो प्रसंगानुरूप आपली पसंती–नापसंतीहि हंसतच व्यक्त करीत होता. मिनीच्या पांच वर्षांच्या आयुष्यांत 'बाबा' खेरीज तिला असा धैर्यवान श्रोता कधीं लाभला नव्हता. तिच्या इवल्याशा ओटीभर सुकामेवाहि दिसला मला. मी काबुलिवाल्याला म्हटलें, "तिला हें सगळं कशाला दिलं ? पुनः असं देऊं नको." आणि खिशांतून एक अधेली काढून ती त्याला दिली. त्यानें विनासंकोच ती अधेली घेतली अन् झोळींत टाकली.

घरीं परत आल्यावर पहातों तों त्या अधेलीवरून सोळा आणे गोंधळ माजलेला !

एक पांढरी, चकाकणारी गोल वस्तु हातांत घेऊन, मिनीची आई मिनीला रागावत होती, "कुठं मिळाली तुला ही अधेली ?"

मिनी म्हणत होती, "काबुलिवाल्यानं दिली."

तिची आई विचारत होती, "काबुलिवाल्याजवळची अधेली तूं काय म्हणून घेतलीस ?"

मिनी रडकुंडीला येऊन म्हणाली, " मी मागितली नाहीं, त्यानं आपणच दिली."

मी हजर झालों, आणि मिनीवर लवकरच ओढवूं पाहणाऱ्या पुढच्या संकटांतून तिची सुटका करून, तिला बाहेर घेऊन गेलों.

नंतर मला बातमी लागली, कीं मिनीची काबुलिवाल्याशीं ती दुसऱ्यांदाचीच भेट नव्हती. दरम्यानच्या काळांत तो दररोज येत असे आणि मिनीला बदाम-पिस्त्यांची लांच चारून तिचें चिमुकलें हृदय त्यानें बरेंचसें जिंकलें होतें.

त्या दोन मित्रांत कांहीं विशिष्ट संवाद आणि थट्टा ठरून गेल्याचें मला दिसून आलें. उदाहरणार्थ– रहमत् खाँला पाहतांक्षणीं माझी कन्या हंसत हंसत त्याला विचारीत असे, " काबुलिवाला, ए काबुलिवाला, तुझ्या झोळींत काय आहे रे ? "

रहमत उगीचच एक अनुस्वार जोडून हंसत हंसत उत्तर देत असे, " हाँती. "

म्हणजे, त्याच्या त्या झोळींत जणुं कांहीं हत्ती मावत असे ! असा त्या विनोदांतील बारीक भावार्थ असायचा. मोठा मार्मिक विनोद त्या संवादांत होता, असें जरी नसलें, तरी त्या दोघांची बरीच करमणूक होत असे त्या संवादानें;–आणि शरद्-ऋतूंतील प्रातःकाळीं एक वयस्क आणि एका अल्लड मुलीचें तें सरल हास्य मलाहि आवडे.

त्या दोघांत आणखी एक संवाद चालायचा. रहमत मिनीला म्हणत असे, " पोरी, तूं कधीं सासरीं जायची नाहींस ? "

बंगाली मुलींना जन्मावधि ' सासर ' या शब्दाचा परिचय असतो. परंतु, आम्ही जरा आधुनिक पद्धतीची मंडळी असल्यामुळें, येवढ्याशा मुलीला आम्ही सासरची कल्पना येऊं दिलेली नव्हती. त्यामुळें, रहमतचा आशय तिला नीटसा कळत नसे. पण, त्याच्या प्रश्नाचें कांहींच उत्तर न देतां गप्प राहणें तिच्या स्वभावाविरुद्ध होतें; म्हणून ती त्याला उलट विचारी, " तूं जाशील सासरीं ? "

रहमत काल्पनिक सासऱ्यावर मूठ उगारून म्हणे, "मी सासऱ्याला ठोक देईन."

तें ऐकून, 'सासरा' नामधारी कोण्या एका प्राण्याच्या होणाऱ्या दुरवस्थेची कल्पना मनांत आणून मिनी खूप हंसत असे.

आतां स्वच्छ शरद् ऋतु होता. प्राचीन काळीं या सुमारालाच राजे-रजवाडे दिग्विजयाला बाहेर पडत असत. मी कलकत्ता सोडून कोठें गेलों नव्हतों; आणि म्हणूनच माझें मन जगभर घिरट्या घालीत असे. मी जणुं कांहीं माझ्या घराच्या कोंपऱ्यांत कायम-प्रवासी होतों; बाहेरच्या जगाकडे माझा जीव सदा ओढ घेत असे. एखाद्या परदेशाचें नांव ऐकल्याबरोबर माझें चित्त तिकडे धांव घेई; तसेंच, परकीय व्यक्ति पाहिल्याबरोबर नदी-पर्वत-अरण्यांमधें असलेल्या एखाद्या झोंपडीचें चित्र माझ्या मनापुढें उभें राही आणि तशा आनंदी, स्वतंत्र आयुष्याचें कल्पनाचित्र डोळ्यांपुढें दिसूं लागे.

तसाच, मी इतका घरकोंबडा आहे, कीं माझ्या खोलीचा कोंपरा सोडून बाहेर पडायचें म्हटलें कीं डोक्यावर वज्राघात झाल्यासारखें वाटे मला. म्हणून, सकाळच्या वेळीं, माझ्या लहानशा खोलींत, टेबलाशेजारीं बसून काबुलिवाल्याशीं गप्पा मारल्यानें माझें पुष्कळसें प्रवासाचें कार्य होत असे.

काबुलिवाला मेघमंद्रस्वरांत, मोडक्या तोडक्या बंगालींत आपल्या प्रांतांतील गोष्टी सांगे आणि माझ्या डोळ्यांपुढून 'दोहो बाजूंस उंच, अवघड चढणींच्या लाल पर्वतांच्या रांगा, त्यांमधून जाणारी वाळूची बारीक वाट, आणि पाठीवर ओझीं लादलेल्या उंटांच्या रांगा; तसेंच, फेटे बांधलेले व्यापारी आणि वाटसरू, कोणी उंटावर, तर कोणी पायीं, कोणाच्या हातांत भाले तर कोणाच्या हातांत त्या काळच्या चकमकी ठोकलेल्या बंदुका;—' अशीं चित्रें सरकूं लागत.

मिनीची आई अति संशयी स्वभावाची. रस्त्यावर जरासा गलबला ऐकला, कीं जगांतले सारे दारूडे झिंगत, धांवत आपल्या घराकडे येत

असल्यासारखें वाटतें तिला! हें जग सर्वत्र चोर, दरोडेखोर, दारूडे, साप, वाघ, मलेरिआ, सुरवंट, झुरळें आणि शिपायांनीं भरलेलं आहे, अशी बिभीषिका, इतकीं वर्षें (फार कांहीं नाहींत) जगांत राहूनहि तिच्या मनांतून नाहींशी झालेली नाहीं.

रहमत काबुलिवाल्याबद्दल ती संपूर्णपणें निःशंक नव्हती. त्याच्यावर लक्ष ठेवण्याबद्दल तिनें मला पुनः पुनः आग्रहानें सांगितलें होतें. मी तिचा संशय हंसून उडवून लावायचा प्रयत्न केला असतां तिनें मला कांहीं प्रश्न विचारले होते, 'कोणाचीं मुलें कधीं चोरलीं जातात, कीं नाहीं? काबूल प्रांतांत गुलामांचा व्यापार चालतो कीं नाहीं? एखाद्या अगडबंब काबुलिवाल्यानें एखादें छोटंसें मूल चोरून नेणें अगदींच अशक्य आहे कीं काय?'

तसें होणें असंभवनीय नाहीं, हें मला मान्य करावें लागलें; परंतु तो प्रकार अविश्वसनीय वाटला. विश्वास ठेवण्याची (मानसिक) शक्ति सर्वांची सारखी नसते, म्हणून माझ्या पत्नीच्या मनांत भीति राहून गेली. तरी पण, त्याची कांहींहि चूक नसतां रहमतला आमच्या घरीं यायला बंदी करणें माझ्याच्यानें झालें नाहीं.

दरसाल, माघ महिन्याच्या मध्यावर रहमत आपल्या गांवीं जात असे. त्या सुमारास आपलें सारें येणें वसूल करण्याच्या गडबडींत तो असायचा. घरोघरीं त्याला फिरावें लागे. तरीपण, तो एकदां मिनीला पाहून जात असे. पाहिलें म्हणजे असें वाटायचें, कीं दोघे मिळून कांहीं तरी कट करीत असावींत. ज्या दिवशीं त्याला सकाळीं यायला सवड व्हायची नाहीं, त्या दिवशीं रहमत संध्याकाळीं आलेला दिसे. संध्याकाळीं घराच्या कोंपऱ्यावर त्या सैल चोळणा-अंगारखा घातलेल्या, झोळ्या घेतलेल्या, उंच माणसाला पाहून मनांत एकदम एक प्रकारची भीतियुक्त शंका उत्पन्न होत असे खरी.

परंतु, 'काबुलिवाला, ए काबुलिवाला' अशा हांका मारीत मिनी धांवत आली अन् त्या दोन विषम वयाच्या मित्रांत निष्कपट गप्पा चालू झालेल्या पाहिल्या, म्हणजे मन कसें प्रसन्न होत असे.

एके दिवशीं, माझ्या ल्हानशा खोलींत मुद्रितें तपाशीत बसलों होतों. जाता जातां थंडी विशेष कडक पडली होती. सगळीकडे 'हु: हु: ही: ही :!' ऐकूं येत असे. खिडकींतून सकाळचें ऊन आंत आलें होतें अन् टेबलाखालीं माझ्या पायांशीं पडलेलें होतें. तेवढीच ऊब किती बरी वाटत होती. तेव्हां आठाचा सुमार असावा. डोक्याला गळ्याचा मफलर गुंडाळून सकाळीं फिरायला गेलेले बहुतेक लोक घरीं परतले होते. अशा वेळीं रस्त्यावर एकदम कसला तरी गलबला ऐकूं आला.

पाहतों तों रहमतला दोन पोलिस शिपाई पकडून आणीत असून त्यांच्या पाठोपाठ कुतूहलानें येणारा मुलांचा घोळका असल्याचें मला दिसलें. रहमतच्या कपड्यांवर रक्ताचे डाग आणि एका पहारेकऱ्याच्या हातांत रक्तानें भरलेला सुरा दिसला. दाराबाहेर जाऊन मी पहारेकऱ्यांना थांबविलें आणि विचारलें, "काय भानगड आहे?"

'आमच्या एका शेजाऱ्यानें रहमतकडून रामपुरी चादर घेतली होती. तिचे पैसे द्यायचे होते. तें देणें तो गृहस्थ खोटें बोलून नाकबूल करीत होता. तेव्हां दोघांत बाचाबाची होऊन रहमतनें सुरा मारला' अशी हकीकत कांहींशी त्या पोलिसांकडून आणि कांहींशी रहमतकडून समजली.

रहमत त्या खोटारड्याला उद्देशून नाहीं नाहीं त्या अश्राव्य शिव्या देत होता. तेवढ्यांत, 'काबुलिवाला, ए काबुलिवाला,' अशा हांका मारीत मिनी बाहेर आली.

एका क्षणांत रहमतचा चेहरा कौतुक-हास्यानें खुलला. त्याच्या खांद्याला आज झोळी नव्हती, त्यामुळें झोळीसंबंधींचा त्यांचा ठरलेला संवाद कांहीं झाला नाहीं. मिनीनें एकदमच त्याला विचारलें, "तूं सासरीं जाणार?"

रहमतनें हंसून म्हटलें, "तिकडेच निघालों आहे."

तें उत्तर ऐकून मिनी कांहीं हंसली नाहीं, असें पाहिल्यावर त्यानें आपले हात दाखवीत म्हटलें, "सासऱ्याला ठोक दिला असता, पण काय करूं? हात बांधलेत."

भयंकर मारल्याच्या अपराधाबद्दल रहमतला कांहीं वर्षांच्या तुरुंगावासाची शिक्षा झाली.

त्याला जवळ जवळ आम्ही विसरलों. घरांत बसून, सततच्या संवयीप्रमाणें, रोजचीं ठराविक कामें करण्यांत दिवसानुदिवस काढीत असतांना एक स्वतंत्र, पर्वत प्रांतांत विहार करणारा पुरुष तुरुंगाच्या चार भिंतींत कसे दिवस कंठीत असेल, असा विचारहि आमच्या मनांत येत नसे.

आणि चंचल मिनीचें वागणेंहि अत्यंत लज्जास्पद होतें, हें तिच्या पित्यालाहि कबूल करणें भाग आहे. खुशाल आपल्या जुन्या मित्राला विसरून, तिनें पहिल्यानें 'नबी' सईस बरोबर सख्य केलें. नंतर ती जसजशी मोठी होऊं लागली, तसा तिचा मित्रपरिवार कमी होऊन, तिला एकेक मैत्रिणी मिळूं लागल्या. पूर्वीप्रमाणें ती आतां आपल्या बाबांच्या खोलींतहि येईनाशी झाली.

याप्रमाणें कितीतरी वर्षें गेलीं. पुनः दरसालप्रमाणें शरदृतु आला. मिनीचें लग्न ठरलें होतें. पूजेच्या सुट्टींत लग्न. पर्वतवासिनी देवीबरोबर माझ्या घरची आनंदमयी पित्याचें घर उदास करून आपल्या पतिगृहीं जाणार होती.

ती सकाळ मोठी सुंदर होती. विशेष सौंदर्य घेऊनच तो दिवस उगवला होता. पावसाळ्यानंतरच्या, (जणुं कांहीं) नुकत्याच न्हालेल्या उन्हाला मुशींतून काढलेल्या निर्मळ सोन्याचा रंग चढला होता. इतकेंच काय, पण कलकत्त्याच्या गल्लीबोळांत एकमेकांना चिकटून असलेल्या विटामातींच्या जुन्या पुराण्या अस्वच्छ घरांवरहि त्या उन्हानें अपूर्व लावण्य पसरविलें होतें.

आमच्या घरीं, रात्र संपते न संपते तोंच सनई वाजूं लागली होती. त्या वाद्याचे सूर जणुं कांहीं माझ्या छातीच्या हाडांच्या फांसळ्यांतून हुमसून हुमसून बाहेर येत होते! त्या करुण भैरवी रागिणींत माझी विरहव्यथा मिसळून, जणुं शरदाच्या उन्हाबरोबरच साऱ्या विश्वावर पसरली होती. आज माझ्या मिनीचें लग्न होतें.

सकाळपासून अगदीं धांदल उडाली होती; लोकांची ये-जा सुरू होती; घरच्या प्रत्येक खोलीच्या दाराला तोरण बांधतांना ठक् ठक्, टुंग् टिंग्, आवाज होत होते; एकमेकांना हांका मारणें, इत्यादि जो गलबला सुरू होता, त्याबद्दल बोलायलाच नको.

मी माझ्या लिहायच्या खोलींत बसून हिशोब पाहत होतों, इतक्यांत रहमत आला आणि सलाम करून माझ्यापुढें उभा राहिला.

पहिल्यानें मी त्याला ओळखलेंच नाहीं. त्याची ती झोळी नव्हती, लांब लांब केंस नव्हते, अंगावर पूर्वीचें तेज नव्हतें. शेवटीं त्याचें हंसूं पाहून मी त्याला ओळखलें.

मी म्हटलें, " काय रे रहमत, कधीं आलास ? "

तो म्हणाला, " काल संध्याकाळीं तुरुंगांतून सुटलों. "

त्याचें तें बोलणें कानाला कसें खटकल्यासारखें झालें. एखादा खुनी इसम प्रत्यक्ष डोळ्यांनीं कधीं पाहिला नव्हता. रहमतला पाहून मन एकदम संकोचल्यासारखें झालें. ' आजच्या या शुभ दिवशीं, हा मनुष्य इथून गेलेलाच बरा, ' असें माझ्या मनांत येऊं लागलें.

मी त्याला म्हटलें " आज आमच्या घरीं कांहीं काम आहे, मी गडबडींत आहे, तूं आज जा. "

तें ऐकतांक्षणीं तो जायला निघाला. शेवटीं दाराशीं पोंचल्यावर तो जरा घुटमळला आणि म्हणाला, " पोरगी, एकदां भेटायची नाहीं का ? "

मिनी होती तशीच होती, असें बहुधा त्याला वाटत असावें. मिनी पूर्वीसारखीच ' काबुलिवाला, ए काबुलिवाला, " करीत धांवत येईल आणि त्यांच्या पूर्वीच्या थट्टामस्करीच्या गप्पांत कांहीं व्यत्यय येणार नाहीं, असें बहुतेक त्याला वाटत असावें. इतकेंच काय, पण पूर्वींची मैत्री लक्षांत ठेवून, त्यानें आपल्या कोणत्याशा एका स्वकीय मित्रा-कडून द्राक्षांची एक पेटी आणि सुकामेवा, बहुतकरून मागून घेऊन, त्याचें पुडकें करून, मिनीसाठीं आणलें होतें. त्याची स्वतःची झोळी आतां नव्हती.

मी सांगितलें, " आज घरीं गडबड आहे, आज कोणाची गांठभेट होऊं शकणार नाहीं. "

त्याला थोडें वाईट वाटलेंसें दिसलें. स्तब्ध उभा राहून, एकदां त्यानें टक लावून माझ्याकडे पाहिलें, आणि नंतर, " बाबू, सलाम, " असें म्हणून तो दाराबाहेर निघून गेला.

माझ्या थोडें जीवाला लागल्यासारखें झालें. त्याला परत बोलावून आणावा असें मनांत येऊं लागलें, पण तेवढ्यांत तो आपण होऊनच परत आला.

जवळ येऊन तो म्हणाला, " हीं द्राक्षं आणि हे बदाम-किसमिस पेरीसाठीं आणले होते, तिला द्या. "

मी तो खाऊ घेतला आणि त्याचे पैसे देऊं लागतांच रहमतनें माझे हात दाबून धरले; तो म्हणाला, " आपण फार दयाळू आहां—मी-मी कधींहि विसरणार नाहीं—मला पैसे देऊं नका !—

" बाबू, तुम्हांला जशी एक लडकी आहे, तशी गांवीं माझीहि एक लडकी आहे. तिचा चेहरा आठवूनच मी तुमच्या मुलीसाठीं येवढा तेवढा मेवा हातांत घेऊन येत असतों, मी कांहीं सवदा करायला येत नाहीं. "

येवढें बोलून, त्यानें आपल्या सैल अंगरख्यांत, छातीपाशीं हात घातला आणि छातीशीं ठेवलेला, एक मळका कागद बाहेर काढला. अगदीं जपून घडी उलगडून, त्यानें तो कागद दोन्ही हातांनीं माझ्यासमोर, टेबलावर पसरून धरला.

पाहतों तों कागदावर एका चिमुकल्या हाताचा ठसा ! फोटोग्राफ नव्हे, तैलचित्र नव्हे, नुसती कोळशाची पूड हाताला फासून कागदावर ठसा उमटवून घेतलेला होता. कन्येचें तेवढें स्मरणचिन्ह उराशीं बाळगून, रहमत दरसाल कलकत्त्याच्या रस्त्यांवरून मेवा विकायला येत असे— जणुं कांहीं तो चिमण्या हाताचा स्पर्श त्याच्या विराट, विरही अंतःकरणांत सुधा-सिंचन करीत होता !

माझे डोळे पाण्यानें भरून आले. तो एक काबुली मेवावाला होता आणि मी एक सन्मान्य कुळांतील बंगाली सद्‌गृहस्थ होतों, तें मी विसरलों; तेव्हां मला समजलें, कीं तो आणि मी एकच होतों. तोहि एक पिता होता आणि मीहि एक पिता होतों. त्याच्या पर्वतगृहवासिनी पार्वतीच्या हाताच्या ठशानें मला माझ्या मिनीची आठवण झाली. मी त्याच क्षणीं तिला आंत बोलावणें पाठविलें. त्याबद्दल आंत बरीच कुरकुर झाली, पण मी तिकडे लक्ष दिलें नाहीं. लाल वधुवस्त्र नेसलेली, कपाळावर चंदनाची नक्षी काढलेली, नवऱ्या मुलीच्या वेषांत मिनी माझ्याजवळ येऊन उभी राहिली.

तिला पाहून पहिल्यानें काबुलिवाला भांबावला. त्यांचा जुना संवाद त्याला जमेना. शेवटीं, तो हंसून म्हणाला, "पोरी, तूं सासरीं जाणार?"

मिनीला आतां 'सासर' या शब्दाचा अर्थ कळत होता; आतां तिला पूर्वीप्रमाणें उत्तर देववलें नाहीं. रहमतचा प्रश्न ऐकून ती लाजली अन् मान वळवून उभी राहिली. काबुलिवाला आणि मिनीच्या पहिल्या मुलाखतीचा दिवस मला आठवला. मनांत एक प्रकारची हुरहुर उत्पन्न झाली.

मिनी आंत गेल्याबरोबर एक दीर्घ सुस्कारा सोडून रहमत मट्कन् जमिनीवर बसला. त्याला स्पष्ट कळून चुकलें, कीं त्याची मुलगीहि एव्हांना मोठी झालेली असणार, तिच्याशींहि नव्यानें ओळख करावी लागणार—ती आतां पूर्वीसारखी नसणार! या आठ वर्षांत तिचें काय झालें असेल, कोणास माहीत! सकाळची वेळ. शरद् ऋतूंतील प्रशांत सूर्यकिरणांत सनईचे सूर वाजूं लागले. रहमत कलकत्त्याच्या एका गल्लींत बसून, अफगाणिस्थानचें वाळवंट-पर्वतप्रदेशाचें दृश्य पाहत होता.

मी एक नोट काढून त्याला दिली. मी म्हणालों, "रहमत, तूं तुझ्या देशाला, तुझ्या मुलीपाशीं परत जा. तुमच्या मिलनसुखानं माझ्या मिनीचं कल्याण होऊं दे."

ते पैसे दिल्यामुळें, लग्नसमारंभापैकीं एक दोन गोष्टींची कपात करावी

लागली. मनांत होतें, तशी विजेच्या दिव्यांची रोषणाई करतां आली नाहीं. किल्ल्याचा बँडहि रहित करावा लागला. माजघरांत बायका अत्यंत नाराज झाल्या, असंतोष व्यक्त करूं लागल्या. परंतु, एका मंगल-प्रकाशानें माझ्या घरचें शुभकार्य आणखी उज्ज्वल झालें !

● ● ●



# निबंध

# स्वतंत्र शिक्षण

सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं इंग्रजी पाठशाळेपासून आमची सुटका मुळीं कशी ती नव्हतीच. घरीं आलों, कीं शाळाहि आमच्या पाठोपाठ यायची. मित्राशीं बोलत असूं इंग्रजींत, वडिलांना पत्र लिहीत असूं इंग्रजींत, जिवाभावाच्या गोष्टी इंग्रजी काव्यांत व्यक्त करीत असूं, देशबांधवांना सभेंत इंग्रजी वक्तव्य करूनच आवाहन करीत असूं. आतां त्या तशा पाठशाळेंतून संपूर्णपणें नसली, तरी अधून मधून जेव्हां सुट्टी मिळते, तेव्हां त्या सुट्टींत आपण मनरंजन कोठें करायचें ? शाळेच्या बाहेर, साऱ्या देशांत, आपल्या शिक्षणाचें कांहीं स्वतंत्र क्षेत्र आहे का ?

युरोपप्रमाणें, ज्या देशांत नानाविध चर्चा चालू असतात, निरनिराळ्या वादविवादांतून पाठ्य विषय नित्य तयार होत असतात, आणि जे त्या ( विषयांचा ) आविष्कार, निर्मिति आणि विकास करीत असतात तेच शिक्षणदानाचें काम करतात, तेथील शिक्षण जड-शिक्षण नसतें. तेथें ते विषयच तेवढे पदरांत पडत नाहींत; त्याबरोबर दृष्टि-शक्ति, मननाची उमेद आणि निर्मितीचा उत्साह मिळत असतो. अशा वातावरणांत, पुस्तकी-विद्येचा असह्य जुलूम नसतो; पुस्तकांत जेवढें मिळेल, त्यालाच सर्वस्वीं चिकटून राहावें लागत नाहीं; ( तेवढ्यानेंच संपूर्णपणें बांधलें राहावें लागत नाहीं. )

आपल्या देशांतहि, पुस्तकांना आमच्या मनाचे राजे न बनवितां,

पुस्तकांवर प्रभुत्व येण्यासाठीं जरा विशेषत्वानें विचार करणें जरूर आहे; आणि तो सक्रिय करणें विशेष अगत्याचें आहे.

वंगाल प्रांतांतील साहित्य, इतिहास, भाषातत्व, लोकविवरण, इत्यादि जें जें म्हणून आम्हांला समजलें पाहिजे, त्या साऱ्यांचें विशेषत्वानें संशोधन आणि त्यांविषयीं विचारविनिमय होणें आवश्यक आहे. हे सारे विषय जाणण्याची आमच्यांत साहजिकपणें उत्सुकता असायला हवी होती —परन्तु, आमचा देश आमच्या दृष्टीपुढें अस्पष्ट आणि परकीयांचा देश अधिक परिचयाचा होत आल्यानें, ती उत्सुकता आमच्यांत निर्माण झालेली नाहीं; आमच्या देशाचें यथार्थ विवरण आजपावेतों तयारच झालेलें नाहीं; म्हणून, आपलें वास्तव्य स्वदेशांत असूनहि, आमच्या ज्ञानाच्या लेखीं स्वदेश अत्यंत क्षुद्र बनलेला आहे.

ज्ञान-शिक्षण जवळून दूर आणि परिचिताकडून अपरिचिताकडे या पद्धतीनें झालें, म्हणजे शिक्षणाचा पाया भरभक्कम होत असतो. ज्या वस्तु भोंवतालीं पसरलेल्या नाहींत,ज्या दृष्टीसमोर नाहींत, त्यांबद्दलच जर आम्ही मुख्यत्वेंकरून ज्ञानासाठीं चर्चा करीत राहिलों, तर तें ज्ञान दुबळें होणारच. परिचित असलेलें संपूर्णपणें आणि यथार्थतेनें आत्मसात् करायला शिकल्यानेंच, अप्रत्यक्ष आणि अपरिचितांचें ग्रहण करण्याची शक्ति उत्पन्न होते.

वस्तु आणि वह्या यांचा मेळ घालून शिकण्याची आपल्याला संधीच मिळत नाहीं. आमचें बहुतेक शिक्षण दृष्टीसमोर न दिसणाऱ्या दृष्टान्तांवर आधारित असतें. आपण इतिहास वाचतों; परन्तु, आपल्या देशांतील सर्वसाधारण जनतेच्या जीवन-प्रवाहाशीं संलग्न राहून घडलेला, ज्यांचीं नाना लक्षणें, नाना स्मृति,आपल्या घरीं-दारीं प्रत्यक्ष उमटलेल्या आहेत,त्या इतिहासाची चर्चा आपण करीत नाहीं; म्हणून, इतिहास म्हणजे काय, याची स्वच्छ कल्पना आम्हांला होऊंच शकत नाहीं. आम्ही भाषातत्त्व तोंडपाठ करून परीक्षेंत उच्चांक मिळवतों, परंतु आमची स्वतःची मातृभाषा कालक्रमानें, प्रांताप्रांतांत, नाना रूपांतरांमधूनच आमचा इतिहास कसा सुबद्ध

करून ठेवीत आलेली आहे, तें नीटपणें आम्ही पाहत नाहीं; म्हणूनच भाषाशास्त्र आम्हांला सुस्पष्टपणें कळतच नाहीं. एका भारतांत समाज आणि धर्माच्या जशा बहुविध अवस्था आणि वैचित्र्य आहे, तसें दुसरे कोठेंहि नसेल. संशोधन आणि अभिनिवेशाच्या बैठकीवरून त्या वैचित्र्याचा विचार केला असतां, समाज आणि धर्माचें शास्त्र ( विज्ञान ) आमच्या दृष्टीला जसें स्पष्ट दिसूं लागेल, तसें दूरच्या देशांच्या समाज आणि धर्मासंबंधींचीं पुस्तकें वाचून होणें शक्य नाहीं.

कल्पना अस्पष्ट आणि दुबळी असेल, तर आकलनशक्तीची आशाच करायला नको; इतकेंच काय, पण अशा परिस्थितींत झालेलें आकलन अवास्तव आणि विचित्र असतें. म्हणूनच, पुस्तकांत इतिहास शिकूनहि, इतिहासाविषयीं यथोचित विचार करायला आम्ही शिकलों नाहीं; पुस्तकांत विज्ञान शिकूनसुद्धां अभूतपूर्व काल्पनिकतेला खुशाल विज्ञान म्हणून खपवीत असतों; धर्म, समाज, इतकेंच काय, पण साहित्यचर्चेंतहि आम्हांला यथोचित प्रमाण राखतां येत नाहीं.

प्रत्यक्ष वस्तूशीं संबंध नसतांना होणारें ज्ञान, भावना, जीवन, हीं निर्जीव आणि निष्फळ होत राहतात, हें खरें मानलें, तर आमच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचें त्या निष्फळतेपासून यथाशक्ति संरक्षण करणें अत्यावश्य आहे.

बंगाल प्रांत आपल्याला सर्वांत निकटचा आहे. याची भाषा, साहित्य, इतिहास, समाजशास्त्र इत्यादींकडे विद्यार्थ्यांनीं लक्ष ठेवलें, तर प्रत्यक्ष वस्तूच्या संपर्कानें विद्यार्थ्यांची निरीक्षणशक्ति आणि विचारशक्ति सबळ बनेल; आणि आपल्या सभोंवार असलेला आपला देश जाणून घेण्याची संवय झाली, म्हणजे बाकीचें सारें जाणण्याचा पाया तयार होऊं शकेल.

आपण फक्त दुसऱ्यापाशीं शिक्षण मिळवायचें, पण शिक्षण-विषय स्वतः निर्माण करायचा नाहीं, अशी भीरुता विद्यार्थ्यांनीं मनांत बाळगूं नये. देशाच्या साहित्यनिर्मितीचा भार तेहि घेऊं शकतात. जेथून कलकत्त्याला विद्यार्थी येत नाहींत, असा जिल्हा बंगालमधें नाहीं. ते

विद्यार्थी साऱ्या वंगदेशाची माहिती मिळविण्याच्या कामीं किती साहाय्यक होऊं शकतात आणि त्याची किती आवश्यकता आहे, त्याचीं एक दोन उदाहरणें द्यायला हरकत नाहीं.

बंगाली भाषेचें अद्याप एखादें व्याकरण झालेलें नाहीं. हें काम सोपें नाहीं. कारण, या व्याकरणाचें साहित्य जमविणें अतिशय अवघड काम आहे. बंगालच्या विभागांत प्रचलित असलेल्या उपभाषांचें तुलनात्मक व्याकरणच बंगालचें यथार्थ शास्त्रशुद्ध व्याकरण होईल. आमच्या विद्यार्थ्यांनीं ' एकमेकां साहाय्य ' करून संघटितपणें काम केल्यास या विविध उपभाषांतील साहित्य संग्रहित करणें कठिण होणार नाहीं.

ठिकठिकाणीं, प्राकृत लोकांत नवीन नवीन धर्मसंप्रदाय निर्माण होत नाहींत, असा प्रदेश बंगालमध्यें नाहीं. याची सुशिक्षित लोक मुळींहि दखल घेत नसतात. प्रचंड जनसमूह नकळत्या गतीनें, पावलें न वाजवितां अग्रेसर होतो आहे; आम्ही उपेक्षेनें त्यांच्याकडे पाहत नाहीं; याचा अर्थ ते स्थिर बसलेले आहेत, असा नव्हे—नव्या काळाची नवी शक्ति त्यांच्यांत परिवर्तनाचें कार्य करतेच आहे; तें परिवर्तन कोणत्या मार्गानें चाललें आहे, काय रूप घेतें आहे, तें जर समजलें नाहीं, तर देश समजणें शक्य नाहीं. देश जाणणें, हेंच अंतिम ध्येय, असें मी म्हणत नाहीं. कोठेंहि असो, सर्वसामान्य मानवांत ज्या कांहीं क्रिया-प्रतिक्रिया चालू असतात त्या नीट समजून घेण्यांत एक प्रकारची कृतार्थता असते; पुस्तकाबाहेरच्या जिवंत माणसांचा अभ्यास करण्यांतच एक शिक्षण आहे. त्यामुळें, नुसती माहिती होते असें नाहीं, तर ज्ञानलालसेचा जसा विकास होतो, तसा कोणत्याहि वर्गांतल्या अभ्यासक्रमानें होत नाहीं. विद्यार्थ्यांनीं आपापल्या विभागांतील खालच्या वर्गांत असलेल्या नानाविध धर्मसंप्रदायांचें विवरण संग्रह करून आणलें, तर मनापासून मनुष्याकडे पाहण्यांत जें एक प्रकारचें शिक्षण आहे, तेंहि होईल, आणि त्याचबरोबर देशाचें कामहि त्यांनीं केल्यासारखें होईल.

आपण मानववंशशास्त्राचीं पुस्तकें शिकत नाहीं, असें नाहीं. परंतु, त्या शिक्षणाच्या परिणामीं घराशेजारच्या महार, मांग, ढोर, चांभार अशांची

संपूर्ण माहिती करून घेण्याविषयीं आमच्या मनांत मुळींहि कुतूहल उत्पन्न होत नाहीं, हें पाहिलें, म्हणजे पुस्तकांबद्दल आमच्या किती चुकीच्या कल्पना झाल्या आहेत, तें ध्यानांत येतें. पुस्तकेंच आम्ही मोठीं नि महत्त्वाचीं मानतो, आणि त्या पुस्तकांतून ज्यांचें प्रतिबिंब असतें त्यांना अगदीं तुच्छ समजतो. पण, एकदां ज्ञानाच्या त्या आदिनिकेतनांत आपण जडत्व सोडून प्रवेश केला, म्हणजे मग आपल्या औत्सुक्याला सीमा राहणार नाहीं. आमचे विद्यार्थी मनापासून एकदां आपल्या त्या शेजाऱ्यांचा सारा पूसतपास करूं लागले, म्हणजे काम करीत असतांनाच त्यांना कामाचें पारितोषिक मिळेल, यांत शंका नाहीं.

संशोधन आणि संग्रह करण्यासारखे अनंत विषय आहेत; आपलीं व्रतें, पर्वण्या बंगालच्या एका विभागांत जशा आहेत, तशा दुसऱ्या विभागांत नाहींत. स्थानभेदाप्रमाणें सामाजिक प्रथेंत वेगळेपणा आहे. त्या खेरीज लोकगीतें, बालगीतें, प्रचलित गाणीं इत्यादींमधें जाणून घेण्यासारखे कितीतरी विषय अंतर्भूत आहेत.

कल्पना कितीहि मोठी असली, तरी ती आत्मसात करून, तिचा आविष्कार करायचा झाला, तर कोठें तरी एखाद्या सीमाबद्ध जागेवर हात ठेवणें जरूर असतें. ती कितीहि ल्हान असो, दीन असो, ओलांडून चालत नाहीं. दूरच्याला जवळ करण्याचा एकमेव उपाय, म्हणजे जवळून त्या दूरच्याकडे जाणें. भारतमाता हिमालयाच्या दुर्गम गिरिशिखरांच्या शिलासनावर बसून, सतत करुण सुरांत वीणा वाजवीत आहे, असें ध्यान करीत राहणें, म्हणजे केवळ कल्पनेची गुंगी आहे. परंतु, भारतमाता आपल्याच खेड्यांत, चिखलमय तळ्याडबक्यांच्या शेजारीं, मलेरियानें कृश झालेल्या, प्लीहावृद्धीनें तळमळणाऱ्या रोग्याला मांडीवर घेऊन, त्याच्या पथ्यपाण्यासाठीं आपल्या रित्या भांडाराकडे उदासदृष्टीनें पाहते आहे, हें पाहणें, म्हणजेच खरें पाहणें. व्यासवसिष्ठ–विश्वामित्रांच्या तपोवनांतून, शमीवृक्षांच्या मुळाशीं,जलसिंचन करीत फिरणाऱ्या भारतमातेला दोन्ही हात जोडून नुसता प्रणाम केला तरी पुरे; परंतु, आपल्या घराशेजारीं राहणाऱ्या, लक्तरीं नेसून, अर्धपोटीं राहून, मुलांचें शिक्षण आणि नोकरीची उमेद-

वारी यांसाठीं लोकांच्या घरांत स्वयंपाक करीत फिरणाऱ्या भारतमातेला तसा नुसता दंडवत घालून दूर लोटतां येत नाहीं !

मुलांनों, आज तुमच्या तारुण्यांत अप्रतिबंधपणें प्रवेश करण्याचा मला अधिकार नाहीं. तुमच्या आशाआकांक्षा, आदर्श यांची सुस्पष्ट कल्पना मला येणें अशक्य आहे. तरीपण, आपल्या नवीन किशोर-कालाची स्मृति माझ्या पिकलेल्या केसांखालीं भस्मावृत स्फुलिंगांप्रमाणें अद्याप झांकलेली आहे ! त्या स्मृतीच्या जोरावर मी इतकें निश्चितपणें समजूं शकतो, कीं महत् आकांक्षांच्या रागिणी मनांत ज्या तारेवर झंकारीत असतात, तुमच्या अंतःकरणांतील त्या सूक्ष्म, तीक्ष्ण, प्रभातकाळींच्या सूर्यरश्मींच्या तंतूंनीं तयार झाल्याप्रमाणें उज्ज्वल असलेल्या तारांवर अजून पडित पडल्याचा गंज चढलेला नाहीं. उदात्त ध्येयासाठीं खुशालपणें आत्मसमर्पण करण्याकडे मनुष्यस्वभावाची जी स्वाभाविक प्रगाढ प्रेरणा असते, ती तुमच्या अंतःकरणांतील प्रेरणा क्षुद्र अडथळ्यांच्या वारंवार होणाऱ्या आघातांनीं निस्तेज झालेली नाहीं. तुमच्या त्या अनाघ्रत पुष्पवत्, अखंड पुण्यवत् नवीन हृदयाच्या आशा-आकांक्षांना मी आज तुमच्या देशाच्या सारस्वतवर्गाच्या वतीनें पाचारण करीत आहे; तुमच्या देशांतील काव्य, गाणीं, लोकगीतें, प्राचीन देवळांचे अवशेष, किड्यांनीं खाल्लेल्या जीर्ण पोथ्या, ग्रामीण पर्वण्या, व्रतकथा, खेडेगांवांतील शेतकऱ्यांच्या झोपड्या, यांत वास्तव्य करणाऱ्या प्रत्यक्ष वस्तूंचा स्वतंत्रपणें विचार करण्यासाठीं व चर्चेसाठीं तुम्ही पुढें या. शिक्षणाचे विषय नुसते पुस्तकांतून तोंडपाठ न करतां, विश्वसंसारांत त्यांचा शोध करण्यासाठीं बोलावतो आहे मी तुम्हांला. या हांकेला ओ दिलीत, तरच तुम्ही खरेखुरे विश्वविद्यालयाचे विद्यार्थी व्हाल; अनुकरणाच्या विडम्बनापासून तुमचें साहित्य तुम्ही वांचवूं शकाल; आपल्या देशाची चित्शक्ति दुर्बलतेच्या अवसादांतून जागी कराल आणि जगाच्या ज्ञानीसभेंत तुमच्या देशाला तुम्ही मानाचें स्थान मिळवून देऊं शकाल.

# भारतवर्षाचा इतिहास

भारताचा जो इतिहास आपण वाचतो आणि तोंडपाठ करून परीक्षा देतो, तो म्हणजे भारताला मध्यरात्रीं पडलेल्या दुस्वप्नाचीच फक्त कहाणी होय. कोठून कोण आले, हाणामारी कत्तलींची धमाल उडाली, बापलेकांत, भावाभावांत सिंहासनाबद्दल ओढाताण सुरू झाली; एक जमाव गेला, तर कोठून तरी दुसरा जमाव हजर व्हायचा;—पठाण मोंगल, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज; साऱ्यांनीं मिळून हें स्वप्न उत्तरोत्तर गुंतागुंतीचें केलेलें आहे.

परंतु, या हल्ल्याबदलत्या, रक्तरंजित स्वप्नपटांतून भारताकडे पाहिल्यास भारतवर्षाचें यथार्थ दर्शन होत नाहीं. भारतीय लोक म्हणजे काय, त्यांचें स्थान कोणतें, याबद्दल हा इतिहास कांहींहि सांगत नाहीं. जणुं कांहीं भारतीयांना अस्तित्वच नाहीं, आणि ज्यांनीं कापाकापी, खुनाखुनी केली त्यांनाच तेवढें आहे, (होतें).

त्या तशा विपत्काळीं देखील ही कत्तल आणि खुनाखुनी म्हणजेच भारतांतील महत्तम घटना नव्हत्या. वादळानें कितीहि गडगडाट केला, तरी तें म्हणजेच त्या दिवसाची सर्वात महत्वाची घटना, असें मानतां येत नाहीं. त्या दिवशीं आकाश धुळीनें व्यापलें असलें, तरी खेडोंपाडीं, घरोंघरीं जन्ममृत्यु आणि सुखदुःखांचा प्रवाह चालू असतोच; त्यांवर झांकण पडलें असलें, तरी मनुष्याला त्याच घटना महत्त्वाच्या असतात. परंतु, पर-

कीय पान्थस्थाच्या लेखीं हें वादळच महत्त्वाचं असतें; धुळीनें त्याचे डोळे विशेष भरून गेलेले असतात, त्याला दुसरें तिसरें कांहीं दिसतच नाहीं. कारण, तो घराबाहेर असतो, घरांत नसतो. म्हणून, परक्यांच्या इतिहासांत या धूळ-वादळाचीच हकीकत आढळते; घरची हकीकत कांहींहि आढळत नाहीं. तो इतिहास वाचला म्हणजे वाटतें, कीं जणुं कांहीं भारतवर्ष तेव्हां नव्हताच, फक्त मोंगलपठाणांच्या गर्जनेनें दुमदुमणारें वातचक्र पालापाचोळ्यांच्या ध्वजा उभारून, दक्षिण-उत्तर आणि पूर्व-पश्चिम भिरभिरत राहिलें होतें.

परंतु, विदेशीयांचा प्रभाव असतांनाहि भारत होताच. नाहींतर, हा सारा धुमाकूळ चालू असतांना कबीर, नानक, चैतन्य, तुकाराम यांना कोणी निर्माण केलें ? तेव्हां फक्त दिल्ली आणि आग्रा होता, असें नाहीं; काशी आणि ( चैतन्याची जन्मभूमि ) नवद्वीप हींहि होतींच. त्या वेळच्या खऱ्याखुऱ्या भारतांत जो जीवनप्रवाह वाहत होता, जे प्रयत्नांचे तरंग उसळत होते, ज्या सामाजिक घडामोडी होत होत्या, त्यांचें वर्णन इतिहासांत सांपडत नाहीं.

पण, सांप्रतच्या क्रमिक पुस्तकांत नसलेल्या भारताशींच आपला संबंध आहे. या संबंधाचा वर्षानुवर्षांचा ऐतिहासिक धागा नाहींसा झाला, तर आमच्या हृदयाचा आधारच तुटल्यासारखा होतो. आम्ही कांहीं भरतभूमीवरचे तण नव्हे; शतकानुशतकांच्या अवकाशांत आमचीं शतसहस्र पाळेंमुळें भारताचें मर्मस्थान काबीज करून बसलेलीं आहेत. पण, दुर्दैवानें असा इतिहास आम्हांला वाचावा लागतो, कीं त्यामुळें, नक्की तेंच आमचीं मुलें–बाळें विसरून जातात. असें वाटूं लागतें, कीं आम्ही जणुं कांहीं भारताचे कोणी नव्हेच, आगन्तुक म्हणजेच भारताचें सर्वस्व.

स्वदेशाशीं आपला संबंध आम्ही इतका उपेक्षणीय समजलो, तर आपण जीवनरस मिळवायचा कोठून ? अशा परिस्थितींत, विदेशाला स्वदेशाचें स्थान देतांना आम्हांला यत्किंचितहि खंत वाटत नाहीं; भारताच्या अवमानाबद्दल मरणप्राय दुःख आम्हांला होत नाहीं. आपण अगदीं सहजपणें

म्हणतो, कीं पूर्वी आमचें कांहीं नव्हतेंच, आतां अन्नवस्त्र, रीतरिवाज़ यां-साठीं आम्हांला विदेशीयांपाशीं भिक्षांदेहीच केली पाहिजे.

सुदैवी देशांतील लोकांना त्यांच्या देशांच्या इतिहासांत आपला देश अखंड सांपडतो. लहानपणीं इतिहासच त्यांची त्यांच्या देशाशीं ओळख करून देत असतो. आमचें अगदीं बरोबर त्याच्या उलट आहे. देशाच्या इतिहासानेंच स्वदेश झांकून टाकला आहे. महंमुदांच्या आक्रमणापासून तों लॉर्ड कर्झनच्या साम्राज्यशाही दर्पोक्तींच्या काळापर्यंतची आमची इतिहासकथा, म्हणजे एक विचित्र धुकें आहे. तें आमची दृष्टि झांकून टाकतें; ती कथा स्वदेशाकडे यथार्थपणें पाहण्याला साहाय्यभूत होत नाहीं. ती अशा जागीं कृत्रिम प्रकाश टाकते, कीं त्यामुळें आमच्या देशाची खरी बाजू अंधारांत पडून, आमच्या डोळ्याला दिसेनाशी होते. त्या अंधारांत नवाबांच्या विलासमंदिरांतील चिरागदानांच्या प्रकाशांत नर्तकींचीं मणिभूषणें झगझगून उठतात; बादशहांच्या दारूच्या पेल्यांतील फेस नशेनें तारवट-लेल्या डोळ्यांप्रमाणें लालीलाल दिसतो. त्या अंधारांत आमच्या प्राचीन देवालयांचीं शिखरें गडप्प् होतात, तर सुलतानांच्या प्रियकरणींच्या संगम-रवरी, नक्षीदार कबरींचे घुमट नक्षत्रलोकापर्यंत पोहोंचूं पाहतात. घोड्यांच्या टापांचा खडखडाट; हत्तींचे चीत्कार; शस्त्रास्त्रांचे खणखणाट; दूरवर पसर-लेल्या छावण्यांचे फिकट तरंग; किनखाबी अस्तरांच्या सोनेरी छटा; फेंसाळ बुडबुड्यासारखे, मशिदींचे दगडी मंडप; खोजांच्या पहाऱ्यांतील रहस्यमय राणीवशांत वावरणारी निःशब्द स्तब्धता; या साऱ्यांनीं मिळून विचित्र शब्दांत आणि नानारंग-ढंगांनीं निर्मिलेल्या प्रचंड इंद्रजालाला भारताचा इतिहास म्हणून काय फायदा? त्यानें भारताच्या पुण्यमंत्राच्या पोथीला सुरस आणि चमत्कारिक आरबी कथांचें वेष्टन गुंडाळलेलें आहे. ती पोथी कोणी उघडून पाहत नाहीं; त्या वेष्टनांतील सुरस आणि चमत्कारिक कथांची ओळन् ओळ मात्र मुलें तोंडपाठ करीत असतात. पुढें, प्रलयरात्रीं, मोंगलसाम्राज्य मरणोन्मुख झालें असतां, स्मशानांत गोळा झालेल्या दूर-दूरच्या गिधाडांनीं चालविलेली सारी चलाखी, फसवाफसवी, हाणाहाणी, म्हणजे तरी भारताचें इतिवृत्त काय? पांच पांच वर्षांच्या चौकांनीं आंख-

अनुक्रम ................ विः ........
क्रमांक ................ नों: दि: ........

लेल्या, बुद्धिबळाच्या पटासारख्या, तदनंतरच्या इंग्रजी कारकीर्दीत भारत आणखी लहान झाला; फरक इतकाच, कीं या इंग्रजी कारकीर्दीच्या पटावर पंधरा आणे पांढरेच चौकोन आहेत. आम्ही अन्नाच्या बदल्यांत एका अवाढव्य व्हाइटवे-लेडलॉ दुकानांतून सुराज्य, सुन्याय, सुशिक्षण सारें कांहीं विकत घेत आहोंत, बाकीच्या साऱ्या दुकानांचीं दारें बंद आहेत. या कारखान्यांत न्यायापासून वाणिज्यापर्यंत सारें कांहीं 'सु' असेलहि; परंतु, त्याच्या कारकुनी-शाळेंतील एका कोंपऱ्यांत असलेलें आमच्या भारताचें स्थान अत्यंत क्षुद्र आहे.

सर्व देशांचे इतिहास एकरूप असले पाहिजेत, हा गैरसमज सोडलाच पाहिजे. रॉथचाइल्डचें चरित्र वाचून काळ्याचे पांढरे झालेली व्यक्ति येशु-ख्रिस्ताच्या जीवनचरित्रांत हिशेबाच्या वह्या आणि कचेरीच्या रोजनिशा पाहूं लागेल; आणि तें व्यर्थ असल्याचें ध्यानांत आल्यावर म्हणेल, 'ज्याच्यापाशीं दमडीहि नव्हती, त्याचें कसलें आलें आहे जीवनचरित्र ?' त्याचप्रमाणें, भारताच्या राष्ट्रीय दफ्तरखान्यांत राजवंशावळी व जयपराजयाचे कागदपत्र मिळाले नाहींत, म्हणजे मनाची चलबिचल होऊन, निराशेनें "जिथं 'पॉलिटिक्स' नाहीं, तिथं कसली आली आहे 'हिस्ट्री' ? " असें म्हणणारी मंडळी भाताच्या शेतांत वांगीं शोधूं पाहतात, आणि तीं तेथें सांपडलीं नाहींत, म्हणजे भातालाहि ते पीक मानायला तयार नसतात. सर्व शेतांत एकच धान्य पिकत नाहीं, हें जाणून, जेथें ज उत्पन्न होतें तेथें त्याचीच अपेक्षा करणाराच शहाणा असतो.

येशु ख्रिस्ताच्या जमाखर्चाच्या वह्या पाहून एखाद्याला त्याजविषयीं अनादर वाटणें शक्य आहे; परंतु, इतर गुणसंपत्तीच्या हिशोबीं त्याच्या जमाखर्चाच्या वह्या कवडी किंमतीच्या ठरतात. त्याचप्रमाणें, राष्ट्रीय घडामोडींच्या गणनेंत भारत दरिद्री समजला गेला तरी, इतर वैशिष्ट्यपूर्ण विशेष गुणधन लक्षांत घेतां, भारताचें तें दैन्य यःकश्चित् ठरतें. भारताचें स्वत्व दृष्टिआड करून, लहानपणापासून आम्ही भारताला आणि स्वतःला खच्ची करीत राहिलों आहोंत. आपल्या वडिवडिलांनीं पुष्कळ युद्धें जिंकून देश पादाक्रांत व व्यापारव्यवसाय केल्याचें इंग्रज मुलाला माहीत असतें. म्हणून तो

स्वतःहि रणगौरव, धनगौरव व राज्यगौरवाचा अधिकारी होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतो. आमच्या वाडवडिलांनीं देश पादाक्रांत केले नाहींत, व्यापारउदीम वाढविला नाहीं, एवढेंच आम्हांला माहीत असतें. हेंच ज्ञान व्हावें, म्हणूनच जसा कांहीं भारताचा इतिहास आहे. पूर्वजांनीं काय केलें तें माहीत नसल्यानें, आम्हीं काय करावें तेंच आम्हांला कळत नाहीं. साहजिकच दुसऱ्यांची नक्कल करावी लागते. याबद्दल दोष कोणाला द्यायचा? बाल्यपणापासून ज्या प्रणालीचें शिक्षण आम्हांला मिळतें, त्यामुळें दिवसेंदिवस स्वदेशाशीं आमची ताटातूटच होत राहते; आणि क्रमाक्रमानें स्वदेशाबद्दल आमच्या मनांत विद्रोहाची भावना उत्पन्न होते.

'देश तुम्ही कशाला म्हणतां? आमच्या देशाचें वैशिष्ट्य काय? तें आहेच कोठें, आणि होतें कोठें?' असे उद्गार आमच्या देशांतील सुशिक्षित लोकहि वेड्यासारखे वरचेवर काढीत असतात. प्रश्न विचारून त्यांचें उत्तर सांपडत नसतें. कारण, ही बाब इतकी बारीक अन इतकी मोठी आहे, कीं नुसत्या युक्तिवादानें ती कळणें शक्य नाहीं. इंग्रज काय, किंवा फ्रेंच काय, कोणत्याच देशांतील लोकांना आपल्या देशाचें वैशिष्ट्य काय आणि मर्मस्थान कोणतें नि कोठें आहे, तें एका वाक्यांत व्यक्त करतां येणार नाहीं. कारण, तें देहांतील प्राणाप्रमाणें, प्रत्यक्ष सत्य असून, त्याच्या इतकेंच अनाकलनीय आहे. तें आमच्या लहानपणापासून निरनिराळ्या अदृश्य मार्गांनीं, नानाविध स्वरूपांत आमच्या ज्ञानांत, प्रेमांत आणि कल्पनेंत प्रवेश करीत असतें; आमच्या भूतकाळाचा आणि वर्तमानकाळाचा सांधा तें निखळूं देत नाहीं; तें आपल्या विचित्र शक्तींनीं आम्हांला घडवीत असतें; त्याच्याच प्रसादानें आम्ही मोठे होतो, आमची मोडतोड होत नाहीं. अशा विविध उद्यमसंपन्न, गुप्त, पुरातन शक्तीची व्याख्या करून, एखाद्या संशयखोर, जिज्ञासूला चार दोन शब्दांत तिची कल्पना द्यायची कशी?

भारताची कृतार्थता मुख्यत्वेंकरून कशांत आहे, याचें स्पष्ट उत्तर एखाद्यानें विचारलें, तर त्या प्रश्नाला उत्तर आहे. भारताचा इतिहासच त्या प्रश्नाचें समर्थन करील. प्रभेदांमध्यें ऐक्य स्थापन करण्यासाठीं भिन्न भिन्न

मार्गांना एकाच ध्येयाच्या दिशेनें वळविणें; बाह्यात्कारी भेद अबाधित ठेवूनहि,त्या एकतेचें निःशंकपणें, संपूर्णपणें ज्ञान मिळवणें; आणि अनेकांतील एकता आत्मसात् करणें; यांसाठीं भारत सतत प्रयत्न करीत राहिला आहे.

या एकतेला जाणणें आणि ऐक्यविस्ताराचा प्रयत्न करणें हा भारताचा स्वभावच आहे. या स्वभावामुळेंच भारत राष्ट्रगौरवाच्या बाबतींत सदोदित उदासीन बनलेला आहे. कारण, राष्ट्रगौरवाच्या मुळाशीं विरोधी भावना आहे. जे परकीयांना अंतःकरणापासून सर्वस्वी परके मानूं शकत नाहींत, त्यांना राष्ट्रगौरवाचा लाभ हेंच एक जीवनांतील सर्वश्रेष्ठ ध्येय असें वाटणें शक्य होत नाहीं. दुसऱ्यांच्या पुढें आपली प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न, हीच राजकीय उन्नतीची बैठक आहे; आणि दुसऱ्यांशीं असलेले लागेबांधे व आपसांतील नानाविध भेद-विरोध यांचा समन्वय घालण्याचा प्रयत्न करणें हाच धर्मनैतिक व सामाजिक उन्नतीचा पाया आहे. ज्या ऐक्याच्या पायावर युरोपीय संस्कृति उभी आहे त्या ऐक्याच्या मुळाशीं विरोध आहे; आणि भारतीय संस्कृति ज्या ऐक्यावर अधिष्ठित आहे, तें ऐक्य संगमशील आहे. युरोपीय राजकारणांतील ऐक्याच्या अंतर्यामीं असलेला विरोधाचा फांसा (समाजांतील निरनिराळ्या वर्गांना) एकमेकांशीं गुंतवून ठेवीत असेल; परंतु, तो त्यांना आंतरिक समाधान द्यायला असमर्थ असतो. उलट, त्यानें व्यक्ति-व्यक्ति, राजा-प्रजा, श्रीमंत-गरीब यांमधील अंतर व विरोध सतत जागता ठेवलेला आहे. हे वर्ग आपापल्या निर्दिष्ट अधिकारांनीं समाजाची धुरा वाहण्याऐवजीं एकमेकांना प्रतिकूल असतात. कोणत्याहि दुसऱ्या पक्षाची शक्ति वाढूं नये यासाठीं प्रत्येक पक्ष जागरूकतेनें आणि प्राणपणानें झटत राहतो. साऱ्यांनीं मिळून जेथें धक्काबुक्की चालविली आहे, तेथें शक्तीचें समीकरण असंभवनीय असतें. तशा स्थितींत, कालांतरानें लोकसंख्येला योग्यतेपेक्षां अधिक महत्त्व येतें; औद्योगीकरण गुणांहून श्रेष्ठ ठरतें; व्यापार-उदीमांतून उत्पन्न झालेल्या संपत्तीनें सर्वसामान्यांचे खजिने ओतप्रोत भरूं लागतात. अशा रीतीनें सामाजिक समता नाहींशी होते; आणि या साऱ्या असमान अंगोपांगांची कशी तरी मोट बांधण्यासाठीं सरकार सारखे कायद्यावर कायदे करीत

राहतें. हें अटळ आहे. कारण, विरोधाच्या बीजापासून विरोधच पिकत असतो. आपल्याला जो पुष्ट आणि हाराभरा असा डेरा दिसतो, तो विरोधाच्या वृक्षाचाच असतो.

भारतानें विसदृशांनाहि आप्तबंधनांनीं एकत्र करण्याचा प्रयत्न केला आहे. यथार्थ असलेल्या भेदांना व्यवस्थितपणें यथायोग्य स्थान देऊन त्यांच्यांत ऐक्य निर्माण करतां येतें. समानतेचे नुसते कायदे केल्यानें ऐक्य निर्माण होत नाहीं. जे एक होणें कर्मकठिण, त्यांच्यांत नातें उत्पन्न करण्याचा उत्तम उपाय म्हणजे, त्यांना निरनिराळे अधिकार देऊन अलग ठेवणें. भिन्न असलेल्यांना सक्तीनें एक केलें, तर ते एक ना एक दिवशीं जोरानें पुनः विभक्त होतात, आणि त्या विभक्तीच्या वेळीं प्रलयकाळाची अवस्था येते. भारताला संमिलनाचें रहस्य माहीत होतें. फ्रेंच राज्यक्रांतींत शारीरिक शक्तीनें मनुष्यांतील सर्व भेदाभेद रक्तानें पुसून काढण्याची ईर्षा होती. परंतु, परिणाम झाला आहे उलटा. युरोपांत राजशक्ति, प्रजाशक्ति, धनशक्ति, जनशक्ति दिवसेंदिवस परस्पर विरोधीच होऊं लागली आहे. सर्वांना ऐक्याच्या सूत्रांत गोंवणें, हें भारताचें लक्ष्य होतें, आणि त्यासाठीं उपाययोजना होती स्वतंत्र. भारतानें समाजांतील सर्व परस्पर विरोधी शक्ति मर्यादित आणि विभक्त करून, समाजशरीराला एक आणि विविध-कार्याला उपयोगी बनविलें होतें. आपापल्या कार्यक्षेत्राचें वारंवार उल्लंघन करूं पाहणाऱ्या विरोधाला त्यानें उच्छृंखल होऊं दिलें नाहीं. स्पर्धेतून उत्पन्न होणाऱ्या कलहप्रियतेकडे भारतानें सामाजिक शक्तींना वळूं दिलें नाहीं. त्याचप्रमाणें, गृह, धर्म, कर्म यांना कलहप्रियतेंतून निर्माण होणाऱ्या गढूळ भोंवऱ्यांत सांपडून भ्रांत होऊं दिलें नाहीं. ऐक्यनिर्मिति, संमिलन-सिद्धि,शांतता व स्वस्थता यांत सामाजिक शक्तींची संपूर्ण परिणति करून, मुक्तिलाभाला अवकाश मिळावा, असें भारताचें उद्दिष्ट होतें.

विधात्यानें भारतांत नानातऱ्हेचे लोक ओढून आणले. भारतीय आर्यांना जी शक्ति लाभली, त्या शक्तीचा ऊहापोह करण्याचा अवसर भारताला फार प्राचीन काळापासून मिळालेला आहे. मानवजातीच्या सर्व-श्रेष्ठ, ऐक्यमूलक संस्कृतीचा पाया, भारत नानाविध उपकरणांनीं सतत

रचीत राहिला आहे. परका म्हणून त्यानें कोणालाहि दूर लोटलें नाहीं, अनार्य म्हणून कोणालाहि बहिष्कृत केलें नाहीं, कीं विसंगत म्हणून कोणाचाहि उपहास केला नाहीं. भारतानें सारेंच घेतलें आहे, साऱ्यांचाच स्वीकार केला आहे. इतक्या साऱ्यांचा समावेश केल्यानंतर, आत्मसंरक्षणा-साठीं आपली अशी कांहीं तरी स्वतंत्र व्यवस्था, सांखळी बांधावी लागते. पशूंच्या रणांगणावरील पशूंप्रमाणें या लोकांना एकमेकांवर सोडून चालत नाहीं. यथोचित नियमांनीं विभक्त, स्वतंत्र करून, मूलभूत अशा ऐक्याच्या भावनेनें त्यांना एकजीव राखावें लागतें. उपकरणें कोठलींहि असोत, पण ती सांखळी आणि मूळ स्वभाव खास भारताचाच आहे. युरोप दुसऱ्यांना दूर सारून, विच्छेदन करून, आपला समाज अबाधित ठेवूं पाहतो— याची प्रचीति आपल्याला अमेरिका, ऑस्ट्रेलिआ, न्यूझीलंड, केपकॉलनी या देशांत आजहि येते. याचें कारण, तेथील स्वकीय समाजांतच व्यव-स्थित सांखळी नाहीं; आपल्या स्वतःच्याच भिन्न भिन्न संप्रदायांना त्यांना यथोचित स्थान देतां आलेलें नाहीं. त्या समाजाचींच अंगें असलेल्या अनेकांना ओझ्याची अवस्था आलेली आहे; अशा स्थितींत ते समाज बाहेरच्या लोकांना आपल्यांत कोठें स्थान देणार? आप्तस्वकीयच जेथें उपद्रवजनक असतात, तेथें बाहेरच्या लोकांना कोणी जागा द्यायला तयार असत नाहीं. ज्या समाजांत विशिष्ट सांखळी आहे, ऐक्याची व्यवस्था आहे, सर्वांना स्वतंत्र स्थान व अधिकार आहेत, असा समाजच दुसऱ्यांना सहज आपलेसे करून घेऊं शकतो. दुसऱ्यांना कापून काढून, छिन्नभिन्न करून आपल्या समाजाचें आणि संस्कृतीचें संरक्षण करणें, हा एक मार्ग; दुसरा, आपल्या नियमनिर्बंधानुसार, सुसंगतपणें आणि व्यवस्थितपणें परक्यांना आपल्या सांखळींत गुंतवून घेणें. पहिल्या मार्गाचें अवलंबन करून युरोप साऱ्या जगाशीं विरोध करीत राहिला आहे; आणि भारत दुसऱ्या मार्गानें सर्वांनाच क्रमाक्रमानें, बेताबेतानें आपलेसे करण्याचा प्रयत्न करीत आहे. धर्मावर जर श्रद्धा असेल आणिं धर्म हेंच जर मानवसंस्कृतीचें अंतिम ध्येय असेल, तर भारताचा मार्गच श्रेष्ठ मानावा लागेल.

दुसऱ्यांना आपलेसे करायला प्रतिभा असावी लागते. दुसऱ्यांच्या अंतः-

करणांत प्रवेश करण्याची शक्ति आणि त्यांना संपूर्णतया आपलेसे करण्याची माया यांत प्रतिभेचें स्वत्व असतें. आम्हांला अशी प्रतिभा भारतांत दिसते. भारतानें विनासंकोच, विनासायास परस्थांच्या अंतरंगांत प्रवेश करून त्यांची ( सांस्कृतिक ) सामग्री आत्मसात् केली आहे. विदेशी ज्याला मूर्ति-पूजा म्हणतात, त्याला भारतानें नाक मुरडलें नाहीं, कीं भ्यालाहि नाहीं. पुलिंद, शबर, व्याध इत्यादि जमातींपासूनहि बीभत्सशी सामग्री भारतानें घेतली; तींत आपलें स्वत्व संमिश्र केलें; आणि त्या संमिश्र संस्कृतींतूनहि आपल्या आध्यात्मिकतेचा आविष्कार केला. भारतानें कांहींहि टाकलें नाहीं सगळ्यांचा स्वीकार करून, तें आत्मसात् केलें.

हा ऐक्यविस्तार आणि बांधणी फक्त समाजव्यवस्थेंतच नव्हे, तर भारताच्या धर्मनीतींतहि दिसून येते. ज्ञान, प्रेम आणि कर्म यांचा समन्वय घालण्याचा गीतेंत जो प्रयत्न आढळतो, तो भारताचें वैशिष्ट्य होय. युरोपांत ‘ रिलिजन ’ ( धर्म ) हा जो शब्द आहे, त्याचें भारतीय भाषेंत भाषांतर होणें अशक्यप्राय आहे. भारतानें धर्माला मनाचे भागविभाग पाडूं दिले नाहींत.—आमची बुद्धि, विश्वास, आचरण, इहलोक, परलोक या सर्वांच्या बेरजेनेंच आमचा धर्म बनला आहे. भारतानें त्याला खंडित करून कांहीं पोषाकी आणि कांहीं नागरी होऊं दिलें नाहीं. हाताचें जीवन, पायाचें जीवन, डोक्याचें जीवन, पोटाचें जीवन, हीं अलग अलग नसतात. विश्वासाचा धर्म, आचरणाचा धर्म, रविवारचा धर्म, उरलेल्या सहा दिवसांचा धर्म, किल्ल्याचा धर्म आणि गृहधर्म असे भेद भारतानें होऊं दिले नाहींत. भारताचा धर्म साऱ्या समाजाचा धर्म आहे. त्याचें मूळ भूमींत असून, माथा आकाशांत आहे. मूळ आणि माथा यांकडे भारतानें अलग-अलगपणें पाहिलेलें नाहीं. द्युलोक भूलोक, सारें मानवी जीवन यांना व्यापणारा एक महान् वृक्ष म्हणूनच भारतानें धर्माला लेखिलेलें आहे.

जगाच्या सुसंस्कृत समाजांत भारत अनेकांना एक करणाऱ्या आदर्शरूपानें विराजमान झालेला आहे. त्याच्या इतिहासांतून हेंच प्रतिपन्न होतें. आपल्या आत्म्याच्या ठिकाणीं असलेल्या विश्वव्यापी त्या एकाला अनुभवून, त्याची विविधतेमधें प्रतिस्थापना करायची; ज्ञानानें त्याचा आवि-

ष्कार करायचा; कर्मानें त्याला अधिष्ठान द्यायचें; प्रेमानें जाणून, जीवनांतून त्याचा प्रचार करायचा; नानाविध अडीअडचणींतून, दुर्गति-सुगतींच्या परिस्थितींतहि भारत हेंच करीत राहिला आहे. इतिहासामधून जेव्हां आम्ही भारताचा हा चिरंतन स्वभाव जाणून घेऊं, तेव्हांच आमचा भूतकाळाशीं तुटलेला सांधा वर्तमानाशीं सांधला जाईल.

• • •



# काव्यविभाग

# "लक्ष्मणभाई असेल जर का— "

## ( वनवास )

वनवासाला मला धाडिला
केव्हां जर का बाबांनीं,
मी तों जाणें शक्यच नसणें,
शंका ऐसी तुझ्या मनीं ?
किति दिवसांचीं चौदा वर्षे
त्याची मजला जाण नसे
अरण्य 'दंडक' आहे कोठें
मला ठाउकें तेंहि नसे;
तरीहि जाईन वनवासाला
भीति तिळही नसे मनीं
लक्ष्मणभाई असेल जर का
माझ्यासंगें सदा वनीं.

वनीं साउली झाडाखालीं
माझें घर बांधीन तिथें
वाळु किनारीं पुष्कळ पाणी
समोर वाहिल नदी जिथें.
नाव इवलिशी मला घेउनी .

नदीपार मग होईल
हरिण–पाडसें बागडतांना
माझ्याजवळीं येतील.
हिरवीं पानें चारीन त्यांना
आई, माझ्या हातांनीं,
लक्ष्मणभाई असेल जर का
माझ्यासंगें सदा वनीं.

झाडांवरती बहारलेलीं
रानफुलें ग कितीतरी
त्यांच्या माळा गुंफुनिया मी
माळिन माझ्या डोइवरी.
नाना रंगी नी पिकलेल्या
सडा फळांचा पडलेला
परड्या परड्या भरून नेइन
घरीं बसोनी खाण्याला.
भाऊ भाऊ आम्ही जेवूं
कमळाच्या पानांमधुनी
लक्ष्मणभाई असेल जर का
माझ्यासंगें सदा वनीं.

ऊन कडकतां उदुंबराच्या
सांवलिला मी जाईन
वाजवीन मी तिथें बांसरी
दुजा गुराखी होईन;

फांदीवरुनी मोर-पिसारा
पार खालतीं लोंबेल,
नी खारोटी बागडतांना
शेंपटि पाठीं उचलील.
दोन प्रहरचा ताप उन्हाचा
टाकिल मजला झोंपवुनी
लक्ष्मणभाई असेल जर का
माझ्यासंगें सदा वनीं.

सायंकाळीं करीन गोळा
पाला आणिक पाचोळा
बसून पाहिन वना कडेला
शेकोटीच्या त्या ज्वाळा.
घरां पांखरें परतुनि येतील
कुई कोल्ह्यांची होईल
फांद्यामधुनी पलीकडेही
सायंतारा दिसतील.
पण अंधारीं, आई, तुझ्या ग
मनांत येतील आठवणी
लक्ष्मणभाई असेल जरिही
माझ्यासंगें सदा वनीं.

आजोबांपरि आणिक पुष्कळ
वनांत असतिल ऋषी मुनी,
वंदिन त्यांना, ऐकिन गोष्टी
पायिं तयांच्या बैसोनी.

राक्षसांस मी भिणार नाहीं
　　असतां गुहक मज नेता
काय करिल तो रावण मातें
　　मजपाशीं नसतां सीता ?
जेवूं घालिन हनुमंतासी
　　दूधभात मी कालवुनी
लक्ष्मणभाई असेल जर का
　　माझ्यासंगें सदा वनीं.

आधीं, परंतु, आई, देई
　　छोटा भाई गे मजला,
आम्ही दोघे भाऊ भाऊ
　　मिळून जाऊं रानाला.
रघुनाथाचीं लीला गाणीं
　　शिकीव मजला गे आई,
डोक्यावरती जटा बांध ना
　　बाण–धनू हातीं देई.
चित्रकूट मी गांठीन आई,
　　पावसांतही जावोनी
लक्ष्मणभाई असेल जर का
　　माझ्यासंगें सदा वनीं.

—" शिशु "



# दोन बिघे जमीन

( गद्यानुवाद )

फक्त दोन बिघे होती माझी जमीन; बाकीची
सारी कर्जापायीं गेलेली होती. बाबू म्हणाले,
' बरं का उपेन, ती जमीन मी विकत घेणार आहे."

मी म्हटलं, " आपण भूपति आहां, जमिनीला कमतरता नाहीं; पाहा आपण, मला कशीबशी डोकं टेंकाय्पुरतीच जमीन आहे."

तें ऐकून राजा[1] म्हणाला, " अरे बाबा, मी बाग केली आहे, तें माहीत आहे ना? दोन बिघे मिळाले, म्हणजे लांबीरुंदीनं अगदीं बरोबर होईल. तेवढी जमीन देणं भाग आहे."

डोळ्यांत पाणी आणून, हात जोडून मी म्हणालों, " श्रीमंत, गरिबाची वास्तु तेवढी राखा. ज्या जमिनीवर सात पिढ्या लहानाच्या थोर झाल्या, ती जमीन सोन्याहून थोर असते. गरिबीपायीं त्या माउलीला विकून टाकूं? इतका का मी दळभद्री आहे?"

माझं बोलणं ऐकून, राजाचे डोळे लाल झाले. कांहीं क्षण तो गप्प राहिला. नंतर क्रूरपणें हंसून म्हणाला, " बरं आहे, तें पाहतां येईल."

---

[1] बंगालमध्यें मोठमोठ्या जमीनदारांना राजा म्हणायची प्रथा आहे.

पुढें, महिना दीड महिन्यांत जमीन, राहतं घर, सोडून रस्त्यावर बाहेर पडलों. खोट्या देण्याचे कागदपत्र करून,(जमीनदारानें) जप्ती आणल्यामुळं, मला सारं विकून टाकावं लागलं. अरे! अरे! या जगांत ज्यांच्यापाशीं भरपूर असतं, त्यांनाच आणखी हांव सुटते. राजाचे हात कंगालाचं सगळं कांहीं लुबाडून घेतात. माझ्या मनांत आलं कीं, परमेश्वराच्या मनांत मला मोह-पाशांत ठेवायचं नसेल, म्हणून त्यानं दोन बिघ्यांच्या मोबदल्यांत मला सारं विश्वं लिहून दिलं असावं. एका साधुमहाराजांचा शिष्य झालों. बैरागी बनून देशोदेशीं हिंडूं लागलों. मनाला ओढ लावणारीं, रमवणारीं कितीतरी तीर्थक्षेत्रं आणि दृश्य पाहिलीं; परंतु भुईवरून, पाण्यांत, निवांत जागीं, नाहीं तर गजबजलेल्या गांवांत कुठंहि भटकत, फिरत असलों तरी रात्रंदिवस माझी दोन बिघे जमीन मला आठवायची; तिचा कांहीं विसर पडत नसे. असं भटकण्यांत चांगलीं पंधरासोळा वर्षं निघून गेलीं. शेवटीं, एक दिवस आमच्या गांवीं परतण्याची मला फार फार इच्छा झाली.

तेव्हां मनांत मी म्हणालों, 'माते, हे सुंदरी, वंगभूमि, तुला त्रिवार प्रणाम असो. तुझ्या गंगाकांठीं, शांत हवेनं तूं जीव शांत केलास. तुझी अमाप रानं अन् तुझ्यावरचं आकाश तुझ्या पायाशीं डोकं टेंकवून, तुझी पायधूळ घेतात. दाट सांवल्या असलेलीं तुझीं लहान लहान खेडीं, शांति–समाधानाचीं घरकुलं आहेत. तुझ्या डेरेदार, हिरव्यागार आंबराई, गुराखीबाळांचीं गायरानं, तळ्यांचं शांत, काळंभोर पाणी, रात्रींची प्रेमळ माया, यांची आठवण येते. प्रेमळ मनाच्या बंगाली घरधनिणी पाण्याच्या घागरी घेऊन जात असलेल्या डोळ्यांपुढं दिसतात. आई, तुझी आठवण झाली, कीं जीव कसा तळमळतो!'

(मनाच्या त्या ओढीनं) दोन दिवसांनीं, दुपारच्या वेळीं आमच्या गांवाला मी आलों. उजव्या हाताला असलेली कुंभारवाडी, डाव्या हातची रथ–आळी,[1] बाजार पेठ, गवळीवाडा, गांवांतलं देऊळ, असं सारं

[1] रथयात्रा नांवाचा सण बंगालमध्यें करतात. त्या वेळीं लहान मोठ्या रथांची मिरवणूक काढतात. ज्या आळींत तसले पुष्कळ रथ ठेवलेले असतात त्याला रथ-तला (रॉथतॉला)—रथांची आळी म्हणतात. हा सण रथ-सप्तमीला करतात.

ओलांडून, शेवटीं मी माझ्या घरापाशीं पोंचलों. चातकाची दशा झाली होती माझी. (माझी जमीन मला दिसली. पण, पण–ती पाहून धक्काच बसला मनाला! तिच्याकडे पहात, मनांतल्या मनांत मी म्हणालों—),

"अग निलाजरे, तुझा शंभरदां धिःकार असो. जेव्हां ज्याच्यापाशीं असशील, त्या वेळीं तूं सर्वस्वीं त्याची होतेस. याच तुला का 'आई' म्हणायचं? ज्या वेळीं तूं या गरिबाची आई होतीस, तेव्हां आपल्या पदरांत भरपूर फळं-फुलं, भाजी-पाला घेऊन बसत होतीस, हें आठवतं का? आणि आज कुणाचं मन भुलवण्यासाठीं, कुण्या रीतीचा हा नट्टापट्टा केला आहेस? पदरांत पांचरंगी पानं भरलीं आहेस, तर डोकंभर फुलं माळलीं आहेस. तुझ्यापायीं बैरागी झालों, बेघर होऊन, सुखाला मूठमाती देऊन मी भटकत राहिलों; आणि तूं इथं बसून, राक्षसिणी, हंसून दिवस काढते आहेस! श्रीमंतांनीं केलेल्या कौतुकानं तुला मोठी ऐट आली आहे; इतकी तूं बदलली आहेस. पहिलं तुझं एकहि लक्षण कुठं दिसत नाहीं. तहानभुकेचं निवारण करणारी कल्याणी होतीस कीं ग तूं! आज तूं कितीहि हंसत असलीस, कितीहि नटली असलीस, तरी आज तूं बटकी बनली आहेस. आधीं तूं मालकीण होतीस."

अगदीं थकून भागून गेलों होतों. तरीपण, जमिनीवर चहूंकडे फिर-फिरून पाहूं लागलों. एका बांधापाशीं पूर्वीचं एक आंब्याचं झाड तसंच असलेलं दिसलं! आश्चर्य वाटलं आणि आनंदहि झाला मला. त्या आंब्याच्या झाडाखालीं जाऊन बसलों. डोळ्यांतून घळाघळां पाणी गळलं आणि काळजांतलं दुःख शांत झालं. एकामागून एक लहानपणच्या आठवणी यायला लागल्या. ज्येष्ठी झडींत रात्रीं डोळ्यांना झोंप नसायची आणि पहांटे उठून आंबे वेंचायला जायची गडबड असायची. तो दुपारचा उभा मुकाटपणा, अन् त्या वेळीं शाळा चुकवणं—मनांत आलं, 'आतां कांहीं पुनः या जन्मांत ते दिवस यायचे नाहींत!' तेवढ्यांत एक वाऱ्याची झुळूक आली. जसा कांहीं वारा श्वास टाकून, झाडांच्या फांद्या हलवून गेला; आणि दोन पिकलेले आंबे अगदीं माझ्या मांडीपाशीं



पडले. वाटलं, इतक्या वेळानं आईनं मला ओळखलं. तिनं मायेनं दिलेला तो खाऊ उचलून, मोठ्या भाविकपणानं कितीदां तरी मी कपाळाला टेकवला.

तेवढ्यांत, कुठूनसा, यमदूतासारखा माळी येऊन हजर झाला; आणि तो बुचडा बांधलेला उडिया[1] माळी घसा फोडून शिवीगाळ करायला लागला. मी म्हणालों, "मी मुकाट्यानं माझं सगळं सगळं कांहीं दिलं. दोनच फळं आज घेतो आहे, तर इतका ओरडा आरडा करतोस?" पण, त्यानं मला ओळखलं नाहीं, खांद्यावर काठी टाकून, मला तो पकडून घेऊन गेला. बाबू आपल्या स्नेह्यासोबत्यांबरोबर गळ टाकून मासे पकडीत होते. माळ्यानं सांगितलेली हकीकत ऐकून स्वारी संतापली आणि म्हणाली, "ठार मारीन, माहीत नाहीं!" बाबू जितके बोलतील, त्याहून आंवतेभोंवते शंभरपट जास्त बोलूं लागले.

मी म्हणालों, "महाराज, फक्त या दोन आंब्यांची भीक मागतों आहे मी!" बाबू कुत्सितपणें हंसून म्हणाले, "मोठा साधु सजला आहे, पक्का चोर लेकाचा!"

मी मनांत हंसलों. डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या. मनाशींच म्हणालों, "हेंच का माझ्या कपाळीं होतं! खरंच, महाराज, आपण साधु-थोर!— अन् मी बरीक चोर!!

— "**चित्रा**"

---

[1] ओरिसा—ओढ्या प्रांतांतल्या माणसाला बंगालमध्यें उडिया म्हणतात.

# हिंग् टिंग् छट् !

## अर्थात्

## स्वप्न-मंगल

स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान ।
गौडानंद कवि सांगे ऐके पुण्यवान ।।
स्वप्न पडलं एक हबूचंद्र राजाला,
अर्थबोध होईना गबूचंद्र मंत्र्याला.

उशागतीं बसलेलीं होतीं तीन माकडं
उवा काढायचं काम त्यांचं चाललं होतं फाकडं;
थपडत होतीं बेलाशक इकडं तिकडं केलं तर
उठत होते ओचकारे साऱ्या तोंडावर.
गडप झालीं माकडं अन् वैदु एक आला,
'उडालीं रे पांखरं !', म्हणून रडूं लागला;
आधीं घेतला राजाला उचलून खांद्यावर,
लगेच त्याला ठेविला ऊंच खांबावर.
खांबाखालीं होती एक जख्खड लुकडी म्हातारी;
हांसत खाजवी तळव्यांना गुदगुल्यांनीं बेजारी.
राजा म्हणे, 'पीडा झाली, करूं तरी काय !
आंखडूं जातां वरती, माझे ओळंबती पाय !'
खगापरी राजा करी भारी झटापट्,



कानीं बोले बेंदु तेव्हां, ‘ हिंग् टिंगू छट्ट ! ’
स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान ।
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान ॥ १ ॥

* * *

हबुपूर राज्यामध्यें गेले दिन सात
झोंप नाहीं कोणाला शीत ना पोटांत,
मान लवे खालीं अन् हात मुकट गालीं,
ऐशा जालीं प्रजा सारी चिंतातुर झाली !
खेळ पारखे पोरांना, पंडितांना पाठ,
मुकाट झाल्या महिला साऱ्या घडलें सर्व अचाट !
रांगा रांगा लोकांच्या मुखीं बोल नाहीं,
बोजा वाढे चिंतेचा मान खालीं होई.
भूमिमध्यें दडल्या तत्त्वा झटति शोधाया
किंवा होत्या बसल्या पंक्ति यथेच्छ जेवाया;
अधून मधून श्वास सोडिती उत्कट
फुत्कारिती मधें कोणी, ‘ हिंग् टिंगू छट् ! ’
स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान ।
गौडानंद कवि सांगे ऐके पुण्यवान ॥ २ ॥

* * *

दिशादिशांनीं जमले पंडितांचे दल
अयोध्या, कनोज, कांची, मगध, कोशल;
आले उज्जयिनीहून बुध-अवतंस,
कालिदास कवीच्या भाचऱ्याचा वंश;
मोठमोठ्या पोथ्यांचें उलटती पान,

जोरजोरें हेलकावे शेंडीसह मान;
बड्या बड्या माथ्यावर पिकलेलं शेत
वाऱ्यानें हले जणुं शिर-समवेत.
कोणी पाहे श्रुति, कोणी स्मृति वा पुराण,
कोणी पाहे व्याकरण, कोणी अभिधान;
धागा दोरा गावेना शोध झाला खूप,
वाढे फुका अनुस्वार विसर्गांचा स्तूप.
गूपचूप जाहले, त्यां विकट संकट,
उधाणते मधुनी, ' हिंग् टिंग् छट् ! '
स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यावान ॥ ३ ॥

* * *

निराशेनें बोलले हबूचंद्र राज,
' म्लेंच्छदेशीं आहे म्हणे पंडित-समाज;
एकतरी पाचारुनी आणावा त्यांतून
पकडीमध्यें अर्थ त्याच्या असावा खिळून ! '
पिंगे केंस, निळे डोळे, कपिश[1] कपोल
पंडितांच्या स्वागतासी धडाडती ढोल;
अंगीं काळी, जाडजूड, काट्छाट् कूर्ति,
ग्रीष्मकाळीं उष्मा वाढे भारी उग्रमूर्ति.
प्रस्तावाविना तो घड्याळांत पाही,
' सतरा मिनिटें,' म्हणे, ' जादा वेळ नाहीं;

[1] कपिश = तांबूस

सांगायाचें कांहीं, तर बोला झट्पट्;'
सभा सारी बोले चट्, 'हिंग् टिंग् छट्!'
स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान।
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान॥ ४॥

*　　*　　*

ऐकुनिया स्वप्नकथा लालीलाल झाला,
नयनांत धगागल्या अग्नीच्या ज्वाला;
जोरानें आदळी मूठ डाव्या हातावरी,
'पाचारुनी उपहास?' पंडित विचारी.
हास्यमुखी फरासी, झोंक खान्दान्
छातीवरी हात आणि लवलेली मान,
बोले, 'स्वप्न राजासी साजणारें छान!
अभाग्याला लाभणारें नव्हेचि हें दान!
राजशिरीं बैसलेलें आहेच जरी,
स्वप्नाची त्या खाराखोशी करितो तरी;
अर्थागारीं अर्थ भारी, अर्थ हवा तर,
राजस्वप्नीं अर्थ नाहीं, शोधूं गेलें तर.
नसे जरी अर्थ, तरी वदूं अकपट,
कानीं लागे गोड गोड, 'हिंग् टिंग् छट्!'
स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान।
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान॥ ५॥

*　　*　　*

सारे सभ्य ओरडले, 'अरे! धिक् धिक्!
कोठला हा गंडमूर्ख,[1] पाषंड,[2] नास्तिक!

[1] गंडमूर्ख = महामूर्ख; [2] पाषंड = पाखंड;

म्हणे, स्वप्न ! स्वप्न असे डोक्याचा विकार !
ऐशा निर्णयाचा कैसा करावा स्वीकार ?
धर्मप्राण ख्यात असूं, श्रेष्ठ आमची जात,
आम्हां देखत डाकू करितो स्वप्नासी आघात ! ! '
हबूचंद्र राजा बोले डोळे वटारोनी,
' गबूचंद्र, शिक्षा यांना अपराधांच्या तोलांनीं;
खड्यामध्यें गाडा आधीं खालीं वर कांटे,
कुत्तरड्यांना टाका यांच्या तुकड्यांचे वांटे.'
दहा-सात मिनिटें नव्हतीं संपलीं
म्लेंच्छ पंडिताची जोडी दिसेनाशी झाली.
परिणामीं सभा सारी आनंदें डोले
शांति धर्म दोघांचें पुनः राज्य आलें.
क्षणामध्यें पंडितांच्या मुद्रा त्या सुकट,
घोकताती पुन्हां पुन्हां, ' हिंग् टिंग् छट् ! '
स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान ।
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान ॥ ६ ॥

*　　　　*　　　　*

त्याच वेळीं सभेमाजीं गौडी [१] एक आला
यवनांच्या गुरूनाही भारी असता झाला;
लाज नाहीं, साज नाहीं, डोकें बोडकें,
सोगा कांस फिटणारीं, खोंवितो टोंकें;
काया काडी तोकडी ती प्राणहीन जसा,
शब्द फुटे तेव्हां वाटे आहे जितासा !
क्षेम नाहीं, कुशल नाहीं, नाहीं नमस्कार,
कुलनांव विचारितां भडके अंगार;

[१] गौडी=बंगाली.

ताठ्यानें तो पुसे, 'चाले कशाचा विचार ?
सांगा, सांगा, गोष्टी सांगूं तुम्हांलागी चार;
व्याख्येचीही करूं शकूं उलटापालट,'
एकमुखीं घोष उठे, 'हिंग् टिंग् छट् !'
स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान ।
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान ॥ ७ ॥

*  *  *

गंभीरला गौडी साधु स्वप्न भारुडें
त्याच्यासाठीं प्रहराकांठीं भाष्य बडबडे,
"सरळा आहे अर्थ त्याचा, निर्मळहि फार
पुरातन भावाचा नवा आविष्कार.
त्र्यंबकाचे त्रिनयन त्रिकाळ त्रिगुण
शक्तिभेदी व्यक्तिभेद द्विगुण-विगुण
विवर्तन आवर्तन संवर्तन आदि
जीवशक्ति शिवशक्तिं करी विसंवादी
आकर्षण विकर्षण पुरुष प्रकृति
आणव त्रैंबकबलें आकृति विकृति
कुशाग्रीं प्रवाहमान जीवात्म विद्युत्–
धारणा परमा शक्ति तेथेंच उद्भूत;
त्रयी शक्ति त्रिस्वरूपीं संसारीं प्रकट,
संक्षेपानें म्हणायाचें, 'हिंग् टिंग् छट् !' "
स्वप्न–मंगलाची कथा अमृतसमान ।
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान् ॥ ८ ॥

*  *  *

'वाहवा ! वाहवा !' तेव्हां करी सारी सभा
'किती सोपा अर्थ अहा ! काय विद्येची प्रभा !
अवघड-फक्कड, गढूळ होतें, झालें गंगानीर,
अर्थाचें नभ निरभ्र झालें, सुटला ज्ञान-समीर !'
हायसें होऊन मनीं राजा उभा राहिला,
किरीट काढून डोईचा हातामध्यें घेतला,
हाडकुळा तो बंगाली, त्याच्या माथीं स्थापिला,
किरीटाच्या ओझ्यानें मानकांटा मोडला !
फारां दिनीं चिंतेचें अघ[1] दूर झालें
हबूराज्य आनंदें हलूं डोलूं लागलें;
वृद्धांमुखीं पंचम्,[2] बालाननें रंगलीं
बायकांचीं तोंडें पुनः एकदम चालूं जाहलीं !
देशव्यापी माथेशूळ झडून गेला झट्
कळून चुकलें, म्हणजे काय 'हिंग् टिंग् छट् !'
स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान ।
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान् ॥ ९ ॥

*　　　*　　　*

स्वप्न-मंगलाची ही कथा
ऐकणाऱ्याची करील मुक्तता
सर्व भ्रमापासोनी सर्वथा
अन्यथा होणें नसेचि ॥
विश्वीं विश्वविचाराची चिंता
फसवूं न शके श्रवण करतां
'सत्य,' 'सत्य,' तें सर्व मिथ्या

[1] अघ = संकट. [2] पंचम् = पान.

होईल जाणता अवचित ॥
'आहे' चें होईल 'नाहीं'
'नाहीं' मध्येंच 'आहे' राही
ऐशि स्थिति प्रतीत होई
श्रोत्यापुढें धडधडून ॥
भासे लोकांस सरळ नीट
त्यासी लावील आपुलें शेंपूट
(लढवोनीया तर्क विकट
आत्मप्रौढी मिरविण्या) ॥
याहो भाई, द्या जांभई, पडून राहा चीत्
संसारीं या अनिश्चित एक मात्र निश्चित—
जग आहे मिथ्या, सर्वभर माया,
स्वप्न एक खरेंखुरें ! बाकी सर्व वायां !
स्वप्न-मंगलाची कथा अमृतसमान ।
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान !

—"सोनार तरी" (सोन्याची नाव)



राणीनं काशाचं ताट पठाण राजाच्या कपाळावर मारलं !



# रंगपंचमी

('होरिखेला' या कवितेचा गद्यानुवाद)

युद्धांत हार झाल्यावर, भुनाग राजाच्या राणीनं केटा शहर सोडलं आणि ती केतूनला जाऊन राहिली. केतूनहून तिनं पठाण केशर खाँला पत्र पाठवलं, 'मियाँसाहेब, लढाई करून आपली हौस फिटली आहे; वसन्तऋतु डोळ्यावरून चालला आहे; आपलं पठाण सैन्य घेऊन या, आम्ही रजपूतरमणी रंगपंचमी खेळूं आपल्याशीं.'

पत्र वाचून, केशर खाँ आनंदानं हंसला. ऐटीनं मिशीला पीळ दिला त्यानं. डोक्यावर रंगीत फेटा चढवला; डोळ्यांत सुर्मा घातला; सुवासिक रुमाल हातांत घेतला; आणि हजारदां दाढी झटकली. पठाणांबरोबर राणी रंगपंचमी खेळणार होती, म्हणून केशर हंसला आणि त्यानं मिशीला पीळ दिला.

फाल्गुन मास. दक्षिणेचा वारा झिंगल्यासारखा वाहात बकुळीच्या बनावर आला होता. आंबराईतल्या वृक्षांना मोहोर आला होता. भुंगे, कोणाचे कोणी न ऐकतां, स्वच्छंदानं गुंजारव करीत फिरत होते.—झुंडी झुंडीनं आज पठाण सैनिक केतूनला रंगपंचमी खेळायला आले होते.

केतूनपूरला राजाच्या उपवनांत नुकती सांज होऊं लागली होती. पठाण सैनिक बनांत येऊन उभे राहिले. मुलतानी रागांत बांसरी वाजायला लागली. अशा वेळीं राणीच्या शंभर रजपूत दासी रंगपंचमी खेळायला आल्या. सूर्य त्या वेळीं रक्तरंगानं रंगलेला होता.

दासींच्या पाया-पायांवर घागरे डोलूं लागले. दक्षिणेच्या वाऱ्यानं ओढण्या उडूं लागल्या. उजव्या हातांवर त्यांनीं गुलालाच्या थाळ्या घेतल्या होत्या; कमरेला पिचकाऱ्या लोंबत होत्या, डाव्या हातांत गुलाब-पाण्याच्या झाऱ्या; अशा थाटांत रांगारांगांनीं त्या आल्या.

डोळे मिचकावून, मिस्किलपणें हंसत जवळ येऊन केशर म्हणाला, " पुष्कळ युद्ध करून, जगून वांचून आलों, पण आज जान-प्राण जाणार असं वाटतं ! " तें ऐकून राणीच्या शंभर सहचरी एकदम मोठ्यानं हंसल्या. लाल रुमाल हलवीत केशर खाँ पुढं झाला आणि त्यानं सलाम केला.

खेळ रंगांत आला. संध्याकाळच्या लाल आकाशांत गुलाल उधळा-यला लागला. वकुलफुलांना नव-रंग चढला. झाडांखालीं रक्त-रेणूंचा सडा पडला. रजपूत रमणींच्या हंसण्याच्या गडगडाटानं पक्षी भयभीत होऊन, कूजन करीनासे झाले.

केशर खाँच्या मनांत येऊं लागलं, ' डोळ्यांना गुंगी आल्यासारखं कां वरं होत नाहीं ! छाती आनंदानं डोलत नाहीं कशी माझी ! या स्त्रियांच्या पायांतल्या नूपुरांची रुणझुण कशीतरी बेसूरी लागते आहे.

' रजपूत रमणींच्या शरीराला कुठं कांहीं कोमलता कशी नाहीं ! बाहू कमलनालाप्रमाणं नाहींत. आवाज तर विजेच्या कडकडाटालाहि लाजवणारा आहे. वाळवंटांतल्या मंजिरीविहीन वेली जितक्या स्वतंत्र, तितक्याच रुक्ष. ' पठाणाला सारखं वाटूं लागलं, ' खरंच, रजपूत स्त्रियांच्या देहयष्टींत किंवा मनांत मुळींच कोमलता कशी ती नाहींच ! '

द्रुत तालानं, यमन रागांत बांसरी वाजूं लागली. तेवढ्यांत, कुंडलाला मोत्यांचे सर लोंबत असलेले, कणखर हातांत लठ्ठ लठ्ठ सोन्याचे गोट,

असा साजशृंगार केलेल्या दासीच्या हातांत गुलालाचं ताट देऊन, तिच्या बरोबर राणी बनांत आली. त्या वेळीं यमन रागांत, द्रुत तालांत बांसरी ताना छेडत होती.

केशर खाँ म्हणाला, "तुमची वाट पाहून पाहून डोळे शिणले माझे; आंधळा व्हायची पाळी आली." राणी म्हणाली, "माझीहि तीच स्थिति झाली आहे." तें ऐकतांक्षणीं शंभर दासींची हंसून मुरकुंडी वळली. **इतक्यांत राणीनं कांशाचं ताट पठाण राजाच्या कपाळावर भिरकावून मारलं!** रक्तधारा वाहूं लागल्या. डोळे फुटले त्याचे!

मेघ नसतांना, विजेच्या कडकडाटाप्रमाणं एकदम नगारे-चौघडे झडूं लागले. चांदणी-आकाशांत चंद्र चमकून उठला. तलवारींचा खणखणाट सुरू झाला. दरवाजाशीं तेव्हां कानडा रागांत सनई वाजूं लागली.

कुंजवनांतल्या झाडा-झाडाखालीं चौघडे, नगारे वाजूं लागले.

वाऱ्यावर ओढण्या उडून गेल्या. सगळे घागरे गळून पडले. जणुं कांहीं कोण्या मंत्रानं, स्त्रीवेष सोडून कुठून कोण बाहेर आले! फुलांतून बाहेर पडलेल्या सर्पाप्रमाणं शंभर वीरांनीं पठाणाला वेढलं! स्वप्नाप्रमाणं ओढण्या उडाल्या, घागरे गळून पडले!

ज्या वाटेनं पठाण आले होते, त्या वाटेनं ते परत गेले नाहींत. त्या फाल्गुन रात्रीं, कुंजवितानांत तल्लीन झालेल्या कोकिळांचें कुहू कुहू कूजन थांबेच ना. केतुनपूरच्या बकुळीच्या बनांत केशर खाँचा खेळ खलास झाला! ज्या वाटेनं पठाण आले, त्या वाटेनं ते कांहीं परत गेले नाहींत!

(—स्वर्गाच्या वाटेनं जगाबाहेर पडावं लागलं होत त्यांना)

—"कथा"

# चरम—मूल्य

## ( अमोल-मोल )

भारा घेवुनिया माथीं
फिरलों मीं रस्तोरस्तीं
" घेतां का हो माल कुणी,
मोल पूरेसें देवोनी ? "
पुकार ऐसा
रात्रीं दिवसां
येती जाती हांसोनी
किंवा मजला चेष्टोनी.
नाढळला कीं एक धनी
फिकीर झाली खरी मनीं.

ऐन दुपारीं राजपथीं
जळजळत्या फरशीवरती
भारा माझा सादविला
रथारूढ राजा आला
कृपाण—पाणि
मुकुटधारिणी


स्वारी; बोलली भाव भला,
" बळेंचि उठवीन मालाला."
ओढाताणींत शक्ति नुरे,
श्रीधर गेले माघारे !

बोळामधल्या एक घरीं
ताठ राहिला जो दारीं
जख्ख थेरडा धरी करीं
हामीण भरली मुखावरी.
" या सोन्यानें
भरपूरानें
खरेदीन रे, माल तुझा, "
असें बोलतां थैलि वजा;
खजील झाला म्हातारा,
मीहि धरिला मार्ग बरा.

मोहोरलेल्या तरूवरी
शांत चंद्रिका निशाचरी
बकुलतरूच्या सांवलीला
दिसली तरुणी तों मजला;
" एक स्मितानें
मधु लीलेनें
भारा घेणें तुम्हां सवें
अवघड मजला जरा नव्हें."
स्मित अश्रूंनीं विरघळलें,
खिन्न मनानें परतविलें.

सागर भरतीची वेळा,
आणि किनारा उजाळला,
शिंपा हातीं वाळुमधें
खेळत होता बाल मुदें
" तुम्हांस घेईन,
कांहीं न देईन; "
मला म्हणे तो ओळखिनें;
विमुक्त केलें वचनानें.
विनामूल्य मज खरीदलें,
क्रीडानंदें क्षण कालें ! !

—" **गीतिमाल्य** "



# जोड्यांची जन्मकथा

( ' जुतार आविष्कार ' या कवितेचा गद्यनुवाद )

( एक होता राजा. त्याचं नांव होतं हबुचंद्र. हबुचंद्राचा मंत्री होता गबुचंद्र. )

एकदां हबुचंद्र राजा आपल्या मंत्र्याला म्हणाला, " गबुचंद्र, काल साऱ्या रात्रभर मी एका गोष्टीचा विचार करीत होतों. जमिनीवर पाय ठेवल्याबरोबर माझ्या पायाला धूळ काय म्हणून लागावी ? तें कांहीं उपयोगाचं नाहीं. तुम्ही सगळे नुसते पगार वांटून घेतां; पण राजाच्या कामाकडे तुमचं मुळींच लक्ष नाहीं. माझ्याच राज्याची माती, माझ्याच पायाला लागावी, म्हणजे काय ? याचा ताबडतोब बंदोबस्त झालाच पाहिजे. नाहींतर कोणाची धडगत नाहीं. "

तें ऐकून गबुचंद्राला भयंकर काळजी उत्पन्न झाली. घामाघूम झाला बिचारा. त्याचा चेहरा पांढरा फटक पडला. डोळ्यांवरची झोंप उडाली. त्याच्या स्वयंपाकघरांतला स्वयंपाक थांबला, चुली थंडावल्या. घरामधें रडारड सुरूं झाली. शेवटीं गबुचंद्रानं हबुचंद्राच्या पायाशीं कैफियत दिली, " सरकार, आपल्या पायाला जर धूळच नाहीं लागली, तर आम्हां पामरांना आपल्या पायधुळीचा लाभ कसा व्हावा ? "

हबुचंद्राचं बोलणं ऐकून राजा खूष झाला. तरीपण, डुलत डुलत

म्हणाला, " हं, तुझं म्हणणं खरं आहे. पण आधीं धुरळा तरी नाहींसा करा, मग पायधुळीचा विचार करतां येईल; आणि धूळ नाहीं म्हणून तुम्हांला पायधुळीची पंचाईत पडणार असेल, तर तुम्हां सर्वांना मी उगीचच पगार देतों म्हणायचा! इतकाले पगार देऊन शास्त्रज्ञ नोकर मी पोसतो आहे तें फुकटच कीं काय? त्यांनीं करावी कांहीं तरी पायधुळीची व्यवस्था;–बरं, पण आधींचं काम तुम्ही अगोदर करा, नंतर पुढच्या कामाचं पाहतां येईल."

गबुचंद्राच्या डोळ्यांना अंधारी आली. त्यानं नंतर अगदीं काळजी-पूर्वक देशोंदेशींहून विद्वान्, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ मंडळी बोलावून आणली. सगळे डोळ्यांना चष्मा लावून विचार करायला बसले. विचार चालू असतांना एकोणीस पिंप तपकिरीचा फडशा उडाला. विचार करकरून शेवटीं ते म्हणाले, " माती नाहींशी झाली, तर धान्य पिकायचं कसं?"

राजा म्हणाला, " तर मग पंडित लोक आहेत कशाला?"

तेव्हां साऱ्यांनीं मिळून पुनः विचार करून एक युक्ति शोधून काढली. साडे सतरा केरसुण्या आणल्या विकत. केरसुण्यांच्या पराक्रमानं राजाचे नाक-डोळे धुळीनं भरून गेले. धुळीपायीं कोणाला डोळे उघडायची सोय राहिली नाहीं. धुळीच्या लोटांनीं सूर्य झांकला गेला. खोकून खोकून लोकांचा जीव जायची पाळी आली. धुळीनं सारं गांव हैराण झालं.

राजा म्हणाला, " धूळ नाहींशी करायला जाऊन साऱ्या गांवभर धुरळा करून टाकला झालं!"

तेव्हां मग एकवीस लाख भिस्ती काखेंत आपापल्या पाण्याच्या पिशव्या अडकवून, झुंडीनं बाहेर पडले. नदी, ओढे, तळीं, कुठं कुठं पाणी शिल्लक ठेवलं नाहीं त्यांनीं. तळचा चिखल तेवढा राहिला. पाण्यांतले प्राणी पाण्यावांचून तडफडायला लागले. कांठावरच्या प्राण्यांना पोहायची पाळी आली. गांवभर झालेल्या चिखलानं खरेदी-विक्रींचे व्यवहार बंद पडले. पडसं–तापानं गांव बेजार झालं.

अनुक्रम ........................ वि. ........
क्रमांक ........................ नों. दि. ........



राजा म्हणाला, " असले गाढव आहेत सगळे. धूळ बसविली आणि जिकडे तिकडे चिखल केला यांनीं. "

गबुचंद्रानं पुनः सगळ्या शहाण्यांना, गुणी लोकांना बोलावलं. बसले सगळे विचार करायला. डोळ्यांपुढं काजवे चमकायला लागले. कशानं धुरळा नाहींसा करावा, हें कांहीं त्यांना सुचेना. कोणी म्हणाले, "साऱ्या पृथ्वीवर हांतऱ्या अंथरा. नाहींतर फरशा घालून धुरळा नाहींसा करूं या. " कोणी म्हणाले, " राजाला खोलींत कोंडून ठेवा, अन् खोलीला एकहि छिद्र ठेवूं नका. धुळीवर त्यांनीं पायच ठेवला नाहीं, म्हणजे पायाला धूळ लागायचं कारणच नाहीं. "

राजा म्हणाला, " हां, खरं आहे हें. पण मी जर खोलींत बसलों, तर धुळीच्या भीतीनं राज्याची धूळधाण झाली, असं होईल ! "

तेव्हां मग सगळे म्हणाले, " तर मग चांभार बोलावून, सगळी पृथ्वी चामड्यानं लपेटून टाकावी. धुळीची पृथ्वी झोळींत घातल्यासारखं होऊन, राजाची थोर कीर्ति मागं राहील त्यामुळं ! "


" योग्य चांभार मिळाला, तर तसं होऊं शकेल, " असंहि म्हणालें सगळे.

चांभाराच्या शोधार्थ राजाचे लोक चोहींकडे धांवत सुटले; पण, योग्य चांभार कांहीं मिळेना, कीं इतकें चामडेंहि मिळेना !

तेव्हां, चांभारांचा प्रमुख असलेला म्हातारा धीर करून पुढं झाला आणि किंचित् हंसून म्हणाला, " परवानगी असली, तर राजांच्या मना-जोगं कशानं होईल, तें मी सांगूं शकतों, आपलीं स्वतःचीं दोन्ही पावलंच झांकलीं, म्हणजे सारी पृथ्वी झांकायचा आटापीटा करायचं कारणच नाहीं ! "

राजा म्हणाला, " हें इतकं सोपं कसं असेल ? सारं गांव विचार कर-करून कासावीस झालंय् ! "

मंत्रि म्हणाला, " लेकाला सुळावर द्या. कोंडून, डांबून ठेवा बेट्याला तुरुंगांत ! "



पण, म्हाताऱ्यानं राजाच्या पायाशीं बसून, अलगत त्याचे दोन्ही पाय चामड्यानं लपेटले. मग राजाच्या पायाला धूळ लागली नाहीं.

तेव्हां मंत्रि लगेच म्हणाला, "माझ्याहि मनांत हेंच होतं. या म्हाताऱ्याला कसं तें कळलं कोणाला माहीत ! "

तेव्हांपासून लोक पायांत जोडे घालायला लागले. गबुचंद्राचा जीव भांड्यांत पडला अन् पृथ्वीमाऊली त्या शहाण्यांच्या तडाख्यांतून सुटली.

—" कल्पना "

# बिंबवती

## ( रूपकथा )

सहेतु सजली राणी, रचिली कबरी,
नव-घन-स्निग्ध रागी नव नीलांबरी [1]
नेसली कवतुकें.
मायेनें भारिलें, झांकिलें अंबरीं,
दर्पण सोनियाचें काढिलें बाहेरीं;
जपोनी मंत्र कांहीं त्याचिया समोरी
आरशालागीं राणी औत्सुक्यें विचारी,
" खरें खरें सांग, जिला जोड नाहीं,
रूपखनि अशी कोण वाहते मही ? "
सस्मित सुंदर, मधुरा वदनी
युवती पाहोनी दचकली राणी
" अगबाई ! बिंबवती ! सवतीची पोर !
धरतीवरती ही का अजोड सुंदर ! "

दुसरे दिवशीं केला दुसरा शृंगार
गळां घातला तिनें पोवळ्यांचा हार;

[1] आपल्याकडे ज्याप्रमाणें काळी चंद्रकळा स्त्रिया वापरतात, त्याप्रमाणें बंगालमध्यें निळीभोर अशी विशिष्ट साडी असते; तिला 'नीलांबरी' म्हणतात.

अजानु पोहोंचला कचसंभार;
लज्जा छायाच जशी,
पदर गुलाबी अंगावरती.
समंत्र धरिलें पुढें सुवर्ण दर्पण,
पुसे, " आतां सर्वांहुनी सुंदर कोण ? "
शशिबिंबासम पुनः तेंच मुख
दिसलें दर्पणीं तों महिषी सन्मुख.
" विषसुमनांचा तिला घातला मी हार,
नाहीं मेली तरीही सवतीची पोर !
बिंबवती धरतीवरी अजोड सुंदर ! "

तिनें बंद केलें मंदीराचें दार
तिनवें दिनीं; केला नखेरला शृंगार,
काजळ-कुंकू केलें; गळां छानदार
मोतीयांचा हार; त्याली शाल्र जरतार.
" खरें खरें बोल रे, " आरशास पुसे,
" रूपराणी कोण ती जगतीं असे ? "
पुनः दर्पणीं आली दिसुनी राणीला
तीच सुंदर बाला; प्राण तडफडला !
लोळ लोळतां शय्येवरी महिषी मुसमुसली,
" पोर सवतीची मारवितां कशी ना मेली!
माझ्या पुढती दिसते, हंसते शिरजोर,
' विश्वसुंदरी ' दावी दर्पण तें चोर !

चवथे दिवशीं थाट निराळा राणीचा
वेणी रचिली, डौल तियेचा नवलाचा,

पिंवळीं वस्त्रें तलम रेशमी, नवी तऱ्हा
नेसायाची; नगांत कोंदण नवें अहा !
सुवर्ण दर्पण पुढतीं धरिलें प्रश्न जुना,
" कोण सुंदरी आवडती सकल जनां ? "
" विखारलेली पोरटी काय समोर पुन्हां ! "
वदली राणी, " अन्य सुंदरा असेच ना ? "

दिवस पांचवा, दिमाख हिरवा नटवीचा
अंगोपांगीं दर्प उकळला रूपाचा.
" रूपखनी माझ्यावाणी असे का कुणी ?
सांग दर्पणा, पुसतसे तुला तुझी राणी "
आरसा दावी प्रश्नासरशीं दोन मुखें !
राजसुतासह हंसे राजसुता सुखें;
वसनें मंगल, माला मंगल शिरीं दिसे
लाही लाही राणीची तेव्हां होत असे
" जगांतुनी घालविली, तरी ती समोर
माझ्या येते ! अगबाई ! सवतीची पोर ! '

अनेकदां जरि सुवर्ण दर्पण घासीलें
बिंब तयांतिल पुसायाचें नाहीं जमलें.
काजळ दुबळें ठरलें चित्रा विचित्र करण्यासी,
आदळ आपट फुकटी ठरली तिचीया हेतूसी.
राणीलागीं दिसून आलें, नाहीं तें सोपें
मुकुर जाळणें; स्वतां पोळली राणी संतापें.

कोसळली ती धरणीवरती, झाली निष्प्राण,
रत्नेंच पेटलीं; अग्नीचें त्यासी आदान !
अपाप म्हणुनी सुंदर सहाजि बिंबवती;
असुयेमाजीं राणी जळली;–कर्मगती !

— " शिशु "



# देवतेचा ग्रास

( गद्यानुवाद )

मैत्र गुरुजी तीर्थस्नानासाठीं सागरसंगमाला जाणार असल्याची वार्ता हळूं हळूं गांवोगांव पसरली. त्यांच्या बरोबर जाण्यासाठीं लहान थोर स्त्री-पुरुषांचा मेळावा जमला. घाटावर दोन नावा तयार राहिल्या.

मोक्षदेलाहि तें पुण्य आपल्याला मिळावं, असं वाटत होतं. मोक्षदा ही एक तरुण विधवा. ती आली आणि हात जोडून म्हणाली, "गुरुजी, मी आपल्याबरोबर येते." तिच्या डोळ्यांतला आर्जवी भाव आणि तिची काकुळतीची विनंति पाहून, तिला 'नको' म्हणणं मोठं कठिण होतं. तरीपण, मैत्र गुरुजी म्हणाले, "जागा कुठं आहे आतां?"

मोक्षदा डोळ्यांत पाणी आणून म्हणाली, "गुरुजी, तुमच्या पायां पडते; कशीबशी, दाटणीवाटणीनं मी जागा करून घेईन." ब्राह्मणाचं मन विरघळलं. तरी देखील, हो ना करीत त्यांनीं विचारलं, "पण, मुलाचं काय करणार?"

मोक्षदा म्हणाली, "कोण? राखाल? तो राहील आपल्या मावशी-

पाशीं. तो झाल्यावर, बाळंतपणांत मला पुष्कळ दिवस ताप येत होता. जगायची सुद्धां आशा नव्हती. तेव्हां अन्नदेनंच आपल्या मुलाबरोबर त्याला जतन केला. तिच्या दुधावरच जतन झालाय राखाल माझा. तेव्हांपासून त्याला माझ्यापेक्षां मावशीचा जास्त ळळा आहे. अवखळ आहे इतका कीं, कोणाला दाद देत नाहीं. त्याच्या खोड्यांबद्दल कांहीं शिक्षा केली, रागावलं त्याला कीं लगेच डोळ्यांत पाणी आणून मावशी त्याला पोटाशीं कवटाळते. तो आईपेक्षां मावशीपाशीं जास्त आनंदांत राहील."

मोक्षदेला बरोबर न्यायला मैत्र गुरुजी कबूल झाले.

मोक्षदेनं घाईघाईनं आंवरासावर केली. बरोबर काय घ्यायचं काय नाहीं, त्याची जुळवाजुळव केली. तिची बांधाबांध झाली. ती वडील-धाऱ्यांच्या पायां पडली. तिचा विरह होणार, म्हणून तिच्या मैत्रिणींना वाईट वाटलं. डोळ्यांत पाणी आणून त्यांनीं तिला निरोप दिला.

मोक्षदा घाटावर पोहोंचली अन् पहाते तों राखाल आधींच तिथं जाऊन नावेंत चढून गुपचुप बसलेला होता.

तिनं विचारलं, "तूं रे कशाला इथं आला आहेस ?"

राखाल म्हणाला, "समुद्रांत जायचंय् मला."

मोक्षदा म्हणाली, "समुद्रांत जायचंय् ? खट्याळ नाहीं तर. चल, उतर खालीं."

स्थिर नजरेनं पाहात राखालनं पुनः दोनच शब्द उच्चारले,

"समुद्रांत जायचंय्."

त्याला ओढून खालीं उतरवण्याचा मोक्षदेनं प्रयत्न केला, तर तो नावेला घट्ट धरून बसला. तिनं पुष्कळ ओढाताण केली, पण त्याची पकड कांहीं सुटेना. शेवटीं मैत्र गुरुजी ममतेनं म्हणाले, "असूं दे, असूं दे. येऊं दे त्याला बरोबर."

मोक्षदा त्रासली आणि मुलाला म्हणाली, "चल, तुला समुद्रांत बुडवते." येवढे शब्द तिच्या तोंडून निघून गेले अन् तिच्या मातृहृदयांत

पश्चात्तापाचे बाण घुसले; तिचा जीव कळवळला! पटकन् डोळे मिटून, तिनं 'नारायण! नारायण!' म्हटलं; मुलाला उराशीं ओढून घेतला आणि त्याच्या साऱ्या अंगावरून मायेचा, आशीर्वादाचा हात फिरवला.

मैत्रमहाशयांनीं तिला हांक मारून हलकेंच म्हटलं, "छे, छे, छे! मोक्षदे, असं म्हणूं नये."

राखालचं जायचं ठरलं. कोणीतरी ती बातमी अन्नदेला कळवली. ती धांवतच आली. "अरे, चाललास कुठं?" अन्नदेनं उतावीळपणानं राखालला विचारलं.

राखाल हंसून म्हणाला, "समुद्रांत चाललोय् मावशी. येईन पुन्हां परत."

वेड्यासारखी होऊन अन्नदा म्हणाली, "गुरुजी, फार खोडकर आहे राखाल माझा, कोण त्याला आवरणार? जन्मल्यापासून मावशीला सोडून राहिलेला नाहीं तो कुठं. त्याला ठेवून चला."

राखाल म्हणाला, "अग मावशी, मला समुद्राच्या पाण्यांत बुडी मारायची आहे. येईन मी पुनः परत."

मैत्रभटजी प्रेमळपणानं म्हणाले, "मी आहे तोंवर तुझ्या राखालची तूं काळजी करूं नको बरं बाई. थंडीचे दिवस आहेत आतां. नदी-नद शांत असतात. बरोबर यात्रेकरू मंडळीहि बरीच आहेत. जातां येतां मिळून दोन महिने लागतील जेमतेम. तुझा राखाल तुझ्यापाशीं सुखरूप पोंचता करीन बरं."

ठरलेल्या शुभ मुहूर्तावर, दुर्गेचं नामस्मरण करून नाव सुरूं करण्यांत आली. पोंचवायला आलेल्या स्त्रिया नदीकांठीं उभ्या होत्या; त्यांचे डोळे पाण्यानं भरले होते. सकाळच्या दंवबिंदूमुळं, चूर्णी नदीकांठच्या त्या गांवाच्या डोळ्यांत आंसवं उभीं राहिल्यासारखं वाटत होतं.

× × × ×

तीर्थस्नानादि आवरल्यावर मंडळी परतूं लागली. येतांना भरती येण्याचा संभव वाटल्यानं नावा एका किनाऱ्याशीं भिडवलेल्या होत्या. संध्याकाळची वेळ होती. घरची आठवण झाल्यानं राखालच्या जीवाला

हुरहुर वाटत होती; त्याचं कुतूहल आतां संपलेलं होतं; त्याला मावशीची आठवण येत होती. पाणी, नुसतं पाणीच पाणी पाहून त्याला कंटाळा आला होता. जणुं कांहीं, एखाद्या अजस्र, काळ्याकुट्ट सापाप्रमाणं अफाट पसरलेलं तें पाणी लाखों फणा काढून, जिभल्या चाटीत, जमिनीवरच्या बाळांवर नजर ठेऊन, रोजच्या रोज फुत्कार टाकीत नाचत होतं !

हे सर्व-सहनशील प्रेमळे, श्यामल-कोमल धरणीमाते,......कोणी, कोठेंहि असला, तरी दोन्ही बाहू पसरून तूं त्याला आपल्या प्रशांत उराशीं कवटाळण्यासाठीं हांका मारीत असतेस.....

अरतून परतून अचपळ राखाल येऊन मैत्रभटजींना विचारूं लागला, " गुरुजी, पाण्याला भरती केव्हां येणार ? "

एकाएकीं सुशांत प्रवाहांत खळ्खळ् सुरूं झाली. दोन्ही थडींनीं भरती आल्याची बातमी पाण्यांत खळ्खळून उठली. नावेचं तोंड फिरलं. वल्ह्यांना ओढ बसूं लागली. खळ्खळ् खळ्खळ् आवाजांत समुद्राचा विजयरथ नदींत शिरला. भरती आली पाण्याला. नावाड्यानं देवाचं नांव घेऊन, गडबडीनं उत्तरेकडे नाव सोडली. राखाल गुरुजींपाशीं आला आणि त्यानं विचारलं, " गांवाला कधीं पोंचणार आपण ? "

सूर्यास्त होण्याच्या आंत, कोस दोन कोसांवर उत्तरेच्या वाऱ्याचा वेग वाढला. भरतीच्या लाटा आणि उत्तरेचा वारा यांच्यांत त्या बारीक नदीच्या वाटेवर युद्ध सुरूं झालं. युद्धाला रंग चढूं लागला. " नाव भिडवा किनाऱ्याला " म्हणून यात्रेकरू पुनःपुनः मोठ्यानं ओरडूं लागले. पण, किनारा होता कुठं ? खवळलेल्या उन्मत्त पाण्यानं लक्ष लक्ष हातांनीं टाळ्या वाजवीत तांडवनृत्य आरंभलं होतं चोहींकडे ! फेंसाळ गर्जनेनं जणुं कांहीं आकाशाला अपशब्दांचा आहेर करूं लागलं होतं तें ! अगदीं दूरच्या तटावर वनाची निळी रेषा दिसत होती. दुसरीकडं प्रक्षुब्ध प्रवाह उसळ्या मारून अस्तगामी सूर्यापर्यंत पोंचण्याचा प्रयत्न करीत होता; जसा कांहीं त्याच्या अंगांत उद्धट विद्रोहाचा संचार झाला होता. नाव नावाड्याच्या प्रयत्नांना दाद देईनाशी झाली. शुद्ध हरपलेल्या

दारुड्यासारखे तोल जाऊन ती झोकांड्या खाऊं लागली. थंड वाऱ्यांत भीताचा हिंव मिसळल्यानं यात्रेकरू स्त्री-पुरुषांच्या अंगांत कांपरं भरल्या-सारखं झालं. कोणाची बोबडी वळली, तर कोणी आप्तस्वकीयांना मोठ्यानं हांका मारून रडूं-ओरडूं लागले. मैत्रगुरुजींच्या तोंडचं पाणी पळालं; चेहरा पांढरा फटक पडला. डोळे मिटून ते इष्टदेवतांचं नाम-स्मरण करूं लागले.—आणि राखाल आईच्या कुशींत तोंड खुपसून, कांपत होता. गपचूप झाला होता अगदीं सारा प्रकार पाहून.

नावाड्याला कांहीं सुचेना—बेचैन झाला होता तो. तेवढ्यांत कांहीं तरी आठवल्यासारखं तो म्हणाला, "बाबांनों, तुमच्यापैकीं कोणीतरी देवाला फसवलेलं आहे खास. म्हणूनच, अवेळीं या लाटा उसळल्या आहेत, तुफान आलं आहे.—सांगतो ऐका, कोणी काय नवस केला असेल, तर आत्तांच्या आत्तां फेडून टाका. कोपलेल्या देवतेशीं खेळ करूं नका." लगेच कोणी कपडे, कोणी पैसे, ज्याला जें शक्य होतं तें मागचा पुढचा विचार न करतां, पाण्यांत टाकायला सुरुवात केली. तरी देखील, पुढच्याच क्षणीं डोळ्याचं पातं लवायच्या आंत एक जोराची उसळी मारून पाणी नावेंत शिरलं. लगेच नावाडी ओरडला, "देवतेचं धन कोण परत घेऊन निघालं असेल, त्यानं या वेळीं ऐकलंच पाहिजे!" तेवढ्यांत मैत्र भटजी उठले आणि मोक्षदेकडे पहात म्हणाले, "हीच ती! आपलं मूल देवाला समर्पण करून, आतां लपवून परत घेऊन निघाली आहे!"

भीतीनं बेभान झालेले यात्रेकरू निष्ठुरपणें एकमुखानं गरजले, "फेका त्याला!"

मोक्षदेनं दोन्ही हातांनीं राखालला उराशीं घट्ट कवटाळून आर्जवानं म्हटलं, "गुरुजी, वांचवा, वांचवा!"

गुरुजी तिच्या अंगावर खेंकसून ओरडले, "कोण वांचवणार? रागानं बेभान झालीस अन् आई होऊन पोटचा गोळा देवतेला वाहि-लास!—आणि आतां मी वांचवूं म्हणतेस? फेड आतां देवतेचं ऋण. नवस मोडून इतके जीव पाण्यांत बुडवणार आहेस कीं काय?"

मोक्षदा काकुळतीनं म्हणाली, " मी महामूर्ख बाई आहे. मीं रागाच्या भरांत जें बोलून गेलें, परमेश्वरा, तेंच का खरं होणार ? तें माझं म्हणणं किती खोटं होतं, तें तुला कळलं नाहीं का देवा ? नुसते माझ्या तोंडचे शब्दच का ऐकलेस तूं ? आईच्या आतड्याचे बोल नाहीं का आले ऐकूं तुला ? "

मोक्षदेचं बोलणं चालूं असतांनाच साऱ्यांनीं मिळून राखालला त्याच्या आईच्या कुशींतून खेंचून, हिसकावून घेतला. मैत्र गुरुजींनीं दोन्ही डोळे मिटले, दांत आंवळून धरले, कान हातांनीं दाबून धरले, आणि दुसरीकडे तोंड वळवलं ! एकाएकीं त्यांच्या काळजाला विजेचा झटका लागावा, तसं झालं; विंचू डसल्यासारखं झालं त्यांना. ,, मावशीऽ, माव-शी गऽ ! " अशी त्या निष्पाप, असहाय बालकाची शेवटची हाक एखाद्या आगीच्या ज्वालेसारखी त्यांच्या कानांत घुसली.

ब्राह्मणानं टाहो फोडला, " राहूं दे, राहूं दे,–वांचवा–वांचवा ! " डोळे उघडतांच, त्यांना मोक्षदा त्यांच्या पायापाशीं मूर्च्छा येऊन पडलेली दिसली.

एक क्षणभरच, उसळत्या लाटांतून डोळे उघडून केविलवाण्या नजरेनं त्या बाळानं वर पाहिलं;—आणि " मावशी !! " असं आर्तपणें ओरडून तो अनंत अंधारांत दिसेनासा झाला. फक्त दोन लहान मुठी एकदां दोनदां पाण्यावर आल्या—जणुं कांहीं आकाशांचा आधार घेण्यासाठीं त्या धडपडत होत्या—आणि निराशेनं त्यांनींहि पाण्यांत बुडी मारली !

" परत आणीन तुला, " असं, मोठ्यानं श्वास घेऊन मैत्र गुरुजी एकदां म्हणाले आणि त्याच क्षणीं त्यांनीं पाण्यांत सूर मारला; पुनः कांहीं ते वर आले नाहींत—सूर्यास्त झाला !!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 33953 वि: 3
क्रमांक 2452 नों: दि:

## बंदीवीर

पंच नदीतीरीं
कबरी डोईवरी
दखतां डोळां गुरुमंत्रें जागरित झाला शीख
निर्मम निर्भीक.
सहस्र कंठीं "गुरुजीकी जय" घुमवित चहुंदिक्-
नव जागरित शीख
सूर्य नवा, नवीन उषा, पाहती निर्निमिख.

"अलख निरंजन—"
महारव उठे, बंधन तुटे, करी भय-भंजन,
वक्षसमीप महोल्लासें असि वाजे खण् खण्,
उठे पंजाब गरजत आज "अलख निरंजन"

येत एक दिन
लक्ष प्राण निर्भय मन ठेविती न ऋण;
जीवन मृत्यु पायींचे भृत्य चित्त चिंताहीन
दशतीर घेरि ( घेऊन भेरी ) येत एक दिन.

दिल्ली शहेरीं
राजमंदिरीं
बादशाही बारबार झोंप फरारी;

तम–ताडन, नभमंथन कोण रव करी ?
गगन लाल, कोण ज्वाल, घोर अंतरीं !

पंच नदीतीरीं
भक्त देहीं मुक्त होत लोहित लहरी
लक्ष लक्ष उरीं
असती जे प्राण, पक्षीसमान उडति का निज घरीं ?
लावि लालि जननी भालीं वीर निज करीं
पंच नदीतीरीं.

शिखी–मोगल–रणीं
मृत्यु–आलिंगनीं
निकट कंठिं मिठि विकटी लढती घालुनी
दंत क्षत श्येन, उरग जणुं रणांगणीं
कठिणशा रणीं
"गुरुजिकी जय" घोष घोर होत त्या दिनीं.

गुरुदासपूर गडीं
तो 'बंदा' करि बंदा तुरक संगरीं,
शृंखलाहि बद्ध होई हरित जो हरि,
दिल्लि शहेरीं
बंदिवान बंदा हो !—गुरुदासपूर गडीं

धूलि उठवि अग्रेसर सैन्य मोगली
भाल्यावर शीखरूंड धरुनि चालली
सेनेला बघण्याला गर्दि लोटली
सौधावरिं, वातायनिं भरुनि वाहिली
चरणचाल उडवि धूळ शीख मोगली
अभय शीख, "गुरुजिकि जय" हांक गर्जली

'मी' 'मी' चा अभिमान !
पुण्य पर्वणीं, सर्वांआधीं करावया बलिदान.
निशा संपली, उषा उगवली, ठाकले धीमान
'गुरुजिकि जय,' घोष निर्भय, पुढती देती मान.
सप्ताह कालीं सातशें बळी पुरे जाहल्यावरी
काझी यमाजी बंदा-नंदन उचलोनीया धरी
आज्ञा तो करी, 'तुझ्या तूं करीं पुत्रवध हा करी,
फेकी अंकावरी
बंदा-नंदन खच्चुन बांधुन आणिला होता करीं.

उमटे न शब्द एकहि
धरि धिटाई, पिताजि घेई उरीं सुता लवलाही
क्षणभरी तात, मस्तकीं हात ठेविता झाला
रुमालावरीं ओष्ठ पळभरी चुंबिलें बाळा
लगोलगे जाहला मागें उपसली सुरी
नेत्र आननीं नीट रोंखुनी
'गुरुजिकी जय' बोलला कानीं, 'भीति ना धरी.'

शोभन वदनीं, निर्भय नयनीं, किरणें उत्साही,
'गुरुजिकी जय,' कां मग भय, म्हणत पित्याला बाही.
कंपित जनमन जयध्वनि ऐकुन, नंदन वंदन गाई.
डाव्या बाहुवरी नीट बंदा धरी सुकुमार आपुला बाळ
उजूं हातीं सुरी सुताच्या उरीं खुपसली जाहला काळ !
'गुरुजिकी जय,' गर्जुनी असें विगलित वेल्हाळ !
स्तंभित तैं वाचा
शलाका लाल, असुरी भाल, फाडिला देह बंदाचा !
उभा तो जरी मरण-दारीं, नुमटे श्वास दुःखाचा
दर्शकजन मिटती नयन, स्तंभित तैं वाचा !!

"कथा"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९२३६७. अनुक्रम ३३९०३ ... दि: ५/२.......

## जीवनीं केली पूजा

**जीवनीं केली पूजा, अपुरी राहिली**
**जाणितो तरी ना ती विफल जहाली !**

फूल ना फुललें तों पडलें गळून,
वाळूंत वाळलेलें नदीचें जीवन,
जाणितो तरी ना तें विफल म्हणून.

जीवनीं जितुकें माघारीं राहिलें
जाणितो मनीं ना तें फुकाचि गेलें;
जाणिवेविण माझ्या स्पर्शाहि वांचून
तुझिया वीणेवरी राहील वाजून
मानितो होईना तें विफल म्हणून !

— **गीतांजलि**

REFBK-0012367

◆ ◆ ◆